GODAVARI FOUNDATION'S
DR. ULHAS PATIL MEDICAL COLLEGE & HOSPITAL
Recognized by National Medical Commission, Approved by Central Govt. of India, New Delhi,
Letter no. MCI-34(41)/2012-med./158127, dated 05/02/2013
Affiliated to Maharashtra University of Health Sciences, Nashik [College Code-1306]
Jalgaon-Bhusawal Road, Jalgaon Kh, Tal. & Dist. Jalgaon 425309 Tel. No.(0257)2366657, 2366678
Email ID : dupmcj@yahoo.in, dupmcj@gmail.com Website : www.dupmc.ac.in
NAAC ACCREDITED

# HEALTH CARE FACILITIES

Dr Ulhas Patil Medical College and Hospital conduct Various medical health camps for the community. The patients attend these camps in order to receive free medical care. Each and every person should get the proper type of health examination, taking into account several essential factors such as age, lifestyle, family history, and hazards. Health camps are organized by Dr. Ulhas Patil Medical College and Hospital, peoples located in rural and urban region of the North Maharashtra (Khandesh). For health checkups, doctors, surgeons, residents, interns, nurses, and paramedical staff members visit villages. Clinically diagnosed or screened individuals receive treatment at health camps. Patients who require additional diagnostic testing are moved to the tertiary care hospital of institute. Dr Ulhas Patil Medical College and Hospital,Jalgaon Kh, is providing healthcare facilities to Airport Authority of India, Jalgaon Airport, Indian Railways Bhusawal and Jalgaon railway station. Our health services are provided to State Transport of Maharashtra, Bhusawal bus stand. PAll the health schemes of government are practiced in our hospital. Institute is receiving praise from the community for its health care camps and initiatives.

लोकमत

# उल्हास पाटील रुग्णालयाच्या वतीने विमानतळावर आरोग्य केंद्राची सुविधा

लोकमत न्यूज नेटवर्क

**जळगाव :** एअरपोर्ट ऑथॉरिटी ऑफ इंडिया, जळगाव विमानतळ व गोदावरी फाउंडेशन संचालित डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने जळगाव विमानतळावर मोफत वैद्यकीय सुविधा केंद्र सुरु करण्यात आले.

याप्रसंगी जळगाव विमानतळाचे संचालक हर्ष त्रिपाठी, गोदावरी फाऊंडेशनच्या संचालिका डॉ.केतकी पाटील, डॉ.उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयाचे डायरेक्टर डॉ. एन. एस.



आर्वीकर, वैद्यकीय अधीक्षक डॉ.प्रेमचंद पंडित, डॉ.सुभाष बडगुजर, प्रशासकीय अधिकारी अशोक भिडे आदी उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते धन्वंतरी देवतेचे पूजन करण्यात आले. प्रवाशांनी तसेच कर्मचाऱ्यांनी आरोग्य केंद्राचा लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ.केतकी पाटील यांनी केले आहे. (वा.प्र.)

Jalgaon Main
Page No. 4 Jun 04, 2025
Powered by: erelego.com

साप्ताहिक गोदावरी परिवार ✻ सोमवार ०७/०७/२०२५ ✻

# गोदावरी फाउंडेशनतर्फे भुसावळ बस स्थानकामध्ये रुग्णसेवा बुथ कार्यान्वित

जळगाव - भुसावळ बस (एस टी) स्थानक परिसरात दररोज हजारोंच्या संख्येने प्रवासी वर्गाची कामानिमित्त रेलचेल सुरु असते. येथे येणाऱ्या प्रवाशांना तसेच बस आगारातील कर्मचाऱ्यांना तात्काळ वैद्यकीय सुविधा मिळाव्यात, या साठी गोदावरी फाऊंडेशन संचलित डॉ उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व धर्मदाय रुग्णालयातर्फे नि:शुल्क ओपीडी सेवा केंद्राचे सोमवार दिनांक ३० जून रोजी उदघाटन करण्यात आले.

याप्रसंगी गोदावरी फाऊंडेशन च्या संचालिका डॉ केतकी ताई पाटील, जळगाव जिल्हा महामंडळ परिवहन विभागाचे नियंत्रक श्री भगवान जगनोर, भुसावळ स्थानक नियंत्रक श्री शिवदे यांच्या हस्ते फित कापून उदघाटन झाले. लगेचच प्रवाशी रुग्णांची तपासणी सुद्धा सुरु झाली.



या वेळी डॉ उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयाचे संचालक डॉ एन एस आर्वीकर, अधिष्ठाता डॉ प्रशांत सोळंके, वैद्यकीय अधीक्षक डॉ प्रेमचंद पंडित, डॉ सुभाष बडगुजर, जीआयएमआरचे संचालक डॉ प्रशांत वारके, भुसावळ येथील डॉ उल्हास पाटील स्कूल च्या मुख्याध्यापिका अनघा पाटील, सन ॲंड ॲडव्हर्टाइजचे मंगेश दादा जुनागडे आदी उपस्थित होते. या प्रसंगी एस टी महामंडळाचे विभागीय नियंत्रक श्री भगवान जगनोर यांनी आरोग्य कक्षाची पाहून करून समाधान व्यक्त केले. सदरचा उपक्रम हा महामंडळाच्या प्रवाशांसाठी खूप उपयुक्त असा ठरणार असून या माध्यमातून प्रवाशांना विविध आजारांवर मोफत उपचार उपलब्ध होणार आहेत त्याबद्दल गोदावरी फाउंडेशन चे आभार मानले.

याप्रसंगी बोलताना गोदावरी फाउंडेशनच्या सदस्या डॉ केतकीताई पाटील यांनी या आरोग्य कक्षाच्या माध्यमातून प्रवाशांना अधिकाधिक चांगली वैद्यकीय सेवा देण्याचा मानस राहील अशी ग्वाही दिली. केवळ प्रवासी च नाही तर बस आगारातील कर्मचारी, परिसरातील नागरिकांसाठी आरोग्य तपासणी सेवा उपलब्ध करून दिली असून सर्व प्राथमिक उपचार येथे केल्या जातील. तसेच अधिक वैद्यकीय उपचारांची गरज भासल्यास पुढील उपचार डॉ उल्हास पाटील रुग्णालयात केले जाणार आहे. या प्रकारचा उपक्रम लवकरच जळगाव बस स्थानकावर देखील सुरू करण्यात येणार असल्याचे डॉ केतकी पाटील म्हणाल्या.

कार्यक्रमात लगेचच पेशंट तपासणीला सुरुवात झालेली असून सुमारे १५ रुग्णांनी या सेवेचा पहिल्या तासाभरातच लाभ घेतला. तसेच आम्हा प्रवाशांसाठी चांगली सुविधा उपलब्ध करून दिल्याने प्रवाशी वर्गामध्ये समाधान दिसून आले. या प्रसंगी गोदावरी नर्सिंग कॉलेजचे इन्चार्ज श्री आकाश धनगर, इंटेरियर चे श्री रामपाल जांगिड तसेच गोदावरी फाउंडेशन चे प्रा चंद्रकांत डोंगरे, प्रा पंकज बोंडे, रितेश पाटील यांच्यासह महामंडळातील कर्मचारी व मोठ्या संख्येने प्रवासी उपस्थित होते.


GPS Map Camera
Bhusawal, Maharashtra, India
2qwq+h68, Gandhi Nagar, Gadkari Nagar,
Bhusawal, Maharashtra 425201, India
Lat 21.046395° Long 75.788195°
25/07/2025 06:34 PM GMT +05:30
Google


GPS Map Camera
Jalgaon, Maharashtra, India
A3/2286, Station Rd, Navi Peth, Shahunagar, Jalgaon, Maharashtra
425001, India
Lat 21.017849° Long 75.563295°
25/07/2025 06:35 PM GMT +05:30
Google


GPS Map Camera
Jalgaon, Maharashtra, India
Xj69+hm7 Jalgaon Airport, Aurangabad - Ajanta - Jalgaon Rd, Mehrun, Tambapura, Jalgaon, Maharashtra 425003, India
Lat 20.961292° Long 75.619046°
25/07/2025 06:36 PM GMT +05:30


"Free Medical Facility"
Provided By
Godavari Foundation's
Dr.Ulhas Patil Medical College & Hospital, Jalgaon
In Association with
Airports Authority of India
Jalgaon Airport
PULL
PULL
GPS Map Camera
Jalgaon, Maharashtra, India
Xj69+hm7 Jalgaon Airport, Aurangabad - Ajanta - Jalgaon Rd, Mehrun, Tambapura, Jalgaon, Maharashtra 425003, India
Lat 20.961243° Long 75.619027°
25/07/2025 06:33 PM GMT +05:30

साप्ताहिक
# गोदावरी परिवार
RNI Regd. No.: MAHMAR/1999/7490




सवलतीचा पोष्ट रजि. नं. JAL/120/2024-2026

* वर्ष २६ वे * अंक २३ * सोमवार ०९/०६/२०२५ * डाक ११/०६/२०२५ * पाने - ४ * किंमत २ रुपये
* year 26 * issue 23 * monday : 09 / 06 / 2025 * post Dt. 11/ 06 / 2025 * pages - 4 * price 2 Rs.

# तीन वर्षीय बालिकेला ब्रॉन्कोस्कोपीद्वारे मिळाले जीवदान

## डॉ. उल्हास पाटील रूग्णालयातील बालरोग शल्यचिकीत्सकांच्या टीमचे यश

**जळगाव - येथील डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय रूग्णालयात एका तीन वर्षीय बालिकेवर ब्रॉन्कोस्कोपीची शस्त्रक्रिया करून श्वासनलिकेत अडकलेला मक्याचा दाणा काढण्यात बालरोग शल्यचिकीत्सक आणि त्यांच्या टीमला यश आले आहे. या शस्त्रक्रियेमुळे बालिकेचा पुर्नजन्मच झाल्याची अनुभूती आली.**

याबाबत माहिती अशी की, निवांशी बडगुजर या तीन वर्षीय बालिकेने चिंगम गिळल्याचे तिच्या पालकांना वाटले. त्यामुळे तिला श्वास घेण्यास त्रास होत होता. त्यांनी स्थानिक ठिकाणी दाखविले असता त्यांना जळगावला पाठविण्यात आले. बडगुजर दाम्पत्यांनी त्यांच्या मुलीला डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय रूग्णालयात दाखल करण्यात आले. याठिकाणी शस्त्रक्रिया विभागातील बालरोग शल्यचिकीत्सक डॉ. मिलींद जोशी यांनी बालिकेची तपासणी केली. तिची ऑक्सीजन पातळी अत्यंत कमी होती.



रुग्णासमवेत तज्ञ डॉक्टर आणि त्यांची टीम छायाचित्रात दिसत आहे. (छायाचित्र : नितीन नेवे)

त्यामुळे तिला कृत्रीम श्वासोच्छवास लावण्यात आला होता. बालिकेचे सीटी स्कॅन करण्यात आल्यानंतर तिच्या श्वसन नलिकेत मक्याचा दाणा अडकल्याचे दिसून आले. त्यामुळे उजव्या फुफ्फुसाचा काही भाग पूर्णपणे निष्क्रिय झाला होता आणि तिला श्वास घेण्यासाठी खूप त्रास होत होता. डॉ. जोशी यांनी तातडीने तिच्यावर शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला.

शस्त्रक्रियेनंतर ऑक्सीजन पातळी नियंत्रीत बालरोग शल्यचिकित्सक डॉ. मिलींद जोशी यांच्या पथकाने अत्यंत कौशल्याने ब्रॉन्कोस्कोपी शस्त्रक्रिया पार पाडली. काही मिनिटांच्या नाजूक प्रक्रियेनंतर मक्याचा अडकलेला दाणा यशस्वीरित्या बाहेर काढण्यात आला. त्यानंतर लगेचच बालिकेची ऑक्सिजन पातळी सुधारू लागली. शस्त्रक्रियेनंतर तिला पीआयसीयू विभागात निगराणीखाली ठेवण्यात आले आणि दोन दिवसांत ती पूर्णतः स्थिर झाली.

या शस्त्रक्रियेसाठी विभागप्रमुख डॉ. शिवाजी सादुलवाड यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. वैभव फरके, डॉ. श्वेता गाढवे, डॉ. सहर हमदुल्ले व भूलशास्त्र तज्ज्ञांनी सहकार्य केले. पीआयसीयू विभागात नवजात शिशु तज्ज्ञ डॉ. सुयोग तन्नीरवार, डॉ. उमाकांत अणेकर, डॉ. चंदाराणी देगूलरकर, डॉ. ओमश्री गुडे, डॉ. अमित यांनी सहकार्य केले.

लहान मुलांकडे लक्ष देणे खूप आवश्यक आहे. त्यांची प्रत्येक हालचाल टिपली गेली पाहिजे. निवांशी बडगुजर ह्या बालिकेच्या श्वासनलिकेत मक्याचा दाणा अडकल्याने तिच्या जीवावर बेतणार होते. परंतु वेळीच त्यांनी रूग्णालयात दाखल केल्याने तीचा जीव वाचला. आपल्या परिसरात अशी काही घटना घडल्यास त्वरीत डॉक्टरशी संपर्क साधावा.



- डॉ. श्वेता गाढवे
निवासी डॉक्टर

## डॉ.उल्हास पाटील रूग्णालयात ६४ स्लाईस सीटी स्कॅन

**जळगाव- जिल्ह्यातील डॉ. उल्हास पाटील धर्मदाय रुग्णालयाने अत्याधुनिक ६४-स्लाईस सीटी स्कॅन मशीनची सुविधा उपलब्ध करून दिली आहे.**

या यंत्राद्वारे शरीराच्या विविध भागांचे अचूक आणि सुस्पष्ट प्रतिमांकन करता येते, ज्यामुळे विविध आजारांचे निदान अधिक प्रभावीपणे करता येते. रुग्णालयात १.५ टेस्ला क्षमतेची एमआरआय मशीन आणि अत्याधुनिक सीटी स्कॅन मशीन २४ तास कार्यरत आहेत, ज्यामुळे आपत्कालीन परिस्थितीतही त्वरित तपासणी शक्य होते. रेडिओलॉजी सेंटरमध्ये सीटी स्कॅन किंवा एमआरआयसाठी मोठा खर्च येतो, परंतु डॉ. उल्हास पाटील रुग्णालयात या सेवा माफक दरात उपलब्ध आहेत. रुग्णालय प्रशासनाने रुग्णांना या सुविधांचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे. या नवीन सुविधेमुळे जळगाव जिल्ह्यातील रुग्णांना अचूक निदान आणि त्वरित उपचार मिळण्यास मदत होइल.


### डॉ. उल्हास पाटील रूग्णालयात

## नासूरवर दुर्बिणीद्वारे अत्याधुनिक शस्त्रक्रियेची सुविधा

### कान-नाक-घसा विभागातील तज्ज्ञांकडून निदान आणि प्रभावी उपचार

**जळगाव : शहरातील नामांकित डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात आता नासूर या व्याधीवर दुर्बिणीद्वारे अत्याधुनिक शस्त्रक्रिया केली जात आहे. कान-नाक-घसा विभागातील तज्ज्ञ डॉक्टरांच्या कार्यक्षमतेमुळे जिल्ह्यातील रुग्णांना आता नासूरसाठी पुणे, मुंबई किंवा औरंगाबादसारख्या मोठ्या शहरात जाण्याची आवश्यकता उरलेली नाही.**

नाकामधील श्वसनमार्गाला लागून असलेले कपाळ, गाल, डोळ्याच्या आसपासचे व जबड्याखालचे कोष काही वेळेस संसर्गामुळे सुजतात. यास सिनुसायटिस म्हणतात. हे वेळीच लक्षात न घेतल्यास त्याचा परिणाम डोकेदुखी, नाक बंद राहणे, चेहऱ्यावर दाब जाणवणे, डोळ्यांतून पाणी येणे अशा त्रासातून होतो. दीर्घकाळ टाळल्यास तो क्रोनिक नासूर बनतो आणि औषधांमुळे आराम न मिळाल्यास शस्त्रक्रिया आवश्यक ठरते.डॉ. उल्हास पाटील रुग्णालयात आता या व्याधीवर अत्याधुनिक पध्दतीने शस्त्रक्रिया सुविधा उपलब्ध झाली आहे. या प्रक्रियेत नाकातून छोटी दुर्बीण व सूक्ष्म उपकरणे वापरून नासूरग्रस्त कोष साफ केले जातात.



या प्रक्रियेमुळे चेहऱ्यावर कोणताही टाका लागत नाही, रुग्णाला फारसा त्रास होत नाही आणि उपचारानंतर लगेच बरे वाटते.या विभागात सुसज्ज ओटी (ऑपरेशन थिएटर), आधुनिक उपकरणे, अनुभव संपन्न सर्जन्स व प्रशिक्षित स्टाफ असल्यामुळे शस्त्रक्रिया अतिशय सुरक्षित आणि यशस्वीपणे पार पडते. रुग्णाचा हॉस्पिटलमध्ये मुक्कामही फारसा लागत नाही.

डॉ. उल्हास पाटील रुग्णालय हे उत्तर महाराष्ट्रातील एक प्रगत वैद्यकीय सेवा देणारे केंद्र असून, विविध विभागांमध्ये आधुनिक उपचारपद्धती लागू करून रुग्णसेवेस तत्पर आहे.नासूर, वारंवार सर्दी, नाक बंद होणे, चेहऱ्यावर सतत दाब जाणवणे असे त्रास असल्यास तज्ज्ञांचा सल्ला घेणे आवश्यक आहे. या नव्या सुविधेमुळे रुग्णांना सहज व अचूक निदानासह परिणामकारक उपचार मिळू लागले आहेत.



- डॉ. अनुश्री अग्रवाल, विभागप्रमुख,
कान-नाक-घसा विभाग

# अतिजोखमीच्या प्रसूतीत स्त्रीरोग तज्ज्ञांचे यश

**जळगाव : डॉ. उल्हास पाटील रुग्णालयातील स्त्रीरोग तज्ज्ञांनी पुन्हा एकदा आपली कार्यक्षमतेची झलक दाखवली आहे. जन्मत: पोलिओ ग्रस्त आणि वजनाने अधिक असलेल्या एका महिलेला गरोदरपणाच्या सातव्या महिन्यात मधुमेहाचे निदान झाले होते. या सर्व जोखमीच्या पार्श्वभूमीवर तिची प्रसूती ही वैद्यकीयदृष्ट्या खूप गुंतागुंतीची होती, मात्र डॉक्टरांच्या समन्वयित प्रयत्नातून आपात्कालीन सिझेरियन शस्त्रक्रिया यशस्वी करण्यात आली.**

याबाबत माहिती अशी की, दिपाली सोनवणे (वय ३२) या महिलेचे नऊ वर्षांपूर्वी पहिले सिझर झाले होते. दरम्यान नऊ वर्षानंतर ती पुन्हा गरोदर राहिली. तिला प्रसूतीसाठी डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय रूग्णालयात दाखल करण्यात आले. या महिला रूग्णाला



पोलिओमुळे बाल्यापासूनच हालचालींमध्ये मर्यादित होती. तिचे वजनदेखील सामान्य महिलांच्या तुलनेत खूप जास्त होते. याशिवाय, गरोदरपणात तिला गर्भाशयावर अतिरिक्त ताण जाणवत होता. सातव्या महिन्यात तपासणीत तिच्या रक्तातील साखरेचे प्रमाण अतिशय वाढलेले आढळून आले आणि गर्भाशयाच्या वाढीबाबतही चिंता निर्माण झाली. मधुमेहामुळे भ्रूणाच्या आरोग्यावरही धोका निर्माण झाला होता.

या सर्व पार्श्वभूमीवर डॉ. उल्हास पाटील रुग्णालयातील स्त्रीरोग विभागाच्या विभागप्रमुख डॉ. माया आर्विकर यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. वैभव पाटील, डॉ. प्रिया राठोड, डॉ. अनुजा चलाख, डॉ. मृदूला मुंगसे, डॉ. हंसिया पिल्लई, डॉ. करूणेश गुप्ता यांच्या टीमने आपत्कालीन परिस्थिती ओळखून संभाव्य धोके लक्षात घेत सिझेरीयनद्वारे यशस्वी प्रसूती केली. या महिलेला गोंडस असे कन्यारत्न प्राप्त झाले. प्रसूतीनंतर महिला रुग्णाची प्रकृती आता ठणठणीत आहे.

## संपादकीय

# असह्य ताण

महिला आणि ताणतणाव यांचे नाते बहुधा तिच्या जन्मापासूनच जुळत असावे. मुलगी झाली म्हणून अनेक पालकांना ताण येतो. मुलगी जसजशी मोठी होते तसतसा तिला सामाजिक भेदभावाचा सामना करावा लागतो. समाजरचनेतील दुय्यमत्वाचा ताण बहुसंख्य महिलांना त्यांच्या अखेरच्या श्वासापर्यंत सहन करावा लागतो. तथापि याच ताणतणावामुळे महिलांमध्ये भावनिक स्थितीत वारंवार बदल (मड स्विंग्ज) होण्याची समस्या वेगाने वाढत असल्याचे निरीक्षण स्त्रीरोगतज्ज्ञ नोंदवतात. ही समस्या विविध प्रकारच्या मानसिक आणि शारीरिक समस्यांची जननी ठरण्याचा धोकाही त्या वर्तवतात. महिलांना किती प्रकारचा ताण सहन करावा लागतो याची नुसती नोंद घ्यायची ठरवली तरी ती यादी कदाचित मारुतीच्या शेपटाप्रमाणे वाढतच जाऊ शकेल. अर्थात, पुरुषांनाही ताण असतातच. त्यांनाही मानसिक समस्या जाणवतात. तथापि समाजरचनेमुळे महिलांना अंमळ जास्तच ताण सहन करावा लागतो हे वास्तव आहे. याची अनेक कारणे सांगितली जातात. जसे की, कौटुंबिक पातळीवर चढउतार, आप्तांचे मृत्यू, मुलांमधील अस्थिरता, नोकरीच्या ठिकाणचे वातावरण आणि वर्तणूक, मासिक पाळी, त्यामुळे होणारे संप्रेरकांमधील बदल, रजोनिवृत्ती इत्यादी इत्यादी. पण यामध्ये महिलांनाही स्वतःला दुय्यम मानायची लागलेली सवय प्रमुख कारण मानले जायला हवे. परिणामी कोणत्याही पातळीवर त्या स्वतःला प्राधान्य देत नाहीत. त्याची सुरुवात आहार-विहारासारख्या प्राथमिक स्तरापासून केली जाऊ शकेल. पात्रता आणि क्षमता असूनही ठरवून स्वतःला दुसर्‍या स्थानावर ठेवणे अवघडच असते. हे सोंग सर्वात जास्त ताण निर्माण करते. दुसरीकडे शरीर साथ देत नाही याची चाहूल त्यांच्याशिवाय अन्य कोणाला लागणार? तथापि महिला ते मान्यच करत नाहीत, असेही तज्ज्ञांचे निरीक्षण आहे. तथापि अशा मानसिकतेमुळे निर्माण होणार्‍या समस्या लक्षात घेता महिलांनी त्यांच्या सवयींमध्ये हळूहळू बदल करणे गरजेचे आहे. छंद जोपासणे, व्यायाम, योगा आणि ध्यान करणे, गाणी ऐकणे, जीवस्यकंठस्य मैत्रिणीशी मनसोक्त गप्पा मारणे, पुरेशी झोप घेणे, दमणे मान्य करणे म्हणजे आपणही दमतो हे स्वतःला बजावणे, नवीन कला शिकणे अशा अनेक उपायांनी महिला त्यांचा ताण कमी करू शकतील.

# गोर्‍या सावळ्याच्या पलीकडे मी आहे!



**गोरा रंग म्हणजे सुंदरता**

ही समजूत अजूनही समाजात खोलवर रुजलेली आहे. परंतु आजच्या वैज्ञानिक युगात आणि बदलत्या सामाजिक जाणिवांमध्ये या समजुतीला छेद देण्याची वेळ आली आहे. त्वचेचा रंग हा केवळ जैविक वैशिष्ट्य आहे – तो तुमचं सौंदर्य, आत्मविश्वास किंवा मूल्य ठरवत नाही. खरं सौंदर्य म्हणजे निरोगी, समतोल, तेजस्वी त्वचा – मग ती कोणत्याही रंगाची असो.

आपण वेगवेगळ्या रंगछटांची त्वचा का पाहतो, हे समजून घेण्यासाठी आपल्याला त्वचेच्या रंगावर प्रभाव टाकणार्‍या घटकांकडे लक्ष द्यावं लागतं:

**१. मेलानिन:**

मेलानिन ही एक नैसर्गिक रंगद्रव्य (pigment) आहे जी त्वचेचा रंग ठरवते. हे मेलानोसायट्स नावाच्या पेशींद्वारे तयार होते. मेलानिनचे प्रमाण जितके जास्त, त्वचा तितकी गडद आणि+; प्रमाण कमी असेल तर त्वचा गोरी दिसते.

**२. वंशपरंपरा आणि भौगोलिक स्थान:**

जगातील वेगवेगळ्या भागांतील लोकांच्या त्वचेच्या रंगात फरक दिसतो. उष्ण कटिबंधीय भागात राहणार्‍या लोकांमध्ये मेलानिन अधिक असतो, कारण त्यांना सूर्यप्रकाशापासून संरक्षण आवश्यक असते. त्यामुळे त्यांची त्वचा गडद दिसते. थंड हवामानातील लोकांमध्ये मेलानिन कमी असल्यामुळे त्वचा गोरी दिसते.

**३. सौरप्रकाश** (UV radiation):

सूर्यप्रकाशातील अल्ट्राव्हायोलेट किरणं मेलानिनच्या निर्मितीला चालना देतात. म्हणून उन्हात राहणार्‍यांची त्वचा काळसर होते – हा शरीराचा नैसर्गिक संरक्षणात्मक प्रतिसाद असतो.

भारतीय समाजात पिढ्यानपिढ्या गोर्‍या रंगाची पूजा केली गेली आहे. जाहिराती, सिनेमे, विवाह जाहीराती या सर्व ठिकाणी गोर्‍या रंगाच्या महत्त्वाचा अतिरेक दिसून येतो. परंतु हळूहळू या संकल्पनांना धक्का बसतो आहे. सोशल मीडियावर माय स्किन माय प्राइड, ब्राउन अँड ब्युटिफुल, अशा चळवळी उभ्या राहात आहेत. कारण, त्वचेचा रंग हा एक जैविक गुणधर्म आहे, आणि तो कोणत्याही व्यक्तीचं सौंदर्य ठरवू शकत नाही.

खरं सौंदर्य म्हणजे गोरं असणं नव्हे, तर त्वचा निरोगी, स्वच्छ, समतोल व तेजस्वी असणं. खाली काही घटक दिले आहेत जे सौंदर्य अधिक अर्थपूर्ण बनवतात:



**सतेज त्वचा** (Glowing Skin):

सतेज म्हणजे आतून तेजस्वी. हे पोषणयुक्त आहार, पुरेसा झोप, योग्य स्किनकेअर आणि तणावमुक्त जीवनशैलीवर अवलंबून आहे.


**समतोल रंग** (Even Tone):

डाग, पिग्मेंटेशन, काळे डाग नसलेली समसर त्वचा जास्त आकर्षक वाटते.

**हायड्रेशन आणि मृदुता:**

त्वचा कोरडी, रुखरुखीत नसावी. ती मऊ, तजेलदार असली पाहिजे.

**स्वतःवर प्रेम:**



आतून सकारात्मकता असली, तर चेहर्‍यावर देखील तेज दिसतं. आत्मविश्वास आणि स्वाभिमान हा सौंदर्याचा खरा गाभा आहे.

त्वचेला गोर्‍या करण्याच्या नावाखाली बाजारात अनेक उत्पादनं आहेत. परंतु बहुतांश क्रीम्समध्ये स्टिरॉइड्स, हायड्रोक्विनोन, आणि मर्क्युरी सारखे घटक असतात जे दीर्घकालीन वापराने त्वचेला हानी पोहोचवतात. त्वचेचा रंग बदलण्याचा कोणताही शाश्वत आणि सुरक्षित मार्ग नाही. त्यामुळे सौंदर्याची कल्पना त्वचेच्या रंगाच्या बदलावर नाही, तर त्वचेच्या आरोग्यावर केंद्रित केली पाहिजे.

त्वचेचा रंग हा कोणत्याही प्रकारे तुमचं सौंदर्य, व्यक्तिमत्त्व किंवा मूल्य ठरवत नाही. गोर्‍या रंगाचा अभिमान न बाळगता, नैसर्गिक त्वचा, तिचं आरोग्य, आणि तेज याला जपणं हेच खरे सौंदर्य आहे.

**सौंदर्याच्या गुजगोष्टी**

डॉ. तेजस्विनी राहूल फाटे
त्वचा विकार विभाग



## धामणगाव बढे येथे शिबीर यशस्वी

**धामणगाव बढे येथे ग्रा.प कार्यालय आणि डॉ.उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालयाच्या सयुक्त विद्यमाने सेवा का अभियानाचे आयोजन करण्यात आले होते.**

येथील अभियानात तज्ञ डॉक्टरांनी ५९ नागरिकांची आरोग्य तपासणी केली. यातील यातील नेत्ररोग ०३,मेडीसिन ०३ आणि अस्थीरोग ०२ अशा ८ नागरिकांना पुढील उपचाराची गरज असल्याने रूग्णालयात येणेबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

## गुम्मीत आरोग्य शिबिर

**गुम्मी जि. बुलढाणा येथे ग्रा.प कार्यालय आणि डॉ.उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालयाच्या सयुक्त विद्यमाने सेवा का अभियानाचे आयोजन करण्यात आले होते.**

शिबिरात तज्ञ डॉक्टरांनी ६३ नागरिकांची आरोग्य तपासणी केली यात सर्जरी ०४, मेडीसिन ०४, कान नाक घसा ०१ अस्थीरोग ०१ आणि नेत्ररोग ०१ अशा ११ नागरिकांना पुढील उपचाराची गरज असल्याने रूग्णालयात येणेबाबत मार्गदर्शन करण्यात आले.यावेळी ८ रक्तदात्यांनी रक्तदान केले.





## मसरूळात आरोग्य मेळा

**मसरूळ जि. बुलढाणा – डॉ.उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालयाच्या सयुक्त विद्यमाने आरोग्य मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.**

या मेळाव्यात तज्ञ डॉक्टरांनी ४१ नागरिकांची आरोग्य तपासणी केली. यातील नेत्ररोग ०२, अस्थीरोग ०२, मेडिसिन ०२,नाक आणि सर्जरी ०१ अशा ०७ नागरिकांना पुढील उपचाराची गरज असल्याने रूग्णालयात येणेबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

## सेवा का अभियानास प्रतिसाद

**निभोंरा बु. ता रावेर – डॉ.उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालयाच्या सयुक्त विद्यमाने सेवा का अभियानाचे आयोजन करण्यात आले होते.**

येथील अभियानात तज्ञ डॉक्टरांनी १४१ नागरिकांची आरोग्य तपासणी केली. यातील यातील नेत्ररोग १५, सर्जरी ०३,अस्थीरोग १० आणि मेडीसिन ०५ अशा ३३ नागरिकांना पुढील उपचाराची गरज असल्याने रूग्णालयात येणेबाबत मार्गदर्शन करण्यात आले.यावेळी १० रक्तदात्यांनी देखिल रक्तदानासाठी पुढाकार घेतला.



# व्हीएलएसआय आणि एम्बेडेड सिस्टम

(उत्तरार्ध)

**VLSI आणि एम्बेडेड सिस्टम डेव्हलपमेंटमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर**

कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) ने तंत्रज्ञानाच्या विविध क्षेत्रांमध्ये क्रांतिकारी बदल घडवले आहेत आणि याचे एक महत्त्वपूर्ण क्षेत्र म्हणजे VLSI (Very Large Scale Integration) आणि एम्बेडेड सिस्टम डेव्हलपमेंट. ह्या दोन्ही क्षेत्रांमध्ये एआय टूल्सचा वापर प्रक्रिया अधिक स्मार्ट, कार्यक्षम आणि जलद बनवण्यासाठी केला जात आहे. चला तर मग, याबद्दल सखोल माहिती पाहूया.

**VLSI डेव्हलपमेंटमध्ये एआयचा वापर**

VLSI डेव्हलपमेंटमध्ये, मोठ्या प्रमाणात सर्किट्स आणि चिप्स डिझाइन करणे एक मोठा आणि गुंतागुंतीचा काम आहे. या प्रक्रियेत अनेक अचूक निर्णय घेणे आणि समजून उमजून डिझाइन तयार करणे आवश्यक असते. AI टूल्स या सर्वांमध्ये मदत करतात, विशेषतः खालील गोष्टींमध्ये:

१. ऑटोमेटेड डिज़ाइन ऑपटि मायझेशन: AI आणि मशीन लर्निंग (ML) वापरून, डिज़ाइन प्रक्रिया स्वयंचलित केली जाऊ शकते. यामुळे सर्किट्स अधिक जलद आणि कमी त्रुटींसह डिझाइन होऊ शकतात.

२. सिमुलेशन आणि चाचणी: AI आधारित सॉफ्टवेअर चिप्सची चाचणी करण्यासाठी स्वयंचलित प्रणाली तयार करतात, ज्या चिप्सच्या कार्यक्षमतेसाठी महत्त्वपूर्ण असतात. यामुळे डिझाइन प्रक्रियेत होणार्‍या त्रुटींना कमी करता येते.

३. पावर आणि एअर हार्डवेअर ऑप्टि मायझेशन: एआय आधारित अल्गोरिदम चिप्सच्या पॉवर आणि परफॉर्मन्स ऑप्टिमायझेशनमध्ये मदत करतात. यामुळे चिप्स अधिक कार्यक्षम आणि ऊर्जा- saving बनतात.

**एम्बेडेड सिस्टम डेव्हलपमेंटमध्ये एआयचा वापर**

एम्बेडेड सिस्टम डेव्हलपमेंटमध्ये AI चा वापर अधिक सुसंगत व स्मार्ट डिव्हायस तयार करण्यासाठी केला जात आहे. खासकरून, IoT (Internet of Things) आणि स्मार्ट डिव्हायसच्या क्षेत्रात एआय क्रांतिकारी भूमिका बजावत आहे.

१. स्मार्ट सेन्सिंग आणि डाटा ॲनालिटिक्स: एआय आणि मशीन लर्निंगच्या सहाय्याने, एम्बेडेड सिस्टमला जास्त प्रभावी सेन्सिंग आणि डाटा प्रोसेसिंग क्षमता मिळवता येते. यामुळे डिव्हायस अधिक स्मार्ट बनतात, उदाहरणार्थ, स्मार्ट थर्मोस्टॅट्स, स्मार्ट होम डिव्हायस, वगैरे.

२. इंटेलिजेंट ऑटोमेशन: एआयचा वापर इंटेलिजेंट ऑटोमेशनमध्ये देखील केला जातो, जेणेकरून एम्बेडेड सिस्टम अधिक कार्यक्षम व स्वयंचलित होऊ शकतात.

३. चुकीचे निर्णय घेणार्‍या सिस्टम्ससाठी दोष शोधणे: एआय आधारित तंत्रज्ञानामध्ये बग्स किंवा दोष शोधणारी सिस्टम्स तयार केली जातात, ज्यामुळे सिस्टम्स अधिक सुरक्षित आणि प्रभावी होतात.

**AI टूल्सचा भविष्यकाळ**

कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर फक्त सध्याच्या तंत्रज्ञानातच नाही, तर भविष्यातील तंत्रज्ञानामध्ये देखील महत्त्वपूर्ण भूमिका बजावणार आहे. AI च्या विकासामुळे, VLSI आणि एम्बेडेड सिस्टम डेव्हलपमेंटचा पुढील पिढी अधिक प्रभावी, कमी वेळेत होणारी आणि अधिक कार्यक्षम होईल. आता, AI च्या सहाय्याने डिजिटल आणि तंत्रज्ञानाच्या सर्व क्षेत्रांमध्ये प्रगती होईल आणि त्याचा फायदा अखेर यूझर्सपर्यंत पोहोचेल.

thodakyat sangayche zale tar mala asa nishkarsh kadhata yeil ki,

VLSI आणि Embedded Systems हे क्षेत्र केवळ इलेक्ट्रॉनिक्स अभियंत्यांसाठीच नाही तर संगणक व माहिती तंत्रज्ञानाशी संबंधित विद्यार्थ्यांसाठी देखील भविष्याचे दार उघडणारे ठरत आहे. भारतातच नव्हे तर जागतिक स्तरावर या क्षेत्रातील व्यावसायिकांची वाढती मागणी लक्षात घेता, हे क्षेत्र नव्या पिढीसाठी सुवर्णसंधी ठरू शकते. नव्या तंत्रज्ञानाच्या युगात या क्षेत्रातील कौशल्य असलेल्यांना देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर मोठ्या संधी उपलब्ध होत आहेत. VLSI आणि एम्बेडेड सिस्टम डेव्हलपमेंटमध्ये एआय टूल्सचा वापर फक्त कार्यक्षमतेसाठीच नाही, तर प्रक्रियांच्या गुणात्मक वाढीसाठी देखील महत्त्वपूर्ण आहे. त्यामुळे नवे चमत्कार घडवता येतील तंत्रज्ञान क्षेत्रात प्रगती होईल.



**Prof. Dr. Vijay Chaudhari**
**M.Tech (VLSI Embedded System) Course Coordinator**
**7588813457**

Editor : Sourabh Patil (Reg. Newspaper) Weekly Godavari Parivar : Owner, Publisher, Printer : Dr. Mrs. Varsha Patil printed at Subhash Printers, 38, Trimbak Nagar, Near Shakuntala Rane Primary School, Beside Narayani Park Apartment, Mahabal Area, Jalgaon 425002 (Mah.) Godavari Hospital, Released at Jalgaon, Near Bhaskar Market. Phone no. 2221834/35, & Posted from Jalgaon Main Post Office. Should be sent to this email for publication of news in the issue (Editors do not necessarily agree with the views published in the issue.)

संपादक : सौरभ पाटील (रजि. न्युजपेपर) साप्ताहिक गोदावरी परिवार : मालक, प्रकाशक, मुद्रक : डॉ. सौ. वर्षा पाटील यांनी सुभाष प्रिंटर्स, ३८, त्र्यंबक नगर, शकुंतला राणे प्रायमरी स्कूलजवळ, नारायणी पार्क अपार्टमेंट शेजारी, महाबळ एरिया, जळगांव ४२५००२ (महा.) येथे छापून गोदावरी हॉस्पीटल, भास्कर मार्केट जवळ, जळगांव फोन नं. २२२१८३४/३५ येथे प्रसिद्ध करुन जळगाव मुख्य डाक कार्यालय येथून निर्गमित केले. अंकात बातम्या प्रसिध्द करण्यासाठी या ईमेलवर पाठवाव्यात. Email : godavari.parivar@gmail.com (अंकात प्रकाशित झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

# विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास हाच ध्यास : महाजन

## नर्सरी ते १२ प्रवेश प्रक्रिया सुरू



**सावदा ˉ उत्तम दर्जाचे खेळाडू, वैज्ञानिक, चित्रकार तसेच सर्वगुण संपन्न विद्यार्थी घडवण्यासाठी प्रयत्न केला जातो अशी डॉ.उल्हास पाटील इग्लिश मिडीयम सीबीएसई स्कुल सावदा स्कुल आहे त्यासाठी सर्व प्रकारच्या सुविधा उपलब्ध करून देत विद्यार्थ्यांचा सर्वागिण विकास हाच आमच्या ध्यास असल्याचे प्रिन्सीपल भारती महाजन यांनी सांगितले.**

डॉ. उल्हास पाटील इग्लिश मिडीयम स्कुल सावदा , नर्सरी ते बारावी प्रवेश प्रक्रिया सुरू असून आमच्या प्रतिनिधीनी त्यांच्याशी बातचित करतांना पुढे बोलतांना ५ एकर क्षेत्रफळात भव्य खेळाचे मैदान,सुशिक्षित अनुभवी शिक्षकाच्या मार्गदर्शनात खेळण्याची संधी उपलब्ध करून दिली जाते.विद्यार्थ्यांचे आत्माविश्वास वाढवून त्यांना प्रभावी संवादक म्हणून घडवण्यासाठी शाळेत टॉक शो, पॅनल डिस्कशन, डिबेट,युवा संसद यासारखे वैविध्यपूर्ण व मनोवेधक उपक्रम नियमित पणे राबवले जातात. इथे विद्यार्थ्यांना ज्ञान पारंगत, कृतिशील आणि अनुभवी शिक्षकांची साथ लाभते.अष्ट पैलू व्यक्तिमत्व युक्त विद्यार्थी घडण्याचा आमचा ध्यास असल्याचे सांगीतले. नर्सरी ते १२ वी प्रवेश प्रक्रिया सूरू असल्याचे देखिल त्यांनी सांगितले.

## मिशन ॲडमिशन

### गोदावरी नर्सिंग कॉलेजच्या कम्युनिटी हेल्थ नर्सिंग विभागातर्फे

# जागतिक तंबाखू विरोधी दिननिमित्त जनजागृती

**जळगाव – येथील गोदावरी नर्सिंग कॉलेज, जळगावच्या कम्युनिटी हेल्थ नर्सिंग विभागाने राष्ट्रीय सेवा योजना (रासेयो) युनिटच्या सहकार्याने तंबाखू आणि निकोटीन उत्पादनांच्या हानिकारक परिणामांबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला.**




अक्षता पाटील कॉन्फरन्स हॉल, गोदावरी नर्सिंग कॉलेज येथे आयोजित तंबाखूच्या दुष्परिणामांवर प्रकाश टाकण्यात आला. विद्यार्थ्यांनी तंबाखू विरोधी शपथ घेतली आणि विविध माहितीपूर्ण सत्रांमध्ये सहभागी झाले. तंबाखू उद्योगाच्या तरुणांना आकर्षित करण्याच्या फसव्या रणनीतींबद्दलही चर्चा करण्यात आली.बीएससी ५ व्या सेमिस्टरच्या विद्यार्थ्यांनी तंबाखू नियंत्रणाशी संधित घोषवाक्याव्दारे चमकदार उत्पादने. काळे हेतू. आकर्षणाचा पर्दाफाश''या वर्षीची जागतिक थीम. जी तंबाखू आणि निकोटीन उद्योगांनी त्यांच्या उत्पादनांना आकर्षक बनवण्यासाठी वापरलेल्या रणनीतींचा उघड करण्यावर लक्ष केंद्रित करते. कार्यक्रमाला प्राचार्य विशाखा गणविर, जीसीओएनच्या कम्युनिटी हेल्थ नर्सिंग प्रमुख प्रा. जॅसिंथ धाया प्रा. निम्मी वर्गीस ,सी.एच. प्रा.निर्भय मोहोड आणि सह प्रा. स्वाती गाडेगोणे, प्रा डिव्हायना पवार,प्रा.आश्लेषा मून, प्रा. रितेश,प्रा श्रुती आणि प्राजक्ता आरेख यांनी मार्गदर्शन केले. समारोप तंबाखू विरोधी शपथेने करण्यात आला.

# अन्न व तंत्रज्ञान क्षैत्रात मोठ्या संधी डॉ.चौधरी

## कृषि अभ्यासक्रमासाठी लवकरच प्रवेश प्रक्रिया सुरू होणार

**जळगाव ˉ अन्न व तंत्रज्ञान आणि कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान क्षैत्रात मोठया संधी उपलब्ध असून आगामी काळात संशोधन व व्यवसायिक स्तरावर देखिल भविष्य उज्वल असल्याचे डॉ अशोक चौधरी यांनी सांगितले.**

निमीत्त होते जिल्ह्यातील नामांकित शैक्षणिक संस्था डॉ. उल्हास पाटील अन्न तंत्रज्ञान महाविद्यालय, आणि कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय जळगाव येथे अन्न तंत्रज्ञान पदवी अभ्यासक्रमासाठी (बी.टेक इन फुड टेक्नॉलॉजी) आणि कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान (बी.टेक इन ॲग्री इंजि अँन्ड टेक्नॉलॉजी) प्रवेश प्रक्रिया लवकरच सूरू होणार आहे. या पार्श्वभुमीवर आमचे प्रतिनीधीने शिक्षण व संशोधक संचालक डॉ अशोक चौधरी यांच्याशी बातचित केली. यावेळी माहिती देतांना त्यांनी महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी संलग्न असलेल्या या महाविद्यालयात वरील दोन्ही ४ वर्षांचे पदवी अभ्यासक्रम राबवले जातात.यात अन्न व तंत्रज्ञान अभ्यासक्रमासाठी एकूण ४० तर कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान साठी ८० विद्यार्थ्यांची प्रवेश क्षमता असून, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या विज्ञान शाखेतील (१२ वी) उत्तीर्ण विद्यार्थी, तसेच निट,जेईइ किंवा सीईटी परीक्षेच्या आधारे प्रवेश घेऊ शकतात.पीसीएम/पीसीबी या विषयांच्या विद्यार्थ्यांसाठी ही सुवर्णसंधी आहे.

डॉ.उल्हास पाटील महाविद्यालयच का? यावर बोलतांना त्यांनी सुसज्ज प्रयोगशाळा, प्रात्यक्षिकात्मक शिक्षण, उद्योग क्षेत्राशी जोडलेले प्रशिक्षण, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, प्लेसमेंट सुविधा, तसेच मुलाखतीसाठी आवश्यक कौशल्य प्रशिक्षण,विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह आणि शाळा व हनाच ीही सोय आहे याचबरोबर उच्चशिक्षीत शिक्षकवृंद व विस्तृत परिसरात संशोधनाला वाव मिळतो असे सांगितलेपुढे नोकरीच्या कोणत्या संधी? हा अभ्यासक्रम पुर्ण केल्यानंतर अन्न व औषध प्रशासन,एफएसएसएआय, कृषी विभाग, बँकिंग क्षेत्र, अन्न प्रक्रिया उद्योग, तसेच स्वयंरोजगारासाठी पीएमएफएमई योजनेंतर्गत सहाय्य उपलब्ध आहे.अन्न व तंत्रज्ञान प्रवेश प्रक्रिया व अधिक माहितीसाठी इच्छुकांनी खालील संपर्क क्रमांकावर संपर्क साधावा:डॉ. संतोष राठी (प्राचार्य) ˉ ७५८८५२०६७६ प्रा. मोहित बनपूरकर ˉ ८८३०९६१८१३ अतुल बोंडे ˉ ८९९९०७१९८७ शिक्षण व संशोधन संचालक–डॉ. अशोक चौधरी– ९४०३२४९६४० परिसर संचालक ˉ प्रा. डॉ. सुधाकर पाटील ˉ ९३२६५१२७४३ तर कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान प्रा. संदिप पाऊलझगडे ॲडमिशन इनचार्ज ९९७०९५६२९५, डॉ. ललित जावळे सहाय्यक प्राध्यापक ८४८४८४४१०४ प्रा. एन. डी. पाटील

सहाय्यक प्राध्यापक ९२८४८८४२६२ प्रा. अतुल बोंडे सहाय्यक कुलसचिव ८९९९०७१९८७ डॉ. पुनमचंद सपकाळे – प्राचार्य– ९४०३५६५९२६ यांचेशी संपर्क साधावा.



## डॉ. प्रेमचंद पंडित
(९४२२९१५३७९)
(निवृत्त सिव्हील सर्जन, बुलडाणा)
वैद्यकीय अधीक्षक
डॉ.उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय, जळगाव

प्रेमवाणी

1. Continuous self improvement is essential for sustained effectiveness
2 Prioritizing task based on importance rather than urgency and promote disciplined execution
3. Live with purpose and intentionality and ensure that your daily actions align with your overarching objective
4. When anchored to a clear purpose, adaptability becomes a competitive advantage and not a compromise
5. The people that endure are the ones that build for what is next, not just what is now
6. A strong culture is tested not in good times, but when difficult decisions need to be made
7. The things that you feel are the hardest are the same things that shape your personality the most over time

१.निरंतर आत्म–सुधार, सतत प्रभावशीलता के लिए आवश्यक है।
२.कार्यों को महत्व के आधार पर प्राथमिकता दें, न कि केवल तात्कालिकता के आधार पर, और अनुशासित निष्पादन को बढ़ावा दें।
३. उद्देश्यपूर्ण और इरादे के साथ जिएं, और सुनिश्चित करें कि आपके दैनिक कार्य आपके व्यापक उद्देश्य के अनुरूप हों।
४. जब आप एक स्पष्ट उद्देश्य से जुड़े होते हैं, तो अनुकूलनशीलता एक प्रतिस्पर्धी लाभ बन जाती है, समझौता नहीं।
५. वे लोग जो टिके रहते हैं, वे वे हैं जो केवल वर्तमान नहीं बल्कि भविष्य के लिए निर्माण करते हैं।
६. एक मजबूत संस्कृति का परीक्षण अच्छे समय में नहीं, बल्कि तब होता है जब कठिन निर्णय लेने होते हैं।
७. जिन बातों को आप सबसे कठिन मानते हैं, वही बातें हैं जो समय के साथ आपके व्यक्तित्व को सबसे अधिक आकार देती हैं।

### डॉ. उल्हास पाटील कॉलेज ऑफ फिजिओथेरपीचा उपक्रम

# जागतिक मल्टिपल स्क्लेरोसिस दिननिमीत्त जनजागृती

**जळगाव – जागतिक मल्टिपल स्क्लेरोसिस दिनानिमित्त, डॉ. उल्हास पाटील कॉलेज ऑफ फिजिओथेरपी, जळगाव येथे माहितीपूर्ण सेमिनार आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन सेमिनार हॉलमध्ये करण्यात आले असून, MS निदान झालेल्या व्यक्तींना भेडसावणाऱ्या अडचणींविषयी जनजागृती करणे व संवाद निर्माण करणे मुख्य उद्देश होता.**



या वर्षीचा विषय होता माझे मल्टिपल स्क्लेरोसिस निदान: एकत्रितपणे मल्टिपल स्क्लेरोसिसचा सामना, जो समुदाय, सहकार्य आणि सामायिक अनुभवांचे महत्त्व अधोरेखित करतो.कार्यक्रमामध्ये मल्टिपल स्क्लेरोसिस सोबत जगताना येणाऱ्या मानसिक आणि शारीरिक पैलूंवर प्रकाश टाकण्यात आला आणि आरोग्यसेवकांची सर्वांगीण उपचार पद्धतीतील भूमिका अधोरेखित करण्यात आली.हा कार्यक्रम न्यूरो विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. डॉ. जिज्ञासा अत्तरदे (सहाय्यक प्राध्यापक) आणि डॉ. शुभम केद्रां पदव्युत्तर विभागाचे विद्यार्थी यांनी चित्रफितव्दारे मार्गदर्शन केले. मल्टिपल स्क्लेरोसिसच्या व्यवस्थापनातील नविन प्रगती, रुग्ण सक्षमीकरण, तसेच लवकर निदान आणि हस्तक्षेपाच्या महत्त्वावर भर देत समृद्ध चर्चा करण्यात आली. मल्टिपल स्क्लेरोसिस रुग्णांसाठी आवश्यक असलेल्या उपचार पद्धती व आधार प्रणालींविषयी भावी फिजिओथेरपिस्टमध्ये समज वाढवण्यासाठी माहितीपूर्ण सत्रे आणि चर्चासत्रे आयोजित करण्यात आली होती. अंतिम वर्षाचे विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेतला.

### राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त

# जागर यात्रेचा डॉ.उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयात समारोप

## रक्तदान करून अहिल्यादेवींना तरुणांनी केले नमन

**जळगाव – पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती महोत्सवानिमित्त आज शुक्रवार दिनांक ३० मे रोजी सकाळी जळगाव येथून भव्य जागर यात्रा काढण्यात आली. तीनशे किलोमीटर अंतर पार करून सायंकाळी ही यात्रा गोदावरी फाउंडेशन संचलित डॉ उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयाच्या परिसरात पोहोचली. या ठिकाणी असलेल्या किवा तेवन मध्ये जागर यात्रेचा समारोप झाला.**



याप्रसंगी व्यासपीठावर विकास दूध फेडरेशनचे संचालक अरविंद दादा देशमुख, अहिल्यादेवी होळकर प्रतिष्ठानचे सुभाष दादा सोनवणे, डॉ नरेंद्र शिरसाट, नानाभाऊ बोरसे, प्रभाकर न्याहळदे, रमेश सुलताने, दिलीप धनगर, संतोष दादा कचरे, सुभाष दादा करे, ॲड शरद न्याहाळदे, मल्हार सेनेचे प्रदेश सरचिटणीस संदीप तेले, अरुण ठाकरे, डॉ उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयाचे प्रशासकीय अधिकारी प्रमोद भिरुड, गोदावरी व्यवस्थापन महाविद्यालयाचे संचालक डॉ प्रशांत वारके, तुळशीराम सोनवणे, ॲड ऋषीकेश सोनवणे उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते राजमाता अहिल्यादेवी यांच्या प्रतिमेचे पूजन तसेच दीपप्रज्वलन करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक तुळशीराम सोनवणे यांनी केले तसेच अरविंद देशमुख आणि प्रमोद भिरुड यांनी राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याविषयी माहिती दिली तसेच या उपक्रमाचे कौतुक केले. अध्यक्षीय भाषण सुभाष दादा सोनवणे यांनी करून अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीच्या शुभेच्छा दिल्या.

तसेच परिसरात डॉ उल्हास पाटील रक्तपेढी तर्फे रक्तदान शिबिर घेण्यात आले, या प्रसंगी तरूणांनी रक्तदान करून राजमाता अहिल्यादेवींना नमन केले. या जागर यात्रेस डॉ केतकी ताई फौंडेशनचेही सहकार्य लाभले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त काढण्यात आलेल्या जागर यात्रेचा समारोप वंदे मातरम या गीताने करण्यात आला.

यावेळी परिसरात राष्ट्रभक्तीमय वातावरणाची निर्मिती झाली.



# जळगाव विमानतळावर मिळणार आपात्कालीन आरोग्य सुविधा

## डॉ उल्हास पाटील रुग्णालयाच्या आरोग्य केंद्राचे उद्घाटन

**जळगाव – एअरपोर्ट ऑथॉरिटी ऑफ इंडिया जळगाव विमानतळ व गोदावरी फाऊंडेशन संचलित डॉ उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने जळगाव विमान तळावर मोफत वैद्यकीय सुविधा केंद्र सुरु करण्यात आले. या केंद्रामुळे प्रवासी तसेच कार्यरत कर्मचाऱ्यांना काही वैद्यकीय सुविधांची आवश्यकता भासल्यास त्या तात्काळ मिळणार आहे.**

या प्रसंगी जळगाव विमानतळाचे संचालक श्री हर्ष त्रिपाठी, गोदावरी फाऊंडेशनच्या संचालिका डॉ केतकी पाटील, डॉ उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयाचे डायरेक्टर डॉ एन एस आर्वीकर, वैद्यकीय अधीक्षक डॉ प्रेमचंद पंडित, डॉ सुभाष बडगुजर, प्रशासकीय अधिकारी अशोक भिडे आदी उपस्थित होते. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते धन्वंतरी देवतेचे पूजन करून श्रीफळ फोडले, त्यांनतर फिट कापून या आपत्कालीन आरोग्य केंद्राचे उद्धाटन झाले. मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. या प्रसंगी विमानतळ संचालक हर्ष त्रिपाठी यांनी सांगितले कि, अत्यावश्यक सेवांची कधी आवश्यकता भासेल ते सांगता येत नाही त्यामुळे जळगाव विमानतळावर अशी सुविधा उपलब्ध असावी त्यासाठी प्रयत्न सुरु होते, आज येथे आरोग्य सेवा सुरु झाल्याने आम्ही प्रवाशांना ती उपलब्ध करून देऊ शकतो याचा आनंद आहे. त्यांनतर डॉ केतकी पाटील यांनी मनोगतात सांगितले कि, येथे प्रवाशांसह संपूर्ण कर्मचाऱ्यांसाठी आरोग्य सुविधा सुरु करण्यात आली, येथे डॉक्टर्स, नर्सिंग स्टाफ तसेच अत्यावश्यक औषध साठा उपलब्ध असणार आहे. तरी प्रवाशांनी तसेच कर्मचाऱ्यांनी आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष न करता वेळीच या आरोग्य केंद्राचा लाभ घ्यावा असे आवाहन डॉ केतकी पाटील यांनी केले. या वेळी विमानतळावरील संपूर्ण स्टाफ उपस्थित होता.



## अमेय चौधरी जेईई ॲडव्हान्स परीक्षेत यश

**जळगाव– गोदावरी इंग्लिश मीडियम सीबीएसई स्कूलचा विद्यार्थी अमेय चौधरी याने २०२५ जेईई ॲडव्हान्स(जॉइंट एंट्रन्स एक्झामिनेशन) परीक्षेत ऑल इंडिया रँक ९५२ क्र मिळवून यश प्राप्त केले आहे.**



ही स्पर्धात्मक परीक्षा आयआयटी सारख्या देशातील सर्वोच्च अभियांत्रिकी संस्थांमध्ये प्रवेशासाठी घेतली जाते.अमेयने आपल्या अथक मेहनत, चिकाटी आणि योग्य नियोजनाच्या जोरावर हे यश संपादन केले. सुरुवातीपासूनच अभ्यासात चमकदार करणा–या अमेयचे गणित व भौतिकशास्त्र हे आवडते विषय होते. शाळेतील शिक्षकांचे मार्गदर्शन व पालकांचे पाठबळ हे त्याच्या यशामागील मुख्य आधार असल्याचे तो नम्रतेने सांगतो.

शाळेचे प्राचार्य सौ. नीलिमा चौधरी यांनी अमेयच्या यशाचे कौतुक करत म्हटले, ‘‘अमेय हा आमच्या शाळेचा अत्यंत मेहनती व शिस्तप्रिय विद्यार्थी आहे. त्याने मिळवलेले यश इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहे.त्याच्या यशाबद्दल गोदावरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. उल्हास पाटील,उपाध्यक्ष सुभाष पाटील, सचिव डॉ. वर्षा पाटील, संचालिका डॉ. केतकी पाटील, हृदयरोगतज्ञ डॉ. वैभव पाटील, न्यूरोलॉजिस्ट डॉ.अनिकेत पाटील, डॉ. अक्षता पाटील ,स्कूलच्या प्राचार्य सौ. नीलिमा चौधरी सर्वांकडून अमेयचे अभिनंदन करण्यात येत असून, त्याच्यावर पुढील वाटचालीसाठी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## डॉ. उल्हास पाटील रुग्णालयात यशस्वी अंडाशय ट्यूमर शस्त्रक्रिया

**जळगाव – डॉ. उल्हास पाटील मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटल येथे एक अत्यंत गुंतागुंतीची अंडाशय ट्यूमर शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडली.**

या शस्त्रक्रियेमध्ये हॉस्पिटलचे प्रसिद्ध सर्जन डॉ. चैतन्य पाटील आणि त्यांच्या अनुभवी वैद्यकीय टीमने महत्त्वाची भूमिका बजावली.रुग्णालयात दाखल झालेल्या महिलेला पोटात तीव्र वेदना होत होत्या,रक्त कमी होत अशा परिस्थीतीत ४ बॅग रक्ताच्या लावण्यात आल्यात.दरम्यान सोनोग्राफी करण्यात आली तपासणीत एक मोठा ट्यूमर असून तिच्या पोटात रक्ताचा गोळा हा उजव्या अंडाशयास चिटकलेला दिसून आला त्याचबरोबर रक्तस्राव होत असल्याचे निदर्शनास आले. ही स्थिती वैद्यकीय दृष्टिकोनातून अत्यंत गंभीर होती.डॉ. चैतन्य पाटील, डॉ. श्वेता गाढवे आणि त्यांच्या टीमने तत्काळ निर्णय घेत, लॅपरोटॉमी पद्धतीने



शस्त्रक्रिया करण्याचे ठरवले.

अत्याधुनिक उपकरणे आणि भुलरोग तज्ञ डॉ बी आर सोनवणे, डॉ शितल आणि निवासी तज्ञांच्या सहकार्याने सर्जरी विभाग प्रमुख डॉ. शिवाजी सादुलवाड यांचे मार्गदर्शनानुसार योग्य नियोजनाच्या साहाय्याने शस्त्रक्रिया करून रक्ताचा गोळा अंडाशय टयुमर काढण्यात आले.रक्तस्रावावरही नियंत्रण मिळवले. शस्त्रक्रियेनंतर रुग्णाची प्रकृती स्थिर असून ती आता नियंत्रणाखाली उपचार घेत आहे.

या यशस्वी शस्त्रक्रियेबद्दल डॉ. पाटील म्हणाले, ‘‘रुग्ण वेळेवर आमच्याकडे आली हे अत्यंत महत्त्वाचे ठरले. अशा प्रकारच्या केसेसमध्ये त्वरीत निदान आणि उपचार हे रुग्णाच्या आयुष्यासाठी निर्णायक ठरतात.‘‘या शस्त्रक्रियेमुळे डॉ. उल्हास पाटील मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटल, जळगाव येथील वैद्यकीय सेवांची गुणवत्ता अधोरेखित झाली आहे. हे हॉस्पिटल आता अशा गुंतागुंतीच्या शस्त्रक्रियांमध्येही विश्वासार्ह ठिकाण बनले आहे.

## किमान १० जूनपर्यंत पावसात घट; शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये

**मुंबई– बदललेल्या वातावरणामुळे मॉन्सूनच्या प्रवासाची गती कमी होण्यास सुरुवात झाली, असल्याने मान्सूनचा प्रवास पूर्णपणे रखडला आहे. किमान १० जूनपर्यंत तरी मॉन्सूनचा प्रवास थांबणार असल्याचा अंदाज आहे, ज्यामुळे यादरम्यान केवळ पश्चिम किनारपट्टी आणि राज्यातील काही भागात प्रामुख्याने हलका पाऊस पडण्याचा अंदाज आहे.**

राज्यातील बहुतांश भागात मात्र कोरडे हवामान अपेक्षित आहे, ज्यामुळे कमाल तापमानात वाढ होईल. विदर्भात ४० अंशापर्यंत कमाल तापमान राहण्याची शक्यता आहे तर मराठवाडा आणि खानदेशात कमाल तापमान ३५ ते ४० अंशामध्ये राहील. या कोरड्या हवामानाचा वाईट परिणाम पेरणी आणि लागवडीवर होण्याची शक्यता आहे.



कोणत्याही खोट्या बातम्यांवर विश्वास ठेवून शेतकऱ्यांनी (प्रामुख्याने कोरडवाहू) पेरणी आणि लागवडीची घाई करू नये, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात आले आहे.

## जग स्तिमित होईल, असाच कुंभमेळा होणार : फडणवीस

### नाशिक येथे कुंभमेळा पूर्वतयारी आढावा बैठक

**नाशिक – कुंभमेळा सुरक्षित, निर्मळ आणि पवित्र वातावरणात होण्यासाठी राज्य शासनाच्या माध्यमातून सर्वतोपरी प्रयत्न केले जातील. कुंभमेळ्यासाठी येणाऱ्या भाविकांना सर्व प्रकारच्या सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात येतील. त्यासाठी निधीची उपलब्धता करून देण्यात येईल. कुंभमेळा भारतीय सनातन संस्कृतीचे प्रतीक असल्याने संपूर्ण जगाचे लक्ष याकडे आहे. त्यामुळे सर्वांच्या सहकार्याने जग स्तिमित होईल असे भव्य दिव्य आणि स्मरणीय आयोजन करण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.**



नाशिक– त्र्यंबकेश्वर येथे होणाऱ्या कुंभमेळ्यातील अमृत स्नानाचे दिवसही मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी जाहीर केले. जिल्हाधिकारी कार्यालयात सिंहस्थ कुंभमेळा पूर्वतयारी आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले. यावेळी जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, आमदार डॉ. राहुल आहेर, आमदार सीमा हिरे, आमदार राहुल ढिकले, विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, जिल्हाधिकारी जलज शर्मा, महानगरपालिका आयुक्त मनीषा खत्री यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

नाशिक कुंभमेळा सिंहस्थ ध्वजारोहण शुभारंभ– शनिवार ३१ ऑक्टोबर २०२६, दुपारी १२ वाजून २ मिनिटांनी (स्थळ–रामकुंड पंचवटी) प्रथम अमृतस्नान–सोमवार २ ऑगस्ट २०२७,आषाढ सोमवती अमावस्या. महाकुंभस्नान/द्वितीय अमृतस्नान–मंगळवार ३१ ऑगस्ट २०२७, श्रावण अमावस्या तृतीय अमृतस्नान– शनिवार ११ सप्टेंबर २०२७, भाद्रपद शुद्ध एकादशी त्र्यंबकेश्वर कुंभमेळा सिंहस्थ ध्वजारोहण शुभारंभ– शनिवार ३१ ऑक्टोबर २०२६, प्रथम अमृतस्नान–सोमवार २ ऑगस्ट २०२७, आषाढ सोमवती अमावस्या.महाकुंभस्नान/द्वितीय अमृतस्नान–मंगळवार ३१ ऑगस्ट २०२७, श्रावण अमावस्या तृतीय अमृतस्नान– शनिवार १२ सप्टेंबर २०२७, भाद्रपद शुद्ध द्वादशी (वामन द्वादशी).

# नवजात शिशुच्या अन्ननलिकेवर यशस्वी शस्त्रक्रिया

## डॉ. उल्हास पाटील रुग्णालयात बाल शल्यचिकीत्सकांचे यश

**जळगाव : डॉ. उल्हास पाटील रुग्णालय, जळगाव येथील बालशल्यचिकित्सकांनी अलीकडेच अवघड आणि धोकादायक समजल्या जाणाऱ्या ट्रॅकिओएसोफेजियल फिस्टुला रिपेअर शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार पाडली.**

याबाबत माहिती अशी की, काशिनाथ महाजन यांच्या नवजात शिशुचे जन्माच्या वेळी वजन अत्यंत कमी – फक्त २.५ किलोग्रॅम होते. शिशुच्या अन्ननलिकेचा मार्ग बंद असल्यामुळे त्याला दूध पचवता येत नव्हते आणि श्वास घेण्यासही त्रास होत होता. शिशु जन्मत: टिइओ दुर्मिळ दोषासह जन्मला होता. यामध्ये अन्ननलिका व श्वासनलिका एकमेकांना असामान्यरित्या जोडलेल्या होत्या. या दोषामुळे शिशु दुध प्यायल्यावर थेट फुफ्फुसात जात असल्यामुळे त्याला जीवघेणा धोका निर्माण झाला होता. अन्ननलिकेचा वरचा भाग बंद असल्यामुळे पोषण घेणेही अशक्य होते. त्याला डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय रूग्णालयात उपचारासाठी दाखल केले असता बाल शल्यचिकीत्सक डॉ. मिलींद जोशी यांनी त्याच्या विविध तपासण्या केल्या.

**आव्हानात्मक शस्त्रक्रिया यशस्वी**

तपासणी अंती आजाराचे निदान झाल्यानंतर अतिशय आव्हानात्मक स्थितीत बालशल्यचिकित्सक डॉ. मिलींद जोशी व टीमने त्वरीत निर्णय घेऊन शस्त्रक्रियेची तयारी केली. ट्रॅकिओएसोफेजियल फिस्टुला रिपेअर ही शस्त्रक्रिया अत्यंत कुशलतेने व बारकाईने केली गेली. शस्त्रक्रियेदरम्यान अन्ननलिकेचा बंद भाग उघडण्यात आला व श्वासनलिकेशी असलेल्या असामान्य जोडणी काढून टाकण्यात आली. त्यानंतर अन्ननलिका योग्य प्रकारे पुन्हा जोडण्यात आली.या यशस्वी शस्त्रक्रियेमध्ये डॉ. उल्हास पाटील रुग्णालयातील विभागप्रमुख




डॉ. शिवाजी सादुलवाड यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. वैभव फरके, डॉ. श्वेता गाढवे, डॉ. सहर हमदुल्ले व भूलशास्त्र तज्ज्ञ यांनी सहकार्य केले. शस्त्रक्रियेनंतर शिशुला काही दिवस पीआयसीयूमध्ये नवजात शिशु तज्ज्ञ डॉ. सुयोग तन्नीरवार यांच्या निगराणीखाली ठेवून त्याची काळजी घेण्यात आली.

या यशस्वी शस्त्रक्रियेमुळे आता शिशु व्यवस्थित दूध पचवू लागला आहे व श्वास घेण्यातही कोणतीही अडचण राहिली नाही. डॉ. उल्हास पाटील रुग्णालयाने पुन्हा एकदा अत्याधुनिक वैद्यकीय सेवा आणि कुशल डॉक्टरांमुळे नवजात शिशुचे जीवन वाचवले आहे. ही घटना संपूर्ण उत्तर महाराष्ट्रासाठी एक अभिमानास्पद बाब ठरली आहे. शिशुच्या पालकांनी डॉक्टर आणि संपूर्ण वैद्यकीय टीमचे मन:पूर्वक आभार मानले.

साप्ताहिक


RNI Regd. No.: MAHMAR/1999/7490

# गोदावरी परिवार

सवलतीचा पोष्ट रजि. नं. JAL/120/2024-2026

* वर्ष २६ वे * अंक २४ * सोमवार १६/०६/२०२५ * डाक १८/०६/२०२५ * पाने – ४ * किंमत २ रुपये

* year 26 * issue 24 * monday : 16 / 06 / 2025 * post Dt. 18/ 06 / 2025 * pages - 4 * price 2 Rs.




# प्रेस सिंड्रोम आजाराच्या बालकावर यशस्वी उपचार

## डॉ. उल्हास पाटील रूग्णालयातील बालरोग तज्ज्ञांचे अथक प्रयत्न

**जळगाव – बालवयातील दुर्मिळ आणि जीवघेणा समजला जाणारा प्रेस सिंड्रोम या आजाराने त्रस्त असलेल्या एका सहा वर्षांच्या बालकावर जळगाव येथील डॉ. उल्हास पाटील मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटल येथील बालरोग तज्ज्ञांनी यशस्वी उपचार करून त्याचे प्राण वाचवले. ही वैद्यकीय कामगिरी जिल्ह्यातील आरोग्य सेवेसाठी अत्यंत उल्लेखनीय मानली जात आहे.**

चोपडा येथील मुर्तुझा शेख (वय १०) बालक अत्यवस्थ स्थितीत रूग्णालयात दाखल झाला होता. त्याला सतत झटके येत होते, तसेच संपूर्ण शरीराला सूज आली होती. रक्तदाब खूप वाढलेला होता, श्वास घेण्यात अडचण होती आणि काही वेळा शुद्धही हरपत होती. त्याचबरोबर किडनीच्या कार्यक्षमतेवरही गंभीर परिणाम झाला होता. अशा परिस्थितीत लगेचच त्याला डॉ. उल्हास पाटील रूग्णालयाच्या बालरोग अतिदक्षता विभागात दाखल करण्यात आले.

**तज्ज्ञांच्या टीमकडून उपचार**

डॉ. उल्हास पाटील रूग्णालयातील बालरोग विभागाचे प्रमुख डॉ. अनंत बेंडाळे, डॉ. उमाकांत अणेकर, डॉ. सुयोग तन्नीरवार यांच्या नेतृत्वाखालील टीमने तातडीने उपचार सुरू केले. सर्वप्रथम बालकाची एमआरआय चाचणी करण्यात आली. यामध्ये मेंदूतील सूज स्पष्टपणे दिसून आली. यासोबतच विविध रक्ताच्या तपासण्या केल्या असता किडनी निकामी होण्याच्या लक्षणांची पुष्टी झाली. त्यातूनच प्रेस सिंड्रोम



रुग्णासमवेत तज्ञ डॉक्टर आणि त्यांची टीम छायाचित्रात दिसत आहे. (छायाचित्र : नितीन नेवे)

हा निदान झाला. प्रेस सिंड्रोम हा मेंदूतील रक्तवाहिन्यांमधील दबाव वाढल्यामुळे होणारा आजार असून, यामध्ये मेंदूत सूज येते, जे झटके, शुद्ध हरपणे, भ्रम, दृष्टिदोष, तसेच इतर अनेक न्यूरोलॉजिकल त्रास निर्माण करू शकतो.

हे प्रकरण अधिक गुंतागुंतीचे होते कारण मुलाला किडनीचा आजार देखील होता, ज्यामुळे रक्तदाब नियंत्रित ठेवणे अत्यंत अवघड झाले होते.रूग्णालयातील डॉक्टरांनी औषधोपचारासोबतच आवश्यक असलेली द्रव आहार व्यवस्थापन, अँटी-एपिलेप्टिक औषधे, आणि विशेष पद्धतीने रक्तदाब नियंत्रित करणारी औषधे दिली. सातत्याने एमआरआय व इतर तपासण्या करून मेंदूतील सूज कमी होण्यावर निरीक्षण ठेवण्यात आले.सुमारे आठ दिवसांच्या उपचारांनंतर बालकाची स्थिती सुधारू लागली. झटके पूर्णपणे बंद झाले, सूज कमी झाली, आणि शुद्ध परत आली. या यशस्वी उपचारासाठी डॉ. चंदाराणी देगूलरकर, डॉ. कुशल धांडे, डॉ. निरज जगताप, डॉ. अभिजीत अरमाड व परिचारीकांनी सहकार्य केले.

लहान मुलांना अचानक झटके, शुद्ध हरपणे, सुज येणे, अशक्तपणा अशी लक्षणे आढळल्यास तातडीने वैद्यकीय सल्ला घ्यावा. प्रेस सिंड्रोम हा आजार वेळेत ओळखल्यास उपचारक्षम असतो, पण उशीर झाल्यास गंभीर परिणाम होऊ शकतात.

–डॉ.चंदाराणी देगूलरकर
निवासी डॉक्टर



# डॉ.उल्हास पाटील रूग्णालयात आठवडाभरात ५० नेत्र शस्त्रक्रिया

**जळगाव : डॉ. उल्हास पाटील रूग्णालयाच्या हभप जगन्नाथ महाराज अंजाळेकर नेत्रालयात नेत्रविभागाने अल्पावधीत उल्लेखनीय यश संपादन केले आहे.**

विभाग प्रमुख डॉ. एन.एस. आर्विकर यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली, नेत्रतज्ज्ञांच्या समर्पित टीमने केवळ आठवडाभरात ५० मोतिबिंदू शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण केल्या. या शस्त्रक्रियांमध्ये आधुनिक फेको तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला. ही पद्धत सुरक्षित, वेदनारहित व लवकर बरे होणारी असल्याने रुग्णांमध्ये विशेष पसंतीस उतरली आहे. ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांसाठी ही सुविधा अत्यंत उपयुक्त ठरली आहे. रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांची पूर्व तपासणी, शस्त्रक्रिया व नंतरची देखभाल यासाठी एक संगठित कार्यपद्धती तयार करण्यात आली आहे. वैद्यकीय महाविद्यालयाचे संचालक तथा विभागप्रमुख डॉ. एन.एस. आर्विकर यांच्या नेतृत्वाखालील नेत्रविभागातील डॉक्टर्स, ऑप्टोमेट्रिस्ट, नर्सेस व इतर सहाय्यक कर्मचारी यांनी या यशात मोलाचा वाटा उचलला आहे.रुग्णालय प्रशासनाकडूनही या उपक्रमासाठी आवश्यक साधनसामग्री व तांत्रिक मदत पुरवण्यात आली आहे. रुग्णांनीही उपचारानंतर समाधान व्यक्त केले असून, दृष्टी परत मिळाल्याचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसून येत आहे.



डॉ. उल्हास पाटील रूग्णालयात

# एन्डोस्कोपी, कोलोनोस्कोपी सुविधा उपलब्ध

## एकाच छताखाली सर्व प्रकारच्या सुविधा; तज्ज्ञांकडून उपचार

**जळगाव– जिल्ह्यातील अग्रगण्य आणि नावाजलेले वैद्यकीय केंद्र असलेल्या डॉ. उल्हास पाटील मेडीकल कॉलेज आणि हॉस्पिटलमध्ये आता एन्डोस्कोपी व कोलोनोस्कोपीसारख्या अत्याधुनिक तपासण्या उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या नव्या सुविधेमुळे आतड्यांसंबंधी आणि पचनसंस्थेशी निगडित आजारांचे तातडीने व अचूक निदान करता येणार आहे. विशेष म्हणजे, आता या तपासण्यांसाठी रुग्णांना अन्य शहरांमध्ये जाण्याची गरज भासणार नाही, त्यामुळे वेळेची तसेच आर्थिक बचत होणार आहे.**

रूग्णालयात अनुभवी व तज्ज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीखाली एन्डोस्कोपी व कोलोनोस्कोपी तपासण्या केल्या जात आहेत. गॅस्ट्रोएंटरोलॉजिस्ट, भूलतज्ज्ञ आणि प्रशिक्षित तांत्रिक कर्मचारी यांच्या समन्वयातून अत्यंत सुरक्षित पद्धतीने ही प्रक्रिया पार पडते. अशा तपासण्या वेळेवर आणि अचूक केल्या गेल्यास पचनसंस्थेतील गंभीर आजार, जसे की गॅस्ट्रिक अल्सर, रक्तस्राव, ट्युमर, पोलिप्स यांचे लवकर निदान,उपचार वेळेत सुरू करता येतात.

**रुग्णांना दिलासा**

रूग्णालयात यापूर्वीपासूनच विविध प्रकारच्या वैद्यकीय व शस्त्रक्रिया सेवा, निदान प्रयोगशाळा, रक्तपेढी, आयसीयू, आणि आपत्कालीन सेवा कार्यरत आहेत. आता एन्डोस्कोपी व कोलोनोस्कोपी या सेवांचा समावेश झाल्याने रुग्णालय अधिक सुसज्ज बनले आहे. एकाच ठिकाणी सर्व तपासण्या आणि उपचार होऊ शकत असल्यामुळे रुग्णांचे गैरसोयीपासून संरक्षण होते.

**तातडीच्या निदानामुळे उपचारांना दिशा**

या तपासण्या त्वरित केल्या जात असल्यामुळे निदान प्रक्रियेत होणारा वेळ वाया जात नाही. अनेक वेळा पचनसंस्थेशी संबंधित आजारांचे निदान उशीराने झाल्यामुळे रुग्णांची स्थिती बिघडते. मात्र, आता हे टाळता येणार आहे. निदान झाल्यावर लगेच उपचार सुरू होतात, जे रुग्णाच्या जीव वाचवण्याच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचे आहे.आर्थिकदृष्ट्या लाभदायकबाहेरील खासगी रुग्णालयांमध्ये अशा तपासण्यांची किंमत खूपच जास्त असते. मात्र, डॉ. उल्हास पाटील हॉस्पिटलमध्ये ही सेवा परवडणाऱ्या दरात उपलब्ध आहे. आरोग्य सेवा पोहोचवण्याच्या दृष्टीने हे महत्त्वाचे पाऊल आहे

# डॉ.उल्हास पाटील रूग्णालयात पॅरोटीड ट्युमरवर यशस्वी शस्त्रक्रिया

**जळगाव – एका ३५ वर्षीय इसमावर डॉ.चैतन्य पाटील आणि डॉ. अर्शील शेख, डॉ. कीरण जोगावडे, डॉ. शुभम कालरा, डॉ. प्रणव शेवाळ टीमने भुलशास्त्र तज्ञांच्या मदतीने पॅरोटीडच्या टयुमरवर केलेली प्लेओमॉर्फिक एडेनोमा शस्त्रक्रिया अथक प्रयत्नानंतर यशस्वी ठरली.**

रूग्णांवर या पुर्वीपण एक शस्त्रक्रिया केलेली होती. रूग्ण आला तेव्हा तपासणीत, डाव्या सबमँडिब्युलर भागात डाव्या बाजूला ४ बाय ५ सेमी टणक दोरी नोड्युल टेंडर सूज दिसून आली. सीटी स्कॅन तपासणी देखील करण्यात आली यात डाव्या पॅरोटीड भागात त्वचेखाली एक गाठ पसरलेली दिसून आली. जखमेची एफएनएसी तपासणी करण्यात आली यात प्लेओमॉर्फिक एडेनोमा निदान झाले.

सामान्य भुल तज्ञ डॉ. बी आर सोनवणे, डॉ शितल ढाके,यांच्या मार्गदर्शनात गाठेची



मास एक्सिजन करण्यात आल फंक्शनल पॅरीओडेक्टोमी पध्दतीने शस्त्रक्रिया करण्यात आली. .नमुने हिस्टोपॅथॉलॉजी तपासणीसाठी पाठवण्यात आले. डॉ. धनजंय बोरोले, डॉ. श्रध्दा उभाळे डॉ. श्रुती यिाणी,डॉ. राशी अग्रवाल,डॉ रेशमा वानखेडे या टीमने हिस्टोपॅथॉलॉजीने मऊ ऊतींमध्ये अनेक परिमित नोड्युलर जखमांचा अहवाल दिला.

त्यांची तुलना मायक्सॉइड-दिसणाऱ्या स्ट्रोमाशी करण्यात आली ज्यामध्ये कॉर्ड आणि ट्रॅबेक्युला यांनी एकमेकांशी जोडलेले विखुरलेले बहुभुज पेशी होते. पेशींमध्ये गोलाकार ते अंडाकृती नरम केंद्रके होती. इंप्रेशन प्लेओमॉर्फिक एडेनोमामध्ये डागांच्या जागेची पुनरावृत्ती झाली.तिला अँटीबायोटिक्स सुरू करण्यात आले. शस्त्रक्रियेनंतर रूग्ण चांगल्या स्थितीत असून पाठपुरावा केला जात आहे.

ट्यूमरच्या मागील शस्त्रक्रियेच्या परिणामी अनेक पुनरावृत्ती होतात आणि ट्यूमर विस्तृत भागात पसरू शकतात.बहुतेक लाळ ग्रंथी ट्यूमरप्रमाणे ट्यूमरचे निदान करण्यासाठी बारीक सुईची आकांक्षा बायोप्सी केली जाऊ शकते.ही गाठ कॅन्सरची नसतेच पण तज्ञांच्या मते वेळीच उपचार न झाल्यास १० केसेस मध्ये कॅन्सरमध्ये रूपांतर होवू शकते

–डॉ.चैतन्य पाटील



# एमआरआय सवलत योजना

**जळगाव – डॉ. उल्हास पाटील मेडिकल कॉलेज व रुग्णालयात गरजू रुग्णांसाठी एम/आर/आय स्कॅन फक्त /३,००० मध्ये करण्याची विशेष सवलत योजना सुरू करण्यात आली आहे.**

सामान्यतः एम/आर/आय स्कॅनसाठी ५,०००-७,००० खर्च येऊ शकतो, पण या योजनेत आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना केवळ ३,००० मध्ये उच्च दर्जाच्या तपासणीची सुविधा देण्यात येत आहे. ही योजना गरजू, अपघातग्रस्त, किंवा शस्त्रक्रियेत येणाऱ्या रुग्णांसाठी आहे या अंतर्गत दि २५ जून पर्यंत ही सवलत योजना राबवण्यात येणार आहे. अतिरिक्त तपासण्या (जसे इतर रेडियोलॉजी चाचण्या) ह्या सवलतीत दिल्या जातात.या सुविधेमुळे रुग्णांना तातडीने निदान करून उपचार करण्यास मदत होणार आहे. अधिक माहितीसाठी, अपॉइंटमेंटसाठी आशिष भिरूड ९३७३३५०००९ यांच्याशी संपर्क साधा.

## संपादकीय

# स्वावलंबनाची संधी

राज्यातील गरजू युवती आणि महिलांना स्वावलंबी बनवण्यासाठी सरकारने गुलाबी रिक्षा वाटप योजनेची अंमलबजावणी सुरू केली आहे. या रिक्षांचे चाक काही महिलांच्या हाती सोपवण्यात आले. महिलांना रोजगार मिळावा आणि रात्री-अपरात्री घरी परतणाऱ्या महिलांना सुरक्षित प्रवास उपलब्ध व्हावा ही या योजनेची प्रमुख उद्दिष्टे असल्याचे सरकारने स्पष्ट केले. या योजनेचे महिलांना अनेक फायदे संभवतात. बहुसंख्य महिला दुचाकी आणि चारचाकी वाहने चालवतात. तथापि ती संधी सर्वच महिलांना मिळत असू शकेल असे नाही. ती उणीव कदाचित दूर होऊ शकेल. वाहन चालवणे हे विशिष्ट कौशल्य आहे. या कौशल्याचे रूपांतरण उदरनिर्वाहात होण्याची संधी ही योजना मिळवून देऊ शकेल. महिला बस-ट्रक चालवतात हे खरे तथापि, अशी वाहने किंवा रिक्षा चालवणे हे महिलांचे काम नाही हा समज मोठ्या प्रमाणात आढळतो. तोही काही प्रमाणात निकाली निघू शकेल. रिक्षा हे प्रवासी वाहन आहे. सर्वदूर वाहतुकीचे तीन तेरा वाजलेले आढळतात. लोक नियम पाळत नाहीत. आवश्यक ती कागदपत्रे जवळ बाळगत नाहीत. सर्वांना एकमेकांच्या वाहनांना ओलांडून पुढे जायचे असते. वाहतूक जाम असेल तर अनेक चालक संयम गमावतात. अस्वस्थ होतात. जोरजोरात हॉर्न वाजवतात. पोलिसांनी कारवाई करायचा प्रयत्न केला तर हुज्जत घालताना आढळतात. अशा वाहनचालकांमध्ये महिला अजूनही मोठ्या संख्येने आढळत नाहीत. बहुसंख्य महिला वाहन शांतपणे, संयमाने चालवताना आढळतात. वाहतूक जाममध्ये अभावानेच घाई करताना आढळतात. महिला त्यांना नेमून दिलेले काम गंभीरपणे करतात. हीच स्वभाव वैशिष्ट्ये त्यांना चांगल्या वाहनचालक बनवू शकतील का? गुलाबी रिक्षा नोकरदार महिलांना सुरक्षित प्रवासाची संधी देतील असे एक उद्दिष्ट आहे. महिला महिलांना जवळच्या वाटतात. त्यामुळे रात्रीच्या वेळी गुलाबी रिक्षातून प्रवास करणे नोकरदार महिलांना सुरक्षित वाटू शकेल.

# उबदार की, थंडगार; अंघोळीच्या पाण्यामागचं विज्ञान!

**रोज अंघोळ करतो, पण पाणी थंड की गरम? - हा प्रश्न प्रत्येकाच्या मनात अधूनमधून डोकावतोच. कोण म्हणतं गरम पाण्याने शरीराला आराम मिळतो, तर कोण म्हणतं थंड पाणी ऊर्जा वाढवतं. आजच्या लेखात आपण हेच पाहणार आहोत की अंघोळीला थंड पाणी वापरावं का गरम, कोणत्या वयात आणि कोणत्या ऋतूत काय योग्य, त्वचेसाठी काय फायदेशीर?**

स्थितीनुसार याचं उत्तर वेगळं असतं. मात्र त्वचारोग तज्ज्ञ म्हणून मी सांगू इच्छिते की अंघोळीच्या पाण्याचं तापमान निवडताना आपण आपल्या त्वचेचा प्रकार, शरीराची गरज, हवामान आणि वय लक्षात घेणं अत्यावश्यक आहे.

हिवाळ्यात बहुतांश लोक गरम पाण्याने अंघोळ करणंपसंत करतात. हे नैसर्गिकही आहे, कारण थंडीमुळे शरीर गोठल्यासारखं वाटतं आणि गरम पाण्यामुळे तो जडपणा कमी होतो. गरम पाण्याने अंघोळ केल्याने स्नायूंना आराम मिळतो, संधिवात किंवा शरीरदुखी असलेल्या व्यक्तींना बरे वाटते. तसेच, गरम वाफेमुळे सर्दी, खोकला आणि बंद नाक यांपासून त्वरित आराम मिळतो. विशेषतः सकाळी उठल्यावर गरम पाण्याची अंघोळ शरीरात उब निर्माण करते, जडपणा कमी करते.

पण गरम पाण्याचे तोटेही दुर्लक्षित करता येणार नाहीत. खूप गरम पाण्यामुळे त्वचेमधील नैसर्गिक तेलं निघून जातात, ज्यामुळे त्वचा कोरडी, खवखवलेली व खाज येणारी होते. संवेदनशील त्वचा असलेल्या व्यक्तींमध्ये, ही अट आणखी गंभीर होऊ शकते. तसेच, रोज खूप गरम पाण्याने अंघोळ केल्यास केस कोरडे, तुटके आणि गळणारे होतात. वृद्ध व रक्तदाबाचे रुग्ण जास्त गरम पाण्याचा वापर केल्यास चक्कर येण्याचा धोका असतो.

दुसरीकडे, थंड पाण्याने अंघोळ केल्याचे फायदेही अनेक आहेत. उन्हाळ्याच्या दिवसांत थंड पाण्याची अंघोळ म्हणजे एक नैसर्गिक उर्जा-डोस आहे. ती शरीरात स्फूर्ती निर्माण करते, त्वचेला ताजेतवाने ठेवते आणि घामाने चिकटलेली त्वचा स्वच्छ करते. थंड पाणी त्वचेमधील नैसर्गिक ओलावा जपून ठेवतं, त्यामुळे कोरडेपणा कमी होतो. तसेच, रोज थोडं थंड पाणी अंगावर घेतल्याने रक्ताभिसरण सुधारतं, मेंदूला ताजेपणा मिळतो आणि स्ट्रेस कमी होतो.

अर्थात, थंड पाण्याची अंघोळ प्रत्येकासाठी योग्य नाही. ज्या व्यक्तींना सर्दी, खोकला किंवा ताप आहे त्यांनी थंड पाण्याने अंघोळ करणे टाळावे. लहान मुलं, वृद्ध आणि शरीर अत्यंत थकलेलं असताना थंड पाणी अधिक त्रासदायक ठरू शकतं. म्हणूनच पाण्याचं तापमान ठरवताना आपण शरीराच्या सध्याच्या प्रकृतीचा विचार केला पाहिजे.



**सौंदर्याच्या गुजगोष्टी**

**डॉ. तेजस्विनी राहूल फाटे**
त्वचा विकार विभाग

अंघोळीचं पाणी निवडताना वय आणि ऋतू यांचा विचार करणे गरजेचे आहे. नवजात बाळांसाठी कोमट पाणी सर्वोत्तम असतं, कारण त्यांची त्वचा खूपच नाजूक असते. लहान मुलं आणि किशोरवयीन मुलांमध्ये उन्हाळ्यात थंड अथवा कोमट पाणी वापरावं तर हिवाळ्यात सौम्य गरम पाणी योग्य ठरतं. प्रौढ व्यक्ती आपल्या प्रकृतीनुसार पाण्याचा प्रकार बदलू शकतात - सकाळी ऊर्जेसाठी थंड आणि रात्री विश्रांतीसाठी गरम पाणी उपयोगी पडू शकतं. वृद्धांसाठी मात्र खूप गरम पाणी धोकादायक असू शकतं; त्यांना सौम्य कोमट पाणी वापरणं हितकारक ठरतं.

त्वचारोग तज्ज्ञांच्या मते, मुरुमांची समस्या असल्यास चेहरा नेहमी थंड पाण्याने धुतला पाहिजे, कारण गरम पाणी त्वचेला अधिक सेंसिटिव्ह करतं. आणि कोरडी त्वचा असेल तर गरम पाण्यानंतर त्वचेला मॉइश्चरायझर लावणं अत्यावश्यक ठरतं. अंघोळीचा कालावधी ५ ते १० मिनिटांपेक्षा जास्त नसावा आणि खूप गरम पाण्याचा थेट वापर टाळावा.

अंघोळीला वापरायचं पाणी हे फक्त आपल्या सवयीवर आधारित नसून, त्यामागे शरीराच्या गरजांनुसार विचार करणं आवश्यक आहे. थंड पाण्याने स्फूर्ती आणि ऊर्जेची अनुभूती मिळते, तर गरम पाण्याने आराम आणि ताणतणावातून मुक्ती. शरीर, त्वचा, ऋतू आणि वय पाहून पाण्याचं तापमान ठरवलं तर आरोग्य, त्वचेसाठी ही अंघोळ रोजचा 'आरोग्यमंत्र' ठरू शकते.

शेवटी एकच सांगावंसं वाटतं - अंघोळ ही केवळ सवय नाही, ती आरोग्य आणि त्वचेच्या देखभालीचा एक महत्त्वाचा टप्पा आहे. योग्य तापमानाचं पाणी निवडणं म्हणजे तुमच्या शरीरावर दररोज केलेली एक प्रेमळ कृती आहे!

# जुने जाणते कर्मयोगी श्री. वासुदेव गुरुजी!

## दिनांक ७ जून २०२५ स्व. वासुदेव घनश्याम पाटील यांच्या स्मृतिदिनानिमित्त लेख प्रकाशित करीत आहोत.

**सर्वप्रथम स्वर्गीय वासुदेव गुरुजींच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन. प्रत्येक विद्यमान पिढी आपल्या गतपिढीच्या आचार, विचार, संस्कारावर मोठी होत असते.**

**का भूमीचे मार्दव**
**सांगे कोंभाची लवलव!**
**कुळी कन्या पुत्र होती जे सात्विक**
**तयाचा हरिक वाटे देवा!!**

आज खानदेशात गोदावरी फाउंडेशन शिक्षण, सहकार, अर्थ, कृषी, वैद्यकीय,विधी, व्यवस्थापन,कला-संगीत या सर्वच क्षेत्रात दैदिप्यमान प्रगती केली व करीत आहे. गोदावरी फाउंडेशनचे संस्थापक श्री. सुभाष पाटील व डॉ.श्री .उल्हासराव पाटील यांनी गोदावरी फाउंडेशन चे साम्राज्य उभे केलेय.

ज्याप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य उभं केलं पण त्यामागे शहाजीराजे व मा जिजाऊ साहेबांचे योगदान अतुलनीय आहे. तद्वतच गोदावरी फाउंडेशन चे आजचे यश प्रगती व स्वरूप पाहता त्याची पायाभरणी स्वर्गीय वासुदेव गुरुजी व गोदावरी आई यांच्या शैक्षणिक दृष्टिकोन, संस्कार, समर्पण यांत आहे. उभयतांनी शिक्षकी पेशा अत्यंत उत्तमपणे कर्तव्यदक्षतेने पार पाडून आपल्या मुलांन सोबत उत्तम संवाद ठेवला. आपल्या मुलांनी खूप शिकावे, शिकून मोठे व्हावे व मोठे यश साकारावे असे स्वप्न उभयतांनी पाहिले होते.

**जाहले धन्य लाभले प्रिय माता-पिता**
**करता करविता तोची प्रारब्ध संचित!**

आज वासुदेव गुरुजींच्या कार्याचा परिचय करून देण्याचे कारण श्री सुभाष पाटील व डॉ. उल्हासराव पाटील यांचे ते वडील होय.

**गुरुजी! तुमची साथ,तुमचे आशीर्वाद,**
**प्राणाचे दुवे मिळवत गेले!**
**गुरुजी! तुमची साथ,तुमचे आशीर्वाद,**
**घरभर दिवे लावून गेले.!!**

अनेक अतुलनीय अभिजात गुणांनी स्वतः:च्या व्यक्तिमत्वात जाणीवपूर्वक जोपासना केलेले धुरंदर प्रज्ञावंत मुत्सद्दी शिक्षक म्हणजे वासुदेव गुरुजी होय! स्व:आचरणातून जीवनाचा परिपाठ घालणारे ते आदर्श शिक्षक होते. कर्तृत्ववान व्यक्तींच्या जीवन चरित्र तत्कालीन परिस्थिती प्रतिकूल वातावरणाशी झगडून त्यांनी गाठलेल्या ध्येयाच्या फलश्रुतीवर ती समजून घ्यायची असतात.

निष्ठेचा ठसा नी कष्टाचा वसा स्वीकारलेले हंबर्डी तालुका यावल येथील स्वर्गीय नर्मदाबाई व स्वर्गीय घनश्याम उखर्डू पाटील हे शेतमजूर म्हणून काम करून आपला उदरनिर्वाह करीत होते. त्यांना तत्कालीन परिस्थितीमुळे अक्षर ओळख नव्हती, पण सद्गुण, सदविचार, सदाचार, धार्मिक व श्रद्धाळू होते. त्यांचे संपूर्ण जीवन अत्यंत कष्टमय परिस्थितीत गेले. तीन अपत्य होते. त्यातील स्वर्गीय वासुदेव गुरुजी सर्वात मोठे होते. त्यांचा जन्म दिनांक १ जानेवारी १९३० रोजी हंबर्डी येथे झाला. त्या कालखंडात गुरुजींनी सातवी फायनल पर्यंतचे शिक्षण हंबर्डी गावातच घेतले. पुढे व्हर्नाक्युलर फायनल हा शिक्षण शास्त्रातील अभ्यासक्रम नाशिक येथून पूर्ण केला. त्यानंतर, त्या वेळचे एदलाबाद आताचे मुक्ताईनगर तालुक्यातील ''मेळसांगवे या गावी व्हॉलंटरी शिक्षक म्हणून ज्ञानदानाच्या कार्याचा श्रीगणेशा केला. सन १९४७-४८ मध्ये नाशिक येथे ज्युनियर पी टी सी या अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण घेतले, व १९४९ मध्ये लोहारा या गावी प्राथमिक शिक्षक म्हणून रुजू झाले. यथावकाश ऊटखेडा, विवरा, लोहारा या गावात ज्ञानदानाचे पवित्र कार्य गुरुजी या नामाभिनाला सार्थ ठरेल असे केले.

गुरुजींच्या जीवनात साथ देणाऱ्या त्यांच्या पत्नी गोदावरी आई या मॅट्रिक व शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रम पूर्ण करून १९५४ मध्ये जि.प. जळगाव अंतर्गत खिर्डी ता. रावेर येथे प्राथमिक शिक्षिका म्हणून आपल्या कारकिर्दीला सुरुवात केली.

गुरुजी म्हणत परिस्थिती ही यशाच्या मार्गाला अडसर असू शकत नाही. परिस्थिती कशीही असो आपण न डगमगता परिस्थितीचा सामना केल्यास यश नक्की मिळते.

गुरुजी सकाळी चार वाजता उठायचे. त्यांच्याकडे पैसा नसला तरी माणुसकी होती. कुणीही गरजवंत त्यांच्याकडे आला की त्यास मदत करायचे. त्यांची सामाजिक विचारसरणी श्रेष्ठ होती. त्या कालखंडात गावात एखाद्या वतनदाराचा नसेल इतका दरारा गुरुजींचा होता. गुरुजींचा स्वभाव मृदू व मवाळ पण भविष्याचा वेध घेणारा दृष्टिकोन होता.

वासुदेव गुरुजींना तीन आपत्य, त्यात सर्वात मोठ्या सौ. प्रमिला सुधाकर भारंबे कला शाखेतून पदवीधर त्यांचे पती श्री. सुधाकर भारंबे हे किर्लोस्कर कमिन्स कंपनीतून इंजिनीयर म्हणून सेवानिवृत्त असून पुणे येथे स्थायिक आहेत.

दुसरे श्री सुभाष पाटील हे एम एस सी असून त्यांची कारकीर्द स्व. जे. टी. महाजन व स्व. मधुकरराव चौधरी यांच्या सहवासात सामाजिक, सहकार व आर्थिक क्षेत्रात कार्य, ते उत्तम आर्थिक सल्लागार आहेत. काही काळ त्यांनी प्राध्यापक म्हणूनही सेवा केली आहे. सुभाषदादांच्या सौभाग्यवती प्रा. डॉ. सुषमा पाटील व्यवस्थापन विषयात पीएचडी असून त्या पीएचडीच्या मार्गदर्शक आहेत. सुभाषदादांचा सर्व परिवार उच्च विद्याविभूषित आहे. गोदावरी बँक व गोदावरी फाउंडेशन ही सुभाषदादांची संकल्पना होय.



तिसरे डॉ. उल्हासराव पाटील हे स्त्री रोग तज्ञ असून गोदावरी फाउंडेशनचे अध्यक्ष व माजी खासदार आहेत.

आपल्या मुलांनी बालपणापासूनच बुद्धिमापन चाचण्या व स्पर्धात्मक परीक्षांना बसावे यासाठी गुरुजी सदैव प्रयत्नशील असायचे. त्यामुळे डॉक्टर साहेब इयत्ता चौथी मध्ये गव्हर्नमेंट रेसिडेन्शियल पब्लिक स्कूलचीपरीक्षा दिली. या परीक्षेत त्या कालखंडात जळगाव जिल्ह्यातून फक्त तीन विद्यार्थी उत्तीर्ण झाले होते, त्यात डॉक्टर एक होते. गुरुजी स्वतः मुलांचा अभ्यास घ्यायचे ज्यामुळे त्यांनी आपल्या तिन्ही मुलांच्या आयुष्याला योग्य दिशा दिली.

आपल्या मुलांनी खूप शिकावं, शिकून मोठे व्हावं, यश साकाराव अशा अनेक स्वप्नांची पेरणी गुरुजींनी आपल्या मुलांमध्ये केली.

शिक्षक म्हणून कार्य करताना अत्यंत हुशार पण आर्थिक परिस्थितीने बेजार झालेल्या अनेक मुलांना मदत केली. त्यांचे अनेक विद्यार्थी आज मोठ्या पदावर आहेत.

गुरुजींचा प्रदीर्घकाळ विवरे बुद्रुक गावी गेला सण १९५९ ते १९७३ या काळात गुरुजींनी विवरे गावाच्या विकासासाठी खूप प्रयत्न केले. कै. मुरलीधर अवसु राणे विवरे गावचे वीस वर्षे सरपंच होते. ते सतत गुरुजींचे मार्गदर्शन घेत. गुरुजींच्या आग्रहास्तव ग. गो. बेंडाळे यांनी पाच एकर शेत माध्यमिक शाळेस दिले. या शाळेचे गुरुजी सेक्रेटरी झाले. या शाळेच्या वाटचालीस गुरुजींचे योगदान खूप आहे सर्व ग्रामपंचायत सदस्य गुरुजींचे मार्गदर्शन घेत असत. येथील प्रगतशील शेतकरी मार्तंड गणपत भिरूड व मुरलीधर राणे यांनी गुरुजींच्या सार्वजनिक व शैक्षणिक कार्यास मोलाची साथ दिली. गावच्या विकासासाठी अनेक लोकोपयोगी योजना गुरुजींनी सर्वांना सोबत घेऊन यशस्वी केल्या. समर्पणाविना उज्वलता ती कुठली वासुदेव गुरुजी हे गाव विकासाचे केंद्र झाले होते.

**धन्य ते गुरुजी.**

अनेक हुशार लोक विवरे या गावाने जिल्ह्याला दिले त्या रत्नमालिकेतील डॉ. उल्हासराव पाटील हे कळस आहेत.

विवरे गावाच्या इतिहासात वासुदेव गुरुजी यांचे कार्य सतत सोनेरी वैभव सारखं जगमगत राहील! गुरुजी सर्वधर्मसमभाव वृत्तीचे होते, ज्यामुळे गावातील सर्व लोक त्यांना मानायचे. एखाद्या वतनदाराचा नसेल इतका दरारा त्यांचा होता, कारण त्यांच्या कामाचे नियोजन - शिस्तबद्ध व त्यांची तल्लख बुद्धी यामुळे ते सर्वांच्या आदरास पात्र झाले. पुढे त्यांची बदली लोहारा या गावी झाली. या गावात तडवी, मुस्लिम, वंजारी समाजाचे लोक मोठ्या प्रमाणात होते. या सर्वांन सोबत गुरुजींचे संबंध घरासारखे होते. गुरुजींकडे शिक्षणाची दूरदृष्टी असल्यामुळे त्यांच्या मुलांना पुणे येथे शिक्षणासाठी पाठविले गुरुजींनी मुलांच्या आयुष्याला योग्य दिशा दिली. हीच घटना या परिवाराच्या विकासाची टर्निंग पॉईंट ठरली.

काळ सारखा पुढे-पुढे जात होता. मुलांच्या शिक्षणातील प्रगतीवर गुरुजींचे बारीक लक्ष होते डॉक्टरांनी इयत्ता दहावीची परीक्षा उत्तम गुणांनी पब्लिक स्कूल मधून उत्तीर्ण केली. घरात आनंदाचे, उत्साहाचे वातावरण होते. गुरुजी तेव्हा ऊटखेडा येथे असताना वयाच्या ४५ व्या वर्षी गुरुजींना हृदयविकाराचा तीव्र झटका आला. नियतीच्या मनात काही वेगळेच होते. डॉक्टर दहावीत असताना गुरुजींनी जगाचा निरोप घेतला तो दिवस सात जून १९७५ होय.गुरुजींच्या जाण्याने कुटुंबावर फार मोठा आघात झाला. गुरुजींच्या पश्चात आई आणि वडील या दोन्ही भूमिका गोदावरी आईने समर्थपणे पार पाडल्यात.

**आई हा धैर्याचा डोंगर, न डळमळे कदाकाळी**

गोदावरी आई परिस्थितीच्या वादळवाऱ्यातून आणि सुखद क्षणांच्या मंद झुळकेतून तावून सलाखून निघालेले व्यक्तिमत्व... वेगाने मार्गक्रमण करताना काळासोबत चालताना त्यांच्या पायात अनेक काटे रुतले. ऊन-सावलीच्या खेळाप्रमाणे दुःखाचे प्रसंग ही त्यांच्या वाटेला आले, अनेक ठेचाही लागल्या, पण यातून सावरत शिक्षणासाठीच त्यांचा जन्म झालेला असावा. गुरुजींच्या पश्चात गुरुजींची मुलांच्या दृष्टीने स्वप्नपूर्तीसाठी या मातेने आपला देह झिझवाला. आज त्या ९२ वर्षाच्या आहेत अति प्रेमळ व सत्यवचनी आहेत. आपल्या ३६ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेत पाच वर्षे विवरे येथील प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका म्हणून उत्कृष्ट कार्य केले आहे. गोदावरी आईने मुलांना आपण गरीब आहोत असे कधी जाणू दिले नाही.आपल्या मनाची श्रीमंती व संस्काराची गर्भश्रीमंती ही लोकोत्तर पुरुषाची ठेव असते असं त्या म्हणत. मुलांनी मनःपूर्वक अभ्यास करायचा आणि उत्तम शिक्षण संपादन करायचा हा संस्कार आई-वडिलांनी मुलांमध्ये रुजवल्यामुळे डॉक्टरांनी १८-१८ तास अभ्यास करून, विद्यादेवता शारदेच्या गाभाऱ्यात जाऊन विद्यादेवतेला प्रसन्न करून आपल्या ध्येयाला गवसणी घातली.

**समर्थ ते हात जे खेचूनी आणतात वैभवाते!**

डॉ. उल्हासराव पाटील यांच्या पत्नी डॉ. सौ. वर्षा पाटील श्री रोग तज्ञ असून त्यांच्या कन्या डॉ.सौ. केतकी ताई पाटील रेडिओलॉजिस्ट तर जावई डॉ.वैभव पाटील हे हृदयरोग तज्ञ मुलगा डॉ.अनिकेत पाटील एमसीएच न्यूरो सर्जरी सून डॉ. अक्षता पाटील या वैद्यकीय क्षेत्रातील उच्च विद्याविभूषित आहे. वैद्यकीय सेवेच्या असिधारा व्रताने, सत्कारलेल्या कर्मयोगाने गोदावरी फाउंडेशनचे कार्य समाजमनाला प्रोत्साहित करत आहे. वासुदेव गुरुजींचा सारा परिवार उच्च विद्या विभूषित पण विनयशील आहे. समाजासमोर गुरुजींच्या कार्याने पिढ्यानपिढ्या आदर्श घ्यावा, नि प्रगती करावी. परिस्थिती ही यशाच्या मार्गातील अडसर असूच शकत नाही. हा सकारात्मक संदेश गुरुजींच्या व गोदावरी आई यांच्या जीवन चरित्रातून समाजाला अनंतकाळ स्फूर्ती नी प्रेरणा देत राहील.

**धन्य तयाचिया माता पिता**
**प्रेरणेचे स्त्रोत तुम्ही!!!**
**प्रगतीचे तुम्ही सांगाती!!!**
**कोटी कोटी प्रणाम तुम्हा.!!!**

संकलन -
**शांताराम जगन्नाथ पाटील**
भुसावळ,
९५४५२०७०५०

Editor : Sourabh Patil (Reg. Newspaper) Weekly Godavari Parivar : Owner, Publisher, Printer : Dr. Mrs. Varsha Patil printed at Subhash Printers, 38, Trimbak Nagar, Near Shakuntala Rane Primary School, Beside Narayani Park Apartment, Mahabal Area, Jalgaon 425002 (Mah.) Godavari Hospital, Released at Jalgaon, Near Bhaskar Market. Phone no. 2221834/35, & Posted from Jalgaon Main Post Office. Should be sent to this email for publication of news in the issue (Editors do not necessarily agree with the views published in the issue.)

संपादक : सौरभ पाटील (रजि. न्युजपेपर) साप्ताहिक गोदावरी परिवार : मालक, प्रकाशक, मुद्रक : डॉ. सौ. वर्षा पाटील यांनी सुभाष प्रिंटर्स, ३८, त्र्यंबक नगर, शकुंतला राणे प्रायमरी स्कूलजवळ, नारायणी पार्क अपार्टमेंट शेजारी, महाबळ एरिया, जळगांव ४२५००२ (महा.) येथे छापून गोदावरी हॉस्पिटल, भास्कर मार्केट जवळ, जळगांव फोन नं. २२२१८३४/३५ येथे प्रसिद्ध करून जळगांव मुख्य डाक कार्यालय येथून निर्गमित केले. अंकात बातम्या प्रसिद्ध करण्यासाठी या ईमेलवर पाठवाव्यात. Email : godavari.parivar@gmail.com (अंकात प्रकाशित झालेल्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

# कर्तव्याचे महामेरू गुरूजी स्व.वासुदेव पाटील यांना आदरांजली अर्पण



## गोदावरी फाउंडेशन संचलित शैक्षणिक संस्थांमध्ये गुरूजींच्या कार्याचे स्मरण

जळगाव – येथील गोदावरी फाउंडेशनचे प्रेरणास्त्रोत स्व. वासुदेव पाटील गुरुजी यांच्या ५० व्या स्मृतीदिनानिमित्त विविध शैक्षणिक संस्थांमध्ये आदरांजलीपर कार्यक्रम घेत गुरूजींच्या महान कार्याला उजाळा देण्यात आला. स्व. वासुदेव गुरूजी यांच्या विचारांचा वारसा सतत तेवत ठेवण्याचा मानस
















### गोदावरी रूग्णालय

गोदावरी प्रसूती रूग्णालय येथे प्रेरणास्त्रोत स्व. वासुदेव पाटील गुरूजी यांच्या स्मृतीदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेला गोदावरी आजी यांच्या हस्ते माल्यार्पण करण्यात आले. यावेळी गोदावरी आजी यांनी स्व. गुरूजींच्या जीवनकार्याविषयीची माहिती दिली. याप्रसंगी राधा नायर, राजेश साठे, अनंत साठे, किशोर पाटील, भूषण पाटील यांच्यासह नर्स स्टाफ उपस्थित होते.

---

### महादेव रुग्णालय

येथील महादेव रुग्णालयात गोदावरी फाऊंडेशनचे अध्यक्ष माजी खासदार उल्हास पाटील यांचे वडील प्रेरणास्त्रोत स्व. वासुदेव घनश्याम पाटील यांच्या स्मृतिदिनी अभिवादन करण्यात आले.यावेळी गोदावरी परिवारातील प्रा. एन. जी. चौधरी यांच्या प्रमुख उपस्थितीत स्वर्गीय वासुदेव घनश्याम पाटील गुरुजींचे प्रतिमेला पुष्पहार अर्पण करत महादेव रुग्णालयातील सर्व सहकारी यांनी प्रतिमा पूजन करत अभिवादन केले.

---

### गोदावरी कॉलेज ऑफ नर्सिंग

गोदावरी कॉलेज ऑफ नर्सिंग महाविद्यालयात निष्काम कर्मयोगी स्व. वासुदेव पाटील(गुरूजी) यांच्या ५० व्या स्मृतीदिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी प्राचार्या विशाखा गणवीर यांनी स्व. वासुदेव पाटील यांच्या प्रतिमेला माल्यार्पण केले. याप्रसंगी उपप्राचार्य प्रा. जसनीत दया, प्रा. शिवानंद बिरादार, प्रा. पियुष वाघ, प्रा. सुमित निर्मल, प्रवीण कोल्हे, अरुण चौधरी, गणेश नांदुरकर, अविनाश पाटील तसेच सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

---

### गोदावरी इंग्लिश स्कूल

येथील गोदावरी सीबीएसई इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये स्व. वासुदेव पाटील यांना स्मृतीदिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. स्कूलच्या प्राचार्या निलीमा चौधरी यांच्या हस्ते माल्यार्पण करण्यात आले. यावेळी स्कूलमधील शिक्षक, शिक्षिका, कर्मचारी वृंद उपस्थित होते.

---

### गोदावरी आयएमआय, डॉ. वर्षा पाटील वुमन्स कॉलेज

गोदावरी आयएमआर महाविद्यालय व डॉ वर्षा पाटील वुमन्स कॉलेज ऑफ कॉम्प्युटर ऍप्लिकेशनमध्ये निष्काम कर्मयोगी स्व. वासुदेव घनश्याम पाटील गुरुजी यांना ५० व्या स्मृतीदिनानिमित्त आदरांजली अर्पण करण्यात आली. आयएमआरचे संचालक डॉ. प्रशांत वारके यांनी स्व. वासुदेव पाटील गुरूजी यांच्या कार्याचे स्मरण करीत त्यांच्या आठवणींना उजाळा दिला. तसेच त्यांच्या संस्कारातून उभी राहिलेली पुढची पिढी त्यांच्या विचारांचा वारसा जपत असल्याचे सांगितले. याप्रसंगी डॉ वर्षा पाटील वुमन्स कॉलेजच्या प्राचार्या डॉ नीलिमा वारके यांनी स्व. वासुदेव गुरुजी यांना पुष्प सुमन वाहून आदरांजली अर्पण केली. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी वृंद उपस्थित होते.

---

### डॉ. उल्हास पाटील विधी महाविद्यालय

स्व. कर्मयोगी वासुदेव घनश्याम पाटील गुरुजी यांना ५० व्या पुण्यतिथी निमित्त आदरांजली अर्पण करण्यात आली. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी स्व. गुरूजी यांना अभिवादन केले.

---

### डॉ. उल्हास पाटील रूग्णालय

डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय रूग्णालयात स्व. वासुदेव पाटील गुरूजी यांना स्मृतीदिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी वैद्यकीय महाविद्यालयाचे रजीस्ट्रार प्रमोद भिरूड, वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रेमचंद पंडीत, नेत्ररोग तज्ज्ञ डॉ. नि.तु. पाटील, डॉ. बाविस्कर, डॉ. सी.डी. सारंग, अशोक भिडे, अशोक बऱ्हाटे, हेमंत पाटील, नीलेश पाटील, टी.व्ही. पाटील, संकेत पाटील यांच्यासह कर्मचारी वृंद उपस्थित होते.

---

### गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालय

गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालयात स्व. वासुदेव पाटील गुरूजी यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही.एच. पाटील यांच्यासह सर्व प्राध्यापक व कर्मचारी वृंद उपस्थित होते.

---

### फिजीओथेरेपी महाविद्यालय

डॉ. उल्हास पाटील कॉलेज ऑफ फिजीओथेरेपी महाविद्यालयात स्व. वासुदेव पाटील यांच्या स्मृतीदिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ. जयवंत नागुलकर यांच्यासह प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.

---

### डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय

डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयात स्व. वासुदेव पाटील गुरूजी यांच्या प्रतिमेस रजीस्ट्रार प्रमोद भिरूड यांच्या हस्ते माल्यार्पण करण्यात आले. यावेळी रूग्णालयाचे प्रशासन अधिकारी आशिष भिरूड, लेखापाल विकास बेंडाळे यांच्यासह कर्मचारी वृंद उपस्थित होते.

---

### डॉ गुणवंतराव सरोदे आयुर्वेद महाविद्यालय व रूग्णालय

डॉ गुणवंतराव सरोदे आयुर्वेद महाविद्यालय व रूग्णालय रिसर्च सेंटर येथे स्व. वासुदेव पाटील गुरूजी यांच्या प्रतिमेस अधिष्टाता डॉ हर्षल बोरोले यांच्या हस्ते माल्यार्पण करण्यात आले. यावेळी डॉक्टर,प्राध्यापक व कर्मचारी वृंद उपस्थीत होते.

---

### डॉ.उल्हास पाटील होमीओपॅथी महाविद्यालय

डॉ.उल्हास पाटील होमीओपॅथी महाविद्यालय व रूग्णालय येथे स्व. वासुदेव पाटील गुरूजी यांच्या प्रतिमेस प्राचार्य डॉ. आर के मिश्रा यांच्या हस्ते माल्यार्पण करण्यात आले. यावेळी डॉक्टर,प्राध्यापक व कर्मचारी वृंद उपस्थीत होते.

---

### डॉ उल्हास पाटील कृषि महाविद्यालय

डॉ उल्हास पाटील कृषि महाविद्यालय,अन्न व तंत्रज्ञान आणि कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयात स्व. वासुदेव पाटील गुरूजी यांच्या प्रतिमेस संचालक डॉ एस एम पाटील यांच्या हस्ते माल्यार्पण करण्यात आले. यावेळी प्राध्यापक व कर्मचारी वृंद उपस्थीत होते.

---

### डॉ उल्हास पाटील सीबीएसई इग्लिश स्कुल सावदा

डॉ उल्हास पाटील सीबीएसई इग्लिश स्कुल सावदा स्व. वासुदेव पाटील गुरूजी यांच्या प्रतिमेस प्राचार्य भारती महाजन यांच्या हस्ते माल्यार्पण करण्यात आले. यावेळी शिक्षक व कर्मचारी वृंद उपस्थीत होते.

---

### डॉ उल्हास पाटील सीबीएसई इग्लिश स्कुल भुसावळ

डॉ उल्हास पाटील सीबीएसई इग्लिश स्कुल भुसावळ स्व. वासुदेव पाटील गुरूजी यांच्या प्रतिमेस प्राचार्य अनघा पाटील यांच्या हस्ते माल्यार्पण करण्यात आले. यावेळी शिक्षक व कर्मचारी वृंद उपस्थीत होते.

# भुसावळ बस स्थानक सुशोभीकरण व रुग्णसेवा कक्ष उभारणी शुभारंभ

गोदावरी फाउंडेशन कडून भुसावल बस स्थानकाचे सुशोभीकरण करण्यात येणार असून प्रवासी रुग्णांसाठी २४ तास रुग्णसेवा कक्ष व तज्ज्ञ डॉक्टरांची सेवा देण्यात येणार आहे.

आज दिनांक ८ जून रोजी गोदावरी आय एम आर चे संचालक डॉ प्रशांत वारके यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी डॉ वारके यांनी सदर सेवेचा शुभारंभ आज होत असून लोकार्पण हे अवघ्या २२ दिवसात म्हणजे ३० जूनला होणार असल्याची जाहीर केले व रुग्णसेवेची संधी दिल्याबद्दल एसटी महामंडळाचे आभार मांडले. सदर कार्यक्रमास भुसावल बस कंट्रोलर श्री हेमंत चौधरी, सन ऍडव्हर्टाईस चे श्री मंगेश जुनागडे, इंटेरियर चे श्री रामपाल जांगिड तसेच गोदावरी फाउंडेशन चे प्रा चंद्रकांत डोंगरे, प्रा पंकज बोंडे, रितेश पाटील, निखिल कोळी व मोठ्या संख्येने प्रवासी उपस्थित होते



## डॉ.उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालयात

# एमयुएचएस स्थापना दिन साजरा

जळगाव - महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विदयापिठ नाशिकचा स्थापना दिन डॉ.उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालयात मोठया उत्साहाने साजरा करण्यात आला. यावेळी अधिष्टाता डॉ. प्रशांत सोळंके यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

त्यांचे सोबत प्रशासकीय अधिकारी प्रमोद भिरूड, क्रिडा संचालक व रेक्टर प्रा. सुरेंद्र गावंडे, यांचेसह कर्मचारी व विदयार्थी वर्ग उपस्थीत होता.स्थापना दिनानिमीत्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

**डॉ.उल्हास पाटील कॉलेज ऑफ फिजिओथेरेपी**

येथील डॉ. उल्हास पाटील कॉलेज ऑफ फिजिओथेरेपी येथे कार्यक्रमाचे आयोजन प्रा. सुरेंद्र गांवडे डॉ. अमित जैस्वाल यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजीत या कार्यक्रमास प्राचार्य डॉ. जयवंत नागुळकर, यासोबतच डॉ. उल्हास पाटील कॉलेज ऑफ फिजिओथेरपी मधील सर्व प्रशासकीय कर्मचारी, शिक्षकवृंद आणि अशैक्षणिक कर्मचारी उपस्थीत होते.

**गोदावरी कॉलेज ऑफ नर्सिंग**

येथील गोदावरी कॉलेज ऑफ नर्सिंगमध्ये प्राचार्य विशाखा गणविर, उपप्राचार्य जयसिंग ढाया, प्रा मनोरमा कश्यप,प्रा अश्वीनी वैदय, प्रा अश्वीनी मानकर यांचेसह प्राध्यापक व विदयार्थी उपस्थीत होते.

**डॉ.गुणवंतराव सरोदे आयुर्वेद महाविद्यालय**

डॉ. मुकेश चौधरी, डॉ.मयुरी चौधरी, प्रशासन अधिकारी चेतन चौधरी यांच्यासह विद्यार्थी व प्राध्यापक वृंद उपस्थीत होते. ध्वजारोहणासह विदयापिठ गायन व विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.



## डॉ. उल्हास पाटील रूग्णालयात

# पर्यावरण दिनानिमित्त ३५१ रोपट्यांचे रोपण

**जळगाव - येथील डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयातर्फे जागतिक पर्यावरण दिनानिमित्त ३५१ विविध प्रकारच्या रोपट्यांचे रोपण करण्यात आले. तसेच प्रत्येक विद्यार्थ्याने या रोपट्याचे संवर्धन करण्याची जबाबदारी देखिल घेतली आहे.**

याप्रसंगी वैद्यकीय महाविद्यालयाचे संचालक डॉ. एन.एस. आर्विकर, डीन डॉ. प्रशांत सोळंके, रजीस्ट्रार प्रमोद भिरूड, महाविद्यालयाचे जनरल सेक्रेटरी शिवराज दाभाडे यांच्यासह प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी महाविद्यालयातील परिसरात स्वच्छता मोहीम देखिल राबविण्यात आली. तसेच बायोमेडीकल कचऱ्याचे विलगीकरण करून त्याची विल्हेवाट लावण्यात आली.



### डॉ. वर्षा पाटील महिला गृहविज्ञान महाविद्यालय

जळगाव - येथील डॉ. वर्षा पाटील महिला गृहविज्ञान महाविद्यालयात महाविद्यालयाच्या मैदानावर राष्ट्रीय सेवा योजना युनिटअंतर्गत वृक्षारोपण मोहीम आयोजित केली होती.

या निमीत्ताने ११ विविध प्रकारच्या रोपट्यांचे रोपण करण्यात आले. तसेच प्रत्येक विद्यार्थ्याने या रोपट्याचे संवर्धन करण्याची जबाबदारी देखिल घेतली आहे. याप्रसंगी नएसएस युनिटचे ३ स्वयंसेवक, प्राचार्य, १ पीओ, २ शिक्षक आणि महाविद्यालयाचे २ कर्मचारी सहभागी झाले होते. यांच्यासह प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

## गोदावरी नर्सिंग महाविद्यालयाच्या

# भोजनालयाचा शुभारंभ

**जळगाव - येथील गोदावरी कॉलेज ऑफ नर्सिंग महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी सुसज्ज असे भोजनालय उभारण्यात आले असून गुरूवारी सत्यनारायण पूजा करून शुभारंभ करण्यात आला. पंकज आणि स्वाती वाघमारे या दाम्पत्याच्या हस्ते महापूजा करण्यात आली. पौरोहित्य राजपुरोहित डि.टी. राव यांनी केले.**

यावेळी डिएम कार्डीओलॉजीस्ट डॉ. वैभव पाटील, प्राचार्या विशाखा गणवीर, प्रा. जस्मित दया, वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रेमचंद पंडीत यांच्यासह मान्यवर व विद्यार्थी उपस्थित होते. या भोजनालयात एकाच वेळी ३०० विद्यार्थी भोजन करू शकतील अशी सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच भोजनालय हवेशीर, निसर्गरम्य वातावरणात असून स्वच्छता राखण्यासाठी स्वतंत्र टीम कार्यरत आहे.





**डॉ. प्रेमचंद पंडित**
(९४२२९१५३७९)
(निवृत्त सिव्हील सर्जन, बुलडाणा)
वैद्यकीय अधीक्षक
डॉ.उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय, जळगाव

1. For every challenge you face, identify at least one aspect within your control that you can improve.
2. Have internal locus of control and find solutions rather than dwell on problems.
3. Starting proactively versus reactively influences your sense of control and confidence.
4. Identify one skill that is becoming increasingly important in your field and begin learning it immediately.
5. Treat learning as a lifelong investment rather than a task that ends with formal education.
6. Without clarity, there is no way to measure progress or adjust course when necessary.
7. Staying ahead of change requires continuous adaptation rather than reactive scrambling.

१. हर चुनौती का सामना करते समय, कम से कम एक ऐसा पहलू खोजें जिसे आप नियंत्रित कर सकते हैं और सुधार सकते हैं।
२. आंतरिक नियंत्रण का स्थान रखें और समस्याओं पर वुशश्रश्र करने के बजाय समाधान खोजें।
३. सक्रिय रूप से शुरुआत करने से (प्रतिक्रियाशील होने के बजाय) आपके नियंत्रण और आत्मविश्वास की भावना पर प्रभाव पड़ता है।
४. एक ऐसा कौशल पहचानें जो आपके क्षेत्र में तेजी से महत्वपूर्ण होता जा रहा है और उसे तुरंत सीखना शुरू करें।
५. सीखने को एक जीवनभर का निवेश मानें, न कि केवल एक कार्य जो औपचारिक शिक्षा के साथ समाप्त हो जाता है।
६. स्पष्टता के बिना, प्रगति को मापना या जब आवश्यक हो तो मार्ग समायोजित करना असंभव है।
७. बदलाव से आगे रहने के लिए निरंतर अनुकूलन आवश्यक है, न कि प्रतिक्रियात्मक हाथापाई।

## मानसिक आरोग्य नर्सिंग विभागात

# जागतिक स्किझोफ्रेनिया दिन



**जळगाव - जागतिक स्किझोफ्रेनिया दिनानिमित्त मानसिक आरोग्य नर्सिंग विभागाने व्याख्यान आयोजित केले होते.**

या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते डॉ. विलास चव्हाण, एमडी मानसोपचार डीयूपीएमसीएच जळगाव आणि डॉ. उमा चांदूरकर, एमडी निवासी हे होते. प्रा. विशाखा गणवीर प्राचार्य जीसीओएन जळगाव, प्रा. जसिंथ धाया उपप्राचार्य, प्रा. आशिविनी वैद्य मानसोपचार विभागाच्या प्रमुख, जीसीओएन, जळगाव श्रीमती हेमांगी मुरकुटे, सहयोगी प्राध्यापक श्री. सुमित निर्मल सहाय्यक प्राध्यापक, सुश्री मालती मॅडम सहयोगी प्राध्यापक आणि सर्व मानसोपचार विशेषज्ञ शिक्षक आणि पदवी आणि पदव्युत्तर पदवीचे विद्यार्थी कार्यक्रमाला उपस्थित होते. सुश्री शिल्पा वाघमारे यांनी सूत्रसंचालन केले आणि श्री. सुमित निर्मल यांनी आभार मानले. डॉ. विलास यांनी स्किझोफ्रेनिया, लक्षणे, कारणे आणि उपचार स्पष्ट केले. कार्यक्रम सर्व सहभागींसाठी माहितीपूर्ण, शैक्षणिक, नाविन्यपूर्ण आणि प्रेरणादायी होता.

## आद्य क्रांतिकारक बिरसा मुंडा पुण्यतिथी साजरी

**जळगाव -जिल्हा जळगाव येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पामार्फत आज महान आदिवासी नेते आणि आद्य क्रांतिकारक बिरसा मुंडा यांची पुण्यतिथी अत्यंत आदरपूर्वक साजरी करण्यात आली.**

या कार्यक्रमात बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. त्यानंतर त्यांच्या संघर्षमय जीवनावर आधारित माहिती दिली गेली. उपस्थित अधिकारी, कर्मचारी, तसेच आदिवासी समाजबांधव यांनी श्रद्धांजली अर्पण केली.

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे प्रकल्प अधिकारी श्री. अरुण पवार यांनी आपल्या भाषणात सांगितले की, बिरसा मुंडा यांचे विचार आणि आदर्श आम्हाला आदिवासी समाजाच्या विकासासाठी प्रेरणा देतात.कार्यक्रमाचे आयोजन अत्यंत शिस्तबद्ध पार पडले. कार्यक्रमाला कार्यालयीन सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांनी उपस्थिती लावुन आदरांजली अर्पण केली.

# जागरूक शेतकरी - सुरक्षित फवारणी....!!

**शेती करताना कीड नियंत्रणासाठी किटकनाशकांचा वापर अपरिहार्य असतो. मात्र त्याचा वापर करताना शेतकऱ्यांनी योग्य ती काळजी घेतली नाही, तर याचे दुष्परिणाम आरोग्यावर होऊ शकतात. अनेकदा फवारणी करताना साध्या चुकांमुळे विषबाधा होऊन अपघात किंवा आजार उद्भवतात. त्यामुळे किटकनाशके फवारण्यापूर्वी, फवारताना आणि फवारणीनंतर काही महत्त्वाच्या गोष्टी लक्षात ठेवणे अत्यावश्यक आहे.**

फवारणी करण्याआधी वापरण्यात येणाऱ्या रसायनाच्या बाटलीवरील लेबल, सूचना पत्रक नीट वाचावे. त्या प्रत्येक रासायनाच्या विषारीपणाची पातळी वेगळी असते. यासाठी बाटल्यांवर लाल, पिवळा, निळा आणि हिरवा अशा रंगाचे त्रिकोणी चिन्ह असते. लाल रंग हे अत्यंत विषारी रसायन दर्शवते. या रंगांच्या आधारे निरक्षर व्यक्तीलाही त्या किटकनाशकाचे स्वरूप लक्षात येते.

फवारणीसाठी वापरण्यात येणारे यंत्र हे योग्य स्थितीत असावे. पंपाचे नोझल गळके असेल तर त्याचा वापर करणे टाळावे. तणनाशकासाठी वापरलेला पंप कीटक नाशकासाठी वापरू नये. मिश्रण तयार करताना सुरुवातीला थोड्या पाण्यात भुकटी मिसळून मग गरजेनुसार पाणी टाकावे. हे करताना हातात हातमोजे व तोंडाला मास्क लावणे आवश्यक असते. शरीर झाकलेले राहील अशा प्रकारचे कपडे वापरावेत. डोक्यावर कापड, पायात बूट आणि पूर्ण बाह्यांचे शर्ट, पायजमा वापरणे फायदेशीर ठरते.

फवारणी करताना वाऱ्याच्या दिशेनेच फवारणी करावी. पावसाच्या वेळी किंवा पाऊस होण्याची शक्यता असताना फवारणी करू नये. फवारणीनंतर लगेच शेतात प्रवेश करणे टाळावे. फवारणी करत असताना खाणे,




पिणे किंवा धूम्रपान करणे टाळावे. एक दिवसात सलग ८ तासांपेक्षा जास्त फवारणीचे काम करू नये आणि उपाशी पोटी फवारणी करणे आरोग्य दृष्टीने धोकादायक असते. सकाळी न्याहारीनंतरच हे काम करावे.

फवारणी झाल्यावर हात, पाय, चेहरा आणि इतर अंग साबणाने स्वच्छ धुवून घ्यावा. वापरलेले कपडे वेगळे ठेवावेत. वापरलेले साहित्य स्वच्छ करून सुकवून सुरक्षित स्थळी ठेवावे. हे साहित्य विहिरी, नदी किंवा ओढ्याजवळ धुणे टाळावे. वापरलेले पाणी पडिक जागी टाकावे. रिकाम्या बाटल्या जमिनीत पुराव्यात.

विषबाधा झाल्यास थोड्याच वेळात काही लक्षणे दिसून येतात - जसे की चक्कर येणे, उलटी होणे, डोळ्यांतून पाणी येणे, अंगावर चट्टे उठणे, डोळे अंधुक दिसणे, स्नायूंमध्ये वेदना होणे, किंवा बेशुद्ध होणे. अशी लक्षणे दिसताच रुग्णास त्वरित नजीकच्या दवाखान्यात नेणे आवश्यक आहे. डॉक्टरांना नेमके कोणते किटकनाशक वापरले गेले होते, किती प्रमाणात आणि किती वेळापूर्वी हे घडले, याची माहिती दिल्यास उपचार अधिक योग्य प्रकारे करता येतात.

विषबाधा झाल्यावर रुग्ण पूर्ण शुद्धीत असेल तरच त्याला उलटी करण्यास प्रवृत्त करावे. अन्यथा तसे करू नये. कधीकधी प्राथमिक उपचार म्हणून कोळशाची भुकटी पाण्यात मिसळून दिली जाते. परंतु हेही डॉक्टरांच्या मार्गदर्शनानुसारच करावे.

शेतीच्या आधुनिक काळात रसायनांचा वापर अपरिहार्य असला, तरी सुरक्षिततेच्या दृष्टीने खबरदारी घेणे हे शेतकऱ्यांच्या आणि त्यांच्या कुटुंबाच्या आरोग्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यामुळे प्रत्येक शेतकऱ्याने किटकनाशक वापरताना योग्य ती दक्षता घ्यावी, यासाठीच ही माहिती सर्वांना समजून घेणे गरजेचे आहे.

संकलन -
**युवराज पाटील**
जिल्हा माहिती अधिकारी,
जळगाव

साप्ताहिक
RNI Regd. No.: MAHMAR/1999/7490
# गोदावरी
परिवार




सवलतीचा पोष्ट रजि. नं. JAL/120/2024-2026

* वर्ष २६ वे * अंक २५ * सोमवार २३/०६/२०२५ * डाक २५/०६/२०२५ * पाने – ४ * किंमत २ रुपये
* year 26 * issue 25 * monday : 23 / 06 / 2025 * post Dt. 25/ 06 / 2025 * pages - 4 * price 2 Rs.

# श्वासासाठीची लढाई दीड वर्षांच्या मेघनाने जिंकली

### जीवघेण्या फुफ्फुस आजारावर यशस्वी मात; डॉ.उल्हास पाटील रूग्णालयातील तज्ज्ञांचे प्रयत्न फळाला




**जळगाव – डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, जळगाव येथे १.५ वर्षांची चिमुरडी मेघना गायकवाड हिने जीवघेण्या श्वसनतंत्राच्या आजारावर यशस्वी मात करत नवजीवन मिळवले आहे.**

याबाबत माहिती अशी की, मेघना नामक दीड वर्षीय बालिकेल श्वास घेण्यास त्रास होत असल्याने आणि तीव्र तापासह तातडीने तिला डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात दाखल करण्यात आले. याठिकाणी तपासणीत तिच्या फुफ्फुसात मोठ्या प्रमाणावर हायड्रो–प्न्युमोथोरेक्स म्हणजेच वायू व पू जमा झालेला आढळून आला, ज्यामुळे तिच्या उजव्या फुफ्फुसावर खूप ताण आला होता. परिस्थिती गंभीर होती आणि तातडीने शस्त्रक्रिया करणे आवश्यक होते.

ख्यातनाम बालशल्यविशारद डॉ. मिलिंद जोशी यांच्या नेतृत्वाखाली ही आपत्कालीन शस्त्रक्रिया – ओपन थोराकोटॉमी – यशस्वीरीत्या पार पडली. त्यांना डॉ. वैभव फडके आणि डॉ. अर्शिल शेख (सहायक शल्यविशारद) यांनी सहकार्य केले. शस्त्रक्रियेदरम्यान तिच्या छातीतून मोठ्या प्रमाणावर पू बाहेर काढण्यात आला व दोन इंटरकॉस्टल ड्रेनेज ट्यूब्स टाकण्यात आल्या, ज्यामुळे तिच्या फुफ्फुसावरचा ताण कमी झाला आणि श्वसन सुरळीत झाले. तत्पश्चात उपचार व निगा घेण्याच्या काळात मेघनाची प्रकृती हळूहळू सुधारली. अशा संकटग्रस्त क्षणी संपूर्ण टीमने अतिशय समर्पितपणे काम केले, आणि आज मेघनाचा हसरा चेहरा पाहून आम्हा सर्वांचे परिश्रम सफल झाले, असें डॉ. मिलींद जोशी यांनी सांगितले.

# डॉ. जान्हवी बनकर सर्वोत्कृष्ट विश्लेषक पुरस्काराने सन्मानित

**जळगाव– येथील डॉ. उल्हास पाटील वैद्यकिय महा व रूग्णालयातील कान नाक घसा विभागाच्या निवासी वैद्यकिय अधिकारी डॉ. जान्हवी बनकर यांना सर्वोत्कृष्ट विश्लेषक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.**

डॉ. मोरवाणी ईएनटी आणि लॅटरल स्कल बेस ग्रुप यांच्या वतीने,एमजीएम मेडिकल कॉलेज, कामोठे, नवी मुंबई येथे १३ ते १५ जून २०२५ दरम्यान सूक्ष्म कान शस्त्रक्रियेसाठी टेम्पोरल बोन डिसेक्शन कार्यशाळा आयोजित करण्यात आली.या शैक्षणिक कार्यशाळेत डॉ. जान्हवी बनकर यांनी प्रतिनिधी म्हणून सहभाग घेतला.कार्यशाळेचे आयोजन ईएनटी आणि ॲनाटॉमी विभागाच्या सहकार्याने करण्यात आले होते.या उत्कृष्ट उपक्रमासाठी डॉ. जान्हवी बनकर यांना सर्वोत्कृष्ट विश्लेषक पुरस्काराने सन्मानित त्यांना विभाग प्रमुख डॉ. अनुश्री अग्रवाल, डॉ. श्रुती पाटील आणि डॉ. पंकजा बेंडाळे यांचे मार्गदर्शन लाभले. डॉ.जान्हवी बनकर यांच्या यशाबददल गोदावरी फॉउंडेशनचे अध्यक्ष माजी खा.डॉ.उल्हास पाटील, सचिव डॉ.वर्षा पाटील, सदस्य डॉ. केतकीताई, डॉ वैभव, डॉ अनिकेत,डॉ. अक्षता पाटील यांच्यासह वैद्यकिय महाविद्यालयाचे संचालक डॉ. एन एस आर्विकर,अधिष्टाता डॉ प्रशांत सोळंके यांनी अभिनंदन केले आहे.



### डोनेट ब्लड अँन्ड गिफ्ट लाईफ मोहीमेअंतर्गत

### जळगाव सर्जिकल सोसायटीतर्फे आयोजित

# सर्जन शिबिरात ९० दात्यांचे रक्तदान

**जळगाव – आपण केलेले रक्तदानाने कोणाला तरी जिवनदानाचे गिप्ट मिळते आणी म्हणूनच जळगाव सर्जिकल सोसायटीतर्फे डोनेट ब्लड अँन्ड गिप्ट लाईफ मोहीमेअंतर्गत १४ जून जागतिक रक्तदाता दिनानिमीत्त १०१ दात्यांनी रक्तदान केले.**

असोसिएशन ऑफ सर्जनस ऑफ इंडिया द्वारे दर वर्षी जून महिन्याचा दुसरा आठवडा सर्जन विक तर १५ जून सर्जन डे म्हणून साजरा करण्यात येणार आहे.

या मागचे उददेश बर्याच रुग्णांना शस्त्रक्रियेविषयी असलेले गैरसमज सर्जनकडे जायचे म्हणजे ऑपरेशनच करावे लागेल तसेच शस्त्रक्रिया बाबतीत भीती व चुकीची माहिती पसरलेली आहे त्याबद्दल जागृती होणे आवश्यक असून हा मुख्य उद्देश आहे आणि म्हणूनच ह्या आठवड्यात रुग्णांसाठी मोफत कॅम्प तसेच मोफत शस्त्रक्रिया आरोग्यावर मार्गदर्शन आणि विविध सामाजिक उपक्रम तसेच लोकांमध्ये रक्तदानाविषयी अज्ञान आहे म्हणून स्वतः रक्तदान करून लोकांनाही रक्तदान करण्यासाठी प्रवृत्त करावे तसेच नेहमी व्यस्त व स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष होते म्हणून सर्जन डे च्या निमित्ताने सर्व सर्जनची आरोग्य तपासणी करून घ्यावी हा ह्या मागचा हेतू आहे आणि म्हणूनच आज दिनांक १४ जून रोजी डॉक्टर उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व हॉस्पिटल व शासकिय वैद्यकिय महाविद्यालय येथे रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले.

यात डिपार्टमेंट ऑफ सर्जरी डॉक्टर्स रेसिडेंट डॉक्टर्स इंटर डॉक्टर्स तसेच विद्यार्थी व स्टाफ असे १०१ दात्यांनी रक्तदान केले यावेळी २५ रोपटयांचे वृक्षारोपण करण्यात आले व केक कापून सर्जन डे साजरा करण्यात आला.

यावेळी जळगाव सर्जीकल सोसा. अध्यक्ष डॉ. दिपक पाटील,उपाध्यक्ष डॉ. छगन चौधरी, सचिव डॉ.स्नेहल फेगडे, सहसचिव डॉ सुशिलकुमार राणे, ट्रेझरर डॉ.जितेंद्र नारखेडे,सदस्य डॉ. राजेंद्र जैन, डॉ शिरीष चौधरी, डॉ. नंदीनी पाटील आणि डॉ. रूचा नवाल, माजी खा डॉ. उल्हास पाटील यांनी ऑनलाईन तर प्रशासकीय अधिकारी प्रमोद भिरूड,शल्यचिकीत्सा विभाग प्रमुख डॉ. शिवाजी सादुलवाड, सहायक डॉ. चैतन्य पाटील यांचेसह सर्व पदाधिकारी उपस्थीत होते. रक्तदान शिबिरात सहभागी होणा–या प्रत्येक व्यक्तीस मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.




# साथीच्या आजारांवर डॉ.उल्हास पाटील रूग्णालयात खात्रीशीर उपचार

### नागरीकांनी लाभ घेण्याचे प्रशासनातर्फे आवाहन




**जळगाव – डॉ. उल्हास पाटील रूग्णालयात आता साथीच्या आजारांवर अत्याधुनिक व खात्रीशीर उपचार उपलब्ध झाले आहेत. दरवर्षी पावसाळ्याच्या काळात डेंग्यू, मलेरिया, टायफॉईड, सर्दी–खोकला, विषमज्वर अशा विविध साथीचे आजार फैलावत असतात. या पार्श्वभूमीवर रूग्णालयाने खास दक्षता घेतली असून, नागरिकांना जलद निदान व तज्ज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीखाली उपचार दिले जात आहेत.**

डॉ. उल्हास पाटील रूग्णालयात उपलब्ध असलेल्या आधुनिक लॅब चाचण्या आणि निदान यंत्रणेमुळे आजाराचे अचूक निदान करता येते. साथीचे आजार वेळीच ओळखणे अत्यंत गरजेचे असते. आमच्या रूग्णालयात सीबीसी, मलेरिया पॅरासाईट टेस्ट, डेंग्यू एनएस१ अँटीजन, टायफॉईड टेस्ट यांसारख्या सर्व चाचण्या अत्यंत अचूकतेने व अल्प कालावधीत केल्या जातात. या उपचार व्यवस्थेत अनुभवी डॉक्टरांची टीम कार्यरत आहे.

औषधोपचारांसोबतच रुग्णांचे समुपदेशन, पोषण सल्ला आणि उपचारपश्चात देखभाल यावरही भर दिला जातो. विशेषतः बालक व वृद्ध रुग्णांसाठी स्वतंत्र कक्ष, ऑक्सिजन सुविधा, सुसज्ज वॉर्ड आणि २४ तास आपत्कालीन सेवा उपलब्ध आहे.

**मोफत शिबिरांचेही आयोजन**

पावसाळ्यात साथीच्या आजारांचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता असली तरी घाबरण्याचे कारण नाही. वेळेवर निदान व उपचार घेतल्यास बरे होणे सहज शक्य आहे. डॉ. उल्हास पाटील रूग्णालयात यासाठी सर्व सुविधा एकाच ठिकाणी आहेत. नागरिकांनी कोणतीही लक्षणे दिसल्यास त्वरित तपासणीस यावे.याशिवाय, जनजागृतीसाठी रूग्णालयात दर आठवड्याला मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन केले जाते. या शिबिरांमध्ये तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी, प्राथमिक उपचार व मार्गदर्शन दिले जाते.

एकूणच, साथीच्या आजाराच्या पार्श्वभूमीवर डॉ. उल्हास पाटील रूग्णालय नागरिकांचे आरोग्य सुरळीत ठेवण्यासाठी कटिबद्ध आहे. वेळीच उपचार आणि योग्य सल्ला घेतल्यास या आजारांवर यशस्वी मात करता येते.

नागरिकांनी घरी उपचार करण्याऐवजी खात्रीशीर उपचारासाठी तज्ञ डॉक्टरांचा सल्ला घ्यावा, असे आवाहन रूग्णालय प्रशासनाने केले आहे.

## संपादकीय

# तपपूर्तीकडे जातांना ...

गेल्या काही दशकांत 'राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकार', 'भाजप सरकार' या मार्गे आता 'मोदी सरकार' म्हणून हे सरकार नुसते स्थिरावले नसून, वेगवेगळ्या क्षेत्रांत हरप्रयत्नांनी आपली पाळेमुळे घट्ट करीत आहे. याचे सर्वाधिक श्रेय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाकडे जाते. मुख्यमंत्रिपद वगळता कोणत्याही केंद्रीय पदाचा अनुभव नसताना थेट सर्वोच्च पदी विराजमान झाल्यानंतर दिल्लीतले दरबारी वर्तुळ, विरोधक आणि प्रसंगी पक्षातील तत्कालीन वरिष्ठांची मक्तेदारी मोडून काढत सरकार, पक्ष आणि जनमानसावरही मोदींनी सवलेली पोलादी पकड ११ वर्षांत जवळपास अभेद्य बनली आहे. 'एक देश- एक निवडणूक', 'एक देश- एक कर' किंवा 'एक देश-एक भाषा' अशा घोषणा व्यासपीठांवर गाजत असल्या, तरी 'एक देश-एक नेता' ही अलिखित घोषणाच सर्वांच्या मुळाशी आहे; किंबहुना पूर्वी मोदी यांना आव्हान देण्याची (मनोमन) स्वप्ने पाहणाऱ्यांनीही हे वास्तव सहर्ष स्वीकारले असून, 'त्यांचे वारसदार' म्हणवून घेण्याचाही अनेकांनी धसका घेतल्याचे दिसते. कोणतेही अपयश अंगी लावून न घेणारी प्रतिमा, जनतेशी (एकतर्फी)थेट संवाद, नवनव्या घोषणांची आतषबाजी, माध्यमे-समाजमाध्यमांवर पकड, राजकीय पराभव सहजी न स्वीकारणारी महत्त्वाकांक्षा आणि राजकीय चाणाक्षपणा अशा या नेतृत्वाच्या जमेच्या बाजू आहेत. आपल्या कामगिरीचा सत्तापक्षाकडून सध्या जयघोष सुरू असून, विरोधकांकडून सरकारच्या चुकांचे पाढे वाचण्यात येत आहेत. सरकारची कामगिरी मोजताना देशाच्या व्यवस्थेला वळण देणाऱ्या राजकीय आघाडीवरील निर्णयांचा उल्लेख करावा लागेल. त्यामध्ये जम्मू-काश्मीरला वेगळे स्थान देणारे घटनेतील ३७०वे कलम वगळणे, अयोध्येत श्रीराम मंदिराची उभारणी आणि गोवंश हत्यांदी, हे निर्णय पक्षाच्या विचारसरणीशी सुसंगत असून, ते मातृसंस्था राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि पक्षाच्या निष्ठावान मतदारांना सुखावणारे ठरले. महिला आरक्षण विधेयक मंजूर करवून घेऊन सरकारने एक पाऊल पुढे टाकले. ढोबळमानाने भाजप हा उजव्या विचारसरणीचा पक्ष मानला, तरी डाव्या विचारांच्या सरकारांनाही फिके पाडणारे काही कल्याणकारी निर्णय, हे मोदी सरकारचा तळागाळातला पाया भक्कम करणारे ठरले. त्यामध्ये जातनिहाय जनगणनेसह पायाभूत सुविधा, मोफत धान्य योजना, शेतकऱ्यांना मिळणारा निधी, पंतप्रधान आवास योजना, उज्ज्वला गॅस, जनधन ँक खाते अशा डझनावारी वैयक्तिक लाभाच्या योजना सरकारने राबवल्याच त्यापेक्षा महत्त्वाचे म्हणजे या सर्वांचे वाजतगाजत श्रेय पंतप्रधान मोदी यांना देऊन लाभार्थींच्या मनावर ते बिंवण्यात सरकार व सत्ताधारी पक्ष यशस्वी ठरले. गेल्या ११ वर्षांमध्ये चार वेळा शेजारी देशांशी संघर्षाचे प्रसंग उद्भवले. त्यामध्ये 'सर्जिकल स्ट्राइक',' बालाकोट हवाई हल्ले, चीनशी संघर्ष आणि पहलगाम हल्ल्यानंतर राबवलेले 'ऑपरेशन सिंदूर' यांचा समावेश आहे. यांपैकी काही घटनांवरून विरोधकांनी टीकास्त्र सोडले असले, तरी सरकारची कणखर प्रतिमा जनतेच्या मनात ठसविण्यात सत्तापक्षाने कोणतीही कसर सोडली नाही.

# डीप लर्निंग म्हणजे काय?

**कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मशीन लर्निंग हे क्षेत्रवेगाने विकसित होत आहे, आपल्याला त्याबद्दल कुतूहल नक्कीच आहे. डीप लर्निंग ही एक पद्धत आहे जी संगणकांना मानवी मज्जातंतू प्रक्रियांची नक्कल करून माहिती प्रक्रिया करण्यास प्रशिक्षित करते.**

सध्या आपण सर्वांना कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मशीन लर्निंग बद्दल थोडी फार जाण तर आहेच. डीप लर्निंग हा एक विशेष प्रकारचे मशीन लर्निंग आहे जे मशीन लर्निंग च्या तुलनेत जास्त जटिल समस्या सोडविण्या साठी उपयोगी ठरते. या लेखात आपण डीप लर्निंग चे वैशिष्ट्य, त्याची कार्यप्रणाली, त्याचे उपयोग ह्या बद्दल माहिती जाणून घेणार आहोत.

कृत्रिम बुद्धिमत्तेची (एआय) संकल्पना १९५० च्या दशकापासून अस्तित्वात आहे. ज्याचे उद्दिष्ट संगणकांना मानवांसारखेच विचार करण्यास आणि तर्क करण्यास सक्षम बनवणे आहे. मशीन लर्निंग (एमएल) ही कृत्रिम बुद्धिमत्तेची (एआय)एक शाखा आहेजी संगणक आणि मशीनना मानवांच्या शिकण्याच्या पद्धतीचे अनुकरण करण्यास, स्वायत्तपणे कार्य करण्यास मदत करते. तसेच अनुभव आणि अधिक डेटाच्या संपर्काद्वारे त्यांची कार्यक्षमता आणि अचूकता सुधारण्यास सक्षम करण्यावर लक्ष केंद्रित करते.

डीप लर्निंग ही मशीन लर्निंग ची उप शाखा आहे. डीप लर्निंग मशीन लर्निंग च्या पलीकडे जाऊन अधिक जटिल श्रेणीबद्ध मॉडेल तयार करते जे मानव नवीन माहिती कशी शिकतात याची नक्कल करते.

डीप लर्निंग आणि मशीन लर्निंग मधील फरक

मशीन लर्निंग हे शिकण्यासाठी मानवी हस्तक्षेपावर अधिक अवलंबून असते. मशीन लर्निंगला प्रशिक्षण साठी लेबल असलेल्या डेटा ची आवश्यकता असते. मशीन लर्निंग हे सोपे कमी गुंतागुंतीचे निर्णय घेण्यासाठी किंवा भाकिते जाणून घेण्यासाठी कामी येते.

याउलट डीप लर्निंगला प्रशिक्षणा साठी मानवी हस्तक्षेपाची आवश्यकता नसते. तसेच प्रशिक्षणासाठी लेबल डेटा ची आवश्यकता नसते. डीप लर्निंग हे गुंतागुंतीचे आणि कठीण समस्या सोडवण्या साठी कामी येते. डीप लर्निंगला जास्त डेटा ची आवश्यकता असते.

डीप लर्निंग आणि मशीन लर्निंगमधील मुख्य फरक म्हणजे न्यूरल नेटवर्क आर्किटेक्चरची रचना. पारंपारिक मशीन लर्निंग मॉडेल एक किंवा दोन संगणकीय स्तरांसह साधे न्यूरल नेटवर्क वापरतात. डीप लर्निंग मॉडेल तीन किंवा अधिक लेयर्स वापरतात. परंतु विशेषत: शेकडो किंवा हजारो लेयर्स- मॉडेलला प्रशिक्षित करण्यासाठी वापरले जातात.

डीप लर्निंग कसे कार्य करते ?

कृत्रिम बुद्धिमत्तेचे उद्दिष्ट हे होते की मशीनला प्रशिक्षित करून काही कामे करवून घेणे की जे करण्या साठी मानवी बुद्धिमत्तेची आवश्यकता असते

डीप लर्निंग हा फक्त एक प्रकारचे मशीन लर्निंग आहे, जे मानवी मेंदूच्या रचनेपासून प्रेरित आहे.

डीप लर्निंग अल्गोरिदम दिलेल्या तार्किक रचनेसह डेटाचे सतत विश्लेषण करून मानवांसारखेच निष्कर्ष काढण्याचा प्रयत्न करतात. हे साध्य करण्यासाठी, डीप लर्निंगमध्ये न्यूरल नेटवर्क्स चा वापर केला जातो.

न्यूरल नेटवर्कची रचना मानवी मेंदूच्या रचनेवर आधारित आहे. ज्याप्रमाणे आपण आपल्या मेंदूचा वापर नमुने ओळखण्यासाठी आणि वेगवेगळ्या प्रकारच्या माहितीचे वर्गीकरण करण्यासाठी करतो, त्याचप्रमाणे आपण न्यूरल नेटवर्कला डेटावर समान कार्ये करण्यास शिकवू शकतो. जेव्हा जेव्हा आपल्याला नवीन माहिती मिळते तेव्हा मेंदू त्याची ज्ञात वस्तूंशी तुलना करण्याचा प्रयत्न करतो. हीच संकल्पना डीप न्यूरल नेटवर्क्सद्वारे देखील वापरली जाते.

न्यूरल नेटवर्क मध्ये ३ प्रकारचे लेयर असतात, इनपुट लेयर, हिडन लेयर, आउटपुट लेयर. डेटा इनपुट लेयरमधून प्रवेश करतो. हिडन लेयर डेटा प्रक्रिया करतात आणि इतर लेयरमध्ये वाहतूक करतात. अंतिम निकाल किंवा अंदाज आउटपुट लेयरमध्ये केला जातो.

डीप लर्निंग चे उपयोग



डीप लर्निंगला व्यवसायाच्या जवळजवळ प्रत्येक क्षेत्रात महत्त्व प्राप्त झाले आहे. ई-कॉमर्स, आरोग्यसेवा, जाहिरात, उत्पादन, मनोरंजन आणि इतर अनेक उद्योगांमध्ये याचा वापर केला जात आहे. डीप लर्निंगने कामे सोपी करून आपल्या जीवनात क्रांती घडवून आणली आहे.

**प्रा. देवेंद्र मधुकर फेगडे,**
संगणक अभियांत्रिकी विभाग,
गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालय, जळगाव

## बामणोद

बामणोद - जळगांव येथील डॉ. उल्हास पाटील कृषी महाविद्यालयाचे ग्रामीण जागरूकता कार्यानुभव कार्यक्रम (खरीप)२०२५-२६ अंतर्गत अंतिम वर्षाचे विद्यार्थ्यांनी बामणोद येथे मार्गदर्शन केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शैलेश तायडे, कार्यक्रम समनव्यक प्रा.बी.एम. गोणशेटवाड, कार्यक्रम अधिकारी प्रा.एम.पी. भोळे व संबंधित विषयातील विषय विशेष तज्ञा यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी कन्या साक्षी बाहेकर,पूर्वजा कुमावत, दिपाली पाटील, हर्षदा पावरा, ऋतिका उघडे, आकांक्षा काकडे कृषी कन्यासोबत गावातील सरपंच श्री. गिरीश विलास तायडे व उपसरपंच श्री. तुषार दिलीप जावळे आणि गावातील शेतकरी उपस्थित होते.





## लोणवाडी शिबिरास प्रतिसाद

**लोणवाडी ता मलकापूर येथे डॉ.उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालयाच्या सयुक्त विद्यमाने आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.**

या मेळाव्यात तज्ञ डॉक्टरांनी ३९ नागरिकांची आरोग्य तपासणी केली.

यातील यातील मेडीसिन ०१, सर्जरी ०२, अस्थीरोग ०२ आणि नेत्ररोग ०२ आणि स्त्रीरोग ०१ अशा ०८ नागरिकांना पुढील उपचाराची गरज असल्याने रूग्णालयात येणेबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

# डॉ. रोनक पटेल यांच्या प्रतिजैविक प्रतिरोधावरील संशोधनाला जागतिक मान्यता

## गोदावरीचे नाव आता पोहचले जागतिक पातळीवर

**जळगाव - डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयातील सूक्ष्मजीवशास्त्र शिक्षक डॉ. रोनक शकील पटेल यांना जीवघेण्या संसर्गातील प्रतिजैविक-प्रतिरोधक जीवाणूंवरील महत्त्वपूर्ण संशोधनासाठी उल्लेखनीय मान्यता मिळाली आहे.**

त्याचा अभ्यास आरोग्य सेवेच्या गंभीर चिंतेवर प्रकाश टाकतो. सामान्य प्रतिजैविकांना प्रतिसाद न देणाऱ्या जीवाणूंची वाढ, विशेषतः जेव्हा रक्त किंवा सेरेब्रोस्पाइनल द्रवपदार्थासारख्या निर्जंतुक शरीरातील द्रवपदार्थामध्ये आढळतात. ही केवळ वैद्यकीय समस्या नाही- हा सार्वजनिक आरोग्याचा इशारा आहे. जर योग्य पावले उचलली गेली नाहीत, तर दैनंदिन उपचार काम करणे थांबवू शकतात, इस्पितळात राहणे जास्त काळ चालू शकते आणि अधिक जीव धोक्यात येऊ शकतात. डॉ. पटेल यांच्या संशोधनात प्रतिजैविकांच्या वापरावर अधिक चांगले नियंत्रण आणि रुग्णालयांमधील संसर्ग प्रतिबंधात्मक उपायांच्या तातडीच्या गरजेवर भर देण्यात आला आहे.



हे महत्त्वाचे काम युनायटेड स्टेट्स सरकारच्या नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसिनच्या अधिकृत संकेतस्थळावर आणि त्याचे आंतरराष्ट्रीय महत्त्व दर्शविणाऱ्या प्रतिष्ठित वैद्यकीय नियतकालिक क्युरियसमध्येही प्रकाशित झाले आहे. त्यांचे मान्यवराकडून, सर्व समाजाकडून व महाविद्यालयातर्फे कौतुक करण्यात येत आहे.त्यांच्या यशाबद्दल गोदावरी फॉउंडेशन परिवारात आनंदोत्सव साजरा केला जात असून संस्थाध्यक्ष माजी खा. डॉ. उल्हास पाटील, उपाध्यक्ष सुभाष पाटील, सचिव डॉ. वर्षा पाटील, सदस्या डॉ. केतकी पाटील, डॉ.वैभव पाटील, डॉ. अनिकेत पाटील, डॉ. अक्षता पाटील यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.



## सातोदात आरोग्य शिबिर

सातोद ता मुक्ताइनगर - ग्रा.प. सातोद आणि डॉ.उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालयाच्या सयुक्त विद्यमाने आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.या शिबिरात तज्ञ डॉक्टरांनी ४२ नागरिकांची जनरल तपासणी करून यातील नेत्ररोग ०६, मेडिसिन ०४,सर्जरी ०२ आणि अस्थीरोग ०६ अशा १८ नागरिकांना पुढील उपचाराची गरज असल्याने रूग्णालयात येणेबाबत मार्गदर्शन करण्यात आले

## भाडगणीत आरोग्य मेळा

भाडगणी ता मलकापूर - ग्रा. प भाडगणी आणि डॉ.उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालयाच्या सयुक्त विद्यमाने आरोग्य मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

या मेळाव्यात तज्ञ डॉक्टरांनी ६० नागरिकांची आरोग्य तपासणी केली. यातील नेत्ररोग ०३, मेडिसिन ०३,सर्जरी ०३ आणि अस्थीरोग ०३ अशा १२ नागरिकांना पुढील उपचाराची गरज असल्याने रूग्णालयात येणेबाबत मार्गदर्शन करण्यात आले.





## रोहीडा येथे शिबिरात तपासणी

**रोहीडा जि. बुलढाणा - येथे प्राथमिक आरोग्य केंद्र व डॉ.उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालयाच्या सयुक्त विद्यमाने आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.**

या शिबिरात तज्ञ डॉक्टरांनी ५२ नागरिकांची जनरल तपासणी करून यातील नेत्ररोग ०३, मेडीसिन ०२,सर्जरी ०२ आणि अस्थीरोग ०१ अशा ०८ नागरिकांना पुढील उपचाराची गरज असल्याने रूग्णालयात येणेबाबत मार्गदर्शन करण्यात आले.



## तांबापुरात आरोग्य शिबीर

**जळगाव - डॉ.उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालयाच्या सयुक्त विद्यमाने तांबापुरात आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.**

या शिबिरात तज्ञ डॉक्टरांनी ६२ नागरिकांची जनरल तपासणी करून यातील नेत्ररोग ०१, मेडीसिन ०३सर्जरी ०१,अस्थीरोग ०२,आणि स्त्रीरोग ०५ अशा १२ नागरिकांना पुढील उपचाराची गरज असल्याने रूग्णालयात येणेबाबत मार्गदर्शन करण्यात आले.यावेळी एका रक्तदात्याने रक्तदान देखिल केले.

Editor : Sourabh Patil (Reg. Newspaper) Weekly Godavari Parivar : Owner, Publisher, Printer : Dr. Mrs. Varsha Patil printed at Subhash Printers, 38, Trimbak Nagar, Near Shakuntala Rane Primary School, Beside Narayani Park Apartment, Mahabal Area, Jalgaon 425002 (Mah.) Godavari Hospital, Released at Jalgaon, Near Bhaskar Market. Phone no. 2221834/35, & Posted from Jalgaon Main Post Office. Should be sent to this email for publication of news in the issue (Editors do not necessarily agree with the views published in the issue.)

संपादक : सौरभ पाटील (रजि. न्युजपेपर) साप्ताहिक गोदावरी परिवार : मालक, प्रकाशक, मुद्रक : डॉ. सौ. वर्षा पाटील यांनी सुभाष प्रिंटर्स, ३८, त्र्यंबक नगर, शकुंतला राणे प्रायमरी स्कूलजवळ, नारायणी पार्क अपार्टमेंट शेजारी, महाबळ एरिया, जळगांव ४२५००२ (महा.) येथे छापून गोदावरी हॉस्पीटल, भास्कर मार्केट जवळ, जळगांव फोन नं. २२२१८३४/३५ येथे प्रसिद्ध करुन जळगाव मुख्य डाक कार्यालय येथून निर्गमित केले. अंकात बातम्या प्रसिध्द करण्यासाठी या ईमेलवर पाठवाव्यात. Email : godavari.parivar@gmail.com (अंकात प्रकाशित झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

# कृषिकन्या, दूतांद्वारा गावोगावी शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शन मेळावे

**जळगाव – डॉ.उल्हास पाटील कृषि महाविद्यालयाचे कृषिकन्या व दूतांव्दारा शेतकऱ्यांसाठी विविध कार्यक्रमांद्वारे आणि प्रात्यक्षिकांच्या सहाय्याने शेतजमिनीचे माती व पाणी परीक्षण, विविध पिकांची लागवड, तंत्रज्ञान, पिकांवर येणारे रोग व त्यासंबंधित माहिती व त्यांचे निवारण यावर गावोगावी जाऊन मेळाव्यातून मार्गदर्शन केले गेले.**




## नायगाव

**नायगाव – येथील डॉ. उल्हास पाटील कृषी महाविद्यालयाचे ग्रामीण जागरूकता कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत अंतिम वर्षाचे विद्यार्थांनी नायगांव येथे मार्गदर्शन केले.**

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शैलेश तायडे, कार्यक्रम समन्वयक प्रा.बी.एम. गोणशेटवाड, कार्यक्रम अधिकारी प्रा.एन .बी.सदार व संबंधित विषयातील विषय विशेष तज्ञ यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी दूत विशाल बाळू बडगुजर, प्रशांत हरचंद पावरा , सावन रंजीत पावरा , मल्लिकाअर्जुन चिरा भोईना , गलम नवीन , विशाल गुलाबसिंग पाटील या कृषी दूतांसोबत गावातील उपसरपंच सुपडा ताई रघुनाथ भालेराव व गावातील शेतकरी उपस्थित होते.

## विरावली

**विरावली – येथील डॉ. उल्हास पाटील कृषी महाविद्यालयाचे ग्रामीण जागरूकता कार्यानुभव कार्यक्रम(खरीप) २०२५–२६ अंतर्गत अंतिम वर्षाचे विद्यार्थ्यांनी विरावली येथे मार्गदर्शन केले.**

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शैलेश तायडे, कार्यक्रम समन्वयक प्रा.बी.एम. गोणशेटवाड, कार्यक्रम अधिकारी प्रा.पी.एम.भोळे व संबंधित विषयातील विषय विशेष तज्ञा यांच्या मार्गदर्शनाखाली कृषीकन्या सृष्टी डोंगरे, प्रतीक्षा गावीत, विशाखा सोनवणे, धनश्वेता अहिरे, प्रज्ञा गजरे, ऐश्वर्या सोनवणे कृषीकन्यां सोबत गावातील ग्रामसेविका सौ. छाया पाटील व गावातील शेतकरी उपस्थित होते





## थोरगव्हाण

**थोरगव्हाण – येथील डॉ. उल्हास पाटील कृषी महाविद्यालयाचे ग्रामीण जागरूकता कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत अंतिम वर्षाचे विद्यार्थी थोरगव्हान येथे मार्गदर्शन केले.**

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शैलेश तायडे, कार्यक्रम समन्वयक प्रा.बी.एम. गोणशेटवाड, कार्यक्रम अधिकारी प्रा.व्हि.एस. पाटील व संबंधित विषयातील विषय विशेष तज्ञा यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी दूत –दिनेश दिलीप महाजन,जयेश विठोबा माळी ,पवन अरुण पाटील ,प्रणव शंकर पाटील व शिवराज सदाशिव शेवाळे कृषी दूतांसोबत गावातील उपसरपंच नितीन काशीनाथ चौधरी व गावातील शेतकरी उपस्थित होते.



## केऱ्हाळे

**केऱ्हाळे – येथे कृषिदूत शेतकऱ्यांना करणार प्रगत तंत्रज्ञानावर मार्गदर्शन.केऱ्हाळे जळगांव येथील डॉ. उल्हास पाटील कृषी महाविद्यालयाचे ग्रामीण जागरूकता कार्यानुभव कार्यक्रम (खरीप)२०२५–२६ अंतर्गत अंतिम वर्षाचे विद्यार्थ्यांनी केऱ्हाळे येथे मार्गदर्शन केले.**

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शैलेश तायडे, कार्यक्रम समन्वयक प्रा.बी.एम. गोणशेटवाड, कार्यक्रम अधिकारी प्रा.व्हि. एस. पाटील व संबंधित विषयातील विषय विशेष तज्ञा यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी दूत रणजित देशमुख, ज्ञानेश्वर सोन्ने, यश दळवी, सुदर्शन वाघमोडे, शुभम चव्हाण, अथर्व तासकर कृषी दूतांसोबत गावातील ग्रामसेवक श्री.एस.टी. पाटील व गावातील शेतकरी उपस्थित होते

## तांदलवाडी

**तांदलवाडी – येथील डॉ. उल्हास पाटील कृषी महाविद्यालयाचे ग्रामीण जागरूकता कार्यानुभव कार्यक्रम (खरीप)२०२५–२६ अंतिम वर्षाचे विद्यार्थ्यांनी तांदलवाडी येथे मार्गदर्शन केले.**

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शैलेश तायडे, कार्यक्रम समन्वयक प्रा.बी.एम. गोणशेटवाड, कार्यक्रम अधिकारी प्रा.एन. बी. सदार व संबंधित विषयातील विषय विशेष तज्ञा यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी दूत मयुर क्षिरसागर, राज कुरे, अक्षय मानकर, मयुर मराठे, दुर्वेश पाटील कृषी दूतांसोबत गावातील उपसरपंच सौ. अनिता राजेंद्र चौधरी व गावातील शेतकरी उपस्थित होते





## ऐनपूर

**ऐनपूर – येथील डॉ. उल्हास पाटील कृषी महाविद्यालयाचे ग्रामीण जागरूकता कार्यानुभव कार्यक्रम (खरीप) २०२५–२६ अंतर्गत अंतिम वर्षाचे विद्यार्थ्यांनी ऐनपूर मार्गदर्शन केले.**

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शैलेश तायडे, कार्यक्रम समन्वयक प्रा.बी.एम. गोणशेटवाड, कार्यक्रम अधिकारी प्रा. एस.एन पाटील व संबंधित विषयातील विषय विशेष तज्ञा यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी दूत सौरव महेर,गौरव महालकर, पियूष नेहते,कुणाल सपकाळे आणि पुष्पराज शेळके कृषी दूतांसोबत गावातील ग्रामसेवक मा. प्रशांत तायडे व गावातील शेतकरी उपस्थित होते

# मूल्यवृद्धीद्वारे समृद्धी

मूल्यवृद्धी म्हणजे केवळ किमतीमध्ये वाढ हे जरी खरे असले तरी कशाप्रकारची आणि कशाकरिता मूल्यवृद्धी करायची याचे मूळ उद्देश लक्षात घेणे आवश्यक आहे. विशेषत: शेती उत्पादनाचे टोम्यॅटो पासून तर अगदी केळी पर्यंत प्रत्येक उत्पादनाचा साठवणकाळ हा ठरलेला असतो. जुजबी उपाय योजनांनी तो थोडाफार वाढवीता येतो परंतु अधिक काळ जर हा काळ वाढवायचा असेल तर त्या उत्पादनांवर काही प्रक्रिया करणे किवा त्या उत्पादनाचे रूपांतर करणे हे अनिवार्य ठरते. असे केल्यामुळे केवळ साठवण काळच वाढतो असे नाही तर बाजार भाव जेंव्हा अनुकूल असेल म्हणजे अधिक असेल तेंव्हा उत्पादने विकता येतात आणी आणखी जास्त मिळकत मिळविता येते. थेंबे थेंबे तळे साचे या म्हणी प्रमाणे समृद्धीकडे वाटचाल करता येते. अन्यत: या वस्तु माती मोल भावाने विकाव्या लागतात. किंवा बाजारसमितीमध्ये सोडून द्यावे लागते व उत्पादनखर्चासह वाहतूक खर्च सुद्धा नुकसांनीत जमा होतो.

अनेक वेळा संपूर्ण पीक योग्य भावा अभावी वखरून टाकावे लागते केवळ या मुख्य उद्देशाने उत्पादित कच्चा माल हा न परवडणा–या भावात विकल्यापेक्षा, त्याची गुणवत्ता वाढविता येते व त्यांच्या भावात भरपूर वाढ मिळते, त्याचे रूपांतर करून किंवा प्रक्रिया करून बाजाराच्या संधी वाढवीता येतात, तसेच हा माल साठवण करून, योग्य वेळी किंवा थोडा थोडा विकता येतो म्हणजे मिळणारा नफा वृद्धीगत होतो आणि कुशल तसेच अनुभवी कामगारांना ब–यापैकी रोजगार सुद्धा मिळू शकतात.

शेतीमध्ये मूल्यवर्धनाचे काही प्रमुख पैलू असे आहेत. **प्रक्रिया रूपांतर:** एखादी साधी प्रक्रिया करणे किंवा विविध प्रक्रिया करणे आणि त्याद्वारे कच्च्या उत्पादनाचे दुस–या रूपातील तयार वस्तूमध्ये रूपांतर करणे. जसे की गहू दळून पीठ करणे व लहान लहान पॅकेटमध्ये विक्रीस तयार करणे. तसेच गहू व इतर एकदल व दविदल धान्यांच्या



**प्रा.डॉ.सुधाकर मधुकर पाटील**
**परिसर संचालक, डॉ.उल्हास पाटील कृषी शिक्षण संकुल जळगाव**

मिश्रणापासून सातूचे पीठ तयार करणे, फळांपासून ज्यूस तयार करणे, विविध फ्लेवर्सच्या जूसचे अनेक प्रकार तयार करून विकणे, चिकू पासून मिल्कशेक तयार करणे, टोम्यॅटोपासून सॉस किंवा केचप तयार करणे, आवळ्यापासून विविध पदार्थ तयार करणे, पालेभाज्या विशेषत: मेथी, जिला साठवण क्षमता जवळपास शून्य आहे, त्यापासून कसूरी मेथी बनवून खूप जास्त भावात विकणे, कांदा कापून वाळविणे आणि पॅकेटसमधून विकणे, गोड लिंबाच्या पानापासून विविध पदार्थ बनविणे, कारले या फळाची पावडर करणे, ज्वारी, बाजरी, तांदूळ, नागली, राजगीरा, तीळ इ. पासून नवनवीन व सहज घरी बनविता येणारे पदार्थ बनविणे हा तर अलिकडे बचत गटांचा मुख्य उत्पन्नाचा स्त्रोत बनला आहे. कच्या केळी पासून विविध पदार्थ बनविणे इ. हा एक स्वतंत्र विषय होईल म्हणून तूर्तास एवढेच.

**प्रतवारी:–** कोणतेही कृषी उत्पन्न हे प्रतवारी करूनच जर विकले तर ब–यापैकी मूल्यवृद्धी मिळते. तसेच जो माल बाजारपेठेत नेला असता कोणी त्याचा भाव सुद्धा विचारणार नाही, तोच माल जर साफ सफाई व प्रतवारी करून विकला तर मोठ्या प्रमाणात मूल्यवृद्धि होते. अतिशय चांगले उदाहरण म्हणजे बाजारातील 'डींशु गहू. जो गहू प्रतिकिलो २२ ते २५ रु. भावात विकल्या गेला असता, तोच गहू जर आपण वरील प्रमाणे तयार केला तर ३० ते ३५ रु. किलो या दराने विकला जातो. हीच बाब इतर धान्ये, फळभाज्या, पालेभाज्या यांना सुद्धा लागू पडते.

**पॅकेजिग:–** अलीकडे मिनी पॅकेजिगचा काळ सुरू आहे. तेल व श्यांपूची मिनी पॅकेटस ही बाजारात अगदी कमी भावात मिळतात पण एकूण विक्री (विपणन) पाहिली तर मोठ्या पॅकेजिग पेक्षा अधिक मार्केटिंग करून जातात. लहान पॅकेजिग हे कमी उत्पन्न गटातील ग्राहकापासून सर्वच ग्राहक, विविध परिस्थितीमध्ये विकत घेत असतात. थोडक्यात काय तर योग्य प्रकारचे पॅकेजिग ही मूल्यवृद्धिचे प्रमुख साधन आहे.

**गुणवत्ता सुधार:–** फळे, फळभाज्या यांच्या काढणीनंतर त्याची प्रतवारी करून, वेष्टणीकरण इ. बाबींचा

अवलंब करून सुधारित व चांगल्या गुणवत्तेसह, अधिक साठवण काळासह, चढया भावात विकली जातात.

**ब्रंडिंग:** स्वत:चा असा ब्रँड असणे ही केव्हाही महत्वाचे ठरते. बाजारात ग्राहकाना आकृष्ट करणेसाठी ब्रँड

हा महत्वाचा असतो. विविध माध्यमाद्वारे आपल्या ब्रँडचा प्रचार करून, प्रसार वाढविणे शक्य असते. पुढे मग हाच ब्रँड आपला मोनोपॉलि ब्रँड सुद्धा होवू शकतो. मग फक्त पैसाच कमवायचा.

**मार्केटिंग:–** डोअर स्टेप मार्केटिंगचे दिवस आता सुगीत आहेत. अगदी साधे उदाहरण द्यायचे झाले तर एजंटमार्फत / सेल्समन, मार्फत घरोघरी हा प्रतवारी केलेल्या व लहान प्याकिंग मधील भाजीपाला केवळ तीन तास घरोघरी जाऊन विकला तर बाजारापेक्षा कितीतरी जास्त किंमत मिळते आणि हाच माल जर रेडी टू कुक असा घरपोच दिला तर मग बघायलाच नको. थोडक्यात, ग्राहकाच्या खिशातील पैसा आपणाकडे ओढण्याचा मूलमंत्र म्हणजे मूल्यवृद्धि.

**शेतकरी वर्गांसाठी विशेषत:** लहान शेतकरी बाधवांसाठी व बेरोजगार युवकांसाठी हा लेख उपयुक्त ठरू शकेल याच अपेक्षेने सदर लिखाणाचे प्रयोजन.

# जागतिक पर्यावरण दिन

पर्यावरणाचे फायदे घेऊन जगणारे आपण लोक जेव्हा पर्यावरणाच्या हानी बद्दल चर्चा सत्र आयोजित करतो, सवंग चर्चा पण कृती जर शून्य असेल तर त्याचा काही उपयोग होणार नाही. पर्यावरणामध्ये खूप सारे बदल होत आहेत आणि या बदलाची चाहूल सर्व देशांना आहेच. फक्त देश म्हणून चालणार नाही किंवा राज्य म्हणून चालणार नाहीत आपण जे सर्वजण जगत आहोत ते केवळ पर्यावरणामुळेच आणि याचा समतोल जो काही होता, आहे व असेल तो पुढच्या पिढीसाठी हे पर्यावरण त्यांच्या जगण्यासाठी घातक होऊ नये एवढीच अपेक्षा. पर्यावरणामध्ये सर्वात मोठा घटक येतो तो वृक्ष ,जमीन, पाणी ,हवा . मूलभूत सजीवांसाठी लागणारे सर्व गोष्टी पर्यावरणातून मिळतात व सर्व सजीव पर्यावरण पूरक राहण्याचा प्रयत्न करतात पण सध्या याला अपवाद आहे मानव, बेसुमार पर्यावरणाचा ऱ्हास करण्याची वृत्ती. हवा पाणी, जमीन यामध्ये प्रदूषण करणारे सर्वाधिक जर कोण असेल तर ते आहेत मानव. प्रगत राष्ट्र ,अप्रगत राष्ट्र या दोघांच्या मध्ये असा काही फरक नाही .प्रगत राष्ट्र हे पर्यावरण पूरक काही गोष्टी करत असतील तर त्या चांगले आहेत आणि काही अप्रगत राष्ट्र आहेत पण तिथे जमीन जंगल व पाणी याच्यामध्ये प्रदूषण तसं त्यांच्याकडून कमी होतं. पण मानवाला बाकीच्या गोष्टी म्हणजे विज्ञानाचा भडीमार झाल्यामुळे ,मिळणाऱ्या अनेक गोष्टी व त्यातून निर्माण होणार प्रदूषण यामुळे सध्या जगात मोठा प्रश्न भेडसावत आहे, आणि यासाठी जागतिक परिषद होत असतात, त्याच्यामध्ये सेमिनार होत असतात, कार्यशाळा होत असतात, संमेलन होत असतात, वैज्ञानिक विचार मंथन होत असते ,पर्यावरणवादी येत असतात. तसा दुर्लक्षित असलेला आमचा शेतकरी हा पिकांची लागवड करतो, झाडे लावतो. पृथ्वीवर असणारे जंगल हे तर आहेच आणि हे जंगल म्हणजेच पर्यावरणाची देणगी, जर मानवाने काही आपल्या भविष्य, स्वतःला जागण्यासाठी काही वृक्षारोपण केलं असेल, त्याचं संवर्धन केलं असेल ,बीज पेरणी केली असेल ,येणार्या पिढ्यांसाठी व या वातावरणातील बदलासाठी जर वृक्षारोपण केलं नाही तर भविष्य खूप अंधकारमय असेल .एकाने बोलून व करून हे चालणार नाही, याची जबाबदारी घेणारी फार कमी लोक आहेत. आता सोशल मीडियाच्या माध्यमातून बरेच उपटसुंभ येऊन काही चित्र, काही चलचित्र दाखवतात व मेसेज करतात पण निसर्गा बद्दलचे योगदान फार कमी. याच्यामध्ये झोकून देणारी फार कमी लोक राहिलेत.नुसता सल्ला व मोकार चर्चा म्हणजे पर्यावरणवादी होत नाही, कोण चांगलं काम करत असेल त्याची चेष्टा, मस्करी आणि निंदानालस्ती करणारी एक अशी पिलावळ, ही पर्यावरणाची रहास करणारी आणखी एक प्रजाती आहे.

मानवाचं जगणं हे मुळात बिया खाऊनच आहे, म्हणजे ज्वारी, बाजरी, गहू ,मका ,तांदूळ , कडधान्य, फळे,ह्या सगळ्या बिया असतात तर ते पेरल्या जात नाहीत, त्या आपल्या पोषणासाठी आपण खातो म्हणजे मानव हा पूर्णपणे पीक व वृक्षावरतीच अवलंबून आहे आणि पर्यावरणामध्ये अशी पिकं व झाडांचं खूप महत्त्व आहे. म्हणजे आपल्या असण्याला, जगण्याला पर्यावरण हाच एक पूरक घटक आहे. असंआपल्याला अन्न खाताना तर कमीत कमी वाटलं पाहिजे. हवा, पाणी, जमीन यामध्ये होणार प्रदूषण खूप घातक आहे. सध्या एक वेगाने वाढत चाललेला ट्रेंड आहे नैसर्गिक शेती, सेंद्रिय शेती, विषमुक्त शेती अशा वेगवेगळ्या गोष्टींची आवश्यकता लोकांना आता सध्या भासत आहे, कारण जमिनीचा पोत पाण्यामध्ये असलेले क्षार व पिकांच्या वरती केलेली वेगवेगळ्या रासायनिक फवारणीमुळे त्यामध्ये उतरणारे रासायनिक गुणधर्म यामुळे मानवाला प्राण्यांना, पक्ष्यांना व इतर सजीव पेशींना तसा धोका निर्माण झालेला आहे.

झाड लावणं हे ऐऱ्या गैऱ्याच काम नाही याच्यासाठी प्रगल्भ बुद्धीचा, शुद्ध विचारांचा मानव लागतो. तो आपल्यामध्ये शिल्लक असेल तर कमीत कमी आपल्या घराभोवती किंवा शेतामध्ये ,सार्वजनिक ठिकाणी किंवा पावसाळ्याच्या दिवसांमध्ये बिया संकलन करून रस्त्याच्या कडेला, मोकळ्या, जागांच्या मध्ये ते करावे हा सल्ला नाही,नाहीतर काही कानकेशा लोकांना त्याचा त्रास होईल. शेवटी पर्यावरण हाच आपला मालक आहे.

मानवाची औकात बिया (धान्य) खाऊन जगणे एवढीच आहे.. बियांणी उगवायचं थांबवलं तर आपली औकात राहणार नाही.. त्यामुळे कमीत कमी खाण्यापुरतं , जगण्यापुरतं तरी पर्यावरण पूरक असावं.

**रेन हाय तर ग्रेन हाय ...!**
**ग्रेन हाय तर ब्रेन हाय....!!**



**– डॉ. बापूराव बिटे**
**सहयोगी प्राध्यापक**
**फॉर्मोकॉलॉजी**

# मृगोत्सवात मृगस्वरांनी रसिक चिंब...

**जळगाव – मृगाच्या सरी रसत असतांना गोदावरी संगीत महाविद्यालयाच्या सभागृहात मृगोत्सव मैफीलीतून सूर, ताल व वादनात मृगस्वरानी रसिक चिंब झाले.**



या मैफीलीचे उदघाटन सचिव डॉ.वर्षा पाटील आणि लहानगी गायक हिच्या हस्ते दिपप्रज्वलनाने झाले. यावेळी त्यांच्या सोबत गोदावरी फउंडेशनचे अध्यक्ष मा. डॉ. उल्हास पाटील ऑनलाईन तर प्रमुख पाहुणे म्हणून श्रीमती गोदावरीआई पाटील, डॉ. वैभव पाटील, डॉ. केतकीताई पाटील, गोदावरी संगीत महाविद्यालयाच्या प्राचार्या सौ. पदमजा नेवे, कथक विभाग प्रमुख डॉ. महिमा मिश्रा, श्री. प्रविण महाजन, श्री. देवेंद्र गुरव, श्री. सुशिल महाजन, केंद्र व्यवस्थापक श्री. राजु पाटील व महाविद्यालयाचे सर्व शिक्षक वृंद व पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात गायन विभागाचे राग भुपाली मध्ये सरगम गीत व छोटा ख्याल हे तुलसी महाजन, अथर्व पाटील, वीरा चौधरी, वैदेही राजपूत, धनश्री जोशी, डेलीना अत्तरदे यांनी सादर केले, तसेच 'ज्योती कलश छलके' हे गीत नाजनीन शेख यांनी सादर केले, तर 'आऊ तोरे चरण कमल' हे गीत निकीता जोशी तर देहाची तिजोरी' हे भक्ती गीत सौ. अलका खैरनार, सौ. राजश्री पाठक, सौ. मनिषा डेकाटे यांनी सादर केले, 'माझे माहेर पंढरी' हा सुरेल असा अभंग ऋतुराज जोशी यांनी सादर केले. 'गरज गरज आज मेघा' या गीतावर कथक विभागातील रीया वर्मा, समृध्दी जोशी, लावण्या डहाड यांनी बहारदार असे नृत्य सादर केले, तर तबला विभागाच्या कृणाल गजाकुश व सार्थक महाजन यांनी त्रिताल तबला वादनातील तालातील प्रकार सादर केले. तर गायन विभागाच्या विद्यार्थ्यांनी 'पंख होते तो उड आती रे', 'सायो नारा सायो नारा', 'चंदा है तु मेरा सुरज है तु', 'दिल दिवाना बीन सजना के, हे गीत अनुक्रमे समिक्षा माकोडे, अर्चना गजाकुश, हिमानी सोनार यांनी सोलो गीत सादर केले. तर 'ॐ नमः शिवाय' हे गीत समिक्षा माकोडे, नाजनीन शेख, ऋतुराज जोशी यांनी सादर केले. तसेच कार्यक्रमाची सांगता 'जय जय महाराष्ट्र माझा' हे गीत गायन विभागातील सर्व विद्याथ्यर्थ्यांनी सामुहीक आपल्या मधुर आवाजात सादर केले.

कार्यक्रमास साथसंगत म्हणून तबला ढोलक श्री. प्रविण महाजन, ऑक्टोपॅड श्री. देवेंद्र गुरव तर सिन्थेसायझरवर श्री. सुशिल महाजन यांनी केली. डॉ. महिमा मिश्रा यांनी कार्यक्रमाचे प्रास्तावीक केले तर सौ. संध्या फासे यांनी कार्यक्रमाचे सुरेल असे सुत्रसंचालन केले. आभार प्रदर्शन श्री. भुषण खैरनार यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी केंद्र व्यवस्थापक श्री. राजू पाटील, अनंता साठे, किशोर चौधरी, ईश्वर पाटील यांनी सहकार्य केले.

---



## डॉ. प्रेमचंद पंडित

(९४२२९१५३७९)
(निवृत्त सिव्हील सर्जन, बुलडाणा)
वैद्यकीय अधीक्षक
डॉ.उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय, जळगाव

प्रेमवाणी

1. Once the goal is fixed in your sight, do not let the distractions deflect your flight.
2. The capacity to choose is itself not freedom — the maturity to choose wisely is.
3. Set the targets not so much to meet them as to meet your best self through them.
4. To offer your best, you need to discover your best — introspection maximizes contribution.
5. When our vision changes from competition to contribution, life becomes a celebration.
6. In the truth of who we are and what we love lies our deepest fulfillment.
7. Spiritual growth centers not on inaction, but on action with the deepest sense of purpose.

**१. जब लक्ष्य आपकी दृष्टि में स्थिर हो जाए, तो ध्यान भटकाने वाली चीजों से अपनी उड़ान को विचलित न होने दें।**
**२. चुनाव करने की क्षमता अपने आप में स्वतंत्रता नहीं है – बुद्धिमानी से चुनाव करने की परिपक्वता ही असली स्वतंत्रता है।**
**३. लक्ष्य इस प्रकार निर्धारित करें कि उन्हें हासिल करने से अधिक, आप उनके माध्यम से अपने सर्वश्रेष्ठ स्वरूप से मिल सकें।**
**४. अपना श्रेष्ठ देने के लिए, पहले अपना श्रेष्ठ खोजें – आत्मचिंतन योगदान को अधिकतम करता है।**
**५. जब हमारा दृष्टिकोण प्रतिस्पर्धा से योगदान की ओर बदलता है, तो जीवन एक उत्सव बन जाता है।**
**६. हम कौन हैं और क्या प्रेम करते हैं – इस सच्चाई में ही हमारी सबसे गहरी पूर्ति छिपी होती है।**
**७.आध्यात्मिक विकास निष्क्रियता पर नहीं, बल्कि गहरे उद्देश्य की भावना के साथ की गई क्रियाशीलता पर आधारित होता है।**

---

## डॉ.उल्हास पाटील फिजिओथेरपी महाविद्यालयात
# जागतिक नेत्रदान दिन साजरा

**जळगाव – येथील डॉ. उल्हास पाटील फिजिओथेरपी महाविद्यालय आणि डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक नेत्रदान दिनाच्या निमित्ताने नेत्रदानाविषयी जनजागृतीसाठी एक विशेष चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले.**

आय कॅन सी क्लीअरली नॉउ या संकल्पनेवर आधारित या सेमिनारचा उद्देश नेत्रदानाचे महत्त्व आणि अंधत्वग्रस्त व्यक्तींच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणण्याच्या भूमिकेवर प्रकाशझोत टाकणे हा होता.यावेळी प्रमुख वक्ते म्हणून डॉ.उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालयाचे संचालक डॉ. एन. एस. आर्विकर यांनी नेत्रदानाविषयी मौल्यवान मार्गदर्शन करतांना नेत्रदानाविषयी व्यापक जनजागृती होणे गरजेचे आहे आणि



त्याद्वारे कित्येक लोकांना दृष्टी मिळू शकते यावर भर दिला.चित्रफितीचा उपयोग करून नेत्रदान प्रक्रियेची माहिती देणे, सामान्य गैरसमज दूर करणे आणि मृत्यूनंतर डोळे दान करण्यासाठी लोकांना प्रेरित करणे या गोष्टींवरही भर दिला.कार्यक्रमात प्राचार्य डॉ. जयवंत नागूलकर सर्व प्राध्यापक, इंटर्न्स व पदव्युत्तर विद्यार्थी यांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी वर्गाने परिश्रम घेतले.

---



# मायक्रोमेनिया क्वीजचे टीम एडवर्ड जेनर विजेते

**जळगाव – डॉ. उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालयाच्या मायक्रोबायोलॉजी विभागातर्फे मायक्रोमेनिया क्वीजमध्ये टीम एडवर्ड जेनर विजेते ठरले.**

या स्पर्धेचे उद्घाटन वैद्यकीय महाविद्यालयाचे अधीष्ठाता डॉ. प्रशांत सोळंके यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करून करण्यात आले. ल्युईस पाश्चर, रॉबर्ट कोच, एडवर्ड जेनर, जोसेफ लिस्चर, अॅन्टोनी वॉन ल्युव्हेनव्होक या पाच टीमने सहभाग घेतला. पाच राउंडमध्ये ही स्पर्धा झाली. एका टीम मध्ये पाच विद्यार्थ्यांचा सहभाग होता. एडवर्ड जेनर संघाने ९५ पॉईटसह प्रथम क्रमांक पटकावला, व्दीतीय विजेते ल्युईस पाश्वर तर तृतीय रॉबर्ट कोच विजेते ठरले. वैष्णवी वानखेडे यांनी सुत्रसंचालन तर आभार डॉ. कैलास वाघ यांनी मानले. परिक्षक म्हणून डॉ. प्रशांत गुडेट्टी यांनी काम पाहीले. या स्पर्धेचे समन्वयक म्हणून डॉ. कैलास वाघ, डॉ. भवानी वर्मा यांनी तर गुणलेखक डॉ स्मीता मुंडे, रौनक पटेल यांनी काम पाहिले.

---

# क्रॅक द क्वीजमध्ये टीम रेटीक्युलीन विजेती

**जळगाव – डॉ. उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालयाच्या पॅथॉलॉजी विभागातर्फे क्रॅक द क्वीजमध्ये टीम रेटीक्युलीन विजेती ठरली.**

या स्पर्धेचे उद्घाटन वैद्यकीय महाविद्यालयाचे डायरेक्टर डॉ. अर्विकर, अधीष्ठाता डॉ. प्रशांत सोळंके,विभाग प्रमुख डॉ. धनंजय बोरोले यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करून करण्यात आले. पास टीम, पर्ल्स प्रशियन टीम , रेटीक्युलीन टीम, काँगो रेड टीम, फौचेट्स टीम या पाच टीमने सहभाग घेतला.एकूण सहा राउंडमध्ये ही स्पर्धा झाली. एका संघा मध्ये तीन विद्यार्थ्यांचा सहभाग होता. रेटीक्युलीन संघाने प्रथम क्रमांक पटकावला या संघामध्ये सुमेध तामगिरे, श्रीकृष्ण इंगळे, ओमकार शेलार यांचा समावेश होता. द्वितीय विजेते फौचेट्स तर तृतीय पास टीम विजेते ठरले.अतिशय उत्कंठावर्धक आणि चुरशीची ही क्विझ ठरली. डॉ. राशी अग्रवाल आणि डॉ. श्रुती बियाणी यांनी सुत्रसंचालन तसेच आभार मानले. परिक्षक म्हणून डॉ. धनंजय बोरोले,डॉ. रेशमा वानखेडे, डॉ. प्रिती बेदमुथा यांनी काम पाहीले. या स्पर्धेचे समन्वयक म्हणून डॉ. झशांक जोशी, डॉ. अंकिता, डॉ.प्रियांका येणकुरे , डॉ. प्रणिता जायभाये, डॉ. प्रज्ञा मंडलापुरे डॉ. श्रद्धा उबाळे, डॉ. मंजिरी गेडाम यांनी तर गुणलेखन डॉ. प्रज्वल मंत्री,डॉ. सायली घाडगे यांनी केले.



---


# जिल्ह्यात प्रधानमंत्री धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान

**जळगाव – आदिवासी समाजाच्या आर्थिक व सामाजिक सशक्तीकरणासाठी केंद्र शासनाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या प्रधानमंत्री धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान अंतर्गत जळगाव जिल्ह्यात १५ जून ते ३० जून या कालावधीत विशेष जनजागृती मोहिम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेअंतर्गत जिल्ह्यातील ११२ आदिवासी बहुल गावांमध्ये शिबिरे व उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.**

अभियानाचा उद्देश आदिवासी बांधवांना विविध शासकीय योजनांचा लाभ थेट गावपातळीवर पोहोचवणे हा असून, जिल्हास्तरावर तसेच तालुकास्तरावर समित्या स्थापण्यात आल्या आहेत. या माध्यमातून आरोग्य, पोषण, रोजगार, शिक्षण, पायाभूत सुविधा आदी १७ विभागांमार्फत सेवा देण्यात येणार आहे.

या मोहिमेअंतर्गत चोपडा-२७, यावल-१८, रावेर-१८, मुक्ताईनगर-०६, भुसावळ-०४, जळगाव-१६, एरंडोल-०३, धरणगाव-०३, अमळनेर-०५, चाळीसगाव-०२, पाचोरा-०१ व जामनेर-०९ अशा ११२ गावांमध्ये विविध उपक्रम राबविले जाणार आहेत.

शिबिरांमधून नागरिकांना खालील सेवा उपल




ब

ध करून देण्यात येणार आहेत:

ˆआधारकार्ड व आयुष्मान भारत कार्ड नोंदणी
ˆजात प्रमाणपत्र, रेशनकार्ड तयार करणे
ˆपीएम किसान योजना, किसान क्रेडिट कार्ड व जनधन खाते उघडणी

ˆ**ई-सेवा सुविधा, सिकलसेल आजारावरील जनजागृती.** ˆविविध विभागांमार्फत लाभ व आवश्यक कागदपत्रांचे वाटप. यासोबतच, आगामी पाच वर्षांत पक्के रस्ते, घरकुल, पाणीपुरवठा, वीज, मोबाईल मेडिकल युनिट, उज्वला गॅस, अंगणवाडी, पोषण, कौशल्यविकास, कृषी, मत्स्यव्यवसाय, पर्यटनविकास, शासकीय निवासी शाळा व वसतीगृहांची उभारणी यांवर भर देण्यात येणार आहे. या अभियानात सिकलसेल डे (ता. १९ जून) निमित्त आरोग्य शिबिरे तर आंतरराष्ट्रीय योग दिन (ता. २१ जून) निमित्त शाळा व महाविद्यालयांमध्ये योगविषयक उपक्रम राबविण्यात येणार आहेत..

आदिवासी सामाजिक संस्था, कार्यकर्ते, स्वयंसेवक व स्थानिक लोकप्रतिनिधींनी या मोहिमेत सक्रीय सहभाग नोंदवावा, असे आवाहन प्रकल्प अधिकारी अरुण पवार, यावल यांनी केले आहे.

---

# धरणगावमध्ये क्रांतिकारी खाज्याजी नाईक स्मारक प्रकल्पाची महाजन यांनी केली पाहणी

जळगाव – धरणगाव (ता. जळगाव) येथे उभारण्यात येत असलेल्या क्रांतिकारी खाज्याजी नाईक स्मारक प्रकल्पाची पाहणी राज्याचे जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री श्री.गिरीश महाजन यांनी केली. हे स्मारक आदिवासींच्या स्वातंत्र्यलढ्यातील योगदानाची साक्ष देणारे असून, भावी पिढ्यांसाठी प्रेरणास्थान ठरेल, असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.

या प्रसंगी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे क्षेत्रीय कार्यवाह बाळासाहेब चौधरी, चाळीसगावचे आमदार मंगेश चव्हाण, भाजपाचे प्रदेश महामंत्री विजुभाऊ चौधरी, स्थानिक पदाधिकारी, आदिवासी समाजाचे प्रतिनिधी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

खाज्याजी नाईक यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या आदिवासींच्या स्वातंत्र्य संग्रामाची उजळणी करणारे हे स्मारक सामाजिक प्रबोधनाचे कार्य करेल, असे यावेळी सांगण्यात आले. प्रकल्पासाठी शासनाकडून सर्वतोपरी सहकार्य करण्यात येईल, असेही महाजन यांनी स्पष्ट केले.



साप्ताहिक RNI Regd. No.: MAHMAR/1999/7490

# गोदावरी परिवार

सवलतीचा पोष्ट रजि. नं. JAL/120/2024-2026

* वर्ष २६ वे * अंक २६ * सोमवार ३०/०६/२०२५ * डाक ०२/०७/२०२५ * पाने – ४ * किंमत २ रुपये
* year 26 * issue 26 * monday : 30 / 06 / 2025 * post Dt. 02/ 07 / 2025 * pages - 4 * price 2 Rs.




# बऱ्हाणपूरच्या अति वजनाच्या महिलेची सुखरूप प्रसूती

## डॉ. उल्हास पाटील रूग्णालयातील स्त्रीरोग तज्ज्ञांचे कौशल्यपूर्ण यश

**जळगाव – ११० किलो वजन असलेल्या आणि बीएमआय ४४ असलेल्या एका महिलेला यशस्वी आणि सुरक्षित प्रसूती करून देण्यात डॉ. उल्हास पाटील रूग्णालयाच्या स्त्रीरोग तज्ज्ञांनी उल्लेखनीय यश मिळवले आहे.**

बऱ्हाणपूर येथील हसरत शेख ( वय २८) या महिलेची ही दुसरी प्रसूती होती, ती देखील तब्बल नऊ वर्षांनंतर. यावेळी तिचे वजन अत्यधिक वाढलेले होते आणि रक्तदाबही नियंत्रणाबाहेर गेला होता. त्यामुळे ही एक उच्चजोखमीची (हाय-रिस्क) केस मानली जात होती. महिला आणि बाळाचे प्राण वाचवणे हेच प्राथमिक उद्दिष्ट होते.रुग्णालयात दाखल झाल्यानंतर तिला विशेष निगराणीखाली ठेवण्यात आले. नियमित तपासण्या, आवश्यक रक्ततपासण्या आणि सोनोग्राफीच्या माध्यमातून संपूर्ण स्थितीवर बारकाईने लक्ष ठेवण्यात आले.

**आव्हान यशस्वी ठरले**

डॉ. उल्हास पाटील रूग्णालयातील तज्ज्ञ स्त्रीरोगतज्ज्ञांनी योग्य नियोजन, तांत्रिक कौशल्य,अनुभवी टीमच्या सहकार्याने प्रसूतीची आखणी केली. महिलेच्या वाढलेल्या बीएमआय सोबतच तिचा वाढलेला रक्तदाब ही अतिशय चिंतेची बाब होती. कोणत्याही क्षणी स्थिती बिघडण्याची शक्यता होती. अशा वेळी विभागप्रमुख डॉ. माया आर्विकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. वैभव पाटील, डॉ. करूणेश गुप्ता, डॉ. तेजस सोनवणे, डॉ. मृदुला मुंगसे, डॉ. पल्लवी शेंडगे यांच्या टीमने अत्यंत दक्षता बाळगून, वेळेची अचूक निवड करून शस्त्रक्रियेच्या (सीझेरियन) मार्गाने सुरक्षित प्रसूती केली. या प्रक्रियेत बाळ पूर्णपणे निरोगी असून आईची तब्येतही स्थिर आहे. बाळंतपणानंतरच्या काळातही महिला विशेष निगराणीखाली होती. यशस्वी प्रसूतीमुळे महिला, तिच्या कुटुंबियांनी समाधान व्यक्त केले असून, त्यांनी डॉ. उल्हास पाटील रूग्णालयाच्या संपूर्ण टीमचे मन:पूर्वक आभार मानले आहेत.



रुग्णासमवेत तज्ञ डॉक्टर आणि त्यांची टीम छायाचित्रात दिसत आहे. (छायाचित्र : नितीन नेवे)

ही केस केवळ वैद्यकीय उपचारांची नव्हे, तर टीमवर्क, नियोजन आणि अनुभवाची कसोटी होती. अशा उच्चजोखमीच्या परिस्थितीत यशस्वी प्रसूती हे आमच्या रुग्णालयाच्या क्षमतेचे द्योतक आहे. या घटनेने पुन्हा एकदा दाखवून दिले आहे की आधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञान, अनुभवी डॉक्टरांचे मार्गदर्शन आणि समर्पित सेवेमुळे अगदी कठीण परिस्थितीतही मातृत्वाचा आनंद सुरक्षितपणे मिळवता येतो.



– डॉ.मृदुला मुंगसे
निवासी डॉक्टर

## व्हिटॅमिन बी १२ ची कमतरता अशी भरुन काढा...!

**जळगाव – व्हिटॅमिन बी १२ हे आपल्या शरीरासाठी एक महत्त्वाचे पोषक तत्व आहे. त्याच्या कमतरतेमुळे थकवा, अशक्तपणा, अशक्तपणा आणि मज्जासंस्थेशी संबंधित समस्या यासारख्या विविध आरोग्य समस्या उद्भवू शकतात.**



शाकाहारी लोकांमध्ये व्हिटॅमिन बी१२ ची कमतरता अधिक आढळते, कारण हे व्हिटॅमिन प्रामुख्याने मांस, मासे आणि अंड्यांमध्ये आढळते. पण काळजी करू नका, काही शाकाहारी पदार्थ देखील आहेत जे व्हिटॅमिन बी १२ च्या कमतरतेवर मात करण्यास मदत करू शकतात. व्हिटॅमिन बी १२चे शाकाहारी स्रोत दही: दही हे व्हिटॅमिन बी १२ चा चांगला स्रोत आहे. यामध्ये प्रोबायोटिक्स देखील भरपूर असतात, जे पचनसंस्था निरोगी ठेवण्यास मदत करतात. मशरूम: व्हिटॅमिन बी १२ सोबतच, मशरूममध्ये इतर अनेक पोषक घटक देखील आढळतात. हे अँटीऑक्सिडंट्सचा देखील चांगला स्रोत आहे. चीज: व्हिटॅमिन बी १२ सोबत, कॅल्शियम आणि प्रथिने देखील चीजमध्ये आढळतात. हे हाडे आणि स्नायू मजबूत करण्यास मदत करते.

# पाय आणि घोट्यांमधील सूजकडे दुर्लक्ष करू नका

## डॉ.उल्हास पाटील रूग्णालयातील तज्ज्ञांचा सल्ला घ्या!

**जळगाव – पाय आणि घोट्यांमध्ये सूज येणे हे मूत्रपिंडाच्या नुकसानाचे लक्षण असू शकते. खरं तर, जेव्हा मूत्रपिंडे योग्यरित्या कार्य करू शकत नाहीत तेव्हा शरीरात द्रव जमा होऊ लागतो, ज्यामुळे पाय आणि घोट्यांमध्ये सूज येते. जर तुम्हाला अशी लक्षणे जाणवत असतील तर ताबडतोब डॉ. उल्हास पाटील रूग्णालयातील तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घ्या असे आवाहन करण्यात आले आहे.**



जर मूत्रपिंडात समस्या असेल तर पाय दुखणे आणि पेटके येण्याची समस्या असू शकते. खरं तर, जेव्हा मूत्रपिंड खराब होते तेव्हा शरीरात इलेक्ट्रोलाइट असंतुलन होऊ शकते, ज्यामुळे स्नायू दुखणे आणि पेटके येऊ शकतात. यामुळे त्या व्यक्तीला चालण्यासही त्रास होऊ शकतो. जर तुम्हालाही या प्रकारची समस्या वारंवार येत असेल तर ताबडतोब तपासणी करून घ्या. पायांच्या तळव्यावर आणि पायाभोवती तीव्र खाज सुटणे हे देखील मूत्रपिंडाच्या नुकसानाचे लक्षण असू शकते. खरंतर, जेव्हा मूत्रपिंड योग्यरित्या कार्य करू शकत नाहीत, तेव्हा शरीरात विषारी पदार्थ जमा होऊ लागतात, ज्यामुळे त्वचेला खाज येऊ शकते. जर तुम्हाला अशी लक्षणे दिसत असतील तर डॉक्टरांशी संपर्क साधा असे आवाहन डॉ. उल्हास पाटील रूग्णालय प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

# दुर्मीळ अन् राक्षसी फायलॉईड ट्युमरवर यशस्वी शस्त्रक्रिया

## महिला रुग्णाला मिळाले जीवनदान; शल्यचिकीत्सकांच्या टीमचे यश

**जळगाव – डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे ३५ वर्षांची रुग्ण रंजना हिंगोणकर हिच्या उजव्या स्तनावर वाढलेला विशाल फायलॉईड ट्युमर शस्त्रक्रियेने पूर्णपणे काढून महिला रूग्णाचे प्राण वाचविण्यात आले. शल्यचिकीत्सकांच्या टीममुळे ही शस्त्रक्रिया यशस्वी ठरली.**

रुग्णाला दीर्घकाळापासून उजव्या स्तनावरच्या वाढत्या गाठेमुळे त्रस्त होती. गाठेचं रूपांतर बाह्यदर्शनी विद्रूप, फोडयुक्त व जखम स्वरूपात झाले होते. ट्युमरने उजव्या छातीपर्यंत आपला प्रसार केला होता. ही परिस्थिती अतिशय गुंतागुंतीची होती व शस्त्रक्रियेचा धोका अधिक होता. या जटिल शस्त्रक्रियेचे कौशल्यपूर्वक नेतृत्व प्रोफेसर आणि विभागप्रमुख डॉ. शिवाजी सदुलवाड यांनी केले. त्यांना डॉ. वैभव फरके व डॉ. अर्शिल शेख यांनी शल्यसहाय्य केले. सर्वांनी मिळून खूप काळजीपूर्वक व तंत्रशुद्ध पद्धतीने हा विशाल ट्युमर बाहेर काढून टाकला. शस्त्रक्रियेनंतर रुग्णेची प्रकृती स्थिर आहे आणि आता तिला घरी सोडण्यात आले आहे. ही केस वैद्यकीय दृष्टिकोनातून अत्यंत आव्हानात्मक होती. पण वेळेवर निदान, अचूक नियोजन आणि कुशल शस्त्रक्रिया यामुळे रूग्णाचे प्राण वाचवता आले. शल्यचिकित्सक टीमचा हा मोठा विजय असल्याचे विभागप्रमुख डॉ. शिवाजी सदुलवाड यांनी सांगितले. रंजना हिंगोणकर यांचे धैर्य आणि डॉक्टरांच्या समर्पणामुळे हा कठीण प्रसंग यशस्वीरीत्या पार पडला. ही घटना रुग्णालयाच्या वैद्यकीय गुणवत्तेचं जिवंत उदाहरण ठरले आहे.



# डॉ.सुचित्रा कराडांच्या हस्ते गोदावरीचे संचालक डॉ.अनिकेत उल्हास पाटील सन्मानित

**जळगाव –पुणेतील एम.आय.टी. ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्सच्या नवीन २०० बेड हॉस्पिटलचे ‘आज’ उदघाटन करण्यात आले. या महत्वपूर्ण सोहळ्याचे उद्घाटन आणि मान्यवरांचा सत्कार डॉ. सुचित्रा कराड यांच्या हस्ते करण्यात आला. विशेष म्हणजे, जळगावच्या प्रतिष्ठित गोदावरी फाउंडेशनचे संचालक आणि एम सी एच न्युरोसर्जन डॉ. अनिकेत उल्हास पाटील यांना संस्थेच्या संचालिकेने पुष्पगुच्छ, शाल आणि श्रीफळ देऊन सन्मानित केले.**

यावेळी दोन्ही संस्थांनी भविष्यातील सहकार्याबाबत चर्चा केली असून, शैक्षणिक तसेच आरोग्य क्षेत्रात सामायिक प्रगतीचे निर्धार व्यक्त झाला.एम.आय.टी. ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्स, पुणे ज्यांची स्थापना प्रो. विश्वनाथ डी. कराड यांनी केली आहे



अभियांत्रिकी, व्यवस्थापन, वैद्यकीय, डिझाइन व इतर क्षेत्रात उच्च शिक्षण देते. संस्थेच्या ताज्या २०० बेड हॉस्पिटलमुळे नवी वैद्यकीय सुविधा सुरू होणार असून, दत्तक पंचक्रोशीतील लोकांना आरोग्य सेवादेखील अधिक सुलभ होण्याची अपेक्षा आहे.डॉ. सुचित्रा कराड यांनी यांच्या स्वागत समारंभात डॉ. अनिकेत पाटील यांचे हार्दिक स्वागत व्यक्त केले आणि त्यांना संस्थेचा विस्तृत परिचय व योजनांची माहिती दिली.

उद्घाटनानंतर दोन्ही प्रतिनिधींनी पुढील काळात विविध आरोग्य आणि शिक्षण सहकार्याच्या प्रकल्पांवर चर्चा केली.

जळगाव– पुणे मार्गावर हा उपक्रम, शहरी तसेच ग्रामीण भागातील लोकांसाठी आरोग्य सुविधा आणखी समृद्ध करतील याची आशा व्यक्त केली गेली.

## संपादकीय

# खेळ कुणाला दैवाचा कळला

अहमदाबाद येथे एअर इंडियाच्या विमानाला झालेल्या अपघाताचे वर्णन 'केवळ दुर्दैव' असेच होऊ शकेल. अन्यथा, वैमानिकाला जरा तरी वेळ मिळाला असता. त्याने धोक्यात असल्याचा आणि मदतीचा संदेश पाठवला होता. तो वाचणार्यांना विचार करण्याची संधी मिळाली असती. तसे काहीच घडले नाही. पत्त्याच्या बंगल्यासारखे विमान कोसळले. तेही डॉक्टरी शिकणार्या विद्यार्थ्यांच्या वसतिगृहावर. या अपघाताने पुन्हा एकदा मनुष्यजन्माचे क्षणभंगुरत्व देशाने अनुभवले. 'पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा' हे कळते पण ते वळणे म्हणजेच त्यातील मर्म स्वीकारणे किती अवघड आहे याची प्रचिती प्रत्येक जण घेत आहे. हे पराधीनत्व तरी किती पराकोटीचे असावे? काही जण त्यांच्या अंतिम प्रवासाला गेले. इतक्या जीवघेण्या अपघातातून विकास रमेशकुमार मात्र वाचले. भूमी चौहानचे वाहन वाहतूक जाममध्ये फसले म्हणून तिचे ते विमान चुकले. विमानात बसलेल्या प्रत्येकाची एक भावनिक कहाणी असेल. त्या कळल्यानंतर फक्त हळहळ अधिक तीव्र होते. गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रूपाणी काही महिन्यांच्या अवधीनंतर त्यांची पत्नी आणि मुलीच्या भेटीला चालले होते.सॉफ्टवेअर अभियंता प्रतीक जोशी त्यांच्या पत्नी आणि त्यांच्या तीन मुलांना कायमचे त्यांच्याबरोबर घेऊन चालले होते. प्रतीक लंडनमध्ये स्थिरावत असताना ते सगळे भारतात राहात होते. प्रयत्नान्ती हा दुरावा ते संपवणार होते. हवाईसुंदरी मैथिली पाटील महाराष्ट्र पनवेलमधील नाव्हा गावाची. हलाखीच्या परिस्थितीत तिने तिच्या हवाईसुंदरी होण्याच्या स्वप्नाचा पाठलाग केला होता असे तिचे कुटुंबीय सांगतात. भारतात पत्नीच्या अस्थी विसर्जित करून अर्जुनभाई पाटोलिया परत लंडनला चालले होते. नाशिक जिल्ह्यातील निफाड तालुक्यातील नैताळे येथील दीपक पाठक हा क्रु मेंबर होता. अपघातग्रस्त विमानातील ब्लॅकबॉक्स सापडला आहे. त्यामुळे अपघाताची कारणे कळू शकतील. घडणार्या प्रत्येक गोष्टीतून माणसाने धडा घ्यावा असे म्हटले जाते. या अपघातातून किंवा एरवी घडणार्या अशा सगळ्याच घटनांमधून धडाच घ्यायचा झाला तर? अपघात टाळण्यासाठी प्रयत्न केले जाऊ शकतील. उदाहरणार्थ, बोईंग विमानाच्या सुरक्षिततेविषयी आक्षेप घेतले जातात. ते आक्षेप कंपनीने गंभीरपणे घेतले असे सांगितले जाते. तसे ते प्रवाशांच्या देखील अनुभवास यायला हवे. अपघाताची विश्वासार्ह माहिती देण्यातील दिरंगाई अफवांना कारण ठरते. तसे घडू न देणे उचित ठरेल. माणसेही काही शिकू शकतील. मृत्यू कोणालाही, कधीही येऊ शकेल. ते कोणाच्याही हातात नाही. तेव्हा रोज उगवणार्या दिवशी 'माणसांशी माणसासम' वागणे नक्की आचरणात आणले जाऊ शकेल. कारण खेळ कुणाला दैवाचा कळला हेच सत्य आहे.

# केसांचा शत्रू तुमच्या नळातून येतोय का?

**आपण दररोज अंघोळीला वापरत असलेले पाणी आपल्या केसांच्या आरोग्यावर मोठा परिणाम करतं. सध्या अनेक ठिकाणी हार्ड वॉटर (कठीण पाणी) मिळतं आहे आणि त्यामुळे केसगळतीच्या तक्रारीही वाढताना दिसत आहेत. पण खरंच हार्ड वॉटरमुळे केस गळतात का? चला या मागचं सत्य जाणून घेऊया.**

**हार्ड वॉटर म्हणजे काय?**

हार्ड वॉटर म्हणजे असे पाणी ज्यात कॅल्शियम, मॅग्नेशियम आणि इतर खनिजांचे प्रमाण जास्त असते. हे खनिज केसांवर साचतात, ज्यामुळे केस मऊ व चमकदार न राहता कोरडे, तुटके आणि निर्जीव होतात.

**हार्ड वॉटर आणि केसगळती – संबंध काय?**

* हार्ड वॉटरमधील कॅल्शियम व मॅग्नेशियम केसांच्या क्युटिकलवर थर साचवतात. त्यामुळे:
* केसांवरचा नैसर्गिक तेलाचा थर निघून जातो.
* शॅम्पू आणि कंडिशनर नीट लागत नाहीत व धुतले जात नाहीत.
* केस कोरडे, तुटके व गळायला लागतात.
* स्काल्पवर खवखव, ड्रायनेस आणि इरिटेशन होते.
* म्हणूनच हार्ड वॉटरचा सातत्याने वापर केल्यास केसांचे आरोग्य बिघडते आणि केसगळती वाढते.

अनेक अभ्यासांमधून हे दिसून आलं आहे की हार्ड वॉटर केसांमध्ये मिनरल्स जमा करतं आणि त्यामुळे केसांची मुळं कमकुवत होतात. यामुळे टेलोजन एफ्लुवियमसारख्या स्थिती उद्भवतात ज्या केसगळतीचं मुख्य कारण ठरतात.

**उपाय काय?**

१. वॉटर सॉफ्टनर वापरणं: घरात वॉटर सॉफ्टनर लावल्यास पाणी सौम्य केलं जाऊ शकतं.
२. फिल्टर लावणं: शॉवरवर मिनरल फिल्टर लावल्यास हार्ड वॉटरमधील घातक घटक कमी होतात.
३. केसांसाठी खास शॅम्पू: क्लॅरिफायिंग किंवा डीटॉक्स शॅम्पू आठवड्यातून एकदा वापरणं.
४. तेल आणि डीप कंडिशनिंग: नारळ तेल, आर्गन तेल किंवा डीप कंडिशनरने केसांना पोषण द्या.
५. अंगावर शेवटचं पाणी सौम्य असावं: शेवटी उकळलेलं किंवा फिल्टर केलेलं पाणी केसांवर वापरा.



**सौंदर्याच्या गुजगोष्टी**

**डॉ. तेजस्विनी राहूल फाटे**
**त्वचा विकार विभाग**



हार्ड वॉटर थेट केसगळतीचं एकमेव कारण नसले तरी ते नक्कीच एक मोठं कारण आहे. केसांची योग्य निगा राखणं, हार्ड वॉटरचा परिणाम समजून घेणं आणि योग्य उपाययोजना करणं आवश्यक आहे. नैसर्गिक केसांचं सौंदर्य टिकवून ठेवण्यासाठी पाण्याचं स्वच्छ आणि सौम्य असणं तितकंच महत्त्वाचं आहे.

# गोदावरी स्कूलमध्ये 'एनआयई' अंक मोफत वाटप

**जळगाव – गोदावरी इंग्लिश मीडियम सीबीएसई स्कूलमध्ये आज नव्या शैक्षणिक वर्षाचा पहिला दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.**

विद्यार्थ्यांचे स्वागत फुलं, रंगीबेरंगी फुगे आणि सकाळ वृत्तपत्राच्या पुढाकाराने विद्यार्थ्यांना 'एनआयई' चा मोफत अंक वितरित करण्यात आला.

मएनआयई' हा विशेष अंक शालेय विद्यार्थ्यांसाठी तयार केला जातो, ज्यामध्ये शैक्षणिक माहिती बरोबरच मनोरंजन, प्रेरणादायी गोष्टी, करंट अफेअर्स आणि इंग्रजी ज्ञानवृद्धीसाठी उपयुक्त सामग्री असते. शाळेचे मुख्याध्यापक सौ निलीमा चौधरी यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासा बरोबरच वर्तमानपत्र वाचनाची सवय लावण्याचे महत्त्व अधोरेखित केले.पालकांनी आणि शिक्षकांनी या उपक्रमाचे स्वागत केले असून विद्यार्थ्यांमध्ये विशेष उत्साह पहावयास मिळाला. सकाळ पेपर आणि 'एनआयई' उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता आणि भाषिक कौशल्य वाढण्यास निश्चितच मदत होईल, असे मत शिक्षकांनी व्यक्त केले.



# रक्तदान शिबिरात ४५ दात्यांचे रक्तदान



**जळगाव – जागतिक रक्तदाता दिनानिमित्त, डॉ. उल्हास पाटील फिजिओथेरपी महाविद्यालय यांच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.**

या उपक्रमाचे समन्वयक कम्युनिटी विभागाचे डॉ. मनोज यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या शिबिरात ४५ दात्यांनी रक्तदान केले. प्राचार्य डॉ. जयवंत नागुलकर यांनी मान्यवरांच्या उपस्थितीत शिबिराचे उद्घाटन केले आणि स्वेच्छेने रक्तदान करण्याचा संदेश दिला.या कार्यक्रमाचा उद्देश रक्तदानाचे महत्त्व आणि त्याच्या जीव वाचवणाऱ्या क्षमतेबाबत जनजागृती करणे हा होता. आरोग्य सेवा तज्ज्ञ आणि ब्लड बँक सहकार्याने करण्यात आले.या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकीय कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

# जळगावी नर्सरीच्या विद्यार्थ्यांचे स्वागत

**जळगाव – गोदावरी इंग्लिश मीडियम सीबीएसई स्कूलमध्ये आज नर्सरी वर्गाच्या नवीन शैक्षणिक वर्षाची जल्लोषात सुरुवात करण्यात आली. नवीन आलेल्या विदयार्थ्यांनी हातात फुगे आणि हसऱ्या चेहऱ्यांसह शाळेत प्रवेश केला. संपूर्ण परिसरात आकर्षक फुग्यांनी सजावट केली होती.**

स्वागत गीतांनी स्वागत करण्यात आले. यावेळी पेरेंट्स ॲक्टिव्हिटीज अंतर्गत अनेक खेळ, हस्तकला उपक्रम आणि संवाद सत्रांचे आयोजन करण्यात आले होते.विशेषत:,शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. नीलिमा चौधरी यांनी यावेळी बोलताना सांगितले.

प्रत्येक बालकासाठी शाळेतील पहिला दिवस अविस्मरणीय व्हावा हा आमचा प्रयत्न आहे. शिक्षणासोबतच संस्कार, प्रेम आणि सुरक्षितता देणं हे आमचं प्रमुख उद्दिष्ट आहे.या कार्यक्रमाला शिक्षकवृंद, पालक आणि इतर मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# जिल्ह्यातील युवक-युवतींसाठी मोफत कौशल्य विकास प्रशिक्षणाचे आयोजन

**जळगाव – जिल्ह्यातील युवक-युवतींना रोजगारक्षम बनवण्यासाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, जळगाव यांच्या मार्फत मोफत कौशल्य विकास प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले असून, त्यासाठी नावनोंदणी प्रक्रिया सुरू झाली आहे.**

जिल्हा वार्षिक योजना ऊझउ (सर्वसाधारण) अंतर्गत 'प्रमोद महाजन कौशल्य उद्योजकता विकास अभियान - किमान कौशल्य विकास कार्यक्रम' सन २०२५-२६ मध्ये राबविण्यात येणार आहे. योजनेचा उद्देश म्हणजे जिल्ह्यातील युवक-युवतींसाठी रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी वाढवणे, तसेच उद्योग व इतर क्षेत्रांना कुशल मनुष्यबळ पुरवणे.

या योजनेत १५ ते ४५ वयोगटातील युवक-युवतींना मान्यताप्राप्त प्रशिक्षण संस्थांमार्फत मोफत कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण करणाऱ्या लाभार्थ्यांना शासनातर्फे अधिकृत प्रमाणपत्र देण्यात येईल.

या प्रशिक्षणात पुढील क्षेत्रातील अभ्यासक्रमांचा समावेश आहे: १. कृषी, २. ऑटोमोटिव्ह, ३. फूड प्रोसेसिंग, ४. ब्युटी अँड वेलनेस, ५. इत्रङ्खख, ६. कन्स्ट्रक्शन, ७. डोमेस्टिक वर्कर्स, ८. इलेक्ट्रॉनिक्स, ९. हँडीक्राफ्ट व कार्पेट, १०. हेल्थकेअर, ११. हॉस्पिटॅलिटी व टुरिझम, १२. पॉवर, १३. मीडिया अँड एंटरटेनमेंट, १४. कॅपिटल गुड्स, १५. लॉजिस्टिक्स, १६. मॅनेजमेंट, १७. स्पोर्ट्स अँड फिटनेस,१८. टेलिकॉम

अधिकाधिक युवक-युवतींनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले असून इच्छुक उमेदवारांनी खालील गुगल लिंक https://tinyurl.com/4ms5nbtt वापरून तात्काळ नोंदणी करावी असे आवाहन विभागा मार्फत करण्यात आले आहे.

# साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्ती अर्ज प्रक्रिया सुरू

**जळगाव – साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादित, महाराष्ट्र राज्य, मुंबई अंतर्गत सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाकरिता मांतग समाज व तत्सम १२ पोटजातीतील विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती अर्ज मागविण्यात येत आहेत.**

**अर्ज स्वीकारण्याची अंतिम मुदत २० जुलै २०२५ अशी निश्चित करण्यात आली आहे.**

या शिष्यवृत्तीसाठी १०वी, १२वी, पदवी, पदव्युत्तर, वैद्यकीय, अभियांत्रिकी आणि इतर अभ्यासक्रमामध्ये ६० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना जेष्ठता व अधिक गुणांच्या आधारे निधीच्या उपलब्धतेनुसार शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येणार आहे.

विद्यार्थ्यांनी गुणपत्रक (मार्कशीट) शाळा सोडल्याचा दाखला, जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला, रेशनकार्ड, आधार कार्ड, दोन पासपोर्ट आकाराचे फोटो ,पुढील वर्गात प्रवेश घेतल्याचा पुरावा (पावती किंवा बोनाफाईड प्रमाणपत्र), जिल्हा व्यवस्थापकांच्या नावे शिष्यवृत्ती मागणीचा अर्ज, कागदपत्रांच्या दोन प्रतीसह साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्या., जळगाव, महाबळ रोड, मायादेवी नगर स्टॉपसमोर, हातणूर कॉलनी, जळगाव जिल्हा कार्यालयाशी संपर्क साधावा.

Editor : Sourabh Patil (Reg. Newspaper) Weekly Godavari Parivar : Owner, Publisher, Printer : Dr. Mrs. Varsha Patil printed at Subhash Printers, 38, Trimbak Nagar, Near Shakuntala Rane Primary School, Beside Narayani Park Apartment, Mahabal Area, Jalgaon 425002 (Mah.) Godavari Hospital, Released at Jalgaon, Near Bhaskar Market. Phone no. 2221834/35, & Posted from Jalgaon Main Post Office. Should be sent to this email for publication of news in the issue (Editors do not necessarily agree with the views published in the issue.)

संपादक : सौरभ पाटील (रजि. न्यूजपेपर) साप्ताहिक गोदावरी परिवार : मालक, प्रकाशक, मुद्रक : डॉ. सौ. वर्षा पाटील यांनी सुभाष प्रिंटर्स, ३८, त्र्यंबक नगर, शकुंतला राणे प्रायमरी स्कूलजवळ, नारायणी पार्क अपार्टमेंट शेजारी, महाबळ एरिया, जळगांव ४२५००२ (महा.) येथे छापून गोदावरी हॉस्पीटल, भास्कर मार्केट जवळ, जळगांव फोन नं. २२२१८३४/३५ येथे प्रसिद्ध करुन जळगाव मुख्य डाक कार्यालय येथून निर्गमित केले. अंकात बातम्या प्रसिध्द करण्यासाठी या ईमेलवर पाठवाव्यात. Email : godavari.parivar@gmail.com (अंकात प्रकाशित झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

## गोदावरी कॉलेज ऑफ नर्सिंगमध्ये

# नॉर्मल डिलिव्हरीवरील कौशल्य प्रशिक्षण कार्यशाळा

**जळगाव : गोदावरी फाउंडेशन संचलित गोदावरी कॉलेज ऑफ नर्सिंग, जळगाव येथे कम्युनिटी हेल्थ नर्सिंग विभागाच्या वतीने, बी.एस्सी. नर्सिंग सहावे सत्र विद्यार्थ्यांच्या सहकार्याने,नैसर्गिक प्रसुती 'नॉर्मल वेजायनल डिलिव्हरीवरील ॲडव्हान्स क्लिनिकल कौशल्य प्रशिक्षण' कार्यशाळा उत्साहात पार पडली.**

प्रमुख अतिथी म्हणून डॉ. हंसीहा पिल्लई निवासी वैद्यकिय अधिकारी डॉ.उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालय यांनी कर्मचार्यांना नॉर्मल डिलिव्हरीची योग्य प्रक्रिया आणि आवश्यक कौशल्ये प्रसूतीच्या विविध टप्प्यांचे ज्ञान, बाळाला सुरक्षितपणे बाहेर काढणे, आणि



प्रसूतीनंतरची काळजी घेण माता आणि बाळ दोघांचीही सुरक्षित प्रसूती सुनिश्चित करणे आहे.

यासाठी, आरोग्य कर्मचार्यांना प्रसूतीदरम्यान उद्भवणार्या समस्या कशा ओळखायच्या आणि त्यावर तातडीने

उपाययोजना कशा करायच्याप्रसूती वेदना, गर्भाची स्थिती, आणि प्रसूतीनंतरची काळजी. यावर मार्ग त्यांनी सामान्य प्रसूतीच्या प्रक्रियेत वैद्यकीय दृष्टिकोन, धोके व व्यवस्थापन यावर आधारित व्यावहारिक माहिती दिली.

कार्यक्रमाच्या प्रमुख समन्वयक म्हणून प्रा. (उपप्राचार्य) जॅसिंथ ढाया (प्रोग्राम हेड) व प्रा. निर्भय मोहोड (विभागप्रमुख, कम्युनिटी हेल्थ नर्सिंग विभाग) यांनी देखिल मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे आयोजन प्रा. स्वाती गाडेगोणे,प्रा.डिव्हायाना पवार,प्रा. अश्लेशा मून आणि प्रा. रितेश पडघन या समन्वयकांनी केले. सहावी सत्रातील बी.एस्सी. नर्सिंग विद्यार्थी यांनीही कार्यक्रम यशस्वी करण्यात महत्त्वपूर्ण सहभाग दिला.

## डॉ.उल्हास पाटील कॉलेज ऑफ फिजिओथेरपीत स्वच्छता मोहीम

**जळगाव – डॉ. उल्हास पाटील कॉलेज ऑफ फिजिओथेरपीच्या विद्यार्थी परिषदेच्या वतीने महाविद्यालयीन कॅम्पसमध्ये स्वच्छता मोहीम यशस्वीरित्या राबविण्यात आली.**

या उपक्रमाला प्राचार्य डॉ. जयवंत नागुळकर, मा. राहुल गिरी तसेच सर्व प्रशासकीय कर्मचारी, शिक्षकेतर कर्मचारी व प्राध्यापक वर्ग उपस्थित होते. डीयूपीसीओपीमधील सर्व विद्यार्थ्यांनी या मोहिमेत सक्रीय सहभाग घेतला आणि कॅम्पसमधील बागा तसेच परिसर स्वच्छ केला. यामुळे स्वच्छ आणि निरोगी पर्यावरणाची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झाली.प्राचार्य डॉ. नागुळकर यांनी स्वच्छतेचा संकल्प केवळ कार्यक्रमापुरता मर्यादित न ठेवता, तो दैनंदिन जीवनाचा एक भाग बनवण्याचे आवाहन केले.कार्यक्रमाचा समारोप स्वच्छतेचा संकल्प घेत, आणि शाश्वत व स्वच्छ कॅम्पससाठी जबाबदारीची भावना जोपासण्याच्या निर्धाराने करण्यात आला.





## डॉ. प्रेमचंद पंडित

(९४२२९१५३७९)
(निवृत्त सिव्हील सर्जन, बुलडाणा)
वैद्यकीय अधीक्षक
डॉ.उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय, जळगाव

1. Focus on making the best possible decisions with the information you have knowing you can not control the outcome.
2. Every experience gives you clarity in chaos, patience in frustrations, and strength in vulnerability.
3. What others do to us cannot hurt us as much as we do to ourselves.
4. Ensure that your daily decisions and actions consistently align with broader objectives.
5. Revisit and evaluate your vision regularly and make improvements where necessary.
6. When faced with difficult choices, revisit your intention and find the centre of the problem.
7. May whatever happens be for the highest good for all concerned.

१. उस जानकारी के आधार पर सर्वोत्तम संभव निर्णय लेने पर ध्यान दें जो आपके पास है, यह जानते हुए कि आप परिणाम को नियंत्रित नहीं कर सकते।
२. हर अनुभव आपको अराजकता में स्पष्टता, निराशाओं में धैर्य, और असुरक्षा में ताक़त देता है।
३. दूसरे हमारे साथ जो करते हैं, वह हमें उतना चोट नहीं पहुंचाता जितना हम स्वयं को पहुंचाते हैं।
४. सुनिश्चित करें कि आपके दैनिक निर्णय और कार्य व्यापक उद्देश्यों के साथ निरंतर मेल खाते हों।
५. अपने दृष्टिकोण की नियमित रूप से समीक्षा करें और जहाँ आवश्यक हो, सुधार करें।
६. जब कठिन निर्णयों का सामना हो, तो अपने इरादे की ओर लौटें और समस्या के केंद्र को समझें।
७. जो कुछ भी हो, वह सभी संबंधित लोगों के लिए सर्वोत्तम कल्याणकारी हो – ऐसी प्रार्थना करें।

# १७ प्राध्यापकांचे एनपीटीईएल परीक्षेत यश




**जळगाव – जळगाव गोदावरी फाउंडेशन संचलित गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालयातील विविध शाखांच्या १७ प्राध्यापकांनी नॅशनल प्रोग्राम ऑन टेक्नॉलॉजी एन्हान्स लर्निंग (एनपीटीईएल) या परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. ही परीक्षा भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२४–२५ साठी आयोजित करण्यात आली होती.**




आयआयटी तसेच आयआयएससी यांच्यातर्फे संचलित उच्चतंत्र शिक्षणातील विषयांवरील अभ्यासक्रम पूर्ण करीत विविध शाखांच्या अनेक प्राध्यापकांनी हे घवघवीत यश संपादन केल्याची माहिती गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील यांनी दिली.

एलपीटीईएल मार्फत यावर्षी घेण्यात आलेल्या परीक्षांमध्ये यंत्र विभाग, आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड डाटा सायन्स, संगणक विभाग, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेली कम्युनिकेशन विभाग, बेसिक सायन्सेस अँड ह्युमॅनिटीज शाखांच्या माध्यमातून १७ विविध प्राध्यापकांनी यश संपादन केले आहे. यंत्र विभागात प्रा.मयूर ठाकूर – नॉन कन्वेंशनल एनर्जी रिसोर्सेस, प्रा. किशोर महाजन– डिझाईन प्रॅक्टिसेस फॉर इंटेलिजंट प्रॉडक्ट डिझाईन, प्रा.पंकज बोंडे– मॅन्युफॅक्चरिंग ऑटोमेशन, प्रा. प्रवीण पाटील– टीचिंग अँड लर्निंग इन इंजिनिअरिंग आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड डाटा सायन्स विभाग, डॉ. अनिल कुमार विश्वकर्मा– इंट्रोडक्शन टू इंटरनेट ऑफ थिंग्स, प्रा. जयश्री पाटील– डाटा सायन्स फॉर इंजिनियर्स, प्रा. रेशमा अत्तरदे– डाटा बेस्ड मॅनेजमेंट सिस्टीम संगणक विभाग, प्रा निलेश वाणी– डाटा सायन्स विथ पायथॉन, प्रा.वेलचंद होले– इंट्रोडक्शन टू इंटरनेट ऑफ थिंग्स, प्रा. देवेंद्र फेगडे– प्रोग्रामिंग डाटा स्ट्रक्चर्स अँड अल्गोरिदम्स युसिंग पायथॉन इलेक्ट्रॉनिक्स अँड टेली कम्युनिकेशन विभाग प्रा.हेमराज धांडे प्रा. महेश एन पाटील, इंट्रोडक्शन टू इंडस्ट्री ४.० अँड इंडस्ट्रियल इंटरनेट ऑफ थिंग्सबेसिक सायन्सेस अँड ह्युमॅनिटीज विभाग, डॉ.नितीन भोळे– नॅचरल हजार्ड्स डॉ. सरोज भोळे– नॅचरल हजार्ड्स, प्रा. संजय चौधरी– केमिस्ट्री ऑफ मेन ग्रुप इलेमेंट्स, प्रा. तृषाली शिंपी– पार्शियल डिफरेन्शियल इक्वेशन फॉर इंजिनियर्स: सोल्युशन बाय सेपरेशन ऑफ वेरिएबल्स, प्रा. खुशाली बेलदार– बॉडी लॅंग्वेज: की टू प्रोफेशनल सक्सेस तसेच ऑनलाइन कम्युनिकेशन इन द डिजिटल एजवरील प्राध्यापकांच्या यशामध्ये विविध विभाग प्रमुखांचे वेळोवेळी प्रोत्साहन तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

महाविद्यालयाच्या प्राध्यापकांच्या यशाबद्दल गोदावरी फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ.उल्हास पाटील, सचिव डॉ. वर्षा पाटील, सदस्या डॉ. केतकी पाटील, हृदयविकार तज्ज्ञ डॉ. वैभव पाटील तसेच न्युरोसर्जन डॉ. अनिकेत पाटील यांनी कौतुक केले.

# योग आणि शालेय विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य : एक समुपदेशकाचा दृष्टिकोन

## मनाच्या गाभाऱ्यात शांततेचा दीप लागतो तेव्हा योग जन्म घेतो

**आज शाळांमध्ये डिजिटल तंत्रज्ञान, स्पर्धा आणि परीक्षांचा दबाव वाढत असतानाच, विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याकडे दुर्लक्ष होत आहे. स्वप्न बाळगणाऱ्या या छोट्या मनांवर शारीरीक आरोग्य उपचाराबरोबर अभ्यासाचे ओझं, पालकांची अपेक्षा आणि समाजाचे मापदंड याचा अनावश्यक ताण येतो. या तणावाच्या साखळीतून बाहेर पडण्यासाठी विद्यार्थ्यांना एक आंतरिक आधार, शांतीचा स्त्रोत हवा असतो – आणि तिथेच योग आपली भूमिका बजावतो.**

**समुपदेशकांच्या दृष्टिकोनातून योगाची गरज:**

शाळा म्हणजे ज्ञानमंदिर, पण विद्यार्थ्यांचे मन हे त्यातील प्रार्थनास्थळ आहे. समुपदेशक म्हणून माझं निरीक्षण आहे की, आज बहुसंख्य विद्यार्थी आत्मविश्वासाच्या अभावाने, सततच्या स्पर्धेने आणि सामाजिक मीडिया प्रभावाने मानसिक अस्वस्थतेचा सामना करत आहेत. या मनोव्यथांवर उपचार करण्यासाठी औषध नव्हे, तर स्वतःकडे पाहण्याची कला शिकवणं आवश्यक आहे . आणि हाच योगाचा आत्मा आहे.

**विद्यार्थ्यांसाठी योगाचे मानसिक व भावनिक फायदे:** योग विद्यार्थ्यांना त्यांच्या आतल्या आवाजाशी जोडतो. ते स्वतःच्या भावना ओळखायला शिकतात.

**एकाग्रता आणि सृजनशीलता वाढवतो:** ध्यान आणि प्राणायामामुळे मन शांतीकडे झुकते, ज्यामुळे अभ्यासात लक्ष केंद्रित होते आणि कल्पनाशक्तीला बख मिळते.

**व भावनिक समतोल साधतो:** राग, मत्सर, ईर्ष्या यांवर योग नियंत्रण ठेवतो. विद्यार्थी सहानुभूतीने विचार करायला शिकतात.

**गुणवत्तायुक्त झोप मिळते:** योग निद्रा आणि शांत श्वसन तंत्रामुळे विद्यार्थ्यांना गाढ, ताजेतवानी झोप मिळते – जे त्यांच्या मानसिक ताजेपणासाठी अत्यावश्यक आहे.

**स्वत:वर विश्वास निर्माण होतो:** योग विद्यार्थ्यांना सांगतो की – तू पुरेसा आहेस. ही भावना त्यांना परीक्षेच्या, स्पर्धेच्या बाहेरही समाधान देऊ शकते.

**शाळेत योगाचा नाविन्यपूर्ण समावेश कसा करावा?**

योग हा अभ्यासाचा भाग न राहता, विद्यार्थ्यांच्या भावनिक गरजा पूर्ण करणारा जीवनशैलीचा भाग व्हावा. एक समुपदेशक म्हणून खालील कल्पना मी यशस्वीपणे वापरल्या आहेत:

**म्युझिकल ध्यान:** शांत संगीतासोबत पाच मिनिटांचे ध्यान – दिवसभर मन प्रसन्न ठेवते.

**ग्रीन योग क्लास:** शाळेच्या आवारात झाडांच्या सान्निध्यात योग सत्र – नैसर्गिक ऊर्जा देणारे.

**मन मोकळं करूया** – संवाद सत्र जिथे विद्यार्थी स्वतःच्या भावना शेअर करतात.

**मन डायरी:** दररोज एक सकारात्मक विचार किंवा भावना लिहिण्याची सवय.

**योग + कला:** विद्यार्थ्यांनी योगाचे अनुभव चित्रातून मांडणे – भावनिक अभिव्यक्तीस उत्तेजन.

**एक अनुभव...**

माझ्या शाळेत एका विद्यार्थिनीला सततची चिंता आणि अभ्यासाचा ताण जाणवत होता. तिची झोप कमी झाली होती, ती चिडचिड करायला लागली होती. मी तिला दररोज १० मिनिटांचे प्राणायाम, आणि ओम जप ध्यान दिले. एका महिन्यात तिचा आत्मविश्वास, चेहऱ्यावरील तेज आणि शांतता आश्चर्यकारकरीत्या वाढली. हा अनुभव योगाच्या अद्भुत प्रभावाची साक्ष देतो. सतत आरोग्य तपासणीमूळे व आजारामूळे १० वीच्या विदयार्थीनीला पास होईल की नाही याची खात्री नव्हती योग आणि समुपदेशनाने ती ७२ गुण मिळवत उत्तीर्ण झाली.

**निष्कर्ष:**

विद्यार्थ्यांचे मन म्हणजे कोवळ्या वेलीसारखे असते – त्याला योग्य दिशा, आधार आणि प्रकाश हवा असतो. योग ही केवळ प्राचीन परंपरा नाही, तर आधुनिक काळातील विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याची गरज आहे. योगाला शाळेच्या अभ्यासक्रमात सर्जनशील पद्धतीने सामावून घेतल्यास आपण गुणवान नव्हे तर समतोल व्यक्तिमत्व घडवू शकतो. योगाने विचारांची दिशा बदलते – आणि दिशा बदलली की भविष्य देखिल बदलते.



– लीना चौधरी
समुपदेशक, गोदावरी इंग्लिश मीडियम स्कूल जळगाव,
९५०३० ८७११६

# गोदावरीच्या विविध संस्थामध्ये आंतरराष्ट्रीय योगा दिनाचा उत्साह




## डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयात योग दिन उत्साहात

जळगाव – येथील डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयात जागतिक योग दिनानिमित्त डॉ. उल्हास पाटील कॉलेज ऑफ फिजीओथेरेपी महाविद्यालयातर्फे सारा संकुल येथे योग दिनाचा कार्यक्रम घेण्यात आला.

कार्यक्रमाच्या सुरवातीला वैद्यकीय महाविद्यालयाचे अधीष्ठाता डॉ. प्रशांत सोळंके, रजीस्ट्रार प्रमोद भिरूड, वैद्यकीय रूग्णालयाचे अधीक्षक डॉ. प्रेमचंद पंडीत, डॉ. चंद्रय्या कांते, फिजीओथेरेपी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयवंत नागूलकर, आयुर्वेद महाविद्यालयाचे डीन डॉ. हर्षल बोरोले, होमीओपॅथी महाविद्यालयाचे डीन डॉ. आर.के. मिश्रा, गोदावरी कॉलेज ऑफ नर्सिंगचे प्रवीण कोल्हे, डॉ. केतकी पाटील नर्सिंग महाविद्यालयाचे संचालक शिवानंद बिरादर यांनी विद्यार्थ्यांना योग दिनाचे महत्व सांगितले.

त्यानंतर प्राचार्य, प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनी योग प्रात्याक्षिक करून योग दिन साजरा केला. या कार्यक्रमात ४९८ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला

## गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालयात योगा दिवस

जळगाव – गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त योग प्रात्याक्षिकांचे योगा फॉर वन अर्थ वन हेल्थ या थीम अंतर्गत योगा डे चे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी गोदावरी अभियांत्रिकीचे प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील, अधिष्ठाता डॉ. हेमंत इंगळे व रजिस्ट्रार डॉ. ईश्वर जाधव तसेच योगशिक्षक प्रा. महेश एन पाटील सर्व विभागप्रमुख व प्राध्यापक वर्ग उपस्थीत होते.योग प्रात्याक्षिकासाठी गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्रा.महेश एन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व प्राध्यापकवृंद यांनी योग प्रात्याक्षिक केले.

## डॉ.उल्हास पाटील कृषी व कृषी अभियांत्रिकी महाविद्यालय

जळगाव – येथे राष्ट्रीय सेवा योजनेर्तंगत आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला.

महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी अंतर्गत जळगाव येथिल डॉ. उल्हास पाटील कृषी महाविद्यालयात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शैलेश तायडे आणि कृषी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पुनमचंद सपकाळे यांचे मार्गदर्शनाखाली कार्यक्रम अधिकारी प्रा.गौरव ढोले आणि प्रा. एन. डी. पाटील यांनी आयोजन केले.

क्रीडा शिक्षक आणि योग अभ्यासक प्रा. आर. डी चौधरी यांनी योगासने आणि प्राणायाम याचे प्रात्यक्षिक करून या प्रसंगी उपप्राचार्य प्रा. प्रवीण देवरे, प्रा. एस एन पाटील, प्रा. बी एम गोणशेटवाड, प्रा. अमोल सोहानी, प्रा. करण बनसोडे, प्रा.कार्तिक खर्चे, प्रा. सागर ठाकरे, सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी यांची उपस्थिती लाभली.

## डॉ. वर्षा पाटील वुमन्स कॉलेज ऑफ होम सायन्स

जळगाव – महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.

योग प्रशिक्षक महाराष्ट्र पूर्व महिला पतंजली योग समिती जळगावच्या आंतरराष्ट्रीय योग परीक्षा उत्तीर्ण तसेच पतंजली विद्यापीठाचे योग गुरु रामदेव बाबाजी यांच्या हस्ते योग भूषण पुरस्कृत जयश्री पाटील मॅडम यांनी योग प्रत्यक्षिकांचे प्रशिक्षण दिले. यावेळी मा. नयना जाधव,डॉ डिंपल पाटील महाविद्यालयाच्या प्राचार्य कविता देशमुख तसेच सर्व विद्यार्थिनी विद्यार्थिनी शिक्षक व शिक्षक तर कर्मचारी उपस्थित होते.

## डॉ.उल्हास पाटील इंग्लिश मीडियम स्कूल, भुसावळ

शाळेत आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात व आनंदात साजरा करण्यात आला.

विद्यार्थ्यांनी योगाच्या महत्त्वाचे गांभीर्याने सहभाग घेत योग रुद्र सादर करत आपल्या अंगभूत प्रतिभेचे दर्शन घडवले. योगाच्या महत्त्वावर आधारित नाटकाच्या माध्यमातून योग ही प्राचीन भारतीय परंपरा आपल्याला मानसिक स्थैर्य, शारीरिक तंदुरुस्ती व आंतरिक शक्ती कशी प्रदान करते, हे प्रभावीपणे दाखवण्यात आले.

## डॉ. उल्हास पाटील लॉ कॉलेज, जळगाव

जळगाव महाविदयालयात आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा योग दिन विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

प्राचार्य डॉ. नयना महाजन यांनी योग ही भारताची प्राचीन परंपरा असून आजच्या तणावपूर्ण जीवनात मनःशांती आणि आरोग्यासाठी योगाची आवश्यकता अधिकच वाढली आहे. युवकांनी दररोज योगा केल्यास आरोग्यदृष्ट्या उत्तम जीवनशैली निर्माण होईल.महाविद्यालयातील प्राचार्य, प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.

## इंग्लिश मीडियम सीबीएससी स्कूल सावदा

शाळेत योगा दिनामित्त योग शिक्षकांच्या उपस्थीतीत योगाचे धडे गिरवण्यात आले.

शाळेच्या प्राचार्या सौ भारती महाजन तसेच क्रीडा शिक्षक आणि इतर शिक्षकांच्या व विद्यार्थ्यांच्या सहाय्याने शाळेत योगा दिवस साजरा करण्यात आला.योगा शिक्षकांच्या मार्गदर्शनानुसार विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या प्रकारचे आसन करून योगा दिवस साजरा केला

## डॉ. वर्षा पाटील वुमन्स कॉलेज ऑफ कॉम्प्युटर एप्लीकेशन महाविद्यालय

जळगाव– डॉक्टर वर्षा पाटील वुमन्स कॉलेज ऑफ कॉम्प्युटर एप्लीकेशन महाविद्यालयात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते

योगाभ्यासक प्रा. महेश पाटील यांचे स्वागत प्रिन्सिपल डॉ. नीलिमा वारके यांनी पुष्पगुच्छ देऊन केले त्यानंतर योगा म्हणजे काय तर जुळणे आजच्या युगामध्ये त्याला कनेक्टिव्हिटी म्हणता येईल असे मत त्यांनी मांडले. त्यांनी ताडासन वृक्षासन, वज्रासन ,ओमकार कसा योग्यरीत्या करायचा डोळ्यांची आसन हे कर्मचारी वर्गाला शिकवले.आयोजन प्रा. मानसी अहिरे यांनी केले होते.

## गोदावरी इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड रिसर्च महाविद्यालय

जळगाव – गोदावरी इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड रिसर्च महाविद्यालयात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

योगाभ्यासक प्रा. महेश पाटील यांचे स्वागत डॉ. प्रशांत वारके यांनी केले, त्यानंतर योगा म्हणजे काय तर जुळणी आजच्या युगामध्ये त्याला कनेक्टिव्हिटी म्हणता येईल असे मत त्यांनी मांडले. ताडासन, वृक्षासन, वज्रासन ,ओमकार कसा योग्यरीत्या करायचा डोळ्यांची आसन हे कर्मचारी वर्गाला शिकवले.कार्यक्रमाचे आयोजन प्रा. प्रज्ञा बाविस्कर यांनी केले होते.

## रोटरी क्लब ऑफ गोदावरी लाईट तर्फे योगा दिवसा साजरा

जळगाव रोटरी क्लब ऑफ गोदावरी लाईटतर्फे अभिमान महादू वारके विद्यालयात योगा दिवस साजरा करण्यात आला !

यामध्ये योगा शिक्षिका कांचन यांनी विद्यार्थ्यांना व गावकरी पालकांना योगाभ्यास शिकविला यामध्ये त्यांनी योगाचे महत्त्व व करण्याची पद्धत योग्यरित्या समजावली. कार्यक्रमाचे आयोजन प्रा. प्राजक्ता पाटील, प्रा. प्रज्ञा बाविस्कर, भूमिका नाले प्रेसिडेंट, निधी पाटील सेक्रेटरी यांनी केले होते.

## फर्स्ट ट्रिबलिंग बॉल नॅशनल हेल्थ नाशिक स्पर्धेत गोदावरी स्कूलचे यश


**जळगाव–नाशिक येथे नुकत्याच पार पडलेल्या फर्स्ट ट्रिबलिंग बॉल नॅशनल हेल्थ स्पर्धेमध्ये गोदावरी इंग्लिश मीडियम सीबीएसई स्कूल, जळगावच्या विद्यार्थीनींनी उल्लेखनीय कामगिरी करत तृतीय क्रमांक पटकावला.**

या स्पर्धेत देशभरातून अनेक शाळांचे विद्यार्थी सहभागी झाले होते. उत्कृष्ट चपळता, एकाग्रता आणि खेळातील समर्पण या गुणवत्तेमुळे या विद्यार्थिनींनी स्पर्धेमध्ये सर्वांचे लक्ष वेधून घेतले. त्याच्या या यशामुळे शाळेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. शाळेच्या प्राचार्य सौ. नीलिमा चौधरी यांनी या यशाबद्दल अभिनंदन करत म्हटले, हा सन्मान फक्त विद्यार्थ्यांचाच नाही, तर संपूर्ण शाळेसाठी गौरवाची बाब आहे.



साप्ताहिक
RNI Regd. No.: MAHMAR/1999/7490
# गोदावरी परिवार
सवलतीचा पोष्ट रजि. नं. JAL/120/2024-2026

* वर्ष २६ वे * अंक २७ * सोमवार ०७/०७/२०२५ * डाक ०९/०७/२०२५ * पाने – ४ * किंमत २ रुपये
* year 26 * issue 27 * monday : 07 / 07 / 2025 * post Dt. 09/ 07 / 2025 * pages - 4 * price 2 Rs.




# नासोलेबियल सिस्ट असलेल्या महिलेवर यशस्वी शस्त्रक्रिया

## डॉ.उल्हास पाटील रूग्णालयातील नाक-कान-घसा तज्ज्ञांचे यश

**जळगाव – आठ ते दहा महिन्यांपासून गालावर सतत सूज आणि त्यातून होणाऱ्या वेदना, यामुळे त्रस्त झालेल्या ६० वर्षीय महिलेवर डॉ. उल्हास पाटील रूग्णालयात यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली. या शस्त्रक्रियेमुळे महिलेच्या त्रासाला पूर्णविराम मिळाला असून, रूग्णालयातील नाक–कान–घसा विभागातील तज्ज्ञ डॉक्टरांचे हे एक मोठे यश मानले जात आहे.**

एरंडोल तालुक्यातील ६० वर्षीय अमिनाबी या महिलेच्या उजव्या गालावर गेल्या अनेक महिन्यांपासून सूज निर्माण झाली होती. सुरुवातीला सूज सौम्य स्वरूपाची होती, परंतु हळूहळू त्याचे प्रमाण वाढू लागले. विशेष म्हणजे त्या सूजेमधून वेळोवेळी द्रवपदार्थ देखील बाहेर येऊ लागला होता. त्यामुळे रुग्ण मानसिक आणि शारीरिकदृष्ट्या खूपच अस्वस्थ झाली होती. स्थानिक उपचारांमधून काहीच फरक न पडल्यामुळे अखेर महिला रूग्ण डॉ. उल्हास पाटील रूग्णालयात दाखल केल्यानंतर नाक–कान–घसा विभागाचे प्रमुख डॉ. अनुश्री अग्रवाल यांनी तिची सखोल तपासणी केली. तपासणी दरम्यान तिच्या गालात नासोलेबियल सिस्ट असल्याचे निदान करण्यात आले.रुग्णाला उच्चरक्तदाब असल्याने हृदयाची तपासणी करून घेण्यात आली. महिलेची प्रकृती लक्षात घेता विभागप्रमुख डॉ. अनुश्री अग्रवाल यांनी त्वरित शस्त्रक्रियेसाठी तयारी सुरू केली. अनुभवी शल्यचिकित्सकांच्या पथकाने दक्षतेने शस्त्रक्रिया पार पाडली.


रुग्णासमवेत तज्ञ डॉक्टर आणि त्यांची टीम छायाचित्रात दिसत आहे. (छायाचित्र : नितीन नेवे)

शस्त्रक्रियेच्या वेळी गालामधील सिस्ट पूर्णपणे काढून टाकण्यात आला. विशेष म्हणजे ही सर्जरी अत्यंत कमी रक्तस्रावासह आणि अल्प कालावधीत पार पडली. शस्त्रक्रियेनंतर काही तासांतच रुग्णाने आरामदायक अनुभव व्यक्त केला आणि तिच्या चेहऱ्यावर पुन्हा हास्य फुलले.

**शस्त्रक्रियेसाठी सहकार्य**

**डॉ. पंकजा बेंडाळे, डॉ. सृष्टी पाटील, डॉ. जान्हवी बनकर, डॉ. सायकत बासू, डॉ. डॉ. अंकीता सोलंकी, डॉ. पंकज शर्मा, डॉ. शुभम सावरकर यांनी सहकार्य केले.**

**नासोलेबियल सिस्ट म्हणजे काय?**

नासोलेबियल सिस्ट हा एक दुर्मिळ स्वरूपाचा सौम्य गाठ असतो, जो नाक आणि गालाच्या सांध्याच्या मधल्या भागात तयार होतो. हा गाठ सौम्य असला तरी तो वेळोवेळी संसर्ग होऊन त्रासदायक ठरू शकतो. विशेषतः वृद्ध वयोगटातील महिलांमध्ये हा आजार अधिक प्रमाणात दिसून येतो. या गाठेमुळे चेहऱ्याच्या सौंदर्यावर परिणाम होतो, तसेच सतत द्रवपदार्थ बाहेर पडल्यामुळे संसर्ग वाढण्याचा धोका असतो.

**ही सिस्ट रुग्णाच्या दैनंदिन जीवनात अडथळा निर्माण करत होती. वेळेत निदान आणि योग्य उपचार झाल्यामुळे रुग्ण पूर्णपणे ठणठणीत झाली आहे. नासोलेबियल सिस्ट हे एक दुर्मिळ आणि गुंतागुंतीचे प्रकरण असते, परंतु आमच्या रूग्णालयातील तांत्रिक सुविधा आणि तज्ज्ञ डॉक्टरांच्या अनुभवामुळे ही सर्जरी यशस्वी झाली.**


–डॉ.अनुश्री अग्रवाल
विभागप्रमुख

# गर्भपिशवीच्या शस्त्रक्रिया आता अल्पदरात

## महिलांसाठी आरोग्यसेवेतील महत्त्वाचा निर्णय

**जळगाव – महिलांच्या आरोग्यासाठी एक मोठा दिलासा देणारा निर्णय डॉ. उल्हास पाटील रूग्णालयाने घेतला असून दुर्बिणीद्वारे गर्भपीशवीची शस्त्रक्रिया आता फक्त १२,००० या अल्प दरात उपलब्ध करून देण्यात आली आहे.**



या शस्त्रक्रियेमध्ये खालील बाबींचा समावेश आहे गर्भाशय व अंडाशयाच्या गाठी गर्भाशयाची सूज कुटुंब नियोजनासाठी आवश्यक शस्त्रक्रियाया शस्त्रक्रिया दुर्बिणीद्वारे (लॅप्रोस्कोपिक तंत्रज्ञान) करण्यात येतात, त्यामुळे रुग्णास लवकर बरे वाटते, जखम लहान असते आणि रुग्णालयात कमी वेळ राहावे लागते.

तज्ज्ञ डॉक्टरांकडून उपचार:या शस्त्रक्रियेसाठी अनुभवी व तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन लाभणार आहे. याचबरोबर सुसज्ज असा वार्ड व अत्याधुनिक ऑपरेशन थिएटरची व्यवस्था देखिल करण्यात आली आहे.

**डॉ. हर्सिया पिल्लई** ८१६९२४०५२६ या क्रमांकवर संपर्क साधावा असे आवाहन रूग्णालय प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

# डॉ.उल्हास पाटील रूग्णालयात सुसज्ज एनआयसीयू विभाग

## नवजात शिशुंच्या आरोग्यासाठी अत्याधुनिक सुविधा

**जळगाव – जिल्ह्यातील अग्रगण्य वैद्यकीय सेवा पुरवणाऱ्या डॉ. उल्हास पाटील रूग्णालयात अत्याधुनिक नवजात अतिदक्षता विभाग (एनआयसीयू) कार्यरत आहे. या विभागात नवजात शिशुंच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान आणि अनुभवसंपन्न वैद्यकीय कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत.**



जिल्ह्यातील ग्रामीण तसेच शहरी भागातील बाळंतिणी आणि त्यांच्या नवजात शिशुंसाठी ही सुविधा वरदान ठरत आहे. २४ तास वरिष्ठ डॉक्टरांची उपलब्धता हे या विभागाचे खास वैशिष्ट्य आहे. नवजात शिशुंच्या उपचारात तज्ज्ञता असलेल्या डॉक्टरांची रोटेशन पद्धतीने सेवा दिली जात असून, कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत तत्काळ वैद्यकीय मदत मिळते. या तज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीखाली उपचाराची प्रत्येक पायरी नियोजनबद्ध व वैज्ञानिक पद्धतीने राबवली जाते.एनआयसीयू विभागात कार्यरत असलेल्या प्रशिक्षित व अनुभवी परिचारिका नवजात शिशुंच्या निगराणीमध्ये विशेष दक्षता घेत आहेत. अत्यंत नाजूक अवस्थेतील बाळांना सुरक्षितपणे हाताळण्यासाठी त्यांना विशेष प्रशिक्षण देण्यात आले आहे. प्रत्येक बाळाचे तापमान, श्वसन, पोषण व सर्व आवश्यक आरोग्य निकष तपासले जातात.रुग्णालयाने विभागात सुसज्ज व्हेंटीलेटरची सुविधा उपलब्ध करून दिली असून, कमी वजनाचे, अपूर्ण वाढ झालेले किंवा श्वसनास त्रास असलेल्या बाळांसाठी ही सुविधा जीव वाचवणारी ठरत आहे. एनआयसीयूमध्ये प्रवेश करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांसाठी हँड हायजिन, प्रोटेक्टिव्ह गिअर वापरणे बंधनकारक असून, नियमित निर्जंतुकीकरण प्रक्रियेचे काटेकोर पालन केले जाते.

# वेदनाशामक औषधींचा नशा करणाऱ्या तरुणाला मिळाली अचूक दिशा

## डॉ. उल्हास पाटील रुग्णालयाच्या मानसोपचार तज्ज्ञांचे यश

**जळगाव : व्यसनाधीनतेच्या गर्तेत अडकलेल्या एका २४ वर्षीय तरुणाला डॉ. उल्हास पाटील रुग्णालयातील मानसोपचार तज्ज्ञांच्या सखोल उपचारांमुळे पुन्हा नवजीवन मिळाले आहे. या तरुणाचा प्रवास हा इतर अनेक तरुणांसाठी जागृतीचा संदेश बनला आहे.**

२४ वर्षीय नसीर हा तरुण मूळचा जळगाव जिल्ह्यातील असून काही काळापूर्वी बंगळुरू येथे नोकरीनिमित्त गेला होता. तिथे मित्रांच्या संगतीत त्याला मद्यपान, गांजा आणि धूम्रपानाची सवय लागली. या सवयींमुळे त्याचे शारीरिक आणि मानसिक आरोग्य ढासळू लागले. आर्थिक अडचणी आल्यावर आणि इतर नशेचे पर्याय कमी पडू लागल्यावर त्याने वेदनाशामक औषधींचे इंजेक्शनद्वारे सेवन सुरू केले. ही सवय पुढे गंभीर व्यसनात बदलली आणि त्याने आपल्या आयुष्याचा ताबाच गमावला.त्याच्या कुटुंबियांनी वेळेत हस्तक्षेप करत त्याला जळगावच्या डॉ. उल्हास पाटील रुग्णालयात दाखल केले. याठिकाणी मानसोपचार तज्ज्ञ डॉ. विलास चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. उमा चांदूरकर व मानसोपचार तज्ज्ञांच्या टीमने तपासणी करून या तरुणाला 'ओपीओइड व्यसन' असल्याचे निदान केले. ओपीओइड हे वेदनाशामक औषधांपासून व्यसननिर्माण करणारे घटक असून याचे व्यसन शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या अत्यंत धोकादायक असते.



**विशेष उपचार पद्धती**

**रुग्णालयातील मानसोपचार तज्ज्ञ डॉ. तज्ज्ञांचे नाव आणि त्यांच्या टीमने या तरुणासाठी विशेष उपचार पद्धती राबवली. औषधोपचार, समुपदेशन, समुपदेशनात्मक थेरपी आणि कुटुंबसमवेत संवाद अशा अनेक टप्प्यांमधून त्याचा उपचार करण्यात आला. तीन महिन्यांच्या उपचारानंतर आज तो तरुण व्यसनमुक्त झाला आहे.**

**तरुणाईमध्ये वाढत चाललेले वेदनाशामक औषधींचे सेवन हे चिंतेचा विषय आहे. वेळेवर उपचार घेतल्यास कोणतेही व्यसन सुटू शकते, हे या प्रकरणातून स्पष्ट झाले आहे. समाजाने या समस्येकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे.**


– डॉ.उमा चांदूरकर
मानसोपचार विभाग

## संपादकीय

# तंत्रज्ञान ओळखीची जबाबदारी

कृषी क्षेत्रात कृत्रि' बुद्धि'ता (एआय) चा वापर वाढवण्याच्या उद्देशाने राज्य सरकारने त्यासंदर्भातील धोरणास नुकतीच 'जुरी दिली. धोरणाच्या अं'लबजावणीसाठी पाचशे कोटींचा निधी 'जूर केला आहे. निर्णय स्वागतार्ह आणि कालसुसंगत देखील आहे. कारण आता कोणत्याही क्षेत्रात एआयचा वापर अपरिहार्य आहे. त्यासाठी असे धोरण आणि 'ार्गदर्शक पूरक ठरू शकेल. त्याचा वापर शेतीत ने'का कसा आणि कुठे कुठे करायचा याची दिशा युवा शेतकर्यांना ि'ळू शकेल. उदाहरणार्थ २०२१ 'ध्ये केंद्र सरकारने ड्रोन धोरण अस्तित्वात आणले. त्यानंतर अनेक क्षेत्रात ड्रोन भरार्या सुरु झाल्या. कृषी क्षेत्रात त्याची अनेक स्टार्टअप सुरु झाल्याचे आढळते. ड्रोन द्वारे खते 'वारणीचा व्यवसाय सुरु करून अनेक गृहिणी (सरकारच्या भाषेत ड्रोन दीदी) आत'निर्भर होताना आढळतात. तसाच बदल एआयच्या वापराबाबत घडू शकेल. बदलत्या हवा'ानाचा 'टका शेतीला जास्त बसतो. आतबट्ट्याची शेती नको अशी भावना 'ूळ धरत आहे. किरकोळ पगाराच्या नोकरीसाठी शेतकर्यांच्या 'ुलांची पावले त्याचे गाव सोडून शहराची वाट धरतात. या पार्श्वभू'ीवर शेतीत एआयचा वापर शाश्वत शेतीसाठी साहाय्यभूत ठरू शकेल. त्याचे अनेक 'ार्ग संशोधक आणि अभ्यासक दाखवतात. जसे की, 'ाती परीक्षण, पिकांचे व्यवस्थापन, तण नियंत्रण, खते 'वारणी, पाणीभरण इत्यादी इत्यादी. त्याचा वापर करून बघण्याचे का' शेतकर्यांना करावे लागेल. तो करण्यास त्यांनाही शिकावे लागेल. विशेषतः युवा शेतकर्यांकडून अपेक्षा आहेत. कारण ते तंत्रज्ञान स्नेही असतात. बदल स्वीकारण्याची क्ष'ता राखून असतात. सरकारी पातळीवर धोरणाची सखोलता जेव्हा ठरायची तेव्हा ठरेल. पण तोपर्यंत तंत्रज्ञानाच्या तांत्रिकतेत 'ारसे न जाताही काही शेतकरी तसे प्रयोग करू लागले आहेत ही आनंददायी बाब ठरावी. सातारा, सर्कलवाडी येथील एक शेतकरी डाळिंबाची शेती करतात. ती अधिक 'लदायी होण्यासाठी त्यांनी एआयचा वापर सुरु केला आहे. त्या'ुळे अनेक का' सोपी होऊ शकतील अशी अपेक्षा ते व्यक्त करतात. विविध पातळ्यांवर असे प्रयोग होणे हा 'हत्वाचा टप्पा आहे. प्रयोग झाले तर अभ्यास होईल. त्याचे निष्कर्ष लक्षात येतील. चुकांचा 'ागोवा घेतला जाऊ शकेल. तंत्रज्ञानाच्या अचूक वापरासाठी ही प्रकीया आवश्यकच असते. त्याचे 'ायदे अनुभवास यायला लागले की सेंद्रिय शेती, पशुधन, शेतीपूरक उद्योगात वापराची प्रेरणा ि'ळू शकेल. शेती व्यवस्थापनावरचा ताण क'ी होऊ शकेल. अर्थात त्यासाठीची 'ानसिकता बदल, कौशल्य विकास आणि तंत्रज्ञानाची गरजेपुरती का होईना पण तोंडओळख करून घेणे ही शेतकर्यांची पण जबाबदारी आहे.

# यांत्रिक अभियांत्रिकीतील करिअर संधी: नाविन्य आणि प्रगतीचा प्रवास

**यांत्रिक अभियांत्रिकी ही अभियांत्रिकी क्षेत्रातील एक मूलभूत आणि सदैव प्रासंगिक ठरणारी शाखा आहे. ही शाखा मानवी जीवनाशी अतिशय जवळून संबंधित असून, कोणत्याही देशाच्या औद्योगिक विकासाचे, तंत्रज्ञानाच्या प्रगतीचे आणि आर्थिक उन्नतीचे गमक तिच्यात दडलेले असते. भौतिकशास्त्र, गणित, थर्मोडायनॅमिक्स, फ्लूइड मॅकेनिक्स, पदार्थ विज्ञान आणि इतर तांत्रिक संकल्पनांचा वापर करून यंत्रणा डिझाइन करणे, त्यांचे विश्लेषण करणे, उत्पादन करणे आणि योग्य देखभाल करणे हे यांत्रिक अभियंत्यांचे मुख्य कार्य असते. ही शाखा इतकी व्यापक आहे की ती केवळ उद्योग–कारखान्यांपुरती मर्यादित न राहता, ऊर्जा, आरोग्य, संरक्षण, अंतराळ, पर्यावरण, शेती, रोबोटिक्स आणि ऑटोमेशन यांसारख्या विविध क्षेत्रांमध्ये सखोल योगदान देते. त्यामुळे विद्यार्थ्यांसाठी यामध्ये असंख्य करिअर संधी**



**उ**

**पलब्ध होत आहेत.**

आजच्या आधुनिक युगात यांत्रिक अभियांत्रिकीचे महत्त्व अधिकच वाढले आहे. ऑटोमोबाईल उद्योग हे एक उत्तम उदाहरण आहे, जिथे अभियंते पारंपरिक वाहनांचे कार्यक्षमता वाढवण्यापासून ते इलेक्ट्रिक, हायब्रीड व स्वयंचलित वाहनांच्या डिझाईनपर्यंत कार्यरत आहेत. या तंत्रज्ञानामुळे इंधन बचत, पर्यावरण संरक्षण आणि वाहतुकीतील सुलभता यास हातभार लागतो. अंतराळ आणि संरक्षण क्षेत्रातही यांत्रिक अभियंते विमान, क्षेपणास्त्रे, उपग्रह आणि अवकाशयानांची रचना व विकास करतात. उत्पादन उद्योगात ते उत्पादन प्रक्रिया सुधारण्याचे, ऑटोमेशन प्रणालींचे नियोजन करण्याचे आणि गुणवत्ता नियंत्रण सुनिश्चित करण्याचे काम करतात. ऊर्जेच्या क्षेत्रात सौर, पवन आणि अणुऊर्जा यासारख्या पर्यायी व नवीकरणीय स्रोतांचा अभ्यास करून शाश्वत ऊर्जास्रोत निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो. त्याचप्रमाणे, वैद्यकीय क्षेत्रातही यांत्रिक अभियंते कृत्रिम अवयव, वैद्यकीय रोबोट्स, इम्प्लांट्स आणि उपकरणे तयार करून आरोग्यसेवेत क्रांती घडवून आणत आहेत.

यांत्रिक अभियांत्रिकीचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर, विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या तांत्रिक भूमिकांमध्ये काम करण्याची संधी असते. डिझाईन अभियंता म्हणून ते CAD सॉफ्टवेअरच्या साहाय्याने यंत्रणा व यंत्रांचे डिझाईन करतात. उत्पादन अभियंता म्हणून ते कारखान्यांतील उत्पादन प्रक्रियेची कार्यक्षमता, खर्च व वेळेचे व्यवस्थापन आणि गुणवत्ता नियंत्रण पाहतात. देखभाल अभियंता म्हणून यंत्रसामग्रीचे नियमित निरीक्षण, देखभाल आणि कार्यक्षम कार्य सुनिश्चित करणे त्यांचे मुख्य कर्तव्य असते. याशिवाय, गुणवत्ता नियंत्रण अभियंता, रोबोटिक्स अभियंता, ऊर्जा अभियंता, प्रोजेक्ट मॅनेजर, आणि संशोधन व विकास अभियंता म्हणूनही करिअरच्या संधी उपलब्ध आहेत. सरकारी क्षेत्रातही रेल्वे, संरक्षण संशोधन संस्था (DRDO), सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम (PSUs), इसरो, बीएआरसी, एमएसईबी यासारख्या संस्था यांत्रिक अभियंत्यांना भरपूर संधी देतात.

उच्च शिक्षणाच्या संधींमध्ये M.Tech, M.E., M.S. यांसारखे पदव्युत्तर अभ्यासक्रम असून, यामध्ये थर्मल, डिझाईन, मॅन्युफॅक्चरिंग, रोबोटिक्स, मेकाट्रॉनिक्स, ऊर्जा प्रणाली, नवीकरणीय ऊर्जा, ऑटोमोबाईल इंजिनिअरिंग या शाखांमध्ये विशेषता घेता येते. तसेच, ऑपरेशन्स किंवा इंडस्ट्रियल मॅनेजमेंटमध्ये MBA केल्यास व्यवस्थापन क्षेत्रात देखील करिअर घडवता येते. याव्यतिरिक्त, विद्यार्थ्यांनी आधुनिक औद्योगिक गरजेनुसार विविध प्रमाणपत्र अभ्यासक्रम करणे आवश्यक आहे, उदा. CAD (Computer Aided Design), CFD (Computational Fluid Dynamics), FEA (Finite Element Analysis), CNC Programming, 3D Printing, IoT (Internet of Things), Artificial Intelligence आणि Data Analytics. हे कौशल्ये विद्यार्थ्यांना जागतिक औद्योगिक क्षेत्रात स्पर्धात्मक ठरवतात.

तांत्रिक जगात सध्या काही महत्त्वाचे ट्रेंड उदयास आले आहेत. उत्पादन प्रक्रियांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) व मशीन लर्निंगचा वापर झपाट्याने वाढत आहे. 3D प्रिंटिंगचा वापर करून जलद आणि किफायतशीर उत्पादन शक्य झाले आहे. स्मार्ट उत्पादने आणि औद्योगिक उपकरणे आता खेढ च्या साहाय्याने इंटरनेटद्वारे नियंत्रित करता येतात. नॅनोतंत्रज्ञानामुळे अधिक मजबूत, टिकाऊ व हलकी उत्पादने तयार होतात. पर्यावरणपूरकता आणि शाश्वत विकास लक्षात घेता, हरित तंत्रज्ञान, कार्बन उत्सर्जन कमी करणारे तंत्र, आणि स्वच्छ ऊर्जा प्रणाली या सुद्धा यांत्रिकी क्षेत्रात महत्त्वाचे विषय ठरत आहेत.

एकूणच पाहता, यांत्रिक अभियांत्रिकी ही केवळ पारंपरिक नोकरीपुरती मर्यादित नसून, ती संशोधन, नवोन्मेष, आणि समाज उपयोगी तंत्रज्ञान निर्मितीचा एक प्रभावी मंच बनली आहे. देश आणि जगभरातील विविध क्षेत्रांमध्ये तांत्रिक कौशल्याची, नवकल्पनांची आणि समस्यांचे वैज्ञानिक निराकरण करण्याच्या क्षमतेची मोठी गरज आहे. त्यामुळे, यांत्रिक अभियांत्रिकीमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी स्वतःला सतत अद्ययावत ठेवत, नवकल्पना विकसित करून, उद्याच्या भारतासाठी आणि जगासाठी तांत्रिक नेतृत्व करणारे अभियंते बनण्याचा प्रयत्न करावा.

जर तुम्हाला यंत्रसामग्रीची रचना, नवकल्पना, आणि प्रत्यक्षात काहीतरी घडवून आणण्याची उत्सुकता असेल, तर यांत्रिक अभियांत्रिकी हे क्षेत्र निश्चितच तुमच्यासाठी योग्य पर्याय आहे.



**प्रा. तुषार कोळी**
विभाग प्रमुख यंत्र अभियांत्रिकी
गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालय जळगाव

# डॉ.एन.एस. आर्वीकर सरांचा वाढदिवस व सेवानिवृत्ती



डॉ उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय जळगाव येथे डॉ. एन एस आर्विकर अधिष्ठाता या पदावरती १७ वर्षे पासून कार्यरत आहे. सुरूवातीला महाविद्यालयाच्या उभारणीत संस्थाध्यक्ष माजी खा.डॉ.उल्हास पाटील यांच्यासोबत अनुभव, जिद्द, चिकाटी व वेळेनुसार करावयाचे कार्य गुणांमूळे त्यांचा मोलाचा वाटा होता. या कठीण प्रसंगी वेगवेगळ्या विभागांची उभारणी,लागणारी यंत्रसामग्री,साहित्य वर्गवारी करून वितरित करणे लागणारी उपकरणे, औषध पुरवठा, मनुष्यबळ इ विचार अतिशय योग्य केला. मेडिकल कौन्सिल ऑफ इंडिया म्हणजे सध्याची नॅशनल मेडिकल कौन्सिल, दिल्ली यांच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार महाविद्यालय व रुग्णालयाची उभारणी हे अतिशय किचकट काम त्यांच्या मार्गदर्शनाखाली पुर्ण झाले.

मी पाच डिसेंबर २०१२ ला या संस्थेमध्ये रुजू झालो. पहिल्याच भेटीत त्यांच्या मध्ये असलेला एक सच्चा शिक्षक, एक तज्ञ डॉक्टर व माणुसकीचा गुणधर्म मला दिसला. त्यांच्या बरोबर काम करताना बऱ्याच समीती, सांस्कृतिक असो वा इतर कुठलेही काम जेव्हा सांगितलं तेव्हा मन लावून करायचं आणि त्यांनाही आवडायचं, काही चुकत असेल बोलून सांगायचे की हे असं करायला पाहिजे त्यांचे समजावून सांगणं व समजून घेणे हे वाखाण्याजोग आहे. माझ्यासारख्या जुनिअर माणसालाही प्रेमाने, आपुलकीने केलेले मार्गदर्शन उत्साह निर्माण करायचे. पदावरती असतानाही कामाच्या व्यापातून विद्यार्थ्यांचं क्लीनिकल पोस्टिंग घेत अतिशय सोप्या, सरळ साध्या समजणाऱ्या भाषेत विद्यार्थ्यांना शिकवायचे त्यामूळे क्लिनिकल पोस्टिंग व लेक्चर्सला विदयार्थी आवडीने उपस्थित राहायचे. त्यांच्यातील सच्चा शिक्षक त्यांना स्थिर बसू देत नव्हता त्याचा प्रदीर्घ अनुभव हा विद्यार्थ्यांचा लाभाचाच विषय ठरला. गायन, वादन, संभाषण कौशल्य महान व्यक्तीबद्दल पुरेपूर पुस्तक वाचन करून अगदी थोडक्यामध्ये प्रभावीपणे मांडण्याचा हातखंडा मुळे वकृत्वही प्रभावी आहे.

वयाची ७० वर्ष २९ जूनला पूर्ण झाली आहे. तरीही सेवानिवृत्ती हा शब्द त्यांना आवडत नाही कारण ते कामावरती विश्वास ठेवतात.त्यांच्यातील या गुणांमूळे काही काळ वैद्यकिय संचालक म्हणूनही त्यांनी आजपर्यंत काम पाहीले.त्यांचे सामाजिक कार्य खूप मोठं आहे, रोटरी क्लब, गायन संस्था व त्यांच्या नेत्ररोग या विषयाच्या विविध संस्थांमध्ये ते मार्गदर्शक म्हणून आहेत. महा कुंभमेळ्यातील भाविकांची सेवा करण्याची संधी उपलब्ध झाली त्यांच्या पत्नी डॉक्टर माया आर्वीकर यांच्यासोबत ते कुंभ मध्ये सहभागी झाले होते या महाविद्यालयाच्या नॅशनल असेसमेंट अँड ॲक्रिडेशन कौन्सिल मूल्यांकन प्रक्रियेत माझ्याकडे समन्वयक पदाची जबाबदारी दिली मी लगेच होय म्हटलं व कामाला लागलो. या प्रक्रियेमध्ये मला समजलंच नाही तीन ते चार महिने कसे निघून गेले, एवढा कामाचा व्याप ,एवढ्या कठीण प्रसंग पण,तो एकदम सरळ करण्यासाठी माझे पाठीशी डॉ आर्वीकर उभे असायचे आणि त्यांच्या मार्गदर्शनाखाली आम्हाला त्या प्रक्रियेमध्ये काम करता आलं. त्यांच्या अनुभवाचा संस्थेला, विद्यार्थ्यांना, समाजाला व मला खूप फायदा झाला आणि त्यांचा स्नेह मी वैयक्तिक अनुभवलेला आहे. अशा अष्टपैलू व्यक्तिमत्वा बद्दल लिहावं तेवढं कमीच आहे. तरी पण ते जरी सेवानिवृत्त झाले असेलही, तरी ते संस्थेला मार्गदर्शन करणारच आहेत.आदरणीय डॉ एन एस आर्वीकर यांना वाढदिवसा निमीत्त उत्तम आरोग्य व आनंददायी जीवन यासाठी खूप खूप शुभेच्छा.

**– डॉ. बापूराव बिटे**
**सहयोगी प्राध्यापक**
**फॉर्मोकॉलॉजी**



# कमी खर्चात उत्पादन उपाययोजना

प्रमुख खरीप पिकांमध्ये सोयाबीन, तूर व मका या पिकांच्या उत्पादन खर्चात (उत्पादनावर परिणाम न करता) कपात करण्याच्या दृष्टीने शेतक–यांना मार्गदर्शन हे आवश्यक आहे. बियाणे , रासायनिक खते व किडनाशके यावेळी खर्च व पिकांच्या पुर्वमशागतीपासुन काढणी वर मजुरीवर होणारा खर्च ही प्रामुख्याने शेती उत्पादन खर्च वाढण्याची कारणे असल्याचे समझतें तसेच हवामानामुळे पाऊस कमी झाल्याने किंवा वेळेवर न पडल्याने निर्माण होणा–या टंचाईस्थितीचा कोरड वाहू पिकांवर विपरीत परिणाम होत आहे शेतीतील ख़र्च वाढत आहे त्यासाठी उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करणे गरजेचे आहे.

पिकांचा उत्पादन खर्च कमी करण्यासाठी सध्याच्या पध्दतीमध्ये काही बदल करणे आवश्यक आहे. यास्तव शेतक–यांनी खालीलप्रमाणे उत्पादन खर्च कमी करण्याच्या सर्वसाधारण उपाययोजना आणि पिकनिहाय तंत्रज्ञानाचा अवलंब करावा. याशिवाय कृषि तज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार आणि प्रगतशिल शेतक–यांच्या अनुभवानुसार उत्पादन खर्च कमी करण्याच्या उपाययोजनांचा अवलंब करता येईल. खर्च कमी करण्याच्यादृष्टीने काही उपाययोजना

**१) बियाणे, खते व किडनाशकावरील खर्च कमी करण्यासाठी उपाययोजना...**

अ) बियाणे

जे काही संकरित वाण आहेत ते वगळता सुधारित वाणांचे प्रमाणित बियाणे दरवर्षी नव्याने खरेदी न करता ३ ते ४ वर्षांपर्यंत वापरावे. जेणेकरुन् ख़र्च कमी होईल..

ज्या काही उत्पादक कंपन्यां आहेत त्या मार्फत बिजोत्पादन कार्यक्रम राबवावा.

बियाण्यांची बचत होईल अशा लागवड पध्दतीचा अवलंब करावा. उदा. तेलबिया व कडधान्यासाठी बीबीएफ (BBF BROD BED FURROW) यंत्राव्दारे लागवड करावी.

ब) रासायनिक खते

जमीन आरोग्य पत्र तपास करुन रासायनिक खतांचा वापर करावा.

शेतातील वाया जाणा–या काडच्या कच–यापासुन सेंद्रिय खत तयार करुन वापरावे. उदा. कंपोस्ट, नाडेप, गांडुळ खत,

तेलबिया पिकांमध्ये जैविक खतांचा (पावडर व द्रवरुप) वापर केल्यास रासायनिक खतावरील खर्चात बचत होते. तुर व हरभरा पिकांवर फुलोरा व शेंगा भरण्याच्या अवस्थेत २ टक्के युरियाचे द्रावण फवारावे. पिकांच्या पोषणासाठी कमी खर्चात शेतावर तयार करून वापरावे.

ठिबक सिंचनाची व्यवस्था असलेल्या ठिकाणी पाण्यात विरघळणा–या तसेच द्रवरुप खतांचा वापर करावा

क) किडनाशके .

केडिरोग सर्व्हेक्षणाच्या आधारे दिलेल्या सल्ल्यानुसारच किडनाशकांचा वापर करावा.

जमिनीतुन पसरणा–या रोगांच्या नियंत्रणासाठी जैविक किंवा रासायनिक किडनाशकांची बीजप्रक्रिया करावी.

बिजप्रक्रियेसाठी शेतावर तयार करता येईल अशा सेंद्रिय पदार्थाचा वापर करावा.उदा. बीजामृत (शेण + गोमुत्र+ माती + ट्रायकोडर्मा) इ.

तूरीवरील शेंगा पोखरणारी अळी, हरभ–यावरील घाटे अळी व कापसावरील रस शोषणा–या किडी व बोंडअळीच्या नियंत्रणासाठी घरच्याघरी तयार केलेल्या ५ टक्के निंबोळी अकांची फवारणी फुलकळी अवस्थेमध्ये करावी. मजुरीवरील खर्च कमी करण्यासाठी उपाययोजना...

यांत्रिकीकरणाच्या अवलंबामुळे मजुरीवरील ५० टक्के खर्च कमी होतो आणि पिकाच्या उत्पादनात वाढ होते.

पिकांच्या पुर्वमशागतीपासुन ते काढणी व मळणीपर्यंतच्या प्रत्येक कामासाठी उपलब्ध असलेल्या सुधारित कृषि अवजारांचा व यंत्रांचा वापर करावा.

यांत्रिकीकरणाचा खर्च कमी करण्यासाठी भाडेतत्वावर अवजारे देण्याच्या सुविधा केंद्राची मदत घ्यावी.

तणनियंत्रणासाठी रासायनिक तणनाशकांचा वापर करावा.

आंतरमशागतीच्या सर्व कामांसाठी व फवारणीसाठी पॉवरटिलरचा वापर करावा. भात, ऊस, कांदा, बटाटा सोया तुर याचे पेरणी यन्त्रे उपलब्ध असुन त्यांचा वापर केल्यास मजुरीमध्ये ८० टक्के बचत होते...

**प्रा.संदिप पुरुषोत्तम पाऊलझगडे**
(सहाय्यक प्राध्यापक)
मृदा व जलसंधारण अभियांत्रिकी विभाग,
डॉ. उल्हास पाटील कृषी अभि. व तंत्रज्ञान

**डॉ. पुनमचंद रुपचंद सपकाळे**
( प्राचार्य )
डॉ. उल्हास पाटील कृषी अभियांत्रिकी व
तंत्रज्ञान महाविद्यालय, जळगाव

Editor : Sourabh Patil (Reg. Newspaper) Weekly Godavari Parivar : Owner, Publisher, Printer : Dr. Mrs. Varsha Patil printed at Subhash Printers, 38, Trimbak Nagar, Near Shakuntala Rane Primary School, Beside Narayani Park Apartment, Mahabal Area, Jalgaon 425002 (Mah.) Godavari Hospital, Released at Jalgaon, Near Bhaskar Market. Phone no. 2221834/35, & Posted from Jalgaon Main Post Office. Should be sent to this email for publication of news in the issue (Editors do not necessarily agree with the views published in the issue.)

संपादक : सौरभ पाटील (रजि. न्युजपेपर) साप्ताहिक गोदावरी परिवार : मालक, प्रकाशक, मुद्रक : डॉ. सौ. वर्षा पाटील यांनी सुभाष प्रिंटर्स, ३८, त्र्यंबक नगर, शकुंतला राणे प्रायमरी स्कूलजवळ, नारायणी पार्क अपार्टमेंट शेजारी, महाबळ एरिया, जळगांव ४२५००२ (महा.) येथे छापून गोदावरी हॉस्पीटल, भास्कर मार्केट जवळ, जळगांव फोन नं. २२२१८३४/३५ येथे प्रसिद्ध करुन जळगाव मुख्य डाक कार्यालय येथून निर्गमित केले. अंकात बातम्या प्रसिध्द करण्यासाठी या ईमेलवर पाठवाव्यात. Email : godavari.parivar@gmail.com (अंकात प्रकाशित झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

# मॉक पार्लियामेंटमधून युवा नेत्या डॉ.केतकीताईनी युवकांना राजकारणात येण्याची घातली साद

**जळगाव – आपत्कालीन स्थितीच्या ५० व्या वर्धापन दिनानिमित्त भारतीय जनता युवा मोर्चा, महाराष्ट्र आयोजित मॉक पार्लियामेंट या विषयावरील वादविवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या माध्यमातून युवा नेत्या डॉ. केतकीताई यांनी युवकांना राजकारणात येण्याची साद घातली.**

नुकतीच भाजयुमोने आपात्कालीन स्थीतीच्या ५० व्या वर्धापन दिनानिमीत्त मॉक पार्लियामेंटचे आयोजन केले होते. या विविध महाविद्यालयाच्या ६० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. या वेळी १९७५ ते १९७७ कालखंड पुन्हा उभा करण्यात आला होता, जिथे भाजप सत्ताधारी पक्ष आणि कॉंग्रेस विरोधी पक्ष होता.हा कार्यक्रम भारतीय संविधानावर आधारित संसद सत्राच्या स्वरूपात आयोजित केला गेला




होता. प्रत्येक सहभागीला ९० सेकंदांचा वेळ दिला गेला होता आपले विचार मांडण्यासाठी. इतर स्पर्धकांच्या मतांवर शंका व्यक्त करायची असल्यास, सहभागींना आपला क्रमांक असलेली बॅच उचलून प्रश्न विचारण्याची संधी मिळाली.

एकूण दोन सत्रांमध्ये ही प्रक्रिया पार पडली.कार्यक्रमाचे उद्घाटन आ. सुरेश भोळे यांच्या हस्ते झाले. विशेष अतिथी म्हणून विश्वास कुलकर्णी आपत्कालीन काळात कारावास भोगलेले प्रत्यक्षदर्शी मा. विश्वास कुलकर्णी उपस्थीत होते. त्या अनुभवाविषयी त्यांनी विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधला. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी युवा नेत्या डॉ. केतकीताई यांनी पुढाकार घेत मार्गदर्शकाची भूमिकेत युवकांना या माध्यमातून व्यासपिठ उपलब्ध करून देत राजकारणात येण्याची साद घातली.

## गोदावरी सीबीएसईच्या कुळकर्णी भगीनीचे कथ्थक परिक्षेत यश

**जळगाव – गोदावरी सीबीएसई स्कुलची इ ९ व इ १० वी त असणाऱ्या लावण्या व कनिष्का कुळकर्णी भगीनींनी नुकतीच कथ्थक प्रथम परिक्षा विशेष प्राविण्यासह उर्त्तीण होत यश प्राप्त केले आहे.**

त्यांना कथ्थक गुरू नूपूर नृत्यालयाच्या नूपूर चांदोरकर खटावकर यांचे मार्गदर्शन लाभले तसेच हार्मोनियम भुषण खैरनार व राहूल कासार तबल्यावर साथसंगत दिली . विशेष म्हणजे इ १०वी ची महत्वाची परिक्षा असून कनिष्काने एकही दिवस क्लास न बुडवता आपला कथ्थक रियाज सूरू ठेवला. नुकतीच तीने १० वीची परिक्षा देखिल ७२ टक्के मिळवत उर्त्तीण झाली आहे. तिच्या या दुहेरी यशाबददल गोदावरी फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. उल्हास पाटील डॉ. वर्षा पाटील (सचिव), डॉ. केतकी पाटील (सदस्य), डॉ. वैभव पाटील (डीएम कार्डिओलॉजिस्ट) व डॉ. अनिकेत पाटील, प्राचार्य निलीमा चौधरी, शिक्षकांनी अभिनंदन केले व पुढील प्रवासासाठी शुभेच्छा व्यक्त केल्यात.



## महर्षी कालिदास जयंती उत्साहात साजरी

**जळगाव – गोदावरी फाउंडेशन संचलित डॉ. गुणवंतराव सरोदे आयुर्वेद मेडिकल कॉलेज, हॉस्पिटल आणि रिसर्च सेंटर, जळगाव येथे महर्षी कालिदास जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या निमित्ताने पुढील आठ दिवस संस्कृत भाषा सप्ताह साजरा केला जाणार असून,सांस्कृतिक, शैक्षणिक आणि भाषिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.**




कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी डॉ उल्हास पाटील मेडिकल कॉलेजचे डायरेक्टर डॉ. आर्विकर सर यांनी संस्कृत भाषेचे महत्त्व, तिचे वैज्ञानिक दृष्टिकोन आणि आधुनिक काळातील उपयोग यावर सखोल विचार मांडले. त्यांनी संस्कृत ही केवळ प्राचीन भाषा नसून ज्ञान, चिकित्सा आणि अध्यात्म यांची समृद्ध परंपरा असल्याचे अधोरेखित केले.या वेळी कॉलेजचे डीन डॉ. हर्षल बोरोले सर यांनी विद्यार्थ्यांना संस्कृत भाषेचा अभ्यास करावा, तिचा उपयोग वैद्यकीय आणि शैक्षणिक क्षेत्रात कसा करता येईल यावर मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना आवाहन केले की, या आठवड्याच्या उपक्रमात सक्रीय सहभाग घ्यावा.

कार्यक्रमात महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी, प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी मोठ्या उत्साहात सहभाग नोंदवला. जयंती निमित्त विद्यार्थ्यांनी संस्कृत श्लोक पठण, नाटच सादरीकरण आणि कालिदासांच्या साहित्यावर आधारित सादरीकरण केले.या संस्कृत सप्ताहाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संस्कृती, भाषा आणि परंपरेबद्दल नवीन जाणिवा निर्माण होण्यास मदत होणार आहे.

### गोदावरी नर्सिंग कॉलेजमध्ये
## हस्तकला कौशल्यावर चर्चासत्र; ग्रामीण कलेला मिळतेय नवी दिशा

**जळगाव – गोदावरी नर्सिंग कॉलेज, जळगाव येथे ग्रामीण कौशल्यांना प्रोत्साहन देण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या हस्तकला कौशल्य सत्राचे आयोजन करण्यात आले होते. या सत्रात विद्यार्थिनींनी मोठा सहभाग नोंदवला.**



मोराड, तालुका जामनेर गावातील अरुण आनंदा पाटील यांनी पारंपरिक हस्तकलेतील आपले अनुभव, ज्ञान व कलामुने विद्यार्थ्यांसमोर सादर केले. त्यांनी काचेच्या बाटलीमध्ये शेती उपयोगी नांगर, वखर, खाट विणकाम, रळी, बॉल आदींचे सजीव प्रात्यक्षिक सादर केले. अनेक विद्यार्थिनींनी प्रथमच पारंपरिक ग्रामीण हस्तकलेचे प्रत्यक्ष दर्शन घेतल्यामुळे त्यांच्यात या क्षेत्राविषयी नवीन उत्सुकता निर्माण झाली.

सत्रानंतर प्रशासकीय अधिकारी श्री. प्रवीण कोल्हे यांच्या हस्ते अरुण पाटील यांना औपचारिक प्रोत्साहन पत्र प्रदान करण्यात आले. गोदावरी नर्सिंग कॉलेजने नेहमीच विद्यार्थिनींच्या सर्वांगीण विकासासाठी उपक्रमशीलता दाखवली आहे. फक्त वैद्यकीय शिक्षणापुरते न मर्यादित राहता, संस्थेने सामाजिक, आर्थिक व कौशल्याधारित उपक्रमांवर भर दिला आहे. कार्यक्रमास प्रा. मनोरमा कश्यप, प्रा. पियुष वाघ, इतर प्राध्यापकवर्ग, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन कौशल्य विकास व विद्यार्थी कल्याण विभाग यांच्या वतीने करण्यात आले.सत्राचा समारोप विद्यार्थिनींनी सादर केलेल्या हस्तकलेच्या लघु प्रात्यक्षिकांद्वारे करण्यात आला. अरुण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबवण्यात आला.



**डॉ. प्रेमचंद पंडित**
(९४२२९१५३७९)
(निवृत्त सिव्हील सर्जन, बुलडाणा)
वैद्यकीय अधीक्षक
डॉ.उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय, जळगाव

प्रेम वाणी

1. The greatest miracle of your success is that you found the strength and courage to begin, day in and day out.
2. Ask yourself what is really important and then have the courage to build your life around your answers.
3. Make sure the path you decide to walk aligns with your own intuition and desires.
4. Change happens only when what you know changes how you live on a daily basis.
5. Be the person you know yourself to be — the best version of you — on your terms.
6. Finding your way is about seeing familiar ground in a new way.
7. Search your soul for the truth, so that you truly know who you are.

१. आपकी सफलता का सबसे बड़ा चमत्कार यह है कि आपने हर दिन की शुरुआत करने की ताकत और साहस पाया।
२. खुद से पूछिए कि वास्तव में क्या महत्वपूर्ण है, और फिर इतना साहस रखें कि आप अपने जीवन को उन्हीं उत्तरों के आधार पर बना सकें।
३. यह सुनिश्चित करें कि जिस रास्ते पर आप चलने का निर्णय लें, वह आपके अपने अंतर्ज्ञान और इच्छाओं से मेल खाता हो।
४. परिवर्तन तभी होता है जब जो आप जानते हैं, वह आपके दैनिक जीवन जीने के तरीके को बदल दे।
५. वह व्यक्ति बनिए जिसे आप जानते हैं कि आप वास्तव में हैं – अपनी शर्तों पर अपने सबसे अच्छे रूप में।
६. अपना रास्ता खोजना, परिचित जमीन को एक नए नजरिए से देखने के बारे में है।
७. अपने आत्मा की गहराइयों में जाकर सत्य को खोजिए, ताकि आप सच में जान सकें कि आप कौन हैं।

## राज्याचे नवनियुक्त मुख्य सचिव राजेश कुमार यांनी स्वीकारला पदभार

**जळगाव – राज्याचे नवनियुक्त मुख्य सचिव राजेश कुमार यांनी आज मावळत्या मुख्य सचिव सुजाता सौनिक यांच्याकडून पदभार स्वीकारला.**

राज्याच्या मुख्य सचिवपदी शासनाने महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव राजेश कुमार यांची नियुक्ती केली आहे. मंत्रालयातील मुख्य सचिवांच्या दालनात मावळत्या मुख्य सचिव सुजाता सौनिक यांच्याकडून त्यांनी ४९ वे मुख्य सचिव म्हणून पदभार स्वीकारला.

मुख्य सचिव राजेश कुमार यांचा अल्पपरिचय आणि त्यांनी आतापर्यंत भूषविलेली पदे :मुख्य सचिव राजेश कुमार (भा.प्र.से. १९८८) यांचा जन्म ३ ऑगस्ट १९६५ रोजी झाला. २५ ऑगस्ट १९८८ रोजी ते भारतीय प्रशासकीय सेवेत रुजू झाले. मूळचे राजस्थानमधील सवाई माधोपूर येथील असलेल्या राजेश कुमार यांनी इतिहास या



विषयात पदव्युत्तर पदवी मिळविलेली आहे.

श्री.राजेश कुमार यांनी यापूर्वी सोलापूर येथे अधिसंख्य सहायक जिल्हाधिकारी पदापासून २४ जुलै १९८९ रोजी आपल्या कारकीर्दीस सुरुवात केली. त्यानंतर सातारा येथे सहायक जिल्हाधिकारी, बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, अमरावती येथे आदिवासी विकास अपर आयुक्त, धाराशीव जिल्हाधिकारी आदी महत्त्वपूर्ण पदांवर त्यांनी काम केले आहे.

## गृहपयोगी वस्तूंचा संच वितरणासाठी अपॉइंटमेंट प्रणाली लागू
### बांधकाम कामगारांना ऑनलाईन नोंदणी आवश्यक

**जळगाव – महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळात नोंदणीकृत सक्रिय (जिवित) बांधकाम कामगारांसाठी गृहपयोगी वस्तूंच्या संचांचे वितरण आता नवीन सुधारित कार्यपद्धतीनुसार करण्यात येणार आहे.**

मंडळाच्याhttp://hikit.mahabocw.in/appointment या अधिकृत संकेतस्थळावर १ जुलै २०२५ पासून ऑनलाईन अपॉइंटमेंट प्रणाली सुरु करण्यात येत असून, १५ जुलै २०२५ पासून प्रत्यक्ष संच वितरणास प्रारंभ होणार आहे.

मंडळाने बांधकाम कामगारांना घरगुती उपयोगाच्या वस्तूंचा संच मोफत वितरित करण्यासाठी राज्यभरात जिल्हानिहाय वितरण केंद्रे निश्चित केली असून, संबंधित कामगारास केवळ त्यांच्या नोंदणी असलेल्या जिल्ह्याच्या वितरण केंद्रातूनच संच प्राप्त करता येईल.

प्रत्येक जिल्ह्यातील बांधकाम कामगारांना त्यांच्या जिल्ह्यातीलच वितरण केंद्रावर संच दिला जाईल. बांधकाम कामगाराने संकेतस्थळावर आपला नोंदणी क्रमांक टाकून लॉग-इन करायचे आहे. जर कामगाराची नोंदणी निष्क्रिय असेल किंवा यापूर्वी संच घेतलेला असेल, तर तो योजनेस अपात्र ठरेल.

पात्र कामगार आपल्या सोयीने दिनांक व केंद्र निवडू शकतो. त्यानंतर त्याला - appointment Letter {'iob. appointment Letter, आधार कार्ड/मंडळ ओळखपत्र घेऊन कामगाराने दिलेल्या दिनांकास संबंधित केंद्रावर प्रत्यक्ष उपस्थित राहणे बंधनकारक आहे. केंद्रावर बायोमेट्रिक ओळख व ऑनलाइन फोटो घेण्यात येईल. त्यानंतरच गृहपयोगी वस्तूंचा संच दिला जाईल.

संच प्राप्त करण्यासाठी लाभार्थ्याने मंडळाचे ओळखपत्र अथवा आधार कार्ड व Appointment Letter घेऊन ठरवलेल्या दिवशी वितरण केंद्रावर प्रत्यक्ष उपस्थित राहणे आवश्यक आहे. तेथे बायोमेट्रिक पडताळणी व ऑनलाईन छायाचित्र घेण्यात येणार असून त्यानंतरच गृहपयोगी वस्तूंचा संच ताब्यात दिला जाईल.

मंडळाच्या निर्देशानुसार, प्रत्येक कुटुंबास (पती किंवा पत्नी) केवळ एकदाच संच अनुज्ञेय राहणार आहे. तसेच, केंद्रात दररोज २५० लाभार्थ्यांना संच वितरणाचे लक्ष्य ठेवण्यात आले असून, कोणत्याही कारणास्तव -ppointment Letter शिवाय संच वितरण केले जाणार नाही. या संदर्भात अधिक माहिती व अपॉइंटमेंटसाठी कामगारांनी http://hikit.mahabocw.in/appointment या संकेतस्थळाला भेट द्यावी, असे आवाहन मंडळाचे सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक कुंभार यांनी केले आहे.

# गोदावरी फाउंडेशनतर्फे भुसावळ बस स्थानकामध्ये रुग्णसेवा बुथ कार्यान्वित

**जळगाव – भुसावळ बस (एस टी) स्थानक परिसरात दररोज हजारोंच्या संख्येने प्रवासी वर्गाची कामानिमित्त रेलचेल सुरु असते. येथे येणाऱ्या प्रवाशांना तसेच बस आगारातील कर्मचाऱ्यांना तात्काळ वैद्यकीय सुविधा मिळाव्यात, या साठी गोदावरी फाऊंडेशन संचलित डॉ उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व धर्मदाय रुग्णालयातर्फे नि:शुल्क ओपीडी सेवा केंद्राचे सोमवार दिनांक ३० जून रोजी उदघाटन करण्यात आले.**

**याप्रसंगी गोदावरी फाऊंडेशन च्या संचालिका डॉ केतकी ताई पाटील, जळगाव जिल्हा महामंडळ परिवहन विभागाचे नियंत्रक श्री भगवान जगनोर, भुसावळ स्थानक नियंत्रक श्री शिवदे यांच्या हस्ते फित कापून उदघाटन झाले. लगेचच प्रवाशी रुग्णांची तपासणी सुद्धा सुरु झाली.**



या वेळी डॉ उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयाचे संचालक डॉ एन एस आर्वीकर, अधिष्ठाता डॉ प्रशांत सोळंके, वैद्यकीय अधीक्षक डॉ प्रेमचंद पंडित, डॉ सुभाष बडगुजर, जीआयएमआरचे संचालक डॉ प्रशांत वारके, भुसावळ येथील डॉ उल्हास पाटील स्कूल च्या मुख्याध्यापिका अनघा पाटील, सन एँड ऍडव्हर्टाइजचे मंगेश दादा जुनागडे आदी उपस्थित होते. या प्रसंगी एस टी महामंडळाचे विभागीय नियंत्रक श्री भगवान जगनोर यांनी आरोग्य कक्षाची पाहून करून समाधान व्यक्त केले. सदरचा उपक्रम हा महामंडळाच्या प्रवाशांसाठी खूप उपयुक्त असा ठरणार असून या माध्यमातून प्रवाशांना विविध आजारांवर मोफत उपचार उपलब्ध होणार आहेत त्याबद्दल गोदावरी फाउंडेशन चे आभार मानले.

याप्रसंगी बोलताना गोदावरी फाउंडेशनच्या सदस्या डॉ केतकीताई पाटील यांनी या आरोग्य कक्षाच्या माध्यमातून प्रवाशांना अधिकाधिक चांगली वैद्यकीय सेवा देण्याचा मानस राहील अशी ग्वाही दिली. केवळ प्रवासी च नाही तर बस आगारातील कर्मचारी, परिसरातील नागरिकांसाठी आरोग्य तपासणी सेवा उपलब्ध करून दिली असून सर्व प्राथमिक उपचार येथे केल्या जातील. तसेच अधिक वैद्यकीय उपचारांची गरज भासल्यास पुढील उपचार डॉ उल्हास पाटील रुग्णालयात केले जाणार आहे. या प्रकारचा उपक्रम लवकरच जळगाव बस स्थानकावर देखील सुरू करण्यात येणार असल्याचे डॉ केतकी पाटील म्हणाल्या.

कार्यक्रमात लगेचच पेशंट तपासणीला सुरुवात झालेली असून सुमारे १५ रुग्णांनी या सेवेचा पहिल्या तासाभरातच लाभ घेतला. तसेच आम्हा प्रवाशांसाठी चांगली सुविधा उपलब्ध करून दिल्याने प्रवाशी वर्गामध्ये समाधान दिसून आले. या प्रसंगी गोदावरी नर्सिंग कॉलेजचे इन्चार्ज श्री आकाश धनगर, इंटेरियर चे श्री रामपाल जांगिड तसेच गोदावरी फाऊंडेशन चे प्रा चंद्रकांत डोंगरे, प्रा पंकज बोंडे, रितेश पाटील यांच्यासह महामंडळातील कर्मचारी व मोठ्या संख्येने प्रवासी उपस्थित होते.

# एम.आर.आय. व सीटी स्कॅन तपासणी

## अत्यल्पदरात अचूक निदानाची सुविधा

**जळगाव : सीटी स्कॅन किंवा एमआरआयचे नाव ऐकताच रुग्णांना टेंशन येते. या तपासण्या खर्चिक स्वरुपाच्या असल्याने सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेरच्या असतात. त्याकरीता रुग्णाच्या सोईसाठी डॉ.उल्हास पाटील धर्मदाय रुग्णालयाद्वारे अत्यल्प दरात दर्जेदार रेडिओलॉजी सेवा उपलब्ध करुन दिल्या आहेत. ही सेवा २४ तास सुरु असते.**

शरिरातील सुक्ष्म बदलांच्या हालचाली टिपण्यासाठी, त्यातील अडथळे जाणून घेण्यासाठी तंत्रज्ञानाची मदत लागते, त्याकरीता डॉ.उल्हास पाटील धर्मदाय रुग्णालयात १.५ टेस्ला ही एमआरआय मशिन तसेच सीटी स्कॅन मशिन देखील आहे. याद्वारे दर दिवसाला रुग्णांच्या तपासण्या सुरु असतात. खाजगी रेडिओलॉजी सेंटरमध्ये कुठलाही सीटी स्कॅन किंवा एमआरआय करण्यासाठी पाच हजाराहून अधिक खर्च येतो. मात्र आता याच वैद्यकिय सुविधा अल्पदरात उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.


डॉ.उल्हास पाटील रुग्णालयात अत्यल्प दरात एक्स रे, सोनोग्राफी, सीटी स्कॅन, एमआरआय सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. केवळ तपासण्याच नव्हे तर स्पेशालिस्ट डॉक्टरांचा सल्ला देखील येथे मोफत उपलब्ध आहे. रुग्णांनी या सेवेचा लाभ घ्यावा असे आवाहन रुग्णालय प्रशासनातर्फे करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी एमआरआयचे पुर्वेश महाजन ९८९०७३८६५८ यांच्याशी किंवा सीटी स्कॅनचे निळकंठ खाचणे ९८९००१३८७२ यांच्याशी संपर्क साधावा.

### तात्काळ तपासण्या, उपचाराची दिशा निश्चित

अनेकदा रस्ते अपघात वा कुठल्याही अपघातात जखमी झालेल्या तसेच अन्य कुठल्याही व्याधींनी प्रकुती खालावलेल्या रुग्णाच्या अत्यावश्यक रेडिओलॉजी तपासण्या मध्यरात्री देखील येथे तातडीने होतात. रेडिओलॉजिस्ट डॉक्टरांद्वारे खात्रीशीर निदानही येथे होते. यामुळे रुग्णांच्या ट्रिटमेंटची अचूक दिशा ठरविण्यात तज्ञांना देखील सोयीचे होते.



# त्वचारोगांवर अल्पदरात उपचार जनतेसाठी दिलासादायक आरोग्य सेवा



**जळगाव : त्वचेच्या विविध समस्यांमुळे त्रस्त रुग्णांसाठी एक दिलासादायक बातमी आहे. गोदावरी फाउंडेशन संचलित डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व धर्मदाय रुग्णालय, जळगाव येथे त्वचारोग विभागात अत्यल्प दरात उपचार सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे.**

या अंतर्गत विविध उपचारांसाठी खालील प्रमाणे दर निश्चित करण्यात आले आहेत: केमिकल पीलिंग: १००० ऐवजी फक्त ५००, स्किन टॅग रिमूव्हल: ६०० ऐवजी फक्त ३००,सीओ२ स्कार २००० ऐवजी फक्त १००० रू केली जाणार आहे. रुग्णांना त्वचेवरील डाग, खवखव, पिगमेंटेशन, व्रण इत्यादी समस्यांवर दर्जेदार उपचार तज्ज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीखाली दिले जात आहेत. हा उपक्रम सामान्य नागरिकांना परवडणाऱ्या दरात उच्च प्रतीची आरोग्यसेवा उपलब्ध करून देणारा आहे. या संधीचा लाभ घेण्यासाठी खालील डॉक्टरांशी संपर्क साधावा:

– डॉ. मुक्ता शेलार ८४२१४८५२०२
– डॉ. आकाश कुरकुरे ८७८८५२६८१२



## मुख्यमंत्री सामुदायीक आरोग्य शिबिरास डॉ.उल्हास पाटील रूग्णालयाचे सहकार्य

**जळगाव – मुख्यमंत्री सामुदायीक आरोग्य शिबिराच्या मदतीस डॉ. उल्हास पाटील रूग्णालयाचे डॉक्टर पोहचले असून जळगाव शहरासह जिल्हयात तपासणी व मार्गदर्शन करीत आहे.**

९ जून ते १५ रोजी जळगाव शहरातील शिवकॉलनी, हरीविठ्ठल नगर, खेडी बु.येथे हजारो नागरिकांची तपासणी करत पुढील उपचारासाठी मार्गदर्शन करण्यात आले.या शिबिरात रक्तदाब,इसीजी व टु.डी इको तपासणी देखिल करण्यात आली.

## चाळीसगावात आरोग्य शिबीर

**चाळीसगाव – डॉ.उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालयाच्या सयुक्त विद्यमाने सलग दोन दिवस आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.**

या शिबिरात तज्ञ डॉक्टरांनी ७८ नागरिकांची टुडीइको तपासणी तर ९१२ नागरिकांची जनरल तपासणी करून यातील सर्जरी २८, हदयरोग ३०,नेत्ररोग ३०, मेडीसिन २८, अस्थीरोग ०४, काननाकघसा ११,स्त्रीरोग ११ बालरोग ०६ आणि मानसोपचार ०१ अशा १४९ नागरिकांना पुढील उपचाराची गरज असल्याने रूग्णालयात येणेबाबत मार्गदर्शन करण्यात आले.






## माजी सैनिकांसाठी भरला आरोग्य मेळा

**जळगाव – डॉ.उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालयाच्या सयुक्त विद्यमाने आरोग्य मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.**

या मेळाव्यात तज्ञ डॉक्टरांनी ४२ नागरिकांची आरोग्य तपासणी केली. यातील यातील नेत्ररोग ०२,मेडीसिन ०१,अस्थीरोग ०१ आणि सर्जरी ०१ अशा ५ नागरीकांना पुढील उपचाराची गरज असल्याने रूग्णालयात येणेबाबत मार्गदर्शन करण्यात आले.यावेळी २ नागरिकांनी रक्तदान देखिल केले.



## सेवा का अभियानास प्रतिसाद

**साखली बु. बुलढाणा– डॉ.उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालयाच्या सयुक्त विद्यमाने सेवा का अभियानाचे आयोजन करण्यात आले होते.**

येथील अभियानात तज्ञ डॉक्टरांनी १०५ नागरिकांची आरोग्य तपासणी केली. यातील यातील कान नाक घसा ०३, नेत्ररोग ०४, सर्जरी ०४, सर्जरी ०४ आणि मेडीसिन व हदयरोग ०२ अशा १७ नागरिकांना पुढील उपचाराची गरज असल्याने रूग्णालयात येणेबाबत मार्गदर्शन करण्यात आले.यावेळी ६ रक्तदात्यांनी देखिल रक्तदानासाठी पुढाकार घेतला.



## आरोग्य शिबिरात डॉ.केतकीताई

**जळगाव – येथील काथार वाणी समाजासाठी डॉ.उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालयाच्या सयुक्त विद्यमाने सेवा का अभियानाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी शिबिराठीकाणी जावून डॉ. केतकीताई यांनी डॉक्टर व नागरीकांना मार्गदर्शन केले.**

शिबिरात तज्ञ डॉक्टरांनी १०३ नागरिकांची आरोग्य तपासणी केली. यातील सर्जरी ०२, मेडीसिन ०७ आणि नेत्ररोग ०२ अशा ११ नागरिकांना पुढील उपचाराची गरज असल्याने रूग्णालयात येणेबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

## कर्कीत शिबिरास प्रतिसाद



**कर्की येथे डॉ.उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालयाच्या सयुक्त विद्यमाने आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.**

या मेळाव्यात तज्ञ डॉक्टरांनी ६२ नागरिकांची आरोग्य तपासणी केली यातील यातील मेडीसिन ०४, अस्थीरोग ०२ आणि नेत्ररोग ०३ अशा ०७ नागरिकांना पुढील उपचाराची गरज असल्याने रूग्णालयात येणेबाबत मार्गदर्शन करण्यात आले.यावेळी ११ नागरीकांनी रक्तदान केले.

## रक्तदानासह आरोग्य तपासणी

**चोरवड, ता. रावेर – येथे डॉ.उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालयाच्या सयुक्त विद्यमाने रक्तदान व आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.**

या शिबिरात तज्ञ डॉक्टरांनी ४२ नागरिकांची आरोग्य तपासणी केली. यातील यातील मेडीसिन ०२ आणि नेत्ररोग ०३ अशा ०५ नागरिकांना पुढील उपचाराची गरज असल्याने रूग्णालयात येणेबाबत मार्गदर्शन करण्यात आले.यावेळी १४ पिशवी रक्त संकलन करण्यात आले.



साप्ताहिक
RNI Regd. No.: MAHMAR/1999/7490
# गोदावरी परिवार




सवलतीचा पोष्ट रजि. नं. JAL/120/2024-2026

* वर्ष २६ वे * अंक २८ * सोमवार १४/०७/२०२५ * डाक १६/०७/२०२५ * पाने - ४ * किंमत २ रुपये
* year 26 * issue 28 * monday : 14 / 07 / 2025 * post Dt. 16/ 07 / 2025 * pages - 4 * price 2 Rs.

# 'इलिव्हेशन ऑफ डिप्रेस स्कल फ्रॅक्चर' रूग्णावर यशस्वी शस्त्रक्रिया

## डॉ. उल्हास पाटील रूग्णालयातील मेंदू व मणका विकार तज्ज्ञांच्या टीमचे यश

**जळगाव : शहरातील डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील मेंदू व मणका विकार तज्ञांनी (न्युरो सर्जन) एका गंभीर अपघातग्रस्त रुग्णावर यशस्वीरीत्या इलिव्हेशन ऑफ डिप्रेस स्कल फ्रॅक्चर ही गुंतागुंतीची शस्त्रक्रिया करून रूग्णाचा जीव वाचवला आहे. रुग्णाची सध्या प्रकृती स्थिर असून उपचार सुरु आहेत.**

याबाबत माहिती अशी की, यावल तालुक्यातील डांभुर्णी येथील वामन कोळी ( वय ६५) हे काही दिवसांपूर्वी रस्त्यावरून चालत असतांना त्यांचा एका दुचाकीने जोरदार धडक दिली. धडकेनंतर रुग्ण रस्त्यावर पडला आणि त्याच्या डोक्याला जोरदार मार लागला. अपघातानंतर रुग्ण शुद्धीवर नसल्यामुळे त्याला तातडीने डॉ. उल्हास पाटील रुग्णालयात दाखल करण्यात आले. येथे न्युरो सर्जन डॉ. विपूल राठोड आणि आपत्कालीन विभागाच्या तज्ञांनी त्वरित तपासणी करून त्याची सीटी स्कॅन चाचणी केली.

या चाचणीत डोक्याच्या हाडाला गंभीर फ्रॅक्चर झाल्याचे समोर आले. विशेषतः मेंदूच्या पुढील भागात हाडाचे काही भाग आतमध्ये गेले होते, जे थेट मेंदूत घुसले होते. यामुळे मेंदूवर दबाव निर्माण झाला होता आणि त्यासोबतच रक्तस्त्रावही सुरू झाला होता. या परिस्थितीत त्वरित शस्त्रक्रिया करणे अत्यावश्यक होते. न्युरो सर्जन डॉ.विपूल राठोड आणि त्यांच्या पथकाने इलिव्हेशन ऑफ डिप्रेस स्कल फ्रॅक्चर ही शस्त्रक्रिया केली.

या प्रक्रियेत डोक्यात दाबून गेलेले हाडाचे तुकडे शस्त्रक्रियेने उचलून त्यांना योग्य स्थितीत आणण्यात आले. तसेच मेंदूवरील रक्तस्राव नियंत्रित करून मेंदूवरील दाब कमी करण्यात आला. ही संपूर्ण प्रक्रिया अत्यंत काटेकोरपणे व अचूकपणे पार पडली. या शस्त्रक्रियेसाठी डॉ. श्वेता गाढवे, डॉ. सहर हमदुले, भूलतज्ञ डॉ. सतीश, डॉ. हेमंत मापारी यांनी मोलाचे सहकार्य केले. या यशस्वी शस्त्रक्रियेने पुन्हा एकदा डॉ. उल्हास पाटील रुग्णालयातील मेंदू व मणका विकार विभागाची कार्यक्षमता अधोरेखित केली आहे. ग्रामीण भागात अशा उन्नत स्तरावरील न्युरो सर्जरी उपलब्ध असणे ही निश्चितच अभिमानाची बाब आहे.




रुग्णासमवेत तज्ञ डॉक्टर आणि त्यांची टीम छायाचित्रात दिसत आहे. (छायाचित्र : नितीन नेवे)

अशा प्रकारच्या डिप्रेस्ड स्कल फ्रॅक्चरमध्ये रुग्णाचा जीव धोक्यात असतो. वेळेवर निदान आणि शस्त्रक्रिया झाली नाही तर गंभीर मेंदू विकार उद्भवू शकतात. या रुग्णाच्या बाबतीत आमच्या पथकाने त्वरित निर्णय घेतला आणि शस्त्रक्रिया वेळेत पार पाडल्यामुळे त्याचा जीव वाचला.

– डॉ. विपूल राठोड
मेंदू व मणका विकार तज्ज्ञ



## त्वचा उपचार अल्पदरात



जळगाव – येथील डॉ. उल्हास पाटील मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटल (जळगाव) मध्ये त्वचारोग विभागात केमिकल पील – १,००० च्या ऐवजी केवळ ५००, स्किन टॅग रिमूव्हल – ६०० च्या बदल्यात ३००, तर सीओर स्कार (दाग) रिमूव्हल – २,००० ऐवजी १,००० अल्पदरात सेवा उपलब्ध असून प्रचंड महिलांचा प्रचंड प्रतिसाद मिळत आहे.

यासाठी त्वचारोग तज्ञ डॉ. एस के तळेले, डॉ तेजस्वीनी यांच्यासह तज्ञ डॉक्टरांची सेवा देखिल उपलब्ध करून देण्यात आली आहे.

# नवजात शिशुंच्या काविळवर डॉ.उल्हास पाटील रूग्णालयात खात्रीशिर उपचार

**जळगाव – नवजात किंवा लहान मुलांमधील कावीळ कावीळ हा एक आजार आहे ज्यामध्ये बाळाची त्वचा आणि डोळे पिवळे होतात. ही स्थिती बाळाच्या रक्तात जास्त प्रमाणात बिलीरुबिनच्या उपस्थितीमुळे उद्भवते. हा एक पिवळा पदार्थ आहे जो लाल रक्तपेशींच्या विघटनामुळे येतो. यकृत शरीरातून बिलीरुबिन काढून टाकण्यास मदत करते, त्यामुळे कावीळ टाळता येते. बहुतेक वेळा, कावीळ स्वत:च निघून जाते, परंतु काही प्रकरणांमध्ये, काही बाळांना आवश्यक असते डॉ. उल्हास पाटील रूग्णालयात नवजात शिशुंच्या काविळवर तज्ज्ञ डॉक्टरांकडून खात्रिशीर उपचार उपलब्ध आहेत.**

शारीरिक कावीळ: हा सर्वात सामान्य प्रकार आहे आणि सामान्यतः जन्माच्या २४ तासांनंतर दिसून येतो. हे घडते कारण नवजात मुलाचे यकृत अद्याप विकसित होत आहे आणि बिलीरुबिन कार्यक्षमतेने प्रक्रिया करत आहे.



स्तनपान कावीळ: स्तनपान करणा-या लहान मुलांना पुरेसे आईचे दूध न मिळाल्यास कावीळ होऊ शकते.

नवजात मुलांमध्ये कावीळ तुलनेने सामान्य आहे, अंदाजे ६० पूर्ण-मुदतीच्या बाळांना आणि ८० टक्के अकाली अर्भकांना प्रभावित करते. शारीरिक कावीळ हा सर्वात वारंवार होणारा प्रकार आहे आणि सामान्यतः काही दिवसांपासून ते काही आठवड्यांत उपचाराशिवाय स्वत:हून सुटतो. पालकांनी त्यांच्या बाळाच्या त्वचेच्या रंगाचे निरीक्षण करणे आणि त्यांना दीर्घकाळापर्यंत कावीळ किंवा इतर कोणतीही लक्षणे दिसल्यास डॉ. उल्हास पाटील रूग्णालयातील तज्ज्ञांचा सल्ला घेणे नक्कीच फायदेशीर ठरेल.

**अर्भक कावीळची लक्षणे**

जर बाळाला कावीळ असेल तर त्याची त्वचा पिवळी दिसेल. प्रथम, चेहरा पिवळा होतो, नंतर छाती आणि पोट आणि शेवटी पाय. बाळाच्या डोळ्यांचा पांढरा भाग देखील पिवळा होतो. पुढील पद्धती पालकांना त्यांच्या बाळाला कावीळ आहे की नाही हे तपासण्यास मदत करेल. बाळाच्या कपाळावर किंवा नाकावर त्वचेवर हळूवारपणे दाबा आणि नंतर आपले बोट उचला. नवजात काविळीच्या लक्षणांपैकी एक म्हणजे बाळाची त्वचा पिवळी दिसते. अशी लक्षणे दिसल्यास त्वरीत डॉ. उल्हास पाटील रूग्णालयात संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# ५५ वर्षीय महिलेच्या दोन्ही डोळ्यांतील मोतीबिंदूवर एकाचवेळी शस्त्रक्रिया यशस्वी

## डॉ. उल्हास पाटील रुग्णालयातील नेत्रविभागाचा मोठा पराक्रम

**जळगाव : वैद्यकीय उपचारांमध्ये सातत्याने प्रगती साधणाऱ्या जळगाव जिल्ह्याच्या वैद्यकीय क्षेत्रात डॉ. उल्हास पाटील रुग्णालयातील नेत्रविभागाने आणखी एक मानाचा टप्पा गाठला आहे. ५५ वर्षीय महिलेच्या दोन्ही डोळ्यांतील मोतीबिंदूवर एकाच वेळी शस्त्रक्रिया यशस्वी केली आहे. विशेष म्हणजे संबंधित महिला मानसिक आजाराने त्रस्त होती आणि तिच्यावर उपचार सुरू होते, त्यामुळे शस्त्रक्रिया करणे हे अधिक धाडसी व आव्हानात्मक होते.**

याबाबत माहिती अशी की, वर्षा नामक ५५ वर्षीय महिला गेल्या काही वर्षांपासून दृष्टीसंबंधी समस्यांना तोंड देत होती. तिच्या दोन्ही डोळ्यांत पूर्णपणे मोतीबिंदू पिकले होते आणि त्यामुळे ती जवळजवळ अंधत्वाच्या उंबरठ्यावर होती. कुटुंबीयांनी जालना, औरंगाबाद तसेच मुंबईतील अनेक रुग्णालयांना भेट दिली. परंतु रुग्णाची मानसिक स्थिती आणि दोन्ही डोळ्यांची एकाचवेळी गरज असलेली शस्त्रक्रिया पाहता, अनेक ठिकाणी डॉक्टरांनी शस्त्रक्रिया करण्यास नकार दिला.

नेत्रविभागाने स्विकारले आव्हान

अखेर रुग्णाला डॉ. उल्हास पाटील रुग्णालयात दाखल करण्यात आले. येथे नेत्रविभागाचे प्रमुख डॉ. एन.एस. आर्विकर यांच्या मार्गदर्शनाखाली नेत्रतज्ञ डॉ. रेणुका पाटील यांनी रुग्णाची बारकाईने तपासणी केली आणि तिच्या वैद्यकीय इतिहासाचा सखोल अभ्यास केला. तिच्या मानसिक आरोग्य स्थितीचा विचार करत उपचार करण्याचा निर्णय घेण्यात आला. या आव्हानात्मक परिस्थितीत नेत्रतज्ञांनी एकाच वेळी दोन्ही डोळ्यांमध्ये बिनटाक्याची मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्याचे धाडस दाखवले. अत्यंत कुशलतेने व अचूकतेने ही शस्त्रक्रिया पार पाडण्यात आली. शस्त्रक्रियेनंतर लगेचच रुग्णाच्या दृष्टीत लक्षणीय सुधारणा झाली आणि तिच्या चेहऱ्यावर समाधान आणि आनंदाचे हास्य फुलले. या यशामध्ये डॉ. उल्हास पाटील रुग्णालयातील नेत्रविभागातील डॉ. मयूरी निलावाड, डॉ. यश पाटील, डॉ. जतीन बाविस्कर, डॉ. शुभम भारसाकळे, डॉ. अनिश कांदळगावकर, भूलतज्ज्ञ डॉ. शितल ढाके, डॉ. सतीश, डॉ. आकांक्षा पाटील व नर्सिंग स्टाफ यांनी मोलाचे सहकार्य केले.





ही शस्त्रक्रिया वैद्यकीय दृष्टिकोनातून अत्यंत आव्हानात्मक होती. रुग्णाची मानसिक स्थिती, दोन्ही डोळ्यांत पूर्णपणे पिकलेला मोतीबिंदू आणि एकाचवेळी शस्त्रक्रिया करण्याची गरज हे सर्व घटक लक्षात घेतल्यास, अत्यंत बारकाईने नियोजन आणि काळजीपूर्वक अंमलबजावणी करावी लागली. आमच्या संपूर्ण टीमच्या प्रयत्नामुळे आणि रुग्णाच्या कुटुंबीयांच्या विश्वासामुळे ही शस्त्रक्रिया यशस्वी ठरली.

– डॉ. जतीन बाविस्कर, निवासी डॉक्टर

## संपादकीय

# पालकांना बदलावे लागेल

लहान मुलांच्या हातात पुस्तके दिसत नाहीत. त्याऐवजी आता मोबाईल दिसतात. त्यामुळे त्यांना कोणतेही प्रश्न पडतच नाहीत. कशाची उत्सुकताही वाटत नाही. त्यांना गोष्टी सांगण्यातील आणि पुस्तक वाचनातील आनंद हिरावला गेला आहे, अशी भावना प्रख्यात अभिनेते सुबोध भावे यांनी नुकतीच व्यक्त केली आहे. अनेक जाणकारांनीही यापूर्वी या मुद्यावर बोट ठेवून पालक आणि समाजाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे. मानसतज्ज्ञसुद्धा त्याबद्दल वारंवार चिंता व्यक्त करतात. मुलांच्या सर्वांगीण विकासात पुस्तके किती महत्त्वाची भूमिका बजावतात ते वेगळे सांगायला नको. पुस्तक वाचन समतोल विचारसरणी रुजवते. दृष्टिकोन व्यापक बनवते. बदलत्या सामाजिक परिस्थितीत ही मूल्ये मुलांमध्ये रुजणे आवश्यक आहे. सुबोध भावे यांनी व्यक्त केलेले विचार बहुसंख्य पालकांना रुचतील आणि ते सहमतही होतील. विषय मुलांच्या पुस्तक वाचनाचा असला तरी किती पालक स्वतः पुस्तके वाचतात? किती मुलांच्या घरी त्यांच्या पालकांचा पुस्तक संग्रह असेल? मुलांना वाचन सवय कशी लावायची याचे अनेक कानमंत्र जाणकार देतात. उदा. मुलांना पुस्तकांची ओळख करून द्या. त्यांच्यासोबत पुस्तक खरेदीला जा. त्यांना त्यांच्या आवडीची पुस्तके खरेदी करू द्या. आठवड्यातून एकदा त्यांना त्यांच्या आवडीचे पुस्तक वाचून दाखवा वगैरे वगैरे! तथापि हे कानमंत्र अमलात आणण्यासाठी पालक पुस्तकप्रेमी असायला हवेत. मुलांच्या वाचनात मोबाईल हा अडथळा आहे हे कबूल, पण पालकांनाच वाचनाची आवड नसेल तर ते तरी त्यांच्या पाल्यांना वाचनास कसे प्रवृत्त करू शकतील? सर्वप्रथम मुले पालकांना वाचतात.पालकांच्या हातात सदासर्वकाळ मोबाईलच दिसणार असेल व तासन्तास ते त्यातच मग्न असतील तर ते पाल्यांना त्यापासून दूर कसे ठेवू शकतील? आजचा काळ 'डिजिटल' शिक्षणाचा आहे. त्यामुळे मुलांच्या हातात मोबाईल देणे अपरिहार्य असू शकेल कदाचित, पण याच मोबाईलचा वापर वाचनासाठीसुद्धा केला जाऊ शकतो. समाज माध्यमांवर वाचनप्रेमींचे अनेक समूह असतात. त्यावर वाचनाशी संबंधित अनेक उपक्रम चालतात. अनेक वाचन ॲप उपलब्ध आहेत. त्यावर पुस्तके वाचता येतात. तथापि हा बदल घडून यावा व मुलांना वाचनाची सवय लागावी, असे वाटत असल्यास ती सवय आधी पालकांनी स्वतःला लावून घेतली पाहिजे. त्यासाठी पालकांना स्वतःला बदलावे लागेल. मोबाईलला काही काळ बाजूला ठेवावे लागेल. तरच मुलांवर वाचनसंस्कार करता येतील.

# 'सितारे जमीन पर' चित्रपटातून मिळाली जीवन आनंदाने जगण्याची प्रेरणा



रोटरी क्लब ऑफ जळगाव नॉर्थ व इनरव्हील क्लब ऑफ जळगाव इस्टचा उपक्रम

**जळगाव – दिव्यांग मुलांना आयुष्यात खूप खडतर प्रवास करावा लागतो, त्यामुळे त्यांचे मनोबल चांगले राहावे यासाठी सतत प्रोत्साहित करणे गरजेचे असते. या उद्देशाने रोटरी क्लब ऑफ जळगाव नॉर्थ व इनरव्हील क्लब ऑफ जळगाव इस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार दिनांक ४ जुलै रोजी आमिर खान प्रस्तुत 'सितारे जमीन पर' हा सिनेमा दाखविण्यात आला. यामुळे दिव्यांग बालकांना आनंदाची मेजवानी तर मिळाली सोबतच जीवन जगण्याची प्रेरणा मिळाल्याचे समाधान त्यांच्या चेहऱ्यावरून दिसत होते.**

सामाजिक दातृत्व या भावनेतून काम करणाऱ्या रोटरी क्लब ऑफ जळगाव नॉर्थ व इनरव्हील क्लब ऑफ जळगाव इस्ट या संस्थांनी आज उडाण या संस्थेत शिकत असलेल्या दिव्यांग बांधवांसाठी विशेष उपक्रम घेण्याचे ठरविले होते. त्या पार्श्वभूमीवर रुषील फाऊंडेशन अंतर्गत सुरु असलेल्या उडान दिव्यांग केंद्रातील बालकांसाठी 'सितारे जमीन पर' या सिनेमाचे तिकिट्स बुक करून त्यांना आनंद देण्याचा प्रयत्न केला.

जळगाव येथील पीव्हीआर येथे हा उपक्रम घेण्यात आला. या प्रसंगी रोटरी क्लब ऑफ जळगाव नॉर्थ चे अध्यक्ष बिपीन पाटील, सचिव हितेंद्र धांडे, भरत कार्डीले, चंदन कोल्हे, सूचिता चौधरी, दीपक पाटील, सोहम खडके, निशांत पोरणी, महेश चौधरी, प्रशांत अग्रवाल, इनरव्हील क्लब ऑफ जळगाव इस्टच्या प्रेसिडेंट सिमरन पाटील, सेक्रेटरी रितू शर्मा, आयएसओ रिटा भल्ला, ट्रेझरर नेहल कोठारी, सुलभा लढा, डीपीसीसी पीडीसी संगीता घोडगावकर, गोदावरी फाऊंडेशन संचालिका डॉ केतकी पाटील, ॲड कीर्ती पाटील, पायल चांदीवाल उडान संस्थेच्या संस्थापिका हर्षाली चौधरी आदी उपस्थित होते. सिनेमा दरम्यान विद्यार्थ्यांना खाऊ वाटप हि करण्यात आले. सिनेमा बघण्याचा आनंद दिव्यांगांच्या चेहऱ्यावरून ओसंडून वाहत होता.

# डोळ्यांखालील काळी वर्तुळे: सौंदर्याचा शत्रू की आरोग्याचा इशारा?

**आजच्या तणावपूर्ण जीवनशैलीत डोळ्यांखालील काळी वर्तुळे** (Under Eye Dark Circles) **ही एक अत्यंत सामान्य पण त्रासदायक समस्या बनली आहे. ती सौंदर्याच्या दृष्टीने चिंतेची बाब आहेच, पण काही वेळा आरोग्याच्या समस्येचेही संकेत असू शकते.**



**डोळ्यांखाली काळी वर्तुळे का होतात?**

१. अनुवंशिकता (ऋक्षपर्शीळली): काही लोकांना ही समस्या कुटुंबपरंपरेनेच असते.
२. झोपेचा अभाव: अपुरी झोप ही सगळ्यात सामान्य कारणं आहे.
३. तणाव व मानसिक थकवा: मानसिक थकवा डोळ्यांभोवती रक्तप्रवाह वाढवतो व वर्तुळे गडद दिसतात.
४. वय वाढणे: त्वचेची जाडी कमी होते, कोलेजन कमी होतं व रक्तवाहिन्या स्पष्ट दिसू लागतात.
५. ॲलर्जी: सतत डोळे चोळल्यामुळे हायपरपिगमेंटेशन होऊ शकतो.
६. स्क्रीन टाईम: मोबाईल, लॅपटॉप यांचा दीर्घ वापर थकवा व वर्तुळे वाढवतो.
७. पाणी कमी पिणे व अपुरी आहार: शरीर निर्जलित झाल्यास त्वचा कोरडी व गडद दिसते.
८. हॉर्मोनल बदल व थायरॉइड विकार

**काळी वर्तुळे होऊ नयेत यासाठी काय करावे?**

* दररोज ७-८ तास पुरेशी झोप घ्या
* स्क्रीन टाइम कमी करा आणि दर तासाला ५ मिनिटांचा ब्रेक घ्या
* ॲंटी-ऑक्सिडंट्सयुक्त आहार घ्या – अंजीर, बदाम, डाळिंब, आवळा
* भरपूर पाणी प्या
* स्ट्रेस कमी करा – ध्यान, योगा उपयुक्त
* डोळ्यांना थंड पाण्याचे शेक किंवा कोरफडीचा रस लावा
* सूर्यप्रकाशापासून संरक्षण – सनग्लासेस व झ्झत्र युक्त क्रीम



**या समस्येवर गोदावरी मेडिकल कॉलेजमध्ये आधुनिक व प्रभावी उपचार उपलब्ध आहेत. त्यामुळे अशी कोणतीही अडचण असल्यास त्वचारोग विभागाशी संपर्क साधा आणि योग्य निदान व उपचारासाठी नक्की भेट द्या.**

**सौंदर्याच्या गुजगोष्टी**

डॉ. तेजस्विनी राहूल फाटे
त्वचा विकार विभाग



## सेवा का अभियानास प्रतिसाद

**चोरवड ता.रावेर येथे ग्रा.प कार्यालय आणि डॉ.उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालयाच्या सयुक्त विद्यमाने सेवा का अभियानाचे आयोजन करण्यात आले होते.**

येथील अभियानात तज्ञ डॉक्टरांनी ४२ नागरिकांची आरोग्य तपासणी केली. यातील यातील नेत्ररोग ०३,मेडीसिन ०२ अशा ५ नागरिकांना पुढील उपचाराची गरज असल्याने रूग्णालयात येणेबाबत मार्गदर्शन करण्यात आले.यावेळी १४ दात्यांनी रक्तदान केले.

## लासूरात आरोग्य शिबीर

**लासून ता. मलकापूर – येथे ग्रा.प कार्यालय आणि डॉ.उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालयाच्या सयुक्त विद्यमाने सेवा का अभियानाचे आयोजन करण्यात आले होते.**

शिबिरात तज्ञ डॉक्टरांनी ५९ नागरिकांची आरोग्य तपासणी केली यात सर्जरी ०१, मेडीसिन ०३, कान नाक घसा ०१ आणि नेत्ररोग ०४ अशा ९ नागरिकांना पुढील उपचाराची गरज असल्याने रूग्णालयात येणेबाबत मार्गदर्शन करण्यात आले.



## कापूसवाडी शिबिरास प्रतिसाद

**कापूसवाडी, ता. जामनेर येथे डॉ.उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालयाच्या सयुक्त विद्यमाने आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.**

या मेळाव्यात तज्ञ डॉक्टरांनी ४३ नागरिकांची आरोग्य तपासणी केली. यातील यातील मेडीसिन ०१, बालरोग ०१, कान नाक घसा ०१ आणि नेत्ररोग ०२ अशा ०५ नागरिकांना पुढील उपचाराची गरज असल्याने रूग्णालयात येणेबाबत मार्गदर्शन करण्यात आले.





## साओत आरोग्य मेळा

**साओत, जि.बुलढाणा – डॉ.उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालयाच्या सयुक्त विद्यमाने आरोग्य मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.**

या मेळाव्यात तज्ञ डॉक्टरांनी ४६ नागरिकांची आरोग्य तपासणी केली. यातील नेत्ररोग ०३ आणि मेडिसिन ०३ अशा ६ नागरिकांना पुढील उपचाराची गरज असल्याने रूग्णालयात येणेबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

## मारूळात महिलांची आरोग्य तपासणी

**मारूळ –येथे प्राथमिक आरोग्य केंद्र व डॉ.उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालयाच्या सयुक्त विद्यमाने आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.**

महिलांच्या विविध आजारांची स्त्रीरोग तज्ञांनी तपासणी केली यावेळी १७ गर्भवती महिलांनी देखिल तपासणी करून १५ गर्भवतींना पुढील उपचारासाठी मार्गदर्शन करण्यात आले.






## रूईखेडयात आरोग्य शिबिर

**रूईखेडा जि. बुलढाणा – डॉ.उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालयाच्या सयुक्त विद्यमाने आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.**

या शिबिरात तज्ञ डॉक्टरांनी ५१ नागरिकांची जनरल तपासणी करून यातील मेडीसिन ०४, सर्जरी ०१ आणि अस्थीरोग ०१ अशा ०६ नागरिकांना पुढील उपचाराची गरज असल्याने रूग्णालयात येणेबाबत मार्गदर्शन करण्यात आले.



## मांडवा दिगर येथे आरोग्य मेळा

**मांडवा दिगर, ता. भुसावळ – डॉ.उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालयाच्या सयुक्त विद्यमाने आरोग्य मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.**

या मेळाव्यात तज्ञ डॉक्टरांनी ५४ नागरिकांची आरोग्य तपासणी केली. यातील यातील नेत्ररोग ०३,मेडिसीन ०४, स्त्रीरोग ०१,त्वचारोग ०२ आणि अस्थीरोग ०३ अशा १३ नागरिकांना पुढील उपचाराची गरज असल्याने रूग्णालयात येणेबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

## खडका येथे स्त्रीरोग तपासणी

**भुसावळ – डॉ.उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालयाच्या सयुक्त विद्यमाने स्त्रीरोग तपासणी अभियानाचे आयोजन करण्यात आले होते.**

येथील अभियानात स्त्रीरोग तज्ञांनी १३४ महिलांची आरोग्य तपासणी केली. यातील पुढील उपचाराची गरज असल्याने रूग्णालयात येणेबाबत मार्गदर्शन करण्यात आले.यावेळी १० रक्तदात्यांनी देखिल रक्तदानासाठी पुढाकार घेतला.



Editor : Sourabh Patil (Reg. Newspaper) Weekly Godavari Parivar : Owner, Publisher, Printer : Dr. Mrs. Varsha Patil printed at Subhash Printers, 38, Trimbak Nagar, Near Shakuntala Rane Primary School, Beside Narayani Park Apartment, Mahabal Area, Jalgaon 425002 (Mah.) Godavari Hospital, Released at Jalgaon, Near Bhaskar Market. Phone no. 2221834/35, & Posted from Jalgaon Main Post Office. Should be sent to this email for publication of news in the issue (Editors do not necessarily agree with the views published in the issue.)

संपादक : सौरभ पाटील (रजि. न्युजपेपर) साप्ताहिक गोदावरी परिवार : मालक, प्रकाशक, मुद्रक : डॉ. सौ. वर्षा पाटील यांनी सुभाष प्रिंटर्स, ३८, त्र्यंबक नगर, शकुंतला राणे प्रायमरी स्कूलजवळ, नारायणी पार्क अपार्टमेंट शेजारी, महाबळ एरिया, जळगांव ४२५००२ (महा.) येथे छापून गोदावरी हॉस्पीटल, भास्कर मार्केट जवळ, जळगांव फोन नं. २२२१८३४/३५ येथे प्रसिद्ध करुन जळगाव मुख्य डाक कार्यालय येथून निर्गमित केले. अंकात बातम्या प्रसिध्द करण्यासाठी या ईमेलवर पाठवाव्यात. Email : godavari.parivar@gmail.com (अंकात प्रकाशित झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

# एक पेड माँ के नाम उपक्रमात गोदावरीनर्सिंगच्या १०० विद्यार्थ्यांचा सहभाग

## मा. युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्री (राज्य) श्री. रक्षाताई खडसे यांची उपस्थिती

**जळगाव – मेरा युवा भारत केंद्र, जळगाव यांच्या वतीने एक पेड माँ के नाम या उपक्रमात गोदावरी व डॉ केतकी पाटील नर्सिंग महाविद्यालयाच्या १०० विदयार्थ्यांसह केंद्रीय क्रिडा राज्यमंत्री ना. रक्षाताई खडसे यांनी उपस्थीती दिली.**

चोरवड, भुसावळ येथे आयोजित या उपक्रमात गोदावरी नर्सिंग महाविद्यालय, जळगाव व डॉ. केतकी पाटील नर्सिंग महाविद्यालय, जळगाव येथून एकूण १०० विद्यार्थी व शिक्षकवृंदांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.या कार्यक्रमाचे आयोजन मा. युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्री (राज्य) श्री. रक्षाताई खडसे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले



होते. पर्यावरण संवर्धन व जनजागृती हा या अभियानाचा उद्देश होता. विद्यार्थ्यांनी मातृप्रेमाची जाणीव जपत झाडे लावून सामाजिक जबाबदारीचे उत्तम उदाहरण घालून दिले. महाविद्यालयीन प्रतिनिधींच्या उपस्थितीत विद्यार्थीनींनी पर्यावरणाच्या रक्षणासाठी दिलेले योगदान उल्लेखनीय ठरले. यशस्वी आयोजनाबद्दल मेरा युवा भारत केंद्र व जिल्हा प्रशासनाचे विशेष आभार व्यक्त करण्यात आले.

### गोदावरी नर्सिंग महाविद्यालयात

## वन महोत्सव सप्ताह २०२५ उत्साहात साजरा

**जळगाव – दिनांक: १ जुलै २०२५ । ₹ल आयोजक: एनएसएस युनिट, गोदावरी नर्सिंग महाविद्यालय, जळगावथीम: झाडे लावा, पृथ्वी वाचवाराज्य शासनाच्या मार्गदर्शनानुसार 'वन महोत्सव सप्ताह २०२५' (दि. १ ते ७ जुलै) अंतर्गत गोदावरी नर्सिंग महाविद्यालय, जळगाव येथे १ जुलै रोजी वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.**

या उपक्रमात महाविद्यालयातील शिक्षकवृंद आणि विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. कार्यक्रमात पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत जीवनशैलीचा संदेश वृक्षारोपणाच्या माध्यमातून दिला गेला.कार्यक्रमाचे आयोजन एनएसएस युनिटच्या पुढाकाराने करण्यात आले. विद्यार्थ्यांनी एक विद्यार्थी – एक वृक्ष संकल्प घेत पर्यावरण रक्षणासाठी बांधिलकी व्यक्त केली.

या उपक्रमामध्ये विविध औषधी, फुलझाडे आणि सावली देणाऱ्या झाडांची लागवड करण्यात आली. परिसर सुशोभीकरणासह विद्यार्थ्यांमध्ये निसर्गाविषयी जाणीव वाढवण्याचा उद्देश होता.

## सायबर सुरक्षा आणि सुरक्षितता जागरूकता!



**भुसावळ – डॉ.उल्हास पाटील इंग्लिश मीडियम स्कूल, भुसावळ येथे एक अभ्यासपूर्ण सायबर सुरक्षा आणि ऑनलाइन सुरक्षा यावर जनजागृती करण्यात आली.**

विशेष प्रमुख पाहुणे तुषार परदेशी, प्राचार्या अनघा पाटील यांनी विद्यार्थ्यांना महत्त्वाच्या विषयांवर मार्गदर्शन केले.

पुढे बोलतांना ते म्हणाले की, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर, ऑनलाइन वैयक्तिक डेटांचे संरक्षण,सायबर धोके ओळखणे आणि टाळणे, मजबूत पासवर्ड आणि डिजिटल स्वच्छता यांचे महत्त्व विषद करून सांगितले. ज्यामुळे विद्यार्थ्यांना डिजिटल जगात सुरक्षित आणि जबाबदारीने मार्गक्रमण करण्यासाठी आवश्यक असलेली जागरूकता आणि कौशल्य मिळाले.

### डॉ.उल्हास पाटील कॉलेज ऑफ फिजिओथेरपीमध्ये

## फिजिओथेरपी शिक्षण अभ्यासक्रम अंमलबजावणीवर कार्यशाळा

**जळगाव – येथील डॉ. उल्हास पाटील कॉलेज ऑफ फिजिओथेरपी येथे क्षमता–आधारित फिजिओथेरपी शिक्षण अभ्यासक्रमाच्या अंमलबजावणीवर २ दिवसांची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेचे सूत्रसंचालक डॉ. अभिजित सत्रालकर (पीटी), डॉ. नेहा इंगळे–चौधरी (पीटी), डॉ. अमित जयस्वाल (पीटी) आणि डॉ. अर्पिता राठोड (पीटी) होते.**



स्रोत व्यक्तींनी क्षमता–आधारित शिक्षणाची भूमिका, त्याचे महत्त्व आणि एमयूएचएसने तयार केलेल्या क्षमता–आधारित फिजिओथेरपी शिक्षण अभ्यासक्रमाची अंमलबजावणी कशी करावी हे स्पष्ट केले. त्यांनी एमयूएचएसने दिलेल्या वेळापत्रकानुसार वेगवेगळ्या विषयांवर भाषणे दिली आणि सहभागींच्या सर्व प्रश्नांची उत्तरे दिली. कार्यशाळेचे उद्घाटन डॉ. उल्हास पाटील कॉलेज ऑफ फिजिओथेरपीचे प्राचार्य डॉ. जयवंत नागुलकर (पीटी) यांनी केले. डॉ. जयवंत नागुलकर (पीटी) यांनी सर्व स्रोत व्यक्तींचे स्वागत केले आणि त्यांच्या उद्घाटन भाषणात क्षमता–आधारित शिक्षणाच्या गरजेवर भाषण दिले. ही २ दिवसांची संवादात्मक कार्यशाळा होती ज्यामध्ये अनेक गट उपक्रम होते. शेवटी, सर्व स्रोत व्यक्तींचा सत्कार करण्यात आला आणि सहभागींना प्रमाणपत्रे देण्यात आली. कार्यशाळेचे सूत्रसंचालक डॉ. आस्था पटेल (पीटी) आणि डॉ. महविश शेख (पीटी) यांनी आभार मानले.

# गोदावरीत वृक्षदिंडी व पालखीचे आयोजन



**जळगाव येथील डॉ.उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालयात आषाढी एकादशीनिमीत्त वृक्षदिंडी व पालखीचे आयोजन करण्यात आले.**

या प्रसंगी इशांन्वी आशिष भिरूड यांचेसह बालगोपालांनी विठ्ठल रखुमाई तसेच विविध संतांची वेशभूषा केली.या वेळी आशिष भिरूड व मंजूषा भिरूड यांच्या हस्ते पालखीचे पूजन व विठठूलल्लाची आरती करण्यात आली. या नंतर बालगोपालांनी दिंडी व रिंगण सोहळा पार पाडला. ऑनलाईनच्या माध्यमातून संस्थाध्यक्ष माजी खा.डॉ.उल्हास पाटील यांनी बालगोपालांचे कौतुक करीत शुभेच्छा व्यक्त केल्यात.

### गोदावरी इंग्लीश मिडीयम स्कुल

जळगाव – येथे गोदावरी इग्लीश मिडीयम सीबीएसई स्कुलमध्ये देखिल आषाढी एकादशी उत्साहात साजरी करण्यात आली. या प्रसंगी विद्यार्थ्यांनी विठ्ठल रखुमाई तसेच विविध संताची वेशभूषा केली.

यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका निलीमा चौधरी यांच्या हस्ते पालखीचे पूजन व विठठूलाची आरती करण्यात आली. त्या नंतर विद्यार्थ्यांची दिंडी व रिंगण सोहळा पार पडला. कार्यक्रमासाठी सर्व शिक्षकवृंद पालक शिक्षकेतर कर्मचारी व सेवक वर्ग यांचे सहकार्य लाभले.

### डॉ. उल्हास पाटील इंग्लिश मीडियम स्कूल, भुसावळ मध्ये विठू नामाचा गजर

भुसावळ – डॉ. उल्हास पाटील इंग्लिश मीडियम स्कूल, भुसावळ येथे आषाढी एकादशीनिमित्त शाळेच्या प्राचार्या अनघा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी आणि शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या उत्साहाने आणि भक्तीभावात विठू नामाचा गजर करण्यात आला.



पारंपारिक प्रार्थना, भजन आणि सांस्कृतिक कार्यक्रमातून भारताच्या समृद्ध आध्यात्मिक वारसाचे जतन आणि संवर्धन करण्यात आले.विद्यार्थ्यांना आषाढी एकादशीचे महत्त्व आणि आपल्या जीवनात श्रद्धा आणि भक्तीचे महत्त्व सखोल समजले. विद्यार्थ्यांमध्ये अध्यात्मिक मूल्ये आणि सांस्कृतिक जागरूकता वाढविण्यास मदत झाली.

## जिल्ह्यात कृत्रिम वाळू प्रकल्पासाठी प्रस्ताव करण्याचे आवाहन
### पर्यावरणपूरक प्रकल्पांना मिळेल प्राधान्य

**जळगाव – जळगाव जिल्ह्यात पर्यावरणपूरक व यांत्रिक पध्दतीने M-Sand म्हणजे कृत्रिम वाळू (मॅन्युफॅक्चर्ड सैंड) उत्पादन करणाऱ्या प्रकल्पांच्या उभारणीसाठी प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. महसूल व वन विभागाच्या दिनांक २३ मे २०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार जिल्ह्यातील इच्छुक उद्योजक, संस्था व कंपन्यांनी आवश्यक कागदपत्रांसह प्रस्ताव सादर करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी केले आहे.**



या प्रकल्पांसाठी सादर करण्यात येणाऱ्या प्रस्तावात प्रकल्पाचे संपूर्ण स्वरूप, उद्दिष्ट, जागेचे वितरण व भू–संपत्तीविषयक कागदपत्रे, पर्यावरणीय परवाने व इतर संबंधित यंत्रणांकडून घेतलेली अनुमती, वापरण्यात येणाऱ्या यंत्रसामग्रीची माहिती, वार्षिक उत्पादन क्षमतेचे विवरण, आर्थिक व तांत्रिक पात्रता दर्शविणारे कागदपत्र तसेच संबंधित अनुभव असल्यास त्याचा तपशील समाविष्ट असणे आवश्यक आहे.

शासन निर्णयातील अटी व मार्गदर्शक तत्वे या प्रक्रियेसाठी लागू राहतील. अपूर्ण प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत. प्रस्तावांची अंतिम छाननी करून निर्णय घेण्याचा अधिकार जिल्हाधिकारी जळगाव यांच्याकडे राहील. इच्छुकांनी आपले प्रस्ताव आपल्या तालुक्यातील तहसील कार्यालय, उपविभागीय अधिकारी कार्यालय किंवा थेट जिल्हाधिकारी कार्यालय, जळगाव येथे सादर करावेत, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

## जिल्हास्तरीय लोकशाही दिनात ७३ अर्जांची नोंद

**जळगाव – जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचा कार्यक्रम आज दिनांक ७ जुलै रोजी सकाळी १०.३० वाजता अल्पबचत भवन, जळगाव येथे जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. या कार्यक्रमात एकूण ७३ अर्ज प्राप्त झाले.**

या वेळी निवासी उपजिल्हाधिकारी जयश्री माळी,उपजिल्हाधिकारी ( महसूल प्रशासन ) विजयकुमार ढगे, तसेच संबंधित विभागाचे अधिकारी, तहसीलदार (संजय गांधी योजनांतर्गत) डॉ.उमा ढेकळे,नायब तहसीलदार राहुल सोनवणे (करमणूक शाखा), इतर शाखांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. लोकशाही दिनामध्ये नागरिकांनी विविध प्रश्नांसंदर्भात अर्ज सादर केले असून, त्याचे तात्काळ निराकरण करण्यासाठी उपस्थित अधिकाऱ्यांना निर्देश देण्यात आले. प्राप्त अर्जांचा विभागवार आढावा घेऊन कार्यवाहीच्या सूचना दिल्या गेल्या.

## राज्य शासनाच्या 'उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार २०२४'साठी प्रवेशिका पाठविण्याकरिता १९ जुलैपर्यंत मुदतवाढ

**मुंबई– माहिती व जनसंपर्क महासंचालनालया मार्फत उत्कृष्ट पत्रकारिता, उत्कृष्ट लेखन, उत्कृष्ट दूरचित्रवाणी वृत्तकथा, उत्कृष्ट छायाचित्रकार, समाज माध्यम आणि स्वच्छता अभियानाबाबत केलेल्या जनजागृतीपर लेखनासाठी पुरस्कार स्पर्धा जाहीर करण्यात आली आहे.**




या स्पर्धेसाठी दिनांक १ जानेवारी, २०२४ ते ३१ डिसेंबर, २०२४ पर्यंतच्या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या लेखन/छायाचित्रे/वृत्तकथा यांच्या प्रवेशिका मागविण्यात आल्या आहेत. प्रवेशिका पाठविण्याचा अंतिम दि. ३१ जानेवारी, २०२५ असा होता. आता या पुरस्कारासाठी प्रवेशिका मागविण्याकरिता दि. १९ जुलै, २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

राज्यातील विविध भागातील स्पर्धकांनी संबंधित जिल्हा माहिती कार्यालयाकडून तर मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील इच्छुकांनी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, तळमजला, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई–३२, येथून विहित नमुन्यातील अर्ज प्राप्त करुन घ्यावयाचे आहेत. अर्जाचे नमुने http://dgipr.maharashtra.gov.in/ या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

साप्ताहिक
# गोदावरी परिवार
RNI Regd. No.: MAHMAR/1999/7490
सवलतीचा पोष्ट रजि. नं. JAL/120/2024-2026
* वर्ष २६ वे * अंक २९ * सोमवार २१/०७/२०२५ * डाक २३/०७/२०२५ * पाने – ४ * किंमत २ रुपये
* year 26 * issue 29 * monday : 21 / 07 / 2025 * post Dt. 23/ 07 / 2025 * pages - 4 * price 2 Rs.




### डॉ. उल्हास पाटील रूग्णालयात
# हाडाचा ट्युमर असलेल्या १२ रुग्णांवर यशस्वी शस्त्रक्रिया
## अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. दीपक अग्रवाल यांच्या टीमचे उल्लेखनीय यश

जळगाव – शहरातील नामांकित डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात हाडाच्या ट्युमरने पीडित १२ रुग्णांवर यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली. ही शस्त्रक्रिया अस्थिरोग विभागाचे प्रमुख डॉ. दीपक अग्रवाल व त्यांच्या कुशल वैद्यकीय पथकाने केली. ग्रामीण भागातून आलेल्या अनेक रुग्णांना वेळीच निदान व उपचार मिळाल्यामुळे नवजीवन लाभले आहे. डॉ. अग्रवाल यांच्या नेतृत्वाखालील पथकाने केवळ शस्त्रक्रिया नव्हे तर उपचारापूर्वी तपासणी, निदान, शस्त्रक्रियेनंतरचा पुनर्वसन कार्यक्रमही अत्यंत नियोजनबद्ध रीतीने राबवला. या यशाबद्दल बोलताना डॉ. दीपक अग्रवाल म्हणाले, ग्रामीण आणि दूरदूरच्या भागातील रुग्णांना अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा देण्याचे आमचे ध्येय आहे. आमच्या टीमने मेहनतीने काम केल्यामुळे आज १२ रुग्ण पुन्हा चालू लागले, याचा आम्हाला आनंद आहे. हाडांचे ट्युमर असलेल्या रुग्णांसाठी डॉ. उल्हास पाटील रूग्णालय हे नवसंजीवनी ठरत आहे.

हाडांच्या गाठी दुर्मिळ असल्या तरी त्या दुर्लक्षित केल्यास जीवघेण्या ठरू शकतात. अंगांचे कार्य टिकवून ठेवण्यात आणि जगण्याचा दर सुधारण्यात लवकर निदान महत्त्वाची भूमिका बजावते, असे त्यांनी जोर देऊन सांगितले. कोणतीही सततची सूज किंवा अस्पष्ट हाडांची वेदना दुर्लक्षित करू नये – त्वरित वैद्यकीय मदत घ्या. सौम्य आणि घातक हाडांच्या जखमांचा लवकर शोध घेण्यासाठी जागरूकता आणि वेळेवर इमेजिंग करणे महत्त्वाचे आहे. ऑर्थोपेडिक्स विभाग जनतेला जागरूकता पसरवण्याचे आणि हाडांच्या आरोग्याला प्राधान्य देण्याचे आवाहन करतो.



डॉ. दिपक अग्रवाल
ऑर्थोपेडिक्स प्रमुख

### असे आहेत शस्त्रक्रिया झालेले रूग्ण

१) शेगाव येथील **शिवानी ठाकरे** या १८ वर्षीय तरूणीला राइट डिस्टल फिमर जायंट सेल ट्यूमर या आजाराचे निदान करण्यात आले. या तरूणीवर एक्स्टॅन्डेड क्युरेटाज ॲण्ड बोन ग्राफ्टींगची शस्त्रक्रिया यशस्वीरित्या करण्यात आली.



२) जळगाव येथील **दर्शिल भारंबे** या १८ वर्षीय तरूणाला राइट डिस्टल फिमर लॅटरल ऑस्टिओकॉन्ड्रोमा या आजाराचे निदान करण्यात आले. त्याच्यावर एन ब्लॉक रिसेक्शनची शस्त्रक्रिया यशस्वीरित्या करण्यात आली.



३) खामगाव येथील २६ वर्षीय **अमोल सोलंके** या रूग्णास राइट डिस्टल अल्ना एन्युरसिमल बोन सिस्टचे निदान करण्यात आले. त्याच्यावर सौव कपांजी प्रक्रिया ही शस्त्रक्रिया यशस्वी करण्यात आली.



४) जळगाव येथील २५ वर्षीय **भारत बारेला** याला लेफ्ट प्रॉक्सिमल अल्ना ऑस्टिओइड ऑस्टियोमा या आजाराचे निदान करण्यात आले. त्याच्यावर एन ब्लॉक रिसेक्शन ही शस्त्रक्रिया करण्यात आली.



५) यावल येथील १८ वर्षीय **कमलेश पाटील** या रूग्णाला लेफ्ट प्रॉक्सिमल टिबिया ऑस्टिओइड ऑस्टियोमा या आजाराचे निदान करण्यात आले. त्याच्यावर एन ब्लॉक रिसेक्शन ही शस्त्रक्रिया यशस्वीरित्या करण्यात आली.



६) भुसावळ येथील १७ वर्षीय **कुणाल जाधव** याला लेफ्ट ह्युमरस हेड कोंड्रोब्लास्टोमा आजाराचे निदान करण्यात आले. त्याच्यावर एक्सीजन बायोप्सी ही शस्त्रक्रिया करण्यात आली.



७) मुंबई येथील ४० वर्षीय **शांताराम बाविस्कर** यांना राइट डिस्टल फिमर जायंट सेल ट्युमर या आजाराचे निदान करण्यात आले. त्यांच्यावर क्युरेटाज ॲण्ड बोन ग्राफ्टिंगची शस्त्रक्रिया यशस्वी करण्यात आली.



८) जळगाव येथील ३७ वर्षीय **शरद सोनवणे** यांना राइट डिस्टल फिमर ऑस्टिओसारकोमा या आजाराचे निदान करण्यात आले. त्यांच्यावर ट्यूमर रिसेक्शन आणि टोटल क्नी आर्थ्रोप्लास्टी विथ मेगा–प्रोस्थेसिस ही शस्त्रक्रिया यशस्वी करण्यात आली.



९) २२ वर्षीय **भूषण तायडे** यास राइट डिस्टल रेडियस जायंट सेल ट्यूमर या आजाराचे निदान करण्यात आले. त्याच्यावर क्युरेटाज ॲण्ड बोन ग्राफ्टींगची शस्त्रक्रिया यशस्वी करण्यात आली.



१०) भुसावळ येथील २२ वर्षीय **लोकेश वारके** या रूग्णास राइट प्रॉक्झीमल टिबीया ऑस्टीओ मायलाइटीस (गॅरिज सक्लेरोझिंग ऑस्टीओ मायलाइटीस) या आजार असल्याचे निदान करण्यात आले. त्याच्यावर क्युरेटाज ही शस्त्रक्रिया यशस्वी करण्यात आली.



११) ३६ वर्षीय **सुरेन्द्र सावळे** यांना राइट थंब एन्कोन्ड्रोमा प्रॉक्सिमल फॅलिंक्स हा आजार झाल्याचे निदान करण्यात आले. त्यांच्यावर क्युरेटाज ही शस्त्रक्रिया यशस्वी करण्यात आली.



१२) भुसावळ येथील २५ वर्षीय **प्रफुल पाटील** या तरूणाला फायब्रस डिस्प्लेसिया विथ पॅथॉलॉजिकल फ्रॅक्चर्स ऑफ लेफ्ट अल्ना ॲण्ड लेफ्ट ह्युमरस या आजाराचे निदान करण्यात आले. त्याच्यावर ओपन रिडक्शन विथ इंटरनल फिक्सेशन ही शस्त्रक्रिया करण्यात आली.



# हृदयविकाराचा त्रास असलेल्या महिलेची सुखरूप प्रसूती
## डॉ. उल्हास पाटील रुग्णालयात यशस्वी सिझेरियन



जळगाव : हृदयविकारासारख्या गंभीर आजाराने त्रस्त असतानाही मातृत्वाच्या प्रवासात धैर्याने पाऊल टाकणाऱ्या प्रतिक्षा पवार या महिलेची सुखरूप प्रसूती यशस्वीपणे करण्यात आली आहे. जळगाव येथील डॉ. उल्हास पाटील मेडिकल कॉलेज व हॉस्पिटलमध्ये स्त्रीरोग व हृदयरोग तज्ज्ञांच्या अनुभवी टीमने मिळून ही जटिल सिझेरियन शस्त्रक्रिया पार पाडली. आई व नवजात बाळ दोघेही आता सुखरूप आहेत, ही अत्यंत दिलासादायक बाब आहे.

जळगाव येथील प्रतिक्षा पवार या महिलेला हृदयविकाराचा त्रास होता. गर्भधारणेच्या सुरुवातीपासूनच ही परीस्थिती त्यांच्या गर्भावस्थेवर परिणाम करत होते. डॉक्टरांनी दिलेल्या माहितीनुसार, गर्भावस्थेच्या शेवटच्या टप्प्यात त्यांच्या पोटातील पाणी कमी झाले होते, बाळाची वाढ अपूर्ण होती, तसेच त्याचे वजन देखील अत्यल्प होते. यामुळे ही प्रसूती अतिजोखमीची ठरू शकत होती.

अशा आव्हानात्मक परिस्थितीत देखील डॉक्टरांनी धैर्याने आणि तांत्रिक कौशल्याने सिझेरियन ऑपरेशन करण्याचा निर्णय घेतला.

हृदयविकार असलेल्या गरोदर महिलांची प्रसूती ही मोठी वैद्यकीय जोखीम असते. गर्भवतीच्या हृदयाची कार्यक्षमता मर्यादित असते आणि सिझेरियनसारख्या शस्त्रक्रियेमध्ये अधिक काळजी घ्यावी लागते. अशा परिस्थितीत अत्यंत काटेकोर नियोजन, विविध तज्ज्ञांचा सुसंवाद, योग्य उपचार व वेळेवर निर्णय हेच यशाचे मुख्य कारण ठरले.

– डॉ. हंसिया पिल्लई, निवासी डॉक्टर



### टीमचे प्रयत्न फळाला

डॉ. उल्हास पाटील रूग्णालयातील स्त्रीरोग विभागाच्या प्रमुख डॉ. माया आर्विकर यांच्या मार्गदर्शनाखाली तज्ज्ञ डॉ.वैभव पाटील, हृदयरोगतज्ज्ञ डॉ. वैभव पाटील, बालरोगतज्ज्ञ डॉ. अनुजा चलाख, डॉ. हंसिया पिल्लई, डॉ. मृदुला मुंगसे, डॉ. करूणेश गुप्ता यांच्यासह अनुभवी नर्सिंग आणि ॲनेस्थेसिया डॉ. महाजन यांच्या टीमने समन्वय साधत महिलेच्या हृदयाची तपासणी करून सिझेरीयनद्वारे प्रसूती सुखरूप केली. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे बाळाचे जन्मावेळीचे वजन जरी कमी असले तरी ते स्थिर असून बाळाला तातडीने नवजात अतिदक्षता विभागात (NICU) दाखल करण्यात आले. बाळाची प्रकृती स्थिर आहे. नवजात शिशु तज्ज्ञ डॉ. सुयोग तन्नीरवार यांच्यासह टीमने नवजात शिशूच्या प्रकृतीवर नियंत्रण ठेवले.

# ईश्वरीकार्याचे बाळकडू देणाऱ्या मातृत्वाला नमन
## गुरूपौर्णिमेनिमित्त डॉ.उल्हास पाटील यांनी घेतले गोदावरी आजींचे आशीर्वाद



जळगाव – आरोग्यसेवा म्हणजे ईश्वरी सेवा. या ईश्वरी सेवेचे बाळकडू पाजणाऱ्या गोदावरी परीवाराच्या आधारस्तंभ गोदावरी आजी यांना गुरूपौर्णिमेनिमित्त माजी खा. डॉ. उल्हास पाटील आणि डॉ. वर्षा पाटील यांनी नमन करीत त्यांचे आशीर्वाद घेतले.

गुरूपौर्णिमेचे औचित्य साधून डॉ. उल्हास पाटील आणि डॉ. वर्षा पाटील यांनी गोदावरी आजींचे मातृपूजन केले. यावेळी गोदावरी आजींनीही डॉ. उल्हास पाटील आणि डॉ. वर्षा पाटील यांच्या मस्तकावर हात ठेवत समाजकार्य अविरतपणे हातून घडो असा आशीर्वाद दिला. अत्यंत भावनिक क्षण असलेल्या या कार्यक्रमप्रसंगी कुटूंबातील सदस्यही उपस्थित होते. डॉ. उल्हास पाटील यांनी आई गोदावरी पाटील यांना गुरू मानले असून दरवर्षी नित्यनेमाने गुरूपौर्णिमेला त्यांना वंदन केले जाते.

## संपादकीय

# म... मराठीचा

मराठी ही केवळ एक भाषा नसून ती आपल्या संस्कृतीचा, इतिहासाचा आणि अस्मितेचा अमूल्य ठेवा आहे. ज्या मातीत जन्म घेतला, जिथे आपले संस्कार रुजले, ती भाषा म्हणजे आपली मायबोली. आजच्या जागतिकीकरणाच्या युगात अनेक परकीय भाषा व विचारसरणी आपल्या जीवनशैलीवर प्रभाव टाकत आहेत. अशा वेळी आपल्या मातृभाषेचे महत्त्व अधोरेखित करणे, तिच्या संवर्धनासाठी जागरूक राहणे ही काळाची गरज आहे.मराठी भाषेचा इतिहास हजारो वर्षांचा आहे. संत तुकाराम, ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ या संतांनी या भाषेतून भक्तीचा महान प्रवाह घडवला. शिवरायांनी मराठीला राजभाषेचा दर्जा दिला आणि स्वराज्याची भाषा बनवली. त्या काळात मराठीने स्वाभिमान आणि स्वातंत्र्याची भावना जागवली. ज्ञानेश्वरीसारखे ग्रंथ आजही ग्रामीण भागात तोंडपाठ आहेत. यावरूनच मराठी भाषेची गोडी आणि तिची प्रगल्भता लक्षात येते.परंतु आजच्या परिस्थितीकडे नजर टाकली, तर मराठीच्या भवितव्याबाबत चिंता वाटावी अशी स्थिती आहे. शहरी भागात इंग्रजीचे वर्चस्व प्रस्थापित झाले आहे. पालक आपल्या मुलांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेत घालण्यासाठी धडपडताना दिसतात. त्यामध्ये चुकीचे काही नाही, पण त्याबरोबरच मराठी भाषेकडे दुर्लक्ष होत आहे. अनेक मुले मराठीत नीट संवादही साधू शकत नाहीत. ही बाब अत्यंत चिंताजनक आहे.शिक्षण हा कोणत्याही समाजाच्या प्रगतीचा मुख्य आधारस्तंभ आहे. आज राज्यातील बहुतांश महाविद्यालये, विद्यापीठे इंग्रजी माध्यमातूनच शिक्षण देतात. त्याचा परिणाम असा की, मराठीतील उच्चशिक्षणाचा दर्जा ढासळतो आहे. विज्ञान, तंत्रज्ञान, अर्थशास्त्र, कायदा अशा अनेक विषयांवर मराठीत दर्जेदार साहित्य उपलब्ध नाही. त्यामुळे विद्यार्थी मराठीला दुय्यम लेखतात. शासनाच्या धोरणातही या बाबतीत गंभीरतेचा अभाव दिसतो.मात्र, मराठीचा गौरव टिकवायचा असेल, तर यासाठी शासन, समाज आणि प्रत्येक नागरिकाने सामूहिक जबाबदारी स्वीकारली पाहिजे. सर्वप्रथम, मराठी भाषेला अभिमानाने वापरण्याची सवय प्रत्येकाने लावून घेतली पाहिजे. आपल्या घरी, कार्यालयात, दुकानी मराठीचा वापर वाढवायला हवा. मराठीला केवळ साजरे करण्याची गोष्ट न मानता, तिचा रोजच्या व्यवहारात वापर करणे हेच खरे तिचे जतन आहे. भाषेचा वापर जितका वाढेल, तितकी ती समृद्ध होईल.मराठी ही आपली ओळख आहे, आपली शान आहे. जशी एखाद्याला आपल्या आईचा अभिमान असतो, तसाच अभिमान आपल्याला मराठीचा असला पाहिजे. परकीय भाषांचे महत्त्व मान्य करतानाही आपण आपल्या मातृभाषेला विसरू नये. कारण जी भाषा आपल्या मनातील भावना शब्दात उतरवते, जी भाषा आपल्याला माणूस म्हणून घडवते, तीच खरी आपली भाषा असते.

# मुरुमांसाठी फेसवॉश वापरताय? पण त्याने मुरुम वाढत नाहीयेत ना?

आजकालच्या तरुणांमध्ये त्वचेविषयी जागरूकता मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. सौंदर्यविषयक उत्पादने, यूट्यूब रील्स, सोशल मिडिया इन्फ्लुएन्सर्स यामुळे अनेकजण वेगवेगळ्या प्रकारचे फेसवॉश वापरताना दिसतात. विशेषतः मुरुम असलेल्या त्वचेसाठी सालिसिलिक ॲसिड युक्त फेसवॉश खूपच लोकप्रिय झाले आहेत. सालिसिलिक ॲसिड हे त्वचेमधील खोल छिद्रांमध्ये जाऊन साचलेले तेल व मृत पेशी काढून



## सौंदर्याच्या गुजगोष्टी

**डॉ. तेजस्विनी राहूल फाटे**
**त्वचा विकार विभाग**

टाकते. त्यामुळे ब्लॅकहेड्स, व्हाईटहेड्स आणि मुरुम कमी होण्यास मदत होते.

परंतु हल्ली अनेकजण हे फेसवॉश दिवसातून तीन–चार वेळा वापरू लागले आहेत किंवा त्यासोबत इतर ॲसिडयुक्त उत्पादने एकत्र वापरत आहेत. याचा परिणाम म्हणून त्वचा कोरडी, ताणलेली आणि संवेदनशील बनते. काहींना लालसरपणा, खाज, खवखव, किंवा त्वचा सोलल्यासारखी लक्षणे जाणवू लागतात. इतकंच नाही तर कोरडेपणामुळे त्वचेला आपलं संरक्षण टिकवण्यासाठी अधिक तेल तयार करावं लागतं, आणि परिणामी मुरुम परत वाढण्याची शक्यता वाढते.

सालिसिलिक ॲसिडचा उपयोग करताना संयम ठेवणं अत्यावश्यक आहे. दिवसातून एकदा किंवा फारतर दोनदाच वापरणं योग्य आहे. जर त्वचा कोरडी वाटत असेल तर एक दिवसाआड वापर करणं अधिक चांगलं. फेसवॉशचे प्रमाण ०.५ टक्के ते २ टक्क्यांपर्यंत मर्यादित असावं. फेसवॉश वापरल्यानंतर त्वचेला सौम्य मॉइश्चरायझर लावणं आणि बाहेर जाताना सन्स्क्रीन वापरणं हे अत्यंत महत्त्वाचं आहे.



मुरुमांचं नियंत्रण मिळवण्यासाठी अनेकजण स्वतःहून उत्पादनं बदलत राहतात, पण त्यामुळे उलट त्रास वाढू शकतो. त्यामुळे आपल्या त्वचेचा प्रकार ओळखून, डॉक्टरांचा सल्ला घेऊनच उत्पादन निवडणं अधिक सुरक्षित ठरतं. 'जास्त वापर म्हणजे जास्त परिणाम' असा गैरसमज ठेऊ नका. प्रत्येकाची त्वचा वेगळी असते, तिची गरज आणि प्रतिक्रिया यानुसार उपचार ठरवले पाहिजेत. योग्य प्रमाणात आणि योग्य पद्धतीने वापरल्यास सालिसिलिक ॲसिड खरोखरच मुरुमांवर प्रभावी ठरते, पण अतिरेक केल्यास तीच गोष्ट त्रासदायक ठरू शकते.



## सेवा का अभियानास प्रतिसाद

**भराडी ता.जामनेर – येथे ग्रा.प कार्यालय आणि डॉ.उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालयाच्या सयुक्त विद्यमाने सेवा का अभियानाचे आयोजन करण्यात आले होते.**

अभियानात तज्ञ डॉक्टरांनी ५४ नागरिकांची आरोग्य तपासणी केली. यातील यातील नेत्ररोग ०२,मेडीसिन ०१,कान नाक घसा ०२ आणि हदयरोग डी इको ०३ अशा ८ नागरिकांना पुढील उपचाराची गरज असल्याने रूग्णालयात येणेबाबत मार्गदर्शन करण्यात आले.



## सोनारीत शिबिरास प्रतिसाद

**सोनारी ता जामनेर – येथे डॉ.उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालयाच्या सयुक्त विद्यमाने आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.** या मेळाव्यात तज्ञ डॉक्टरांनी ५८ नागरिकांची तपासणी केली. यातील यातील मेडीसिन ०१, अस्थीरोग ०२ आणि नेत्ररोग ०३ अशा ०६ नागरिकांना पुढील उपचाराची गरज असल्याने रूग्णालयात येणेबाबत मार्गदर्शन करण्यात आले.



## नशिराबादेत नेत्र तपासणी

**नशिराबाद – डॉ.उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालय आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या सयुक्त विदयमाने नशिराबादेत आषाढी एकादशीनिमीत्त वारक यांची नेत्रतपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.** यावेळी नेत्ररोग तज्ञांनी ११२ नागरिकांची नेत्र तपासणी केली यातील १४ नागरिकांना पुढील उपचाराची गरज असल्याने मार्गदर्शन करण्यात आले.



## खुपता, ता.सिल्लोड येथे आरोग्य शिबिर

**खुपता ता. सिल्लोड – येथे ग्रा.प कार्यालय आणि डॉ.उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालयाच्या सयुक्त विद्यमाने सेवा का अभियानाचे आयोजन करण्यात आले होते.**

शिबिरात तज्ञ डॉक्टरांनी ६१ नागरिकांची आरोग्य तपासणी केली यात अस्थिरोग ०१, स्त्रीरोग ०२, कान नाक घसा ०१ आणि नेत्ररोग ०३ अशा ७ नागरिकांना पुढील उपचाराची गरज असल्याने रूग्णालयात येणेबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

## पालमध्ये आरोग्य मेळा

**पाल ता. रावेर – डॉ.उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालयाच्या सयुक्त विद्यमाने दि ९ व १० जूलै रोजी आरोग्य मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.** यावेळी परिसरातील नागरिकांची मोठ्या प्रमाणात उपस्थित होती.

या मेळाव्यात तज्ञ डॉक्टरांनी ८६ नागरिकांची आरोग्य तपासणी केली. यातील ७ नागरिकांना पुढील उपचाराची गरज असल्याने रूग्णालयात येणेबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

# विद्युत अभियांत्रिकीतील नवे ट्रेंड्स

**आजच्या युगात दैनदीन जीवनात नवनवीन संधी व आव्हाने निर्माण होत आहेत. आजच्या घडीला खालील काही महत्त्वाचे ट्रेंड्स विद्युत अभियांत्रिकीत पाहायला मिळत आहेत.**

**१. स्मार्ट ग्रिड (Smart Grid) तंत्रज्ञान**

पारंपरिक वीजपुरवठा प्रणालीपेक्षा स्मार्ट ग्रिड अधिक कार्यक्षम, विश्वसनीय आणि स्वयंचलित आहे. स्मार्ट ग्रिडमध्ये इंटरनेट ऑफ थिंग्ज (IoT), सेन्सर, आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) चा वापर करून वीज नियंत्रित करता येते. इलेक्ट्रिकल अभियांत्रिकीमधील ही तंत्रज्ञान अक्षय ऊर्जा स्रोत आणि साठवण तंत्रज्ञानांना अधिक शाश्वत ऊर्जा पुरवठा प्रदान करण्यास देखील अनुमती देते.

**मायक्रोग्रिड**

मायक्रोग्रीडमध्ये ‘‘आंतरकनेक्ट केलेले भार आणि वितरित विद्युत अभियांत्रिकी हे एक सतत विकसित होणारे क्षेत्र आहे. सोप्या भाषेत सांगायचे तर, मायक्रोग्रिड हे स्वयंपूर्ण ऊर्जा स्रोत आहेत जे लहान, समुदाय-आधारित क्षेत्रांसाठी वीज प्रदान करतात

**२. नवीन आणि अक्षय ऊर्जा स्त्रोतांचा वापर**

सौर उर्जा, पवन उर्जा, जलविद्युत इत्यादी अक्षय उर्जा स्त्रोतांचा वापर झपाट्याने वाढत आहे. विद्युत अभियंत्यांची गरज या प्रणालींच्या डिझाइन, स्थापना आणि देखभालीसाठी वाढली आहे.

**३. इलेक्ट्रिक वाहने**

इलेक्ट्रिक वाहनांची मागणी वाढत असल्यामुळे एत चार्जिंग स्टेशनची यंत्रणा, बॅटरी व्यवस्थापन प्रणाली आणि पॉवर इलेक्ट्रॉनिक्समध्ये विशेष प्रगती झाली आहे.

**४. ऑटोमेशन आणि औद्योगिक खेढ**


औद्योगिक प्रकल्पांमध्ये स्वयंचलित यंत्रणा आणि खेढ उपकरणांचा वापर करून उत्पादनक्षमता वाढवली जाते. PLC (Programmable Logic Controller) आणि SCA¦A यंत्रणांचा वापर प्रचंड प्रमाणात वाढला आहे.

**नवोपक्रमासाठी वाव**

नियमित देखभाल आणि अद्यतनांसाठी आयओटी ज्ञानाव्यतिरिक्त, इलेक्ट्रिकल अभियांत्रिकी मधील या ट्रेंडमध्ये नावीन्यपूर्णतेची प्रचंड क्षमता आहे.

**सुधारणेसाठी वाव**

ग्राहकांना अपेक्षित असलेले मानक कनेक्शन असले तरी, सुधारणेसाठी नेहमीच वाव असतो. 4G ते 5G पर्यंतच्या अपग्रेडचा विचार करा. , IoT ने इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगमध्ये अनेक मार्गांनी नावीन्य आणले आहे, जसे की खालील: स्मार्ट घरे, स्मार्ट




शहरे, औद्योगिक ऑटोमेशन, स्मार्ट मीटर, घरातील ऊर्जा साठवण प्रणाली.इलेक्ट्रॉनिक्सच्या भविष्यात इंटरनेट कनेक्शनची आवश्यकता वाढत असताना, IoT हा एक इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग ट्रेंड आहे जो लवकरच कधीही बंद होणार नाही.

**५. ऊर्जा संचय प्रणाली**

(Energy Storage Systems)

ऊर्जा साठवण्यासाठी प्रगत बॅटरी सोल्युशन्स (जसे की लिथियम-आयन बॅटरी), सुपरकॅपेसिटर आणि फ्लो बॅटरी विकसित केली जात आहेत. हे सोल्युशन्स ऊर्जा वितरण अधिक स्थिर आणि विश्वासार्ह करतात.

**६. कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि मशीन लर्निंग**

वीजवितरणातील समस्या ओळखणे, देखभाल भाकीत करणे आणि वीज वापराचा विश्लेषण करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मशीन लर्निंगचा वापर वाढत आहे.

**७. स्मार्ट घरे आणि ऊर्जा कार्यक्षम उपकरणे**

स्मार्ट होम्समध्ये ऊर्जा बचतीसाठी विद्युत उपकरणे इंटरनेटशी जोडलेली असतात. स्मार्ट मीटर्स, लाइटिंग कंट्रोल सिस्टीम्स, आणि क्तअउ व्यवस्थापन यात सुधारणा केली जात आहे.

Wireless Power Transmission

थोडक्यात, वायरलेस पॉवर ट्रान्सफर (WPT), ज्याला वायरलेस एनर्जी ट्रान्सफर असेही म्हणतात, ते इंटरकनेक्टिंग वायर्सचा वापर न करता पॉवर सोर्सपासून रिसीव्हरपर्यंत विद्युत उर्जेचे प्रसारण आहे. थझढ सिस्टीम ऊर्जा प्रसारणासाठी वेळेनुसार बदलणारे इलेक्ट्रोमॅग्नेटिक फील्ड वापरतात. या सिस्टीम वायरलेस कम्युनिकेशन डिव्हाइसेस सारख्याच फील्ड आणि लहरींमधून प्रवास करतात. मूलतः, डिव्हाइस मधील रिसीव्हर पॉवर उचलतो, ज्यामुळे कॉन्टॅक्टलेस चार्जिंग, पॉवरिंग आणि डेटा कम्युनिकेशन शक्य होते.

**निष्कर्ष:**

विद्युत अभियांत्रिकी क्षेत्रात तंत्रज्ञानाच्या मदतीने क्रांतिकारी बदल होत आहेत. या ट्रेंड्समुळे या क्षेत्रात कार्यरत अभियंत्यांना नव्या संधी, ज्ञान आणि कौशल्यांची गरज निर्माण झाली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी व अभियंत्यांनी सतत नवे कौशल्य आत्मसात करणे आवश्यक ठरत आहे.



**प्रा.डॉ. अतुल अ. बऱ्हाटे**
**विद्युत अभियांत्रिकी विभाग, गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालय,जळगाव**

Editor : Sourabh Patil (Reg. Newspaper) Weekly Godavari Parivar : Owner, Publisher, Printer : Dr. Mrs. Varsha Patil printed at Subhash Printers, 38, Trimbak Nagar, Near Shakuntala Rane Primary School, Beside Narayani Park Apartment, Mahabal Area, Jalgaon 425002 (Mah.) Godavari Hospital, Released at Jalgaon, Near Bhaskar Market. Phone no. 2221834/35, & Posted from Jalgaon Main Post Office. Should be sent to this email for publication of news in the issue (Editors do not necessarily agree with the views published in the issue.)

संपादक : सौरभ पाटील (रजि. न्युजपेपर) साप्ताहिक गोदावरी परिवार : मालक, प्रकाशक, मुद्रक : डॉ. सौ. वर्षा पाटील यांनी सुभाष प्रिंटर्स, ३८, त्र्यंबक नगर, शकुंतला राणे प्रायमरी स्कूलजवळ, नारायणी पार्क अपार्टमेंट शेजारी, महाबळ एरिया, जळगांव ४२५००२ (महा.) येथे छापून गोदावरी हॉस्पीटल, भास्कर मार्केट जवळ, जळगांव फोन नं. २२२१८३४/३५ येथे प्रसिद्ध करुन जळगाव मुख्य डाक कार्यालय येथून निर्गमित केले. अंकात बातम्या प्रसिध्द करण्यासाठी या ईमेलवर पाठवाव्यात. Email : godavari.parivar@gmail.com (अंकात प्रकाशित झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

### गोदावरी अभियांत्रिकी कॉलेजच्या विद्यार्थ्यांकडून

# स्वयंचलित सोलर पॅनल क्लिनर रोबोची निर्मिती

**जळगाव – गोदावरी फाउंडेशन संचलित, गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालय, जळगाव येथील अंतिम वर्ष यांत्रिक अभियांत्रिकी शाखेच्या विद्यार्थ्यांनी ‘‘पूर्णपणे स्वयंचलित ऑर्डिनो संचालित सोलर पॅनल क्लिनर रोबो‘‘ हे नाविन्यपूर्ण प्रकल्पाचे यशस्वी डिझाईन व निर्मिती केली आहे.**

हा प्रकल्प प्रा. मयूर पी. ठाकूर आणि प्रा. किशोर एम. महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण करण्यात आला.तुषार पाटील, वैभव पाटील, यद्रेश ठाकरे आणि निरज नारखेडे या विद्यार्थ्यांनी सौरऊर्जेच्या क्षेत्रातील एक महत्त्वाचा प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला. सोलर पॅनलवर धूळ व मळ साचल्यामुळे निर्माण होणारी कार्यक्षमतेत घट होते. त्यांनी



तयार केलेला हा रोबो ऑर्डिनो प्रोग्रामिंगच्या सहाय्याने पूर्णपणे स्वयंचलित आहे, जो कोणत्याही मानवी हस्तक्षेपाशिवाय सोलर पॅनल स्वच्छ करतो, आणि त्यामुळे जास्तीत जास्त सूर्यप्रकाश पॅनेलवर पडून ऊर्जा निर्मिती वाढते.या रोबोटमध्ये सेन्सर्स आणि मोटर यंत्रणांचा वापर करण्यात आला आहे, ज्यामुळे तो मोठ्या क्षमतेच्या व रिमोट सोलर प्रकल्पांसाठी उपयुक्त ठरतो. यामुळे वेळ आणि मनुष्यबळाची बचत होते, तसेच नवीकरणीय (रिन्यूएबल) ऊर्जा उपक्रमांना चालना मिळते.प्रोजेक्ट प्रात्यक्षिकाच्या वेळी (व्हाईस चेअर, एएसएम इंडिया नॅशनल कौन्सिल) तसेच सुबोध मटेरियल टेक्नॉलॉजीस्ट, मुंबई चे संचालक सुधाकर बोंडे तसेच सोबत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील आणि यांत्रिक अभियांत्रिकी विभागप्रमुख प्रा. तुषार ए. कोळी उपस्थीत होते. त्यांनी विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाचे कौतुक करताना, त्यांनी विद्यार्थ्यांच्या तांत्रिक कौशल्याचे आणि कल्पकतेमूळे अशा नाविन्यपूर्ण प्रकल्पांमुळे टिकाऊ ऊर्जा उपाययोजनांना हातभार लागतो, असे मत व्यक्त केले. या प्रकल्पामुळे गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे इनोवेशन चे विचार व व्यावहारिक तांत्रिक कौशल्य समोर आले आहे. तसेच, भारतात स्वच्छ आणि कार्यक्षम सौरऊर्जा उपाययोजनांच्या गरजेला उत्तर देण्यासाठी या प्रकल्पाचा उपयोग होऊ शकतो.विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल गोदावरी फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. उल्हास पाटील, डॉ. वर्षा पाटील (सचिव), डॉ. केतकी पाटील (सदस्य) डॉ. वैभव पाटील (डीएम कार्डिओलॉजिस्ट) व डॉ. अनिकेत पाटील यांनी कौतुक केले.



जळगाव येथील जी.एम.फाऊंडेशनमध्ये प्रतिमापूजन

# जेष्ठ विचारवंत रामभाऊ म्हाळगी यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन

जळगाव – राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रचारक, जनसंघ या राजकीय पक्षाचे महाराष्ट्राचे पहिले सरचिटणीस आणि पक्षाचे विधानसभेतील पहिले आमदार होऊन गेलेले जेष्ठ विचारवंत रामभाऊ म्हाळगी यांचा जयंती दिनानिमित्त जळगाव शहरातील भाजप कार्यालय, जी एम फाऊंडेशन येथे बुधवार दिनांक ९ जुलै रोजी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी भाजपा महिला मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष डॉ केतकी ताई पाटील, माजी महापौर सीमाताई भोळे, रेखाताई वर्मा यांनी रामभाऊ म्हाळगी यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करून अभिवादन केले. यावेळी रामभाऊ म्हाळगी यांनी पक्षासाठी केलेल्या कार्याचे स्मरण करण्यात आले. यावेळी उदयजी भालेराव, संजयजी शिंदे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



## डॉ. प्रेमचंद पंडित
(९४२२९१५३७९)
(निवृत्त सिव्हील सर्जन, बुलडाणा)
वैद्यकीय अधीक्षक
डॉ.उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय, जळगाव

1. It requires patience, persistence, and a genuine commitment to contributing value in your work.
2. Specializing allows you to stand out and become known for a particular expertise.
3. Analyze and synthesize concepts and offer innovative solutions to problems.
4. Offer real value, be consistent and contribute to the growth.
5. Share insights, offer unique perspective and influence through knowledge and vision.
6. Reflect on your experiences and insights and present them in a way that challenges conventional wisdom.
7. Anticipate trends and future developments while consistently producing valuable content.

✻ यह कार्य में मूल्य जोड़ने के लिए धैर्य, निरंतरता और सच्ची प्रतिबद्धता की आवश्यकता होती है।
✻ विशेषज्ञता आपको अलग पहचान दिलाने और किसी विशेष क्षेत्र में प्रसिद्ध बनने की अनुमति देती है।
✻ अवधारणाओं का विश्लेषण और संश्लेषण करें और समस्याओं के लिए नवोन्मेषी समाधान प्रस्तुत करें।
✻ वास्तविक मूल्य प्रदान करें, निरंतर बने रहें और विकास में योगदान दें।
✻ अंतर्दृष्टि साझा करें, अनोखा दृष्टिकोण रखें और ज्ञान व दृष्टि के माध्यम से प्रभाव डालें।
✻ अपने अनुभवों और अंतर्दृष्टियों पर विचार करें और उन्हें इस प्रकार प्रस्तुत करें जो पारंपरिक सोच को चुनौती दे।
✻ रुझानों और भविष्य के विकास का पूर्वानुमान लगाएँ, साथ ही लगातार मूल्यवान सामग्री का निर्माण करें।

# गोदावरी कॉलेज ऑफ नर्सिंगमध्ये जनजागृती

**जळगाव – जळगाव येथे राष्ट्रीय सेवा योजना (एनएनएस युनिट) च्या माध्यमातून जागतिक लोकसंख्या दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या उपक्रमाचा उद्देश वाढती लोकसंख्या, तिचे आरोग्य व पर्यावरणावर होणारे परिणाम आणि शाश्वत विकासासाठी आवश्यक असलेले उपाय याविषयी जनजागृती करणे हा होता.**

कार्यक्रमाचे आयोजन गोदावरी फाउंडेशनद्वारे संचालित आणि एमयुएचएस नाशिकशी संलग्न असलेल्या नॅक मान्यताप्राप्त गोदावरी कॉलेज ऑफ नर्सिंग मध्ये करण्यात आले.कार्यक्रमाची सुरुवात एनएनएस कार्यक्रम अधिकारी यांच्या प्रास्ताविकाने झाली, ज्यामध्ये त्यांनी लोकसंख्येच्या सध्याच्या स्थितीबाबत विवेचन करताना संतुलित लोकसंख्येचे आरोग्य, सामाजिक आणि आर्थिक विकासावर होणारे सकारात्मक परिणाम अधोरेखित केले. यानंतर दोन प्रमुख उपक्रम राबवण्यात आले – आरोग्य जनजागृती सत्र आणि निबंध लेखन स्पर्धा.आरोग्य जनजागृती सत्रात एनएनएस स्वयंसेवकांनी कुटुंब नियोजन, प्रजनन आरोग्य, मातृ व ालकल्याण आणि जनसंख्या नियंत्रणाच्या उपाययोजनांवर सखोल माहिती दिली. सत्रात पोस्टर प्रदर्शन, चार्ट्स, माहितीपर व्याख्याने आणि संवादात्मक चर्चांद्वारे उपस्थितांचे लक्ष वेधण्यात आले. विशेषतः महिलांच्या आरोग्यासाठी साक्षरता व माहितीची भूमिका स्पष्ट करण्यात आली. स्वयंसेवकांनी आरोग्य आणि लोकसंख्येचा परस्पर संध प्रभावीपणे मांडला.निबंध लेखन स्पर्धेत विद्यार्थ्यांनी लोकसंख्या वाढ आणि शाश्वत विकास तसेच युवावर्गाची भूमिका लोकसंख्या नियंत्रणात या विषयांवर लेखन केले. या स्पर्धेद्वारे विद्यार्थ्यांना आपले विचार मांडण्याची संधी मिळाली आणि लोकसंख्या विषयक समज विस्तृत करण्यास प्रोत्साहन मिळाले. काही उत्कृष्ट निबंध निवडून त्यांचे वाचनही करण्यात आले.या कार्यक्रमाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जबाबदारीची भावना रुजली आणि त्यांनी




सार्वजनिक आरोग्य विषयक मुद्यांमध्ये प्रत्यक्ष सहभाग घेतला. मी नाही पण तू या ब्रीदवाक्याशी सुसंगत अशी सामूहिक जबाबदारीची भावना यामध्ये दिसून आली. जागतिक लोकसंख्या दिनाचे हे आयोजन हे एक यशस्वी, मार्गदर्शक आणि प्रेरणादायी पाऊल ठरले.

**समुदाय आरोग्यावर धोरणात्मक बदलांवर**

येथील समुदाय आरोग्य विभागाच्या वतीने समुदाय आरोग्यावर धोरणात्मक बदलांचा परिणाम (अलीकडील कायदे व त्याचा प्रभाव) या विषयावर एक वेबिनारातून जनजागृती करण्यात आली.

या साठी प्रिया दादाराव जाधव ( कम्युनिटी हेल्थ नर्सिंग), उपजिल्हा रुग्णालय माळीपूर येथे कार्यरत असलेले स्टाफ नर्स व सहा वर्षांचा अध्यापनाचा अनुभव असलेले मार्गदर्शक म्हणून उपस्थित होत्या.वेबिनारमध्ये नविन कायद्याचे आरोग्य सेवा प्रणालीवर होणारे परिणाम, धोरण बदलांची अंमलबजावणी आणि त्याचा जनतेच्या आरोग्यावर होणारा परिणाम यासारख्या विषयांवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी वेबिनारमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतला. वेबिनार ऑनलाईल माध्यमातून आयोजित करण्यात आले होते.कार्यक्रमाचे आयोजन विभाग प्रमुख आणि एनएसएस संयोजक यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

**सुरक्षित इंजेक्शन सराव**

**जळगाव** – या कार्यक्रमाच्या माध्यमातून नर्सिंगच्या विदयार्थ्यांना सुरक्षित सुई वापर, हात स्वच्छता, नीडल स्टिक इजा प्रतिबंध, आणि बायोमेडिकल वेस्ट मॅनेजमेंट यावर डॉ.उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालय तसेच गोदावरी नर्सिंगच्या प्रा. प्रियंका गाडेकर, प्रा. सुमैया शेख,प्रा सचिन पवार यांनी प्रात्यक्षीकव्दारे मार्गदर्शन केले. याचबरोबर वरील विषयास अनुसरून विद्यार्थ्यांनी पोस्टर सादरीकरण, भूमिका आणि प्रश्नमंजुषा स्पर्धांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.वन निडल,वन सिरींज ओन्ली वन टाईम या घोषवाक्यास अनुसरून इंजेक्शनचा एकदाच उपयोग करावा,रूग्णांना इंजेक्शन दयायच्या आधी व नंतर लक्षात ठेवायच्या विविध सुचना यावेळी प्रा. प्रियंका यांनी केल्यात.

**संघर्षातून संधीकडे प्रबोधन सत्र**

जळगाव गोदावरी नर्सिंग महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी संघर्षातून संधीकडे या विषयावर प्रबोधन सत्राचे आयोजन करण्यात आले.

हे सत्र नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० (छएझ २०२०) अंतर्गत विवाद निराकरण व संघर्ष व्यवस्थापन यावर केंद्रित होते.या चर्चासत्रात बालआरोग्य नर्सिंग विभाग, नागपूर येथील प्रा. कामीनी पिसे यांनी ऑनलाईन मार्गदर्शन केले. त्यांनी संवाद कौशल्य, सहानुभूती आणि सकारात्मक दृष्टिकोनाच्या माध्यमातून संघर्षाचे व्यवस्थापन कसे करावे आणि त्यातून संधी कशा निर्माण करता येतात याचे प्रभावी उदाहरणांसह मार्गदर्शन केले.

पुढे बोलतांना त्यांनी संघर्षाचे विविध प्रकार,पातळी संघर्ष टाळण्यासाठीच्या

### गोदावरी नर्सिंग महाविद्यालयाचा उपक्रम

# लैंगिक समानता व लोकसंख्या वाढीचा संसाधनांवर परिणामावर पॉडकास्टचे आयोजन

**जळगाव – गोदावरी नर्सिंग महाविद्यालयाच्या कम्युनिटी हेल्थ नर्सिंग विभागाच्या वतीने डॉ. केतकी पाटील सेमिनार हॉल येथे लैंगिक समानता व लोकसंख्या वाढीचा संसाधनांवर परिणामावर पॉडकास्टच्या माध्यमातून चर्चा करण्यात आली.**

या कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित असलेले गोदावरी आयएमआरचे संचालक डॉ. प्रशांत वारके तर निवेदीका म्हणून गोदावरी नर्सिंगच्या प्रा.दिवायना पवार या उपस्थीत होत्या.डॉ. वारके यांनी लैंगिक समानतेचे महत्त्व, समाजातील असमतोलाचे दुष्परिणाम आणि लोकसंख्यावाढीचा जागतिक संसाधनांवरील वाढता ताण यावर बौध्दीक चर्चा करण्यात आली. या पॉडकास्टच्या




माध्यमातून बौद्धिकता, सामाजिक जाणीव आणि परिवर्तनाची प्रेरणा यांचे मिश्रण दिसून आले. विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी यामध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवत सामाजिक समतेसाठी कार्य करण्याची प्रेरणा घेतली. दमदार निवेदन आणि तितकेच सडेतोड उत्तरांच्या माध्यमातून प्रश्नाची उकल करण्याचा प्रयत्न या पॉडकॉस्ट मधून करण्यात आला.

### डॉ. उल्हास पाटील इंग्लिश मीडियम स्कूलचा उपक्रम

# सर्जनशीलतेद्वारे साखरेच्या सेवनाबद्दल जागरूकता!

**भुसावळ – येथील डॉ. उल्हास पाटील इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये, विद्यार्थ्यांनी आगळया वेगळ्या आणि अर्थपूर्ण शुगर बोर्ड ॲक्टिव्हिटी मध्ये भाग घेत जंक फूड आणि कोल्ड्रिंक्सच्या हानिकारक परिणामांबद्दल जागरूकता पसरविण्यासाठी सजीव देखाव्याचे सादरीकरण केले.**



रंगीबेरंगी शुगर बोर्ड डिस्प्ले आणि विचार करायला लावणाऱ्या स्कीटद्वारे विद्यार्थ्यांनी जंक फूड आणि एरेटेड कोल्ड्रिंक्स आपल्या आरोग्याला कसे हानी पोहोचवू शकतात. ज्यामुळे लठ्ठपणा, मधुमेह, दात किडणे आणि इतर अनेक आरोग्य समस्या उद्भवू शकतात या उपक्रमातून संदेश देत ‘‘निरोगी अन्न हे जंक फूड नाही तर खरे ऊर्जा वाढविणारे आहे.!‘‘या उपक्रमाने विद्यार्थ्यांना निरोगी राहण्याच्या सवयी स्वीकारण्यास प्रोत्साहित केले समवयस्कांना दैनंदिन जीवनास स्मार्ट, पौष्टिक अन्न निवडी करण्यास प्रेरित केले.

या आगळया वेगळ्या उपक्रमाची चर्चा आज संपुर्ण भुसावळ तालुक्यात होत होती.

साप्ताहिक

RNI Regd. No.: MAHMAR/1999/7490

# गोदावरी परिवार




सवलतीचा पोष्ट रजि. नं. JAL/120/2024-2026

* वर्ष २६ वे * अंक ३० * सोमवार २८/०७/२०२५ * डाक ३०/०७/२०२५ * पाने – ४ * किंमत २ रुपये

* year 26 * issue 30 * monday : 28 / 07 / 2025 * post Dt. 30/ 07 / 2025

## ४५ वर्षीय महिलेच्या गर्भाशयातून दुर्बिण शस्त्रक्रियेने काढल्या १३ गाठी

### डॉ. उल्हास पाटील रुग्णालयात टीएलएच शस्त्रक्रिया यशस्वी

**जळगाव – गेल्या काही महिन्यांपासून सतत पोटदुखीचा त्रास आणि अंगावरून अधिक प्रमाणात जाणे यामुळ त्रस्त झालेल्या एका ४५ वर्षीय महिलेच्या गर्भाशयात अळेर तब्बल १३ गाठी होत्या. डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय रूग्णालयातील स्त्रीरोग तज्ज्ञांच्या कुशल मार्गदर्शनाखाली दुर्बिणीद्वारे सव्वा तास चाललेल्या टीएलएच शस्त्रक्रियेत ह्या गाठी यशस्वीरीत्या काढण्यात आल्या. ही शस्त्रक्रिया यशस्वी झाल्यामुळे संबंधित महिलेची प्रकृती आता स्थिर आहे.**



रुग्णासमवेत तज्ञ डॉक्टर आणि त्यांची टीम छायाचित्रात दिसत आहे. (छायाचित्र : नितीन नेवे)

याबाबत माहिती अशी की, जामनेर तालुक्यातील लताबाई गायकवाड (वय ४५) या महिलेला सतत पोटात दुखणे, थकवा, वजन वाढणे आणि मासिक पाळीदरम्यान अतिरक्तस्राव होत असल्याचा त्रास होत होता. या लक्षणांमुळे तिचे दैनंदिन आयुष्य पूर्णपणे विस्कळीत झाले होते. प्राथमिक उपचार करूनही आराम न मिळाल्याने अखेर ती डॉ. उल्हास पाटील रुग्णालय, जळगाव येथे आली.

**अत्याधुनिक पद्धतीने शस्त्रक्रिया**

डॉ. उल्हास पाटील रूग्णालयातील स्त्रीरोग विभागप्रमुख डॉ. माया आर्विकर यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. वैभव पाटील, डॉ. करूणेश गुप्ता यांनी महिलेची तपासणी केली.

तपासणी केल्यानंतर तिच्या गर्भाशयात अनेक गाठी असल्याचे निदर्शनास आले. यातून ती अनेक शारीरिक त्रासांना सामोरी जात होती. वैद्यकीय निरीक्षणाखाली तिला दुर्बिणीद्वारे टीएलएच शस्त्रक्रियेचा सल्ला देण्यात आला.

ही शस्त्रक्रिया अत्यंत गुंतागुंतीची होती कारण गर्भाशयात अनेक गाठी होत्या आणि त्यांचा आकारही मोठा होता. मात्र आधुनिक उपकरणे आणि आमच्या टीमच्या सामूहिक प्रयत्नामुळे हे यश शक्य झाले. स्त्रियांमध्ये गर्भाशयाच्या गाठी हा एक सामान्य विकार आहे, मात्र तो वेळीच लक्षात घेतला नाही तर पुढील समस्या निर्माण होऊ शकतात. त्यामुळे पोटदुखी, अनियमित पाळी, अधिक रक्तस्राव असे लक्षणे दिसल्यास तत्काळ तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.



– डॉ.करूणेश गुप्ता
निवासी डॉक्टर

### काय आहे टीएलएच?

टीएलएच ही एक आधुनिक व अत्याधुनिक शस्त्रक्रिया पद्धत आहे, ज्यामध्ये संपूर्ण गर्भाशय दुर्बिणीच्या सहाय्याने काढला जातो. यामध्ये मोठी चिरा न घेता केवळ लहान छिद्रांद्वारे शस्त्रक्रिया केली जाते, त्यामुळे रक्तस्राव कमी होतो, वेदना कमी असतात आणि रुग्ण लवकर बरा होतो.



### १३ गाठी काढण्यात डॉक्टरांना यश

सव्वा तास चाललेल्या या शस्त्रक्रियेत महिलेच्या गर्भाशयातून १३ गाठी यशस्वीपणे काढण्यात आल्या. यापैकी काही गाठी मोठ्या आकाराच्या होत्या, ज्या इतर अवयवांवरही दाब देत होत्या. शस्त्रक्रिया पूर्णपणे यशस्वी ठरली असून रुग्णाची प्रकृती आता स्थिर आहे. ही शस्त्रक्रिया स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. वैभव पाटील, डॉ. करूणेश गुप्ता यांनी यशस्वी केली. भूलशास्त्र विभागाचे डॉ. महाजन यांच्यासह स्टाफचे सहकार्य लाभले.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आवाहनाला डॉ.उल्हास पाटील रूग्णालयाचा प्रतिसाद

#### सेवा का अभियानांतर्गत

## १५० हून अधिक रूग्णांची आरोग्य तपासणी; पहिल्याच दिवशी ३८ जणांची नोंदणी

**जळगाव – राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसाला समाजोपयोगी उपक्रम राबविण्याचे आवाहन करण्यात आले होते. या आवाहनाला डॉ. उल्हास पाटील रूग्णालयाने प्रतिसाद देत सेवा का अभियान या अतंर्गत २२ ते २४ जुलै या तीन दिवशी मोफत शस्त्रक्रियांचे आयोजन केले आहे. पहिल्याच दिवशी या अभियानाला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला असून ३८ जणांची शस्त्रक्रियेसाठी नोंदणी करण्यात आली आहे.**

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस मंगळवारी विविध समाजोपयोगी उपक्रमांनी साजरा करण्यात आला. मुख्यमंत्री फडणवीस यांनी केलेल्या आवाहनानुसार डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय रूग्णालयातर्फे तीन दिवस सेवा का अभियान म्हणून राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत शासकीय योजनेत न बसणाऱ्या सर्व शस्त्रक्रिया मोफत केल्या जात आहे.

अभियानाच्या पहिल्याच दिवशी १५० जणांची आरोग्य तपासणी करण्यात आली.त्यापैकी ३८ जणांची शस्त्रक्रियेसाठी नोंदणी करण्यात आली असून तज्ज्ञ डॉक्टरांकडून या रूग्णांवर विविध प्रकारच्या शस्त्रक्रिया मोफत केल्या जाणार आहेत. यात जनरल सर्जरी, हृदयविकार, कान-नाक-घसा, स्त्रीरोग, नेत्ररोग यासारख्या शस्त्रक्रियांचा समावेश आहे.

हे अभियान सुरू राहणार असून गरजू रूग्णांनी त्वरीत नावनोंदणी करून अभियानाचा लाभ घ्यावा असे आवाहन डॉ. उल्हास पाटील रूग्णालयातर्फे करण्यात आले आहे.



## सहा महिन्याच्या गर्भवतीवर आतड्यांच्या गुतांगुतीची शस्त्रक्रिया यशस्वी

**जळगाव – पोटात ६ महिन्याचे बाळ असलेल्या गर्भवतीला पडल्यामूळे आतडयांमध्ये गुतांगुत होउन अत्यावस्थ अवस्थेत डॉ.उल्हास पाटील रूग्णालयात दाखल करण्यात आले. तिच्यावर केलेली एक्सप्लोटरी लॅप्रोटॉमी शस्त्रक्रिया यशस्वी झाल्याने जिवदान मिळाले आहे.**



डॉ. उल्हास पाटील रुग्णालयात एका २५ वर्षीय गर्भवती महिलेला गंभीर स्थितीत दाखल करण्यात आले, जिच्या गर्भाशयात सुमारे ६ महिन्याचे बाळ आहे. घरात पोटावर पडल्याने पोटहीरडेपणा आणि लघवी व संडास विसर्जनात अडचण जाणवू लागली. प्राथमिक उपचारानंतर तिची सोनोग्राफी करण्यात आली, ज्यात आतडयांमध्ये अत्यंत किचकट गुंतागुंत आढळून आले. मार लागल्याने पोटात रक्तस्त्राव देखिल जास्त प्रमाणात झाला होता. तिला तात्काळ अतिदक्षता विभागात हलवण्यात आले व आई-बाळाच्या हालचालींवर लक्ष ठेवले जात होते. तिला नाकमार्गे नळी टाकण्यात आली होती.दोन दिवसानंतर लक्षात आले की, पोटातील विष्ठा नाकातल्या नळीतून बाहेर येऊ लागली आहे. ही अत्यंत चिंतेची गोष्ट असल्याने, परिपूर्ण तपासणी करून एक्प्लोरटरी लॅप्रोटॉमी पद्धतीने शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेण्यात आला. शल्यचिकीत्सा विभाग प्रमुख डॉ शिवाजी सादुलवाड यांच्या मार्गदर्शनानुसार सहायक डॉ. चैतन्य पाटील, डॉ श्वेता गाढवे,डॉ.सेहर हमदुले आणि डॉ.शार्दुल कांबळे, याचेसह भुलरोग तज्ञ डॉ. महाजन, डॉ सोनवणे यांच्या टीमने गर्भाशयावर कोणतीही परिणाम न होवू देता सुरक्षित पद्धतीने आतड्यांमधील गुंतागुंत यशस्वीपणे दूर केली.

शस्त्रक्रियेनंतर बाळ व आईच्या हालचाली व्यवस्थीत होत असतांना अचानक १८ तासांनंतर, बाळाने हालचाल थांबवली. दुर्दैवाने, ते गर्भाशयातच मृत स्थितीत असल्याचे सोनोग्राफीमध्ये स्पष्ट झाले. त्यानंतर, डॉ. हंसिया व डॉ. वैभव पाटील यांनी तातडीने सिझरचा निर्णय घेवून मृत बालकास सुरक्षित बाहेर काढले.

**डॉ. चैतन्य पाटील – एक्सप्लोरटरी लॅप्रोटॉमीनंतर परिस्थिती सुधारली होती, परंतु दुर्दैवाने ळाच्या एका अनपेक्षित मृत्यामुळे १८ तासातच सिझर करण्यासारखी परिस्थीती उदभवली पण स्त्री-रोग तज्ञांच्या योग्य व तीव्र वैद्यकीय प्रक्रियेमुळे आईचे जीवन वाचले आहे, अत्यंत गुंतागुंतीच्या स्थितीतही डॉक्टरांच्या एकात्मिक, तत्पर आणि उच्च कौशल्यावाचून, आईचे जीवन वाचवण्यात यश आले. पोटावर कुठला तरी प्रकारचा ट्रॉमा झाल्यास ताबडतो वैद्यकीय तपासणी आणि चर्चेसाठी तज्ज्ञांची मदत घेणे अत्यंत आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले.**



# असंसर्गजन्य आजारांच्या प्रतिबंध आणि उपचारांमध्ये पोषणाची भूमिका

## डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयाते जागतिक आहार तज्ञ डॉ.झिशान अली यांनी दिल्या महत्वाच्या टीप्स

**जळगाव – डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय जळगाव येथे इंडीयन सोसायटी ऑफ लाईफ स्टाईल मेडीसीन आयएसएलएम आणि फीजीशियन कमेटी और फॉर रिस्पॉसीबल मेडीसीन यांच्या सयुक्त विद्यमाने एम.बी.बी.एस च्या विदयार्थ्यासाठी असंसर्गजन्य आजारांच्या प्रतिबंध आणि उपचारामध्ये पोषणाची भुमिका या विषयावर जागतिक स्तरावरचे आहारतज्ञ डॉ. झिशान अली, वाशिंटन, अमेरिका यांचे व्याख्यान आयोजित केले होते.**



सुरूवातीला मान्यवरांचे स्वागत अनुक्रम अधिष्टाता डॉ. प्रशांत सोलुंके, डॉ.एन एस आर्विकर, आणि डॉ दिलीप ढेकळे यांनी शाल, श्रीफळ देऊन केले. मार्गदर्शन करतांना तज्ञांनी जुनाट व संसर्गजन्य नसलेला आजार जसे शुगर, उच्च रक्तदाब,कर्करोग इ. वर पूर्ण शाकाहार हा रामाण उपाय आहे. तसेच जेवणात तेल, साखर, दुधजन्य पदार्थ, प्राण्यापासून निर्मत कोणतेही पदार्थ न घेतल्यास आरोग्य उत्तम राहील. कृत्रिम रित्या तयार केलेली पदार्थ (जंकफुड), तळलेले पदार्थ इत्यादीचा वापर पूर्णपणे बंद करावा. आपल्या जीवनशैलीत आमुलाग्र बदल करून दारू, तंबाखू, स्निग्ध पदार्थ सेवन टाळावे. व संपूर्ण वनस्पतीजन्य पदार्थांचेच सेवन करावे.

या जिवनशैलीमुळे आपणास संसर्गजन्य नसलेले कर्करोग, उच्चरक्तदा, मधुमेह आणि ह्दयविकार इ. पासुन आपले संरक्षण होईल. डॉ. योगीता बावसकर, आहारतज्ञ जळगाव व डॉ. नितिन नांदुरकर, इंडीयन सोसायटी ऑफ लाईफ स्टाईल चे सदश्य यांचे सुद्धा संपूर्ण वनस्पती जन्य (डब्ल्युपीबीडी) पदार्थाच्या सेवनाचे फायदे विषद केले. सदर व्याखानास डॉ. उल्हास पाटील वैदयकीय महा विदयालयाचे प्राध्यापक, पदव्युत्तर व एम.बी.बी.एस चे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमानंतर इंडीयन सोसायटी ऑफ लाईफस्टाईल मेडीसील (आयएसएलएम्) च्या वतीने संपूर्ण वनस्पतीजन्य पदार्थापासून बनविलेले पदार्थ भोजनाची प्रा. व विदयार्थ्यांसाठी व्यवस्था करण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहा प्रा विजय मोरे, डॉ. गिरिश उगले आणि डॉ. गोविंद पाटील यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार श्री. सुरकान सिध्दकी यांनी मानले.

## डॉ.उल्हास पाटील होमीओपॅथी महाविद्यालयात वृक्षारोपण

**जळगाव – येथील डॉ.उल्हास पाटील होमीओपॅथी महाविद्यालयात वृक्षारोपण सप्ताह साजरा करण्यात आला. या सप्ताहाचा समारोप दि १५ रोजी वृक्षारोपण मोहीम राबवत करण्यात आला.**

यावेळी प्राचार्य डॉ राकेशकुमार मिश्रा, प्रा.डॉ. विपुल शिलाहार, प्रा डॉ. पंकज शर्मा, प्रा. डॉ. जया सरकार, प्रा.डॉ. संदीप समांता, प्रा. डॉ. भुषण वानखेडे, डॉ. वैष्णवी बऱ्हाडे, डॉ. श्रेया मनवाणी, राजीव जामोदकर, ललीत महाजन, राहूल वैदय, तारकेश भंगाळे, जयमाला राणे, समाधान गायके, इर्टन आणि इतर वैद्यकिय तज्ञ उपस्थीत होते. यावेळी परिसरात ६० वृक्षाचे रोपण करण्यात आले. यावेळी प्राचार्य मिश्रा यांनी विद्यार्थ्यांना वृक्षाचे संगोपन करण्याची शपथ दिली.






## माजी विद्यार्थी किशोर पाटील यांचे गोदावरी अभियांत्रिकीत स्वागत

**जळगाव – येथील गोदावरी अभियांत्रिकीच्या २०१७ च्या बॅचो माजी विद्यार्थी किशोर पाटील यांनी भेट दिली. यावेळी महाविद्यालयातर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला.**

गोदावरी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगला इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग २०१७ च्या बॅचचे माजी विद्यार्थी अदानी ग्रीन एनर्जी लिमिटेडचे उपव्यवस्थापक (प्रकल्प) कार्यरत असलेले किशोर शांताराम पाटील यांनी आज गोदावरीला भेट दिली. यावेळी त्यांनी पदवी प्राप्त केल्यापासूनच्या त्यांच्या व्यावसायिक प्रवासाबद्दल आणि अनुभवांबद्दल मौल्यवान माहिती दिली. या भेटीचे मा प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील, डॉ. हेमंत इंगळे शैक्षणिक डीन, प्रा. महेश एच. पाटील इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभागाचे प्रमुख, डॉ. अतुल ए. बर्हाटे, संयोजक, आयआयसी, प्रा. हरीश ए. पाटील, प्रा. नेमीचंद सैनी यांनी खूप कौतुक केले. या भेटीमुळे करिअरच्या मार्गांबद्दल प्रयत्न करण्याची प्रेरणा मिळाली.

### डॉ.उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालयास भेट

## गोदावरी स्कुलच्या विद्यार्थ्यांनी घेतली शरीरशास्त्राची माहिती

**जळगाव – इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांची डॉ.उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयतील शरीरशास्त्र ॲनाटॉमी डिपार्टमेंटला शैक्षणिक भेट देत अवयवांची माहिती घेतली.**

या भेटीचे मुख्य उद्दिष्ट विद्यार्थ्यांना मानवी शरीररचनेचे प्रत्यक्ष ज्ञान देणे व वैद्यकीय क्षेत्रातील संधींची ओळख करून देणे हे होते. विद्यार्थ्यांना ॲनाटॉमी विभागातील विविध संरचना, मानवी अवयवांचे प्रत्यक्ष नमुने, हाडांची रचना व कार्यपद्धती यांची माहिती देण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी उत्साहाने प्रश्न विचारले व वैद्यकीय अभ्यासक्रमांबद्दल सखोल माहिती घेतली.या विभागाच्या प्रमुख शुभांगी घुले मॅडम उपस्थित होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांना विज्ञान व वैद्यकीय क्षेत्रातील महत्त्व स्पष्ट करून, मेहनत, सातत्य आणि चिकाटी यांच्या जोरावर यश मिळवता येते, असे सांगितले. यासोबतच महाविद्यालयातील अनुभवी प्राध्यापक आणि वैद्यकीय तज्ञांनी देखील विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांना प्रेरणा दिली.




या शैक्षणिक भेटीमुळे विद्यार्थ्यांमध्ये शास्त्रीय जिज्ञासा, वैद्यकीय शिक्षणाविषयी रुची आणि करिअरबाबत जागरूकता निर्माण झाली. शाळेच्या प्राचार्य सौ नीलिमा चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली विज्ञान शाखेच्या प्रमुख प्रिया चौधरी व टीमतर्फे हा उपक्रम राबवण्यात आला.शिक्षकवृंद आणि पालकांनी या उपक्रमाचे कौतुक करत अशाच शैक्षणिक उपक्रमांचे भविष्यात आयोजन व्हावे अशी अपेक्षा व्यक्त केली.



## सुश्रुत जयंती उत्साहात साजरी

**जळगाव– गोदावरी फाउंडेशन संचलित डॉ गुणवंतराव सरोदे आयुर्वेद मेडिकल कॉलेज, हॉस्पिटल आणि रिसर्च सेंटर, जळगाव येथे आज सुश्रुत जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.**

या प्रसंगी महाविद्यालयाचे डीन डॉ. हर्षल बोरोले यांनी विद्यार्थ्यांना आणि उपस्थितांना संबोधित करताना आयुर्वेदातील शल्यतंत्राचे जनक म्हणून ओळखले जाणारे आचार्य सुश्रुत यांचे आयुष्य, कार्य आणि योगदान याविषयी सविस्तर माहिती दिली. त्यांनी सांगितले की, सुश्रुतांनी शल्यचिकित्सा (सर्जरी) क्षेत्रात भरीव कामगिरी केली असून त्यांचे सुश्रुतसंहिता हे ग्रंथ आजही वैद्यकीय क्षेत्रात आदराने पाहिले जाते.या कार्यक्रमात महाविद्यालयातील सर्व शिक्षक, विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून सुश्रुतांच्या कार्याला अभिवादन केले. कार्यक्रमाच्या शेवटी सुश्रुतांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांचे स्मरण करण्यात आले.

## होमीओपॅथीक महाविद्यालयात चार्ट स्पर्धेत फुटे, पोटे विजेते

**जळगाव – येथील डॉ.उल्हास पाटील होमीओपॅथीक वैद्यकिय महाविद्यालय येथे नुकतीच चार्ट स्पर्धा उत्साहात संपन्न झाली यात वैष्णवी कुटे आणि अपुर्वा पोटे यांनी विजेतेपद पटकावले.**

स्पर्धेचे उदघाटन प्राचार्य डॉ. आर के मिश्रा यांचे हस्ते फित कापून करण्यात आले. यावेळी त्यांच्या सोबत डॉ. पंकज शर्मा, डॉ संदीप समांता, डॉ. विपुल शिलाहार, डॉ. कुणाल फेगडे, प्रशासकीय अधिकारी राजीव जामोदकर, ललीत महाजन यांचेसह प्राध्यापक व कर्मचारी वर्ग उपस्थीत होते. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना अशा स्पर्धेतून वाव मिळतो त्यामूळे सहभाग महत्वाचा असे प्राचार्य मिश्रा यांनी सांगितले.

या स्पर्धेत ४५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत ३० चार्ट सादर केले यात वैष्णवी कुटे आणि अपुर्वा पोटे यांनी प्रथम तर व्दीतीय दर्शन महाजन, तृतीय सुशरा शेख, सानिया खान, रोहीना बेग, सानिया शेख, चतृर्थ मुणाल डांगे, साक्षी कुटे आणि नमीता फासे यांना विभागून देण्यात आले. फार्मसी विभाग डॉ. पंकज शर्मा यांच्या मार्गदर्शनानुसार डॉ. गणेश महाजन, डॉ. मोहीनी, डॉ श्वेता, डॉ महेश यांनी यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. डॉ शर्मा यांनी आभार प्रदर्शन केले. समारोप विजेत्यांचा सन्मान चिन्हे देवून सत्कार करण्यात आला.



## ऑक्झिलरी नर्सिंग मिडवाइफ [ANM] म्हणजे काय?

**ANM म्हणजे ऑक्झिलरी नर्सिंग मिडवाइफ, जो एक दोन वर्षांचा व्यावसायिक नर्सिंग अभ्यासक्रम आहे. या कोर्समधून विद्यार्थ्यांना आरोग्य सेवेशी संबंधित प्राथमिक ज्ञान, प्रसूतिसेवाशास्त्र, लसीकरण, बालसंवर्धन, माता व बाल आरोग्य, प्राथमिक उपचार, आरोग्य शिक्षण इत्यादींचे प्रशिक्षण दिले जाते.**

### ANM कोर्स का निवडावा?

**१. सेवाभावाची संधी:**
ANM कोर्समुळे आपल्याला समाजात आरोग्यसेवा देण्याची आणि गरजू लोकांची काळजी घेण्याची संधी मिळते. हे क्षेत्र सामाजिक दृष्टीने पूजनीय मानले जाते.

**२. जलद करिअर प्रारंभ:**
दोन वर्षांच्या कालावधीत हे शिक्षण पूर्ण झाल्यावर लगेच नोकरीच्या संधी उपलब्ध होतात. त्यामुळे अल्प कालावधीत करिअर सुरू करण्याची उत्तम संधी मिळते.

**३. शासकीय व खाजगी क्षेत्रात संधी:**
ANM पूर्ण केल्यानंतर सरकारी रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे, खाजगी रुग्णालये, छत्रछ्ज, अंगणवाडी, आशा कार्यकर्ता म्हणून काम करण्याची संधी उपलब्ध होते.



**४. महिला सक्षमीकरण:**
ग्रामीण व निमशहरी भागातील मुलींना स्वावलंबी बनवण्याचे हे एक प्रभावी माध्यम आहे. आरोग्यसेवा क्षेत्रात काम करत असताना त्यांचे आत्मभान वाढते व समाजात मान मिळतो.

**५. उच्च शिक्षणाची वाट मोकळी:**
ANM नंतर विद्यार्थी GNM (General Nursing and Midwifery) किंवा B.Sc. Nursing सारख्या उच्च अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेऊ शकतात. त्यामुळे करिअर ग्रोथसाठीही हा कोर्स आधार ठरतो.

**६. उत्तम रोजगार सुरक्षा व स्थिरता:**
आरोग्यसेवा क्षेत्र हे सतत विकसित होत असलेले क्षेत्र आहे. त्यामुळे या क्षेत्रातील नोकऱ्यांमध्ये स्थिरता व सुरक्षा असते.

**निष्कर्ष:**
ANM अभ्यासक्रम हा केवळ करिअरसाठी नाही, तर समाजसेवा आणि स्त्री सक्षमीकरणाच्या दिशेने एक महत्त्वाचा टप्पा आहे. ज्यांना लवकर नोकरी मिळवायची आहे, सामाजिक कार्याची आवड आहे, आणि आरोग्यसेवेमध्ये करिअर घडवायचे आहे, त्यांनी ANM कोर्सचा पर्याय नक्की निवडावा.

–प्रविण कोल्हे
प्रशासकीय अधिकारी
गोदावरी नर्सिंग कॉलेज, जळगाव खु.

# मद्यपी रूग्णांची समुपदेशनातून व्यसनमुक्तीकडे वाटचाल

## डॉ. उल्हास पाटील रूग्णालयात मानसोपचार विभागाच्या संकल्प व्यसनमुक्ती केंद्राचा उपक्रम यशस्वी

**जळगाव : डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, जळगाव येथील मानसोपचार विभाग आणि संकल्प व्यसनमुक्ती केंद्रामार्फत राबविण्यात येणारा व्यसनमुक्ती उपक्रम उल्लेखनीय ठरत आहे. गेल्या एका महिन्यात या केंद्रात ७५ मद्यपी रूग्णांना प्रभावी समुपदेशनाच्या माध्यमातून व्यसनमुक्तीकडे यशस्वी वळवण्यात आले आहे.**



या उपक्रमांतर्गत दर आठवड्याला रुग्णांचे एकत्रिकरण करून सामूहिक समुपदेशनाचे सत्र घेतले जातात. यामध्ये रूग्णांना मद्यपानाचे दुष्परिणाम, आरोग्यावर होणारे घातक परिणाम, कौटुंबिक जीवनातील अडचणी यांची सखोल माहिती दिली जाते. समुपदेशनादरम्यान रूग्णांच्या मानसिक स्थितीचा अभ्यास करून त्यानुसार योग्य ती वैद्यकीय व मानसिक मदत पुरवली जाते.विशेष प्रशिक्षित मानसोपचारतज्ज्ञ, समुपदेशक, सामाजिक कार्यकर्ते आणि वैद्यकीय अधिकारी यांच्या टीममार्फत या रुग्णांना वैयक्तिक व सामूहिक पातळीवर मार्गदर्शन केले जाते.

व्यसनाधीनतेमुळे त्रस्त रुग्णांसाठी हे केंद्र आशेचा किरण ठरले आहे. यामध्ये केवळ रूग्णच नव्हे तर त्यांच्या कुटुंबीयांनाही समुपदेशनातून समज आणि पाठिंबा दिला जातो. संकल्प व्यसनमुक्ती केंद्रामध्ये केवळ उपचार न देता प्रेरणादायी व्हिडीओ, ध्यानधारणा, योग आणि सकारात्मक विचारसरणीच्या कार्यशाळांद्वारे रुग्णांच्या मानसिक सशक्तीकरणावर भर दिला जातो.

अनेक रुग्णांनी आपल्या अनुभवांमध्ये सांगितले की, समुपदेशनामुळे आपल्याला नवीन दृष्टीकोन मिळाला असून, आता व्यसनमुक्त जीवन जगण्याची उमेद निर्माण झाली आहे. केवळ औषधांनी नाही तर समुपदेशन, कुटुंबाचा आधार आणि मानसिक बळकटतेने रुग्णांचे आयुष्य बदलू शकते. या उपक्रमामुळे जिल्ह्यातील अनेक कुटुंबांना व्यसनामुळे आलेली दुःखे दूर होण्याची संधी मिळत आहे. डॉ. उल्हास पाटील रूग्णालयाच्या या सामाजिक उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. भविष्यात आणखी रूग्णांपर्यंत हा उपक्रम पोहोचवण्याचे लक्ष्य मानसोपचार विभागाने ठेवले आहे.



# सेवा का अभियान तरूणासाठी ठरले नवसंजीवनी

### विष प्राशन केलेल्या रूग्णावर मेडीसीन विभागाकडून यशस्वी उपचार

**जळगाव – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय रूग्णालयातर्फे सेवा का अभियान आयोजित करण्यात आले होते. हे अभियान विश प्राशन केलेल्या तरूणासाठी नवसंजीवनीच ठरले. डॉ. उल्हास पाटील रूग्णालयातील मेडीसीन विभागातील तज्ज्ञांनी रूग्णावर यशस्वी उपचार केले.**

याबाबत सविस्तर माहिती अशी की, पारोळा तालुक्यातील टिटवी येथील विलास राठोड (वय १९) हा तरूण शेती करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवितो. ९ जुलै रोजी काही तरी कारणाने त्याने ऑर्गेनो फॉस्फेट नावाचे किटक नाशक विषारी द्रवपदार्थ प्राशन केले होते. त्यामुळे त्याची प्रकृती बिघडली. त्याला तातडीने डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय रूग्णालयात दाखल करण्यात आले. रूग्णाची परीस्थिती लक्षात घेता त्याला तातडीने अतिदक्षता विभागात उपचारासाठी भरती करण्यात आले. त्याची तपासणी केली असता विश प्राशन करून चार तास उलटूनही त्याचे पोट रिकामे करण्यात आले नव्हते. अखेर एमआयसीयू विभागप्रमुख डॉ. चंद्रय्या कांते यांच्या मार्गदर्शनाखालील टिमने क्षणाचाही विलंब न करता तरूणावर उपचार सुरू केले. त्याने प्राशन केलेले विषारी द्रव पदार्थ काढण्यासाठी शर्थीचे प्रयत्न करण्यात आले. विष प्राशनामुळे त्याचे हात-पाय थरथरत होते, त्याला उलट्या होऊन तो अत्यवस्थ झाला होता. ही सारी परीस्थिती लक्षात घेता मेडीसीन विभागातील तज्ज्ञांच्या टीमने उपचार सुरूच ठेवले. अवघ्या दोन दिवसात ह्या तरूणाची प्रकृती धोक्याबाहेर आली. त्यानंतर त्याच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू ठेवून मानसोपचार विभागातील तज्ज्ञांकडून त्याचे समुपदेशन करण्यात आले. मेडीसीन विभागातील तज्ज्ञांच्या टिमचे प्रयत्न आणि सेवा का अभियान यामुळे तरूणाला पुन्हा जिवदान मिळाले.

**यांनी केले उपचार**

मेडीसीन तज्ज्ञ डॉ. चंद्रय्या कांते यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. पुजा तत्रीवार, डॉ. तेजस खैरनार, डॉ. ललीतकुमार, डॉ. आसावरी देशपांडे, डॉ. सई पाटील, डॉ. आकाश पवार, डॉ. सौरव मुळे, डॉ. हर्ष त्रिपाठी, डॉ. सचिन संगपवाड, डॉ. विनय बुराडकर, डॉ. अभिषेक चोपकर यांनी रूग्णावर यशस्वी उपचार केले.

### डॉ.उल्हास पाटील रूग्णालयात

# एंडोस्कोपी, कोलोनोस्कोपी अल्पदरात


### पचनसंस्थेशी विकारांवर लवकर निदान करणे झाले शक्य

**जळगाव – डॉ.उल्हास पाटील वैद्यकिय रूग्णालयामध्ये एंडोस्कोपी आणि कोलोनोस्कोपी आता कमी दरात उपलब्ध आहेत. या तपासण्यांसाठी लागणारा खर्च कमी झाल्यामुळे, लोकांना आता आरोग्य सुविधा घेणे सोपे झाले आहे.**

**एंडोस्कोपी आणि कोलोनोस्कोपी काय आहे?**

**एंडोस्कोपी:** ही एक वैद्यकिय प्रक्रिया आहे, ज्यामध्ये कॅमेरा असलेली एक पातळ, लवचिक ट्यूब (एंडोस्कोप) शरीरात टाकली जाते. यामुळे डॉक्टरांना शरीराच्या आतले अवयव तपासता येतात.

**कोलोनोस्कोपी:** ही एक प्रकारची एंडोस्कोपी आहे, जी मोठ्या आतड्याची (




कोलन) तपासणी करण्यासाठी वापरली जाते. यात एंडोस्कोप गुदद्वारातून आत टाकला जातो.

या दोन्ही प्रक्रिया पचनसंस्थेशी संबंधित समस्यांचे निदान आणि उपचारांसाठी महत्त्वाच्या आहेत.

या तपासण्यांसाठी जास्त पैसे मोजावे लागणार नाहीत,एंडोस्कोपी आणि कोलोनोस्कोपी सारख्या तपासण्या कमी दरात उपलब्ध होत आहेत. यामुळे लोकांना आरोग्य सेवा घेणे सोपे झाले आहे.

**फायदे**

कमी दरात एंडोस्कोपी आणि कोलोनोस्कोपी उपलब्ध असल्याने, पोटाच्या समस्या असणाऱ्या लोकांना लवकर निदान आणि उपचार मिळण्यास मदत होईल.

या तपासण्यांमुळे आतड्यांसंबंधी कर्करोग, अल्सर आणि इतर आजारांचे लवकर निदान होऊ शकते. रूग्णांना जास्त दिवस ॲडमिट राहायची गरज राहत नाही. कोणत्याही शस्त्रक्रियेविना निदान करणे शक्य होते.

## शालेय क्रीडा स्पर्धांचे अद्ययावत नियम शिबिर उत्साहात

**जळगाव – जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा संघटनांचा महासंघ, जिल्हा शारीरिक शिक्षण व क्रीडा शिक्षक महासंघ आणि मु. जे. महाविद्यालय, जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने शालेय क्रीडा स्पर्धांचे अद्ययावत नियम शिबिर उत्साहात संपन्न झाले.**

मु. जे. महाविद्यालयाच्या सभागृहात पार पडलेल्या या शिबिराचे उद्घाटन जिल्हा क्रीडा संघटना महासंघाचे अध्यक्ष आमदार प्रा. चंद्रकांत सोनवणे यांच्या हस्ते खाशाबा जाधव व मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन, माल्यार्पण आणि दीपप्रज्वलन करून झाले.

या वेळी प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा क्रीडा अधिकारी रविंद्र नाईक, प्राचार्य डॉ. अरविंद राणे, प्रा. आर.बी. ठाकरे, डॉ. श्रीकृष्ण बेलोरकर, डॉ. प्रदीप तळवलकर, राजेश जाधव, विभागीय क्रीडा शिक्षक महासंघाचे अध्यक्ष प्रशांत कोल्हे, मनभावन रेडिओचे अमोल देशमुख, मंगेश भोईटे, तालुका क्रीडा अधिकारी नितीन जंगम यांची उपस्थिती होती.



**डॉ. प्रेमचंद पंडित**
(९४२२९१५३७९)
(निवृत्त सिव्हील सर्जन, बुलडाणा)
वैद्यकीय अधीक्षक
डॉ.उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय, जळगाव

1. Make your goals specific, meaningful, action-guided, rewarding, and time-well-spent for exponential results.
2. Start each day by reconnecting with your end goal.
3. Set daily intentions connecting each task to your mission and values.
4. Make one small promise to yourself each day then keep it.
5. When commitment becomes collective, follow-through accelerates and shared momentum drives performance further.
6. Habit-driven approach, though small consistent actions, makes excellence repeatable.
7. Discipline is about removing friction so that success becomes the path of least resistance.

१.अपने लक्ष्यों को विशिष्ट, अर्थपूर्ण, क्रियात्मक, पुरस्कार देने वाले और समय-सार्थक बनाएं ताकि असाधारण परिणाम मिल सकें।
२. हर दिन की शुरुआत अपने अंतिम लक्ष्य से पुनः जुड़ने से करें।
३. प्रत्येक कार्य को अपने मिशन और मूल्यों से जोड़ते हुए दैनिक संकल्प निर्धारित करें।
४. हर दिन अपने आप से एक छोटा वादा करें और उसे निभाएं।
५. जब प्रतिबद्धता सामूहिक बन जाती है, तो उसका पालन तीव्र हो जाता है और साझा गति प्रदर्शन को और आगे बढ़ाती है।
६. आदत-आधारित दृष्टिकोण, यानि छोटे लेकिन निरंतर कार्य, उत्कृष्टता को दोहराने योग्य बनाते हैं।
७.अनुशासन का अर्थ है रुकावटों को हटाना ताकि सफलता सबसे कम विरोध का मार्ग बन जाए।

# जळगावकरांना मिळणार नवी खाऊ गल्ली... नवा स्वाद अनुभव...!

## पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते 'बहिणाबाई मार्ट'चे उद्घाटन

**जळगाव – जळगाव शहरातील राजकमल टॉकीजजवळ जिल्हा परिषद बचत भवन इमारतीत 'बहिणाबाई मार्ट' या विशेष प्रकल्पाचे आज जल्लोषात उद्घाटन करण्यात आले. पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते हा लोकोपयोगी प्रकल्प आज जनतेच्या सेवेत दाखल झाला.**

या प्रकल्पाअंतर्गत जळगावातील नागरिकांना आता वर्षभर महिला बचत गटांनी बनवलेली उत्पादने खरेदी करता येणार असून, त्याचबरोबर पारंपरिक चविष्ट खाद्यपदार्थांचा आस्वाद घेण्याचीही संधी मिळणार आहे. महिला बचत गटांच्या आर्थिक स्वावलंबनाचे हे नवे पर्व आहे. बहिणाबाई मार्ट आणि खाऊ गल्लीच्या माध्यमातून ग्रामीण महिलांना बारमाही उत्पन्नाचा स्रोत मिळेल आणि त्यांच्या कलेला हक्काचे व्यासपीठ मिळेल, असे उद्गार पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी यावेळी काढले. लवकरच या मार्टमध्ये 'खाऊ गल्ली' कार्यान्वित होणार असल्याची माहितीही पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी यावेळी दिली.

कार्यक्रमाला जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल, अपर मुख्य कार्यकारी अधिकारी रणधीर सूर्यवंशी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक राजू लोखंडे, तसेच माजी महापौर विष्णू भंगाळे उपस्थित होते.

जिल्ह्यात सध्या ३१ हजार महिला बचत गट कार्यरत असून, त्यांचे ६७ प्रभाग संघ आहेत. सरस प्रदर्शनाच्या माध्यमातून आजवर गटांच्या उत्पादनांची विक्री होत होती. मात्र, त्याला बारमाही आणि स्थायी बाजारपेठ मिळावी या हेतूने पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या संकल्पनेतून 'बहिणाबाई मार्केट' उपक्रमाचा प्रारंभ झाला. या व्यतिरिक्त जिल्हा नियोजन समितीमार्फत जिल्ह्यात विविध ठिकाणी २० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून, जिल्हाभरात १०




ठिकाणी बहिणाबाई मार्केटसाठी भूमिपूजन पार पडले आहे. यासाठी अनेक ठिकाणी कामास सुरुवातही झाली असून, काही ठिकाणी लवकरच हे मार्केट सुरू होणार आहे.शहराच्या मध्यभागी असलेल्या कोंबडी मार्केट इमारतीतील २० गाळ्यांमध्ये हे बहिणाबाई मार्ट कार्यरत करण्यात आले आहे. हे गाळे प्रभाग संघ निहाय अदलाबदल करून वापरण्याची सुविधा असून, नाममात्र भाडे आकारले जाईल.